विषय :- मा.महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती व नगरसेवक निधीतून सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या नऊ कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १८५ दिनांक :- ५.१.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
| --- | --- | --- |
| १. | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र.४९ मध्ये गुरूतेजबहादुर नगर येथील शौचालय दुरूस्ती व सिमेंट पायवाटा बनवणे. (नगरसेवक निधीतून) | रू. ९९,०००/- |
| २. | उल्हासनगर ३ येथील प्रभाग क्र.४० मध्ये मिस्त्री यांच्या घरापासुन अप्पा यांच्या घरापर्यंत एम.२५० ने रस्ता बांधणे. (नगरसेवक निधीतून) | रू.१,९९,९५०/- |
| १. | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र.११ मध्ये अण्णाभाऊ साठे प्रवेशव्दाराचा भाग ते राजाई सोसायटी (प्रिती सोसायटी समोर) एम.२५० ने रस्ता बांधणे. (नगरसेवक निधीतून) | रू.१,९९,९००/- |

--१०--

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
| --- | --- | --- |
| २. | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र.४० मध्ये विविध ठिकाणी शौचालय दुरूस्ती करणे. (मा.महापौर निधीतून) | रू.४९,९००/- |

३. उल्हासनगर -३ येथील प्रभाग क्र ४० मध्ये कमल आटो गॅरेज जवळील तुलसी ट्रेडिंग कंपनी पर्यंत सी.सी.पायवाटा बांधणे. (नगरसेवक निधीतून) — रू.४९,९००/-

४. उल्हासनगर -२ येथील प्रभाग क्र.७ मध्ये हनुमाननगर (सुरेंद्र पान हाऊस),द्रौपदी जैसवाल (रमाबाई आंबेडकर नगर)येथील डब्लु बी.एम.ने रस्ता बनविणे.(मा.महापौर निधीतून) — रू.१,००,०००/-

५. उल्हासनगर येथील प्रभाग क्र६६ मध्ये मोहनदास दवाखाना राधेश्याम दरबार जवळ आणि विविध ठिकाणी शौचालय दुरूस्ती करणे.(मा.महापौर निधीतून) — रू.७०,०००/-

६. उल्हासनगर -३ येथील उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे जागी कारंजे उभारणे व जुना प्लास्टर ऑफ पॅरीसचा पुतळा काढुन त्याजागी ब्रॉझचा पुतळा बसविणे. (मा.उपमहापौर निधीतून) — रू.१,९२,०००/-

७. उल्हासनगर ३ येथील प्र.क्र.१३ मध्ये सम्राट अशोक नगर येथील सिध्दार्थ बालवाडी व शिंदे वायरमन यांच्या घरासमोरील शौचालय आयोध्यानगर येथील शौचालय व पायवाटा दुरूस्तीकरणे. (नगरसेवक निधीतून) — रू.१,९९,०००/-

---

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका
--११--

श्री. सोनाळे (उपआयुक्त) :-आयत्त्यावेळच्या विषयान्वये एक प्रस्ताव चर्चेस आणलेला आहे.

*<u>मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी :-</u> उपआयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयाअन्वये चर्चेस आणलेला प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असून तो सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

*<u>आयत्त्यावेळचा विषय :-</u>*

*<u>विषय :-</u> एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत गोलमैदान पुनम अपार्टमेंट ते गांधी बंगलो रस्त्यावर मार्ग प्रकाशसाठी रस्त्यादरम्यान आलेले खांब (विजेचे) त्वरीत काढणे व एकाबाजुस नविन खांब बसविण्यासाठी बनविलेल्या प्राकलनास मंजुरी <u>बाबत.</u>*

*<u>प्रस्तावना :-</u>*

*महानगरपालिकेने एकात्मिक रस्तेविकास कार्यक्रमांतर्गत गोलमैदान पुनम अपार्टमेंट ते गांधी बंगलो पर्यंत रस्ता रूंदीकरण केलेला असून तिथे मार्ग प्रकाशसाठी लावलेले खांब रस्त्याच्या दरम्यान आलेले आहेत. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने ते खांब त्वरीत काढण्यासाठी विद्युत विभागाला सांगीतलेले आहे. नाही तर त्याचे काम पुरे होऊ शकत नाही.*

*सदर काम जर त्वरीत काढले तर त्या मार्गात पुर्ण अंधार होईल त्यामुळे सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने अगोदर एका बाजुस खांब बसवून ते काम चालु करून मग दरम्यानचे खांब काढणे रास्त राहील जे काही तेथुन निघालेले जुने सामान कामात येईल. ते धरून यासाठी रू.३ ,०४ ,०००/-चे प्राकलन बनविलेले आहे.*

*मुख्यलेखा अधिकारी यांनी निकड तपासुन निर्णय घेणे योग्य राहील व मुख्य लेखा परिक्षक यांनी सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने परिस्थिती लक्षात घेता प्रस्ताव मान्य करण्यास हरकत नाही असे मत दिलेले आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याने दर्शविलेल्या तातडी पहाता सदर प्राकलनाला प्रशासकीय व वित्तिय मान्यता देऊन कामाची निकड पहाता मजुर कामगार संस्थेमार्फत हे काम करून घेण्याची संधी मंजुरीसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित आहे व हा विषय दिनांक ५.१.२००१ च्या स्थायी समितीच्या सुचीवर नुसनही आयत्त्यावेळचा विषय म्हणुन घेण्यात यावा हि विनंती.*

*<u>स्थायी समिती ठराव क्र. १८६</u>* *<u>दि:-५.१.२००१.</u>*

*<u>सुचकाचे नाव :- श्री. रामचंद्र पारवानी.</u>*

*<u>अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.</u>*

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत पुनम अपार्टमेंट ते गांधी बंगलो या रस्त्यावर मध्ये आलेले विजेचे खांब काढुन रस्त्याच्या एका बाजुस नविन खांब बसविण्या कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्त्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संथेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५. ०५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-२५.१.२००१.

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक २५.१.२००१ रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शाविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती.कुंदनानी लविना | सदस्या |
| २ | श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |

३ श्री. चव्हाण रमेश सदस्य
४. श्री.पारवानी रामचंद सदस्य
५. श्री.पंजाबी नारायण सदस्य
६. श्री.बहरानी ठाकुरदास सदस्य
७. श्री. भांडे भगवान सदस्य
८. श्री.टाले प्रमोद सदस्य
९ श्री.तलरेजा विनोद सदस्य
१० श्री.तेजी कैलास सदस्य
११ श्रीमती.राजानी भारती सदस्या
१२ श्री. किशोर वनवारी सदस्य

तर

१)श्री.कुमार आयलानी २) श्री. चौधरी राजेंद्र ३) श्री.पद्मा वलेचा हे सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्या.

मा.सचिव :- विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. ५.१.२००१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- दि ५.१.२००१ रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिव :- विषय क्र.२ वाचून दाखवितात.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- . नगरसेवक निधीतून व इतर निधीतून जलवाहिनी टाकणे कामीच्या ५ प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देणे बाबत.



स्थायी समिती ठराव क्र.१८७ दिनांक :- २५.१.२००१.

सुचकाचे नाव :- श्री.रमेश चव्हाण.

अनुमोदकाचे नाव :- श्री.नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|

------------------------------------------------------------

| | |
|---|---|
| १. उल्हासनगर-२ येथील प्रभाग क्र६७ मध्ये सतनाम कॉलनी मध्ये ५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे. (नगरसेवक निधीतून) | रू. ६४,१४२/- |
| २. उल्हासनगर ४ येथील प्रभाग क्र१६ मध्ये मालेश्वर निवास ते राजु वंजारी निवास समता नगर येथे ५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे. (नगरसेवक निधीतून) | रू८०,०००/- |
| ३. उल्हासनगर-१ येथील प्रभाग क्र३३ मध्ये आनंद नगर, मुतूनगर करिता ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे. (नगरसेवक निधीतून) | रू१,७३,२००/- |
| ४. उल्हासनगर-३ येथे फायर ब्रिगेड स्टेशन करिता महाराष्ट्र मोटर्स कॅरियर ते फायर ब्रिगेड स्टेशन पर्यंत ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे. | रू७९,४००/- |
| १. उल्हासनगर ५,वार्ड क्र४६ मध्ये रोड आयलंड व बगिच्या करिता २५ व ५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे. (नगरसेवक निधीतून) | रू१,०३,४०५/- |

------------------------------------------------------------

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने मंजुर.**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका
--३--

**मा.सचिव :-**विषय क्र३ वाचुन दाखवितात.

**मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी** :- हा प्रस्ताव समंत केला जावा.

**श्री.किशोर वनवारी :-** आयुक्त साहेब, आपणासाठी गाडीचा हा प्रस्ताव आहे ना? आम्ही, या गाडीत आपणास पाहु इच्छित आहोत, इतर कुणाला नाही.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मा.आयुक्तांकरिता नविन वाहन खरेदी करणे कामी आयुक्तांना मे. हिंदुस्थान मोटर्स लि. यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिका आयुक्तांकरिता नवीन वाहन खरेदी करणे आवश्यक आहे. सदर खरेदीकामी सन २०००-२००१ च्या अंदाजपत्रकात रूपये ५ लाखांची तरतुद देखिल शिल्लक आहे. सदर कार ॲम्बेसेडर क्लासिक १८०० आयएसझेड बीयुएसी एमपीएफआय शासनमान्य दरानुसार उत्पादक मे. हिंदुस्तान मोटर्स यांच्याकडुन रू. ४,११,१९८/- एवढया किंमतीस निविदा न मागविता खरेदी केल्यास महापालिकेच्या हिताचे होईल.

सदर बाबी लक्षात घेऊन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या प्रकरण ५ चे कलम २ (२)अंतर्गत सदर वाहन खरेदी करण्या करिता रूपये ४,११,१९८/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देऊन उत्पादक मे. हिंन्दुस्तान मोटर्स लि. यांचेकडुन थेट खरेदी करण्याची मंजुरी मिळण्यासाठी स्थायी समिती पुढे सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १८८ दि:-२५.१.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

श्री.रामचंद्र पारवानी.

अनुमोदकाचे नाव :- श्री.नारायण पंजाबी.

श्री.विनोद तलरेजा

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या आयुक्तांकरिता नविन वाहन ॲम्बेसेडर क्लासिक १८०० आय.एस.झेड बी.यु.ए.सी एम.पी.एफ.आय. मॉडेल शासन मान्य दरानुसार उत्पादक मे. हिंदुस्थान मोटर्स लि. यांचेकडुन खरेदी करणेस व आयुक्तांना निविदा शिवाय त्यांच्याशी थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

--४--

तसेच अंतर्भूत खर्च रू.४,११,१९८/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.४ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :- हा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर भुयार गटार योजने अंतर्गत प्रभाग ५५ मध्ये मा. महापौर निधीतून भूयार गटार लाईन टाकणे, जोडणे व दुरूस्ती करणे कामीच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त ठिकाणी भुयार गटार वारंवार चोकअप होत असते. या बाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी वारंवार पत्र देऊन भुयारी गटार दुरूस्ती करून आणि नवीन कनेक्शन भुयारी गटारवर करून मल शुध्दीकरण केंन्द्र पूर्ण क्षमतेला चालविण्याकरिता पत्र लिहिलेले आहे तरी या भुयारी गटारची दुरूस्तीची लाईन टाकणे व जोडणेची आवश्यकता आहे. त्याकरिता खालील प्रमाणे प्राकलन तयार करण्यात आलेले आहे.

| अनु.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १. | बॅरेक क्र.१२६८, वार्ड क्र.५५ कॅम्प क्र.४ | ६५,३२६/- |

वरील प्राकलन जिल्हा दर सुचि ९८-९९च्या आधिन राहून तयार करण्यात आलेले आहे. या करिता मा.महापौर यांनी आपल्या निधीतून त्या कामासाठी निधी उपलब्ध करून दिलेला आहे. सदर प्रस्तावास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता तसेच काम मजुर कामगार सहकारी संस्थेमार्फत करून घेण्यास स्थायी समितीकडुन मंजुरी मिळावी.

स्थायी समिती ठराव क्र.१८९ दि:-२५.१.२००१.

सुचकाचे नाव :- श्री.किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर भूयार गटार योजने अंतर्गत बॅरेक १२६८ , रेमा अपार्टमेंटच्या मागे प्रभाग क्र.५५ , उल्हासनगर-४ येथे भुयार गटार लाईन टाकणे, जोडणे व दुरूस्ती करणे कामी रू.६५,३२६/- च्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्त्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संथेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.५ वाचुन दाखवितात.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मा.महापौर, स्थायी समिती सभापती व नगरसेवक निधीतून सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या ७ कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १९० दिनांक :- २५.१.२००१.

सुचकाचे नाव :- श्रीमती.लविना कुंदनानी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रमेश चव्हाण.

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

--६--

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र४२ मध्ये शिवाजीनगर, गणेश नगर मध्ये शौचालय दुरूस्ती करणे. (नगरसेवक निधीतून) | रू. १,००,०००/- |
| २. | उल्हासनगर येथील प्रभाग क्र ५६ मध्ये बॅ.नं.९४१ जवळ चार बैठकीचे शौचालय, सी.सी.नाली बांधणे आणि सिंधुयुथ सर्कल जवळ नाला दुरूस्ती करणे. (नगरसेवक निधीतून) | रू.२,९९,९००/- |
| ३ | उल्हासनगर-४ येथील प्र क्र १२ मध्ये आशिर्वाद कॉलनी आणि विविध ठिकाणी सी.सी.पायवाटा आणि नाल्या बांधणे. (नगरसेवक निधीतून) | रू.९५,८२०/- |
| ४. | उल्हासनगर-४ येथील प्र.क्र.२३ मध्ये बॅरेक क्र १५८३,१५८४,१५८६ जवळ आणि विविध ठिकाणी सी.सी.पायवाटा आणि नाल्या बांधणे. (स्था.स.सभापती निधीतून) | रू.१,००,०००/- |
| १. | उल्हासनगर ४,येथील प्र.क्र.२३ मध्ये बॅ.क्र १६६१,१६६२,१६६३ जवळ आणि विविध ठिकाणी सी.सी.पायवाटा आणि नाल्या बांधणे. (मा.महापौर निधीतून) | रू. ९९,०००/- |
| २. | उल्हासनगर ३,येथील प्र.क्र १३ मध्ये संजय गांधी नगर येथील सार्वजनिक शौचालय बांधणे. (नगरसेवक निधीतून) | रू. २,१०,३५०/- |
| ३. | उल्हासनगर २,येथील प्र.क्र ६६ मध्ये श्वेता अपार्टमेंट समोर प्लॉटला लोखंडी जाळी लावून विकसित करणे आणि नाला बांधणे. (मा.महापौर निधीतून) | रू. १,९९,८९०/- |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--७--

मा.सचिव :- विषय क्र.६ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-या प्रस्तावाबाबत स्पष्टीकरण केले जावे.

मा.आयुक्त :- आपणाकडे ड्रेनेज कनेक्शन सिस्टम अदयाप तयार नाही, या सिस्टम नुसार मल थेट ट्रिटमेंट प्लान्ट मध्ये जात असतो परंतु तशी आपणाकडे व्यवस्था नसल्याने सद्या हा जो प्रस्ताव आहे तो क्लोरिनेशन प्लॅन्ट ऑपरेट करण्यासाठीचा आहे.
काही दिवसापूर्वी उल्हासनगर शहरात कॉलराची साथ पसरली होती त्यामुळे शासनाने ड्रेनेज व ट्रिटमेंट प्लॅन तयार करण्याचे सक्त आदेश दिलेले आहेत. क्लोरीनेशनचा प्रस्ताव हा त्याचा एक भाग आहे. आपणाकडे क्लोरीनेशन प्लॅन्ट नसल्याने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने आपले शहर अभियंता यांचेवर यापूर्वीच गुन्हा दाखल केलेला आहे त्यानुसार हया बाबींचा विचार करता क्लोरीनेशन करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास महाराष्ट्र शासन आपणास सोडणार नाही म्हणुन निविदा मागविण्यासाठीच्या या प्रस्तावास संमती दिली जावी.

मा.सचिव :-विषय क्र.६ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- निविदा मागविण्याशी मंजुरी मागत आहात ना?

मा.आयुक्त :- होय, निविदा मागविण्यासाठी हा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवला आहे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मलप्रक्रिया केंन्द्र खडेगोलवली येथील क्लोरीनेशन यंत्रणा दुरूस्तीकरणे कामीचे अंदाजित रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

मलप्रक्रिया केंद्र, खडेगोळवली येथे महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळातर्फे ''बॅनको '' या कंपनीची क्लोरिनेशन यंत्रणा सन १९८८ मध्ये बसविण्यांत आली. या यंत्रणेतील काही भाग नादुरूस्त झाल्याने सध्या ही यंत्रणा कार्यान्वित नाही. या संदर्भात दुरूस्तीकामासाठी यंत्रणेच्या उत्पादकांशी संपर्क साधला. त्यांनी पहाणी करून रू.११,६३,०००/- मात्रचे दरपत्रक दिले आहे.

या यंत्रणेची लवकरात लवकर दुरूस्ती करून घेण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळानेही सुचना दिली आहे. सदर काम लवकरात लवकर करून घेणे अत्त्यंत आवश्यक आहे. करिता या दुरूस्तीकामाच्या अंदाजित खर्चास मंजुरी मिळण्यास सदर प्रस्ताव सादर करण्यांत आला असून त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. स्थायी समितीच्या मंजुरीनंतर निविदा मागवुन काम करावयाचे आहे.

तरी क्लोरिनेशन यंत्रणेच्या दुरूस्तीकामाचा अंदाजित खर्च रू.११,६३,०००/-मात्र यांस प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळण्याकरिता सदर प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करण्यांत येत आहे. त्यास मंजुरी मिळावी ही विनंती.

--८--

स्थायी समिती ठराव क्र.१९१ दि:-२५.१.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामचंद्र पारवानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार मलप्रक्रिया केंन्द्र,खडेगोळवली येथील क्लोरीनेशनसाठी यंत्रणा दुरूस्ती करणे कामीचे अंदाजित रक्कम रू.११,६३,०००/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र.७ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- कोण सांगेल? या प्रस्तावा बरोबर संबधित नगरसेवकाचे संमतीपत्र आहे काय?

मा.सदस्या श्रीमती. भारती राजानी:-होय, संबंधित प्रभागाचे नगरसेवकाचे संमती पत्र या प्रस्तावा सोबत आहे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :-अपंग अर्जदार श्री.सुधाकर गिरधर खैरनार यांना प्रभाग क्र.५१, स्मशानभूमी गेटच्या बाजूला उल्हासनगर ४ येथील महापालिकेच्या जागेवर तात्पुरत्त्या स्वरूपी एस.टी.डी. बुथ

## बांधणे कामी परवाना देणे बाबत.

प्रस्तावना:-

अर्जदार श्री. सुधाकर गिरधर खैरनार हया अपंग व्यक्तीस टेलिफोन बुथ चालविणेसाठी प्रभाग क्रमांक ५१ स्मशान भूमी गेटच्या बाजुला उल्हासनगर-४ येथे '४ x ४' जागा मागीतली आहे.

अर्जदार व्यक्तीस अपंग असल्यामुळे अत्यंत तात्पुरत्त्या स्वरूपात ४ x ४ची लाकडी कॅबीन मध्ये टेलिफोन बुथसाठी खालील अटींवर परवानगी बाबत स्थायी समितीची संमती घेणे आवश्यक आहे.

१) महानगरपालिका सांगेल त्यावेळी लाकडी कॅबीन (बुथ)हटवून जागा खाली करावी लागेल.
२) कोर्टातून कोणत्त्याही प्रकारचा स्टे आणता येणार नाही.
३) फक्त आपण तेथे काम करावे. जागेचा वापर केवळ अर्जदार यांनाच करता येईल. भाडेकरू ठेवता येणार नाही.

--९--

४) एस.डी.ओ ऑफीसचा ना हरकत दाखला या कार्यालयांत सादर करावा लागेल.
५) वरील बाबी अर्जदारास मान्य असल्याबाबत २०/-स्टॅम्प पेपर वर ऑफिडेव्हीड करावे लागेल.

**स्थायी समिती ठराव क्र.** १९२ **दिनांक** :- २५.१.२००१ ,

सुचकाचे नाव :-श्रीमती.भारती राजानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. रामचंद्र पारवानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार श्री. सुधाकर गिरधर खैरनार या अपंग व्यक्तीस वर नमुद केलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्तीवर प्रभाग क्र.५१ , स्मशानभूमी गेटच्या बाजुला , उल्हासनगर-४ येथे महापालिकेच्या जागेवर '४' x '४' चा तात्पुरत्त्या स्वरूपी एस.टी.डी. बुथ बांधणे कामी एका वर्षासाठी परवाना देणेस मान्यता देत आहे.

तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधिन राहून सदरचा परवाना एका वर्षापेक्षा अधिक नसेल एवढया कालावधीसाठी वेळोवेळी नुतनीकरण करण्यास आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

**एकमताने मंजुर.**

सभापती / पिठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.आयुक्त :- आपणा सर्वांची संमती असेल तर आयत्त्यावेळच्या विषयान्वये मी प्रस्ताव चर्चेस आणु इच्छितो. प्रभाग क्र.१७ मध्ये नगरसेवक निधीतून एम.२५० ने रस्ता बांधणे कामीचा प्रस्ताव आहे.

मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी :-आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेला प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असुन तो सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

आयत्त्यावेळचा विषय

प्रस्तावना :-

उल्हासनगर ५ येथील प्रभाग क्र.१७ मध्ये विरतानाजी नगर येथे प्रायमरी स्कूल साईट नं.१०६ मागे आणि विविध ठिकाणी रस्ता एम-२५० ने बांधणे हे काम करण्यासाठी नगरसेवक श्री. भगवान भांडे प्रभाग क्रमांक १७ यांनी त्यांच्या नगरसेवक निधीतून करणेसाठी दिनांक १ जानेवारी, २००१ च्या पत्रानुसार विनंती केलेली आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने हे काम करण्यासाठी जागेची पहाणी करून रू. २,१६,९००/- किंमतीचे प्राकलन तयार



केलेले आहे. या कामाच्या खर्चासाठी अंदाजपत्रकात महानगरपालिका भाग क्रमांक लेखा शिर्ष सी-४ (एक्स)पी-२ मधुन काम करावयाचे आहे. त्यानुसार सदर रूपये. २,१६,९००/- किंमतीचे प्रभाग क्रमांकमधील सदर कामाचे प्राकलन रू.२,१६,९००/- यांस प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळण्यासाठी स्थायी समिती सभेपुढे ठेवणेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १९३ दि:-२५.१.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. भगवान भांडे.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामचंद्र पारवानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर ५ येथील प्रभाग क्र.१७ मधील विरतानाजी नगर येथील प्रायमरी स्कुल साईट क्र.१०६ मागे आणि विविध ठिकाणी नगरसेवक निधीतून एम-२५० ने रस्ता बांधणे कामीच्या रू.२,१६,९००/- खर्चाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्त्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५.०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-८.२.२००१.

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक ८.२.२००१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | |
|---|---|
| १ श्रीमती.कुंदनानी लविना | सदस्या |
| २ श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ३ श्री.पारवानी रामचंद | सदस्य |
| ४. श्री.पंजाबी नारायण | सदस्य |
| ५. श्री.बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ६. श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| ७ श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ८ श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| ९ श्री. किशोर वनवारी | सदस्य |
| १० श्रीमती.पदमा वलेचा | सदस्या |

तर

१)श्री.कुमार आयलानी २) श्री. चौधरी राजेंद ३) श्री. चव्हाण रमेश ४)श्री. भांडे भगवान ५)श्री.तेजी कैलास हे सदस्य सभेस अनुपस्थितीत होते.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- आमचा मित्र पक्ष असलेल्या शिवसेनेचे सदस्य आज श्री. मलंगगड येथील यात्रेच्या कार्यक्रमात मग्न असल्याने या सभेत उपस्थित नाहीत. आजची ही सभा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रका बाबतच्या महत्त्वपुर्ण विषयाबाबत असल्याने

या विषयाबाबत सर्व पक्षिय सदस्यामध्ये सविस्तर चर्चा झाली पाहिजे असे मला वाटते, यास्तव मा. सभापती महोदयांना मी अनुरोध करतो की, आजच्या या सभेचे कामकाज सोमवार दि.१२.२.२००१ रोजी सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत पुढे ढकलावे.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>आजची ही सभा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रका बाबत असून या विषयावर सर्व पक्षांच्या सदस्यामध्ये सविस्तर चर्चा होऊन एकमत झाले पाहिजे असे मला वाटते, यास्तव मी सुध्दा मा.सभापती महोदयांना अनुरोध करतो की, आज ही सभा स्थगित करून सोमवार दि.१२.२.२००१ रोजी सायंकाळी ४.०० वाजात घेण्यांत यावी.



<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u> आजची ही सभा सर्वानुमते स्थगित करून सोमवार दि.१२.२.२००१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता घेण्यांत येईल.

सायंकाळी ४. १० वाजता सभा दि. १२.२.२००१ रोजी सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत स्थगित करण्यांत येत असल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>दिनांक:</u>-१६.२.२००१.

### <u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १६.२. २००१ रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | |
|---|---|
| १ श्रीमती.कुंदनानी लविना | सदस्या |
| २ श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ३ श्री. श्री. चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ४ श्री. श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ५ श्री.पारवानी रामचंद | सदस्य |
| ६ श्री.पंजाबी नारायण | सदस्य |
| ७ श्री.भांडे भगवान | सदस्य |
| ८. श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| ९ श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| १० श्री.तेजी कैलास | सदस्य |
| ११ श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| १२ श्री. किशोर वनवारी | सदस्य |

तर

१)श्री.कुमार आयलानी २) श्री.बहरानी ठाकुरदास ३) श्रीमती.पदमा वलेचा हे सदस्य /सदस्या सभेस अनुपस्थितीत होते/होत्त्या.

सभेचे सुरूवात ४ . ४५ वाजता करण्यांत आली.

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि.२५.१.२००१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u> दि.२५.१.२००१ रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र.२ वाचून दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> नगरसेवकांचे पत्र आहे का?

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> कुणाचा प्रभाग आहे?

<u>श्री.सोनावणे (नगररचनाकार)</u> :- श्रीमती. टेकचंदानी चंदा यांचा प्रभाग आहे. तसे पत्र दिले आहे.

--२--

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय</u> :-अपंग अर्जदार श्री.सुरेश अप्पा यमगर यास हरमन मोहता कंपनी जवळील सचिन टेलरच्या बाजुला, उल्हासनगर.१ येथे महापालिकेच्या जागेवर तात्त्पुरत्त्या स्वरूपात एस.टी.डी. बुथ बांधणे व <u>चालविणे कामी परवाना देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना:-</u>

अर्जदार श्री. सुरेश अप्पा यमगर हया अपंग व्यक्तीस टेलिफोन बुथ चालविणेसाठी हरमन मोहता कंपनी जवळील सचिन टेलर्सच्या बाजुला सरकारी जागेत उल्हासनगर-१ येथे जागा मागीतली आहे.

अर्जदार व्यक्तीस अपंग असल्यामुळे अत्त्यंत तात्त्पुरत्त्या स्वरूपात "४ x ४" ची लाकडी कॅबीन मध्ये टेलिफोन बुथसाठी खालील अटींवर परवानगी बाबत स्थायी समितीची संमती घेणे आवश्यक आहे.

१) महानगरपालिका सांगेल त्यावेळी लाकडी कॅबीन (बुथ)हटवून जागा खाली करावी लागेल.

२) सदर जागेचा वापर केवळ तात्त्पुरत्त्या स्वरूपात असून जागेबाबत मालकी हक्क पुर्णत: महानगरपालिकेचा असेल.

३)   जागेचा वापर केवळ अर्जदार यांनाच करता येईल. भाडेकरू ठेवता येणार नाही.
४)   प्रशासक कार्यालयाचा नाहरकत दाखला या कार्यालयात सादर करावा लागेल.
५)   कोर्टातून कोणत्त्याही प्रकारचा स्टे आणता येणार नाही.
६)   वरील बाबी अर्जदारास मान्य असल्याबाबत २०/-स्टॅम्प पेपर वर ॲफिडेव्हीड करावे लागेल.

<u>स्थायी समिती ठराव क्र</u>. १९५                    <u>दिनांक</u> :- १६.२.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.
अनुमोदकाचे नाव :-श्रीमती.लविना कुंदनानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अपंग अर्जदार श्री. सुरेश अप्पा यमगर यांना वर नमुद केलेल्या जागेवर आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्ती वर तात्पुरत्त्या स्वरूपात एस.टी.डी. बुथ बांधणे व चालविणे कामी एक वर्षाच्या कालावधीसाठी परवाना देणेस मान्यता देत आहे.

तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधिन राहून सदरचा परवाना वेळोवेळी एका वर्षापेक्षा अधिक नसेल ऐवढया कालावधीसाठी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--३--

<u>मा.सचिव :- **विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.**</u>

<u>**मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण**</u> :- किती कामे आहेत?

<u>**मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी**</u> :- महापौर फंड अजुन शिल्लक आहे काय?

<u>**मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-**</u> कधी संपणार?

<u>**मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण**</u> :- सर्वांचे किती शिल्लक आहेत?

<u>**श्री. चिजवानी (शहर अभियंता)**</u> :- जितकी तरतुद आहे त्यापेक्षा जास्त कामे केली नाहीत. तपशिल इथे नाही आहे.

<u>**मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण**</u> :- सभा संपल्यावर सांगा.

<u>**मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-**</u> फक्त उपमहापौरांचे सांगायचे का?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- सर्वांचेचे सांगा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-डिटेल सांगा कोणते रोड आहेत ते?

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मा.महापौर, उपमहापौर व नगरसेवक निधीतून
सार्वजनिक बांधकामा अंतर्गत करावयाच्या
आठ कामीचे प्राकलनास प्रशासकीय व
वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १९६ दिनांक :- १६.२.२००१.

सुचकाचे नाव :- श्रीमती. कांता गजवानी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्त्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र.४० मध्ये विविध ठिकाणी शौचालय दुरूस्ती करणे. (नगरसेवक निधीतून) | रू.९८,०००/- |
| २. | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.१ मध्ये बाबासाहेब आंबेडकर स्कुल जवळ, आणि व्ही.पी.नाईक कॉलनी येथे सी.सी.पायवाटा व नाल्या बांधणे. (नगरसेवक निधीतून) | रू.१,९९,९००/- |



| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| ३. | उल्हासनगर येथील प्र क्र.४७ मध्ये सार्वजनिक शौचालय बांधणे.(किंमत २लाख) या मंजुर कामा ऐवजी त्याच प्रभागात हरीजन पाडा आणि विविध ठिकाणी सी.सी.पायवाटा आणि नाल्या बांधणे. (मा.महापौर निधीतून) | रू.२,००,०००/- |

४. उल्हासनगर येथील प्र.क्र४६ मध्ये हजेरी रोड समोरील बगीच्यामध्ये बॅंचेस सप्लाय करणे आणि लाल माती आणि विविध दुसरे कामे करून बगीच्याचा विकास करणे. (नगरसेवक निधीतून) रू.१ ,९९ ,८००/-

५. उल्हासनगर येथील प्र.क्र१५ मध्ये डॉ.साळवे यांचे दवाखाने पासुन ते आनंद पान शॉप पर्यंतचा रस्ता एम.२५० ने बांधणे. (नगरसेवक निधीतून) रू. २ ,०४ ,६००/-

१. उल्हासनगर ४ ,येथील विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन समोर पासुन ओटी सेक्शन ते शिवसेना ऑफीस, अशा सिलीकेट मार्गे रस्ता बी.एम. आणि ए.सी व्दारे विकसित करणे. (उप.महापौर निधीतून) रू. २ ,६५ ,०००/-

२. उल्हासनगर ३ ,येथील प्र.क्र. ५९ मध्ये बुध्द विहार ते दिवाण ट्रान्सपोर्ट पर्यंत एम. २५० ने रस्ता बांधणे. (नगरसेवक निधीतून) रू. १ ,३९ ,७००/-

३. उल्हासनगर ३ ,४ येथील प्र.क्र. मध्ये वृक्ष संरक्षण विकास करणे. (मा.महापौर निधीतून) रू. ७० ,०००/-

---

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका



मा.सचिव :- विषय क्र४ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- आयलानी जरा डिटेल सांगा कोणते रोड ते?

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :-एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र.१ अंतर्गत रस्त्यावर दिवाबत्ती लावणे कामी निविदा विचारात घेऊन संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

सादर करण्यात येत आहे की, महानगरपालिकेने महासभेचे ठराव क्र.१२ दि. ११.११.९९ अन्वये ३३ रस्त्यांचे रूंदीकरण करून बनविण्याचे कार्य हाती घेतलेले आहे. त्यातुन महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागार व सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या मतानुसार जे काही रस्ते दिवाबत्ती लावण्यासाठी तयार होत आहेत त्या अनुक्रमांकात त्या रस्त्यावर दिवाबत्ती लावण्याची कार्यवाही करण्याचे कार्य हाती घेतले जात आहे. तसेच तांत्रिक सल्लागार व सार्वजनिक बांधकाम खात्त्याच्या सांगण्यानुसार जे काही रस्ते सध्या दिवाबत्ती लावण्यासाठी तयार होत आहेत. आणि दिवाबत्ती बसविणे शक्य आहे. त्यांचे प्राकलन १९९९-२००० च्या डी.एस.आर प्रमाणे बनवुन वर्तमानपत्रात निविदा सुचना देऊन सिलबंद निविदा मागविण्यात आलेली आहे. त्यांचा तुलनात्त्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| ग्रुप क्र. | रस्त्याचे वर्णन | अंदाजित रक्कम रू. | विविध कंपन्यांनी दिलेल्या दराचा तुलनात्त्मक तक्ता | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे.बजाज इलेलि | मे.जे.डी. इले.वर्क्स | मे.जयेश इ.कॉ | मे.बी.जे. इले कं. |
| अ | शांतीनगर,साईबाबा मंदीर ते कलवर्ट उल्हासनगर.३ (शांतीनगर ते ए ब्लॉक वाया डॉल्फीन क्लबचा एक भाग)व बोट क्लब ते विठ्ठलवाडी वाया काजल पेट्रोल पंप | १०,२८,८९६.५० | ९.१२ टक्के कमी | ९.०१ टक्के कमी | ७टक्के कमी | ८ टक्के कमी |
| ब | हिंन्दुस्तान पेन्सील फॅक्टरी ते बॅरेक क्र.१६३६ ते माणेरा गाव जंक्शन व जैक ऑफ महाराष्ट्र रोड,कोयंडा पुतळा पर्यंत उल्हासनगर-४ | १४,६०,२७२.०० | ९.१२टक्के कमी | ९.१० टक्के कमी | ८ टक्के कमी | ८.५ टक्के कमी |
| क | राधास्वामी सतसंग ते ओटी चौक | ११,७३,००१.६४ | ९.०१ टक्के | ९.१२ टक्के | ८.५ टक्के | ९ टक्के |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उल्हासनगर-३ व नेहरू चौक ते प्रेमरामचंदानी चौक | | कमी | कमी | कमी | कमी |
| ड | महापालिका मुख्यालय ते प्रकाश ऑटो उल्हासनगर-३ चोपडा कोर्ट ते स्मशानभुमी वाया माता मंदीर उल्हासनगर-३ गुरूव्दारा ते डि.टी. कॉलनी कालानी कॉलेज चौक ते राणा ट्रेडींग उल्हासनगर-१ | १४,२२,३८६.०० | ९.०१ टक्के कमी | ९.१६ टक्के कमी | ८.५ टक्के कमी | ८.८९ टक्के कमी |

सदर तुलनात्मक तक्त्यानुसार मेसर्स बजाज इलेक्ट्रीकल लिमिटेड, निविदा क्र.अ व ब मध्ये सर्वात कमी दर दिले आहेत आणि मेसर्स जे.डी. इलेक्ट्रीकस् वर्कस यांनी निविदा क्र. क व ड मध्ये सर्वात कमी दर दिले आहेत. ज्या कार्यात ज्या कंपनीने सर्वाधिक कमी दर दिले आहेत ते दर वाजवी आहेत व सदर कार्यावर येणा-या खर्चाची पुरेशी तरतुद अंदाजपत्रकात पण उपलब्ध आहे. यासर्व बाबी लक्षात घेऊन ज्या कार्यात ज्या कंपनीने सर्वात कमी दर दिले आहेत त्यांच्या निविदेला मंजुरी देऊन लागणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळावी हि विनंती.

स्थायी समिती ठराव क्र.१९७ दि:-१६.२.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. रामचंद्र पारवानी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र.१ अंतर्गत रस्ता रूंदीकरणकरून बनविण्यासाठी घेतलेल्या काही रस्त्यांवर दिवाबत्ती लावणे कामी वरील तुलनात्मक तक्त्यानुसार मेसर्स बजाज इलेक्ट्रीकल लिमिटेड बाब अ व ब करिता आणि मेसर्स जे.डी. इलेक्ट्रीक वर्कस क व ड करिता यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असुन आयुक्तांस संविदेस मान्यता देत आहे.

तसेच अंतर्भुत खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका
--७--
मा.सचिव :- विषय क्र.५ वाचुन दाखवितात.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मल प्रक्रिया केंद खडेगोलवली येथील क्लोरिनेशन यंत्राची दुरूस्तीकामी मे. ओम इंडस्ट्रीयल इंजिनियरिंग सर्विसेस, डोंबिवली यांची सर्वात लघुत्त्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेच्या अखत्त्यारीतील २८ द.ल.लि. मलप्रक्रिया केंद, खडेगोळवली येथील क्लोरीनेशन यंत्रणा दुरूस्तीचा रूपये ११,६३,०००/- मात्र अंदाजित खर्चाचा प्रस्ताव पा.पु.ज.नि.विभागातर्फे मंजुरीकरिता सादर करण्यांत आला. या प्रस्तावास स्थायी समिती ठराव क्र.१९१, दि.२५.१.२००१ नुसार प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळाली.

या कामाकरिता दैनिक लोकमत व दैनिक फ्रि प्रेस जर्नल या राज्यस्तरीय वृतपत्रांतुन तसेच दै.उल्हासविकास या स्थानिक वृतपत्रांतुन निविदा सुचना प्रसिध्द करण्यांत आली. या कामाकरिता एकंदरित तीन निविदाकारांनी निविदा सादर केल्या त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१ मेसर्स ए.एस. इलेक्ट्रीक्स कार्पोरेशन, नवी मुंबई. :-अंदाजित किंमती पेक्षा २.१० टक्के कमी (रूपये ११,३८,५७७/-मात्र.)

२ मेसर्स ओम इंडस्ट्रीयल इंजिनिअरींग सर्व्हिसेस :-अंदाजित किंमतीपेक्षा ९.९२ टक्के कमी. (रूपये १०,४७,६३०/-मात्र.)

३ मेसर्स अलाईड इलेक्ट्रॉनिक्स मॅकेनिकल्स :-अंदाजित किंमतीपेक्षा ९.९२ टक्के कमी (रू.११,१२,९९१/-मात्र)

उपरोक्त निविदांपैकी मे. ओम इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, डोंबिवली यांची निविदा न्युनतम दराची आहे. तथापि दिनांक ३.२.२००१ शेती, मा.आयुक्त यांचे समवेत झालेल्या चर्चेत सदर ठेकेदाराने आपल्या दरांत सूट देवून अंदाजित किंमतीपेक्षा १७ टक्के कमी दराने काम करण्याचे मान्य केले व तसे महानगरपालिकेला लेखी कळविले आहे. त्यानुसार निविदेचे सुधारित दर अंदाजित किंमतीपेक्षा १७ टक्के कमी म्हणजे रू. ९,६५,२९०/- मात्र इतके आहेत.

सदर प्रस्तावास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केली असुन मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मलप्रक्रिया क्रेंद, खडेगोळवली येथील क्लोरिनेशन यंत्रणेची दुरूस्तीची मे.ओम इंडस्ट्रीयल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस डोंबिवली यांची निविदा व त्याकरिता येणारा खर्च रू.९,६५,२९०/-मात्र यांस

प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळण्यासाठी सदर प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करण्यांत येत आहे. त्यांस मंजुरी मिळावी ही विनंती.

स्थायी समिती ठराव क्र.१९८ दि:-१६.२.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

--८--

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार मलप्रक्रिया केंन्द्र,खडेगोलवली येथील क्लोरीनेशन यंत्राची दुरूस्ती करणे कामी मे.ओम इंडस्ट्रीयल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांची सर्वात लघुत्तम दराच्या निविदा स्विकृती योग्य असुन आयुक्तांस संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र.६ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- मागे आम्ही आठ मुददे दिले होते.

मा.सचिव :- तशी सुधारणा केली आहे.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :- शहरातील कचरा चांगल्यात-हेने उचलला जात आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मी रामचंद पारवानीशी सहमत आहे. आम्ही जे आठ मुददे सांगीतले होते त्याचा निविदेमध्ये समावेश केला जावा. रोडवर असणारा कचरा किंवा इमारती वगैरे बांधल्यावर तिथुन निघणारे रेती, दगड ,माती पण त्यांनी उचलली पाहिजे.

मा.आयुक्त :-इमारती बांधणा-यांनी स्वत:चा कचरा स्वत: खत्त्यावर आणला पाहिजे. असे कोणीही ठेकेदार मान्य करणार नाही.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :- यांना विनंती केली तरी पण ते उचलतात.

मा.आयुक्त :- लोक गैरफायदा उचलतात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- नगरसेवकांच्या तक्रारीचे चोवीस तासाच्या आत निवारण केले पाहिजे. त्यांना एक फोन फिक्स करून दया जो चोवीस तास चालु असेल.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- त्यांचा एक माणूस मोबाईल घेऊन फिरत असतो.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- छोटया छोटया गल्लीमध्ये मोठया गाडया जात नाहीत. त्यांना छोटया छोटया गाडया ठेवायला सांगा. तसेच त्यांना लेबर कडुन गल्लीत जाऊन टोपलीत कचरा भरायला सांगा. तसेच आम्ही याप्रमाणे मागे सुचविलेल्या आठ मुददयांचा समावेश यात करावा.

--९--

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- तसेच जुन्या ठेकेदारांना पेमेंट दयायचे त्याचे काय?

मा.आयुक्त :- ते यात कशाला जोडता?

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- मला वाटते ५०० पेक्षा जास्त खत्ते आहेत.

मा.आयुक्त :- नवीन रोड तयार झाल्यामुळे नविन खत्ते निर्माण झाले असतील तर ते मी यात जोडायला सांगतो.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- कचरा वाहतुकीचे कामाकरिता मेसर्स व्ही.आर. पनवेलकर यांना पुर्वीच्या संविदेतील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मुदत वाढ देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर शहरातील ठरविलेल्या ५०० खत्त्यावरून कचरा उचलुन डंम्पींग ग्राऊंड पर्यंत वाहतुक करण्याच्या कामासाठी मेसर्स. व्ही.आर.पनवेलकर यांना दि.२२.१२. २०००च्या ठराव क्र.१८९ नुसार मा.स्थायी समितीने मान्यता दिली आहे.

कचरा उचलण्याच्या कामासाठी सन एप्रिल २००१ मार्च २००२ आर्थिक वर्षाकरिता अनुभवी कंत्राटदाराकडुन नविन निविदा मागवाव्या किंवा मेसर्स व्ही.आर. पनवेलकर यांचे काम समाधानकारक असल्यामुळे व कोणत्त्याही प्रकारच्या तक्रारी नसल्यामुळे त्या कंत्राटास मुदतवाढ देऊन नव्याने करारनामा करण्याबाबत मा.स्थायी समिती समोर धोरणात्त्मक निर्णयाकरिता तसेच प्रशासकीय व वित्तिय मंजुरीस सादर.

स्थायी समिती ठराव क्र. १९९ दि:-१६.२.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.

श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामचंद्र पारवानी.

श्री. प्रमोद टाले.

हि स्थायी समिती सभेच्या चर्चेअंती व पनवेलकर मार्फत केलेल्या मागील वर्षाची शहरातील समाधानकारक साफसफाई , परिस्थिती लक्षात घेऊन आयुक्तांना त्यांच्याशी सरकारी वर्ष २००१-२००२ करिता पुर्वीच्या संविदेतील अटी व शर्ती वर कचरा वाहतुकीचे कामी मुदत वाढ देऊन निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहेत.

--१०--

तसेच अंतर्भुत खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र. ७ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री रामचंद पारवानी :- पत्र आहे का नगरसेवकांचे? कुणाचा प्रभाग आहे?

काही सदस्य :- पास.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- अपंग अर्जदार कुमारी भाग्यश्री गोपाळ गावडे हिस जिजामाता चौक ,पोलीस चौकीच्या उजव्या बाजुला मराठा सेक्शन-३२ , उल्हासनगर. ४ येथे महापालिकेच्या जागेवर तात्तुरत्त्या स्वरूपात एस.टी.डी. बुथ बांधणे व चालविणे कामी परवाना देणे बाबत.

प्रस्तावना:-

अर्जदार कुमारी भाग्यश्री गोपाळ गावडे हया अपंग मुलीने टेलिफोन बुथ चालविणेसाठी उल्हासनगर शहरातील जिजामाता चौक,पोलीस चौकीच्या उजव्या बाजुला मराठ सेक्शन-३२ , उल्हासनगर. ४ मधील "४ x ४" ची जागा मागीतली आहे.

अर्जदार मुलगी अपंग असल्यामुळे अत्यंत तात्तपुरत्त्या स्वरूपात "४ x ४" ची लाकडी कॅबीन मध्ये टेलिफोन बुथसाठी खालील अटींवर परवानगी बाबत स्थायी समितीची संमती घेणे आवश्यक आहे.

१) महानगरपालिका सांगेल त्यावेळी लाकडी कॅबीन (बुथ)हटवून जागा खाली करावी लागेल.
२) सदर जागेचा वापर केवळ तात्तपुरत्त्या स्वरूपात असून जागेबाबत मालकी हक्क पुर्णतः महानगरपालिकेचा असेल.
३) फक्त आपणच तेथे काम करावे. जागेचा वापर केवळ अर्जदार यांनाच करता येईल. भाडेकरू ठेवता येणार नाही.
४) एस.डी.ओ ऑफीसचा नाहरकत दाखला या कार्यालयात सादर करावा लागेल.
५) कोर्टातून कोणत्त्याही प्रकारचा स्टे आणता येणार नाही.
६) वरील बाबी अर्जदारास मान्य असल्याबाबत <u>१०/-स्टॅम्प</u> पेपर वर ऑफिडेव्हीड करावे लागेल.

--११--

<u>स्थायी समिती ठराव क्र</u>. २०० <u>दिनांक</u> :- १६.२.२००२.

सुचकाचे नाव :-श्री.रमेश चव्हाण.

अनुमोदकाचे नाव :-श्री. राजेंद चौधरी.

हि स्थायी समिती वरील प्रस्त्तावनेनुसार अपंग अर्जदार कुमारी भाग्यश्री गोपाळ गावडे हिस वर नमुद केलेल्या महापालिकेच्या जागेवर आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्ती वर तात्तपुरत्त्या स्वरूपात एस.टी.डी. बुथ बांधणे व चालविणे कामी एक वर्षाच्या कालावधीसाठी परवाना देणेस मान्यता देत आहे.

तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधिन राहून सदरचा परवाना वेळोवेळी एका वर्षापेक्षा अधिक नसेल ऐवढया कालावधीसाठी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी सायंकाळी ५. ०५ वाजता सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-१२.२.२००१.

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक १२.२. २००१ रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती.कुंदनानी लविना | सदस्या |
| २ | श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ३ | श्री. श्री. चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ४ | श्री. श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ५ | श्री.पारवानी रामचंद | सदस्य |
| ६ | श्री.पंजाबी नारायण | सदस्य |
| ७ | श्री.ब्रहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ८ | श्री.भांडे भगवान | सदस्य |
| ९ . | श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| १० | श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ११ | श्री.तेजी कैलास | सदस्य |
| १२ | श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| १३ | श्री. किशोर वनवारी | सदस्य |
| १४ | श्री.पदमा वलेचा | सदस्या |

तर

मा.सदस्य श्री.कुमार आयलानी हे सभेस अनुपस्थितीत होते.

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :</u> प्रशासनाकडुन सन २००१-२००२च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाची प्रत सर्वांना प्राप्त झाली आहे. लेखापरिक्षकांना मी विनंती करते की, त्यांनी या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाचे सविस्तर स्पष्टीकरण करावे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :-</u> १२१ कोटी उत्पन्न व २४२ कोटी खर्च दर्शविलेल्या या अर्थ संकल्पिय अंदाजात १२१ कोटीची जी तुट आहे ती कशी भरून काढणार?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> त्यासाठी जर आपण करांचे दर वाढविण्यास अनुकुल असाल तर तसा निर्णय घेता येईल. प्रथा अशी आहे की, आयुक्त उत्पन्न व खर्चाचे निवेदन देतात ते स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी ठेवले जाते. स्थायी समितीत त्यावर चर्चा होऊन स्थायी समिती महासभेच्या मंजुरीच्या अधिन राहून करांचे दर व अर्थसंकल्पीय अंदाज तयार करते.

--२--

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u>या अर्थसंकल्पीय अंदाजाचे प्रत्येक मुदयावर सविस्तर चर्चा झाली पाहिजे.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> या अर्थसंकल्पीय अंदाजाचे आयुक्तांनी अगोदर स्पष्टीकरण केले तर बरे होईल, सर्व पक्षीय नेत्त्यांच्या बैठकीमध्ये आयुक्तांनी या अर्थसंकल्पाचे जसे स्पष्टीकरण केले तसे.....

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> हुडको कडुन किती कर्ज घेणार आहात?

<u>मा.आयुक्त :-</u> सहा कोटी.

<u>मा.आयुक्त :-</u> मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ चे तरतुदीप्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाज आयुक्तांनी तयार करावयाचे आहेत. सदर अंदाजात अधिनियमाचे कलम ६२,६४,६५,६६ व इतर कलमान्वये महानगरपालिकेस पार पाडावयाची कार्य व कर्तव्य महानगरपालिका निधीतुन प्राथमिक शिक्षण निधीत दयावयाच्या अनुदानाची रक्कम व विशेष निधीत जमा करावयाच्या रक्कमा अशा बाबीसंबंधी कराव्या लागणा-या खर्चाची तदतुद करणे आवश्यक आहे. वरील सर्व बाबी लक्षात घेता प्रत्येक बाबीं अंतर्गत अपेक्षित उत्पन्न व अपेक्षित खर्च यांचे वर्गीकरणासहित अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सन २०००-२००१ चे सुधारीत अंदाजपत्रक व २००१-२००२ चे मुळ अंदाजपत्रकासंबधित तपशिल पुढील प्रमाणे आहे.

<u>गत साली म्हणजे सन २०००-२००१ करिता रूपये १३३ कोटीचे मुळ अंदाजपत्रक सादर करण्यात आले होते. मागील ८ महिन्याचे उत्पन्न व खर्च लक्षात घेता २०००-२००१ सालासाठी रूपये ९९.७० कोटी जमा व रूपये ९९.६८ कोटी खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक सादर करण्यात आलेले आहे. मुळ अंदाजपत्रक व सुधारित अंदाजपत्रक यामध्ये प्रामुख्याने जी तफावत दिसुन येते, त्यामध्ये मालमत्ता व पाणी</u>

पट्टीच्या उदिष्टांनुसार वसुली न होणे  या बाबींचा समावेश आहे. विित्तिय वर्ष २०००-२००१ मध्ये महापालिका हद्दीतील सर्व इमारती व जमिनीची फेर आकारणी आवश्यक असल्यामुळे सदर आकारणी व्यवस्थित करून घेण्याकरिता मेसर्स टाटा इन्फोटेक यांची नियुक्ती करण्यात आली होती. यासंदर्भात न्यायालयात दावे दाखल झाल्याने आकारणी करणे व बीले करदात्त्यांना बजावणे याकामी खुप विलंब झाला व सदर कार्यवाही अपुर्ण अवस्थेत ठेवुन सध्या प्रचलित पध्दतीने कर आकारणीचा निर्णय घेणे आवश्यक ठरले. परिणामत: मालमत्ता कराची देयके उशिरा काढण्यात आली या वर्षात महानगरपालिकेने पाणीपट्टी वसुलीच्या पध्दतीमध्ये फेरफार करून सदर आकाराचा समावेश मालमत्ता कराच्या बीलामध्ये केलेला होता. त्यामुळे मालमत्ता कर व पाणी पट्टी उत्त्पन्नावर परिणाम झालेला आहे.

आर्थिक वर्ष २००१-२००२ मध्ये महानगरपालिकेचा आवश्यक खर्च रूपये २४२.९३ कोटी आहे, पण उत्त्पन्नाच्या विविध बाबीतुन रक्कम रूपये १२१.३७ कोटी फक्त उत्त्पन्न अपेक्षित आहे. अंदाजित उत्त्पन्न रूपये १२१.३७ मध्ये  जकातीमधील काही वस्तुंवर प्रस्तावित करण्यात आलेल्या दरवाढीमुळे अपेक्षित एकूण ८ कोटी चा समावेश आहे.

सन २००१-२००२ चे अपेक्षित उत्त्पन्न व खर्च लक्षात घेता रहाणारी तुट रूपये १२१.५६ कोटी मालमत्ता कर पाणी पट्टी व इतर फी मध्ये वाढ करून भरून काढणे आवश्यक आहे. परंतु एवढी मोठी तुट भरून काढण्यासाठी मोठया प्रमाणावर करवाढ करावी लागेल. एवढया मोठया करवाढीचा बोजा शहरातील जनतेवर लादणे उचित नसल्यामुळे अल्पश: प्रमाणात मालमत्ता कराव करवाढीचा प्रस्ताव अंमलात आणुन तसेच उर्वरित देणी उदा. महाराष्ट्र राज्य औद्योगिक

--३--

विकास महामंडळ (एम.आय.डी.सी) व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे (एमजेपी) चे १९९४ पुर्वी पाणी खरेदीपोटी देय असलेले विलंब शुल्क आकार देणी पुढे ढकलण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

मालमत्ता करामध्ये सुचविण्यात आलेल्या वाढींचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

१)पथकर (Street Tax):- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ पोटकलम १८ नुसार सार्वजनिक रस्ते व पुल इत्त्यादी  बांधुन सुस्थितीत ठेवणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेने एकात्मिक रस्ते विकास योजनेच्या टप्पा क्रमांक १ नुसार शहरातील ३३ मुख्य रस्त्यांचा विकास कार्यक्रम हाती घेण्यात आलेला असुन सदर कार्यक्रम युध्द पातळीवर सुरू आहे. सदर विकास कार्यक्रमा अंतर्गत अंदाजे ४२ कोटी रू. खर्च अपेक्षित असुन त्यासाठी रक्कम रूपये २० कोटी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडुन कर्ज सुध्दा घेतलेले आहे. सदर कर्जाची व्याजासह परतफेड पुढील १५ आर्थिक वर्षात करावी लागणार आहे.

पथकर या कराची आकारणी अधिनियमाचे कलम १४८ (क)तरतुदीनुसार केली जाते. त्यांची वाढीची कमाल मर्यादा दर १० टक्के मात्र आहे. सदयाचे प्रचलित दर कर योग्य मुल्याच्या तीन टक्के असुन सदरहू कर कर योग्य मुल्याच्या १० टक्के म्हणजे ७ टक्के वाढ प्रस्तावित आहे. उल्हासनगर क्षेत्रात असलेल्या जमिनीचे व इमारतीचे वार्षिक कर योग्य मुल्यात अंदाजे रू. २७ कोटी असुन सदर करवाढीमुळे १.८९ करोड अतिरिक्त उत्त्पन्न मिळेल. रस्ते विकास कार्यक्रमावर खर्च व कर्ज परतफेड विचारात घेता. प्रस्तावित वाढही समर्थनिय वाटते.

२) पाणी पुरवठा सुविधा लाभ कर ( Water Benefit Tax ) :- पाणी पुरवठा लाभकर अधिनियमाच्या कलम १३० नुसार आकारण्यात येतो व त्यास कोणती कमाल मर्यादा नाही. महानगरपालिकेने शहरातील पाणी पुरवठा व वितरण सुरळीत करण्याच्या दृष्टीने मेसर्स. किर्लोस्कर कंस्ल्टंस यांचे कडुन तयार करण्यात आलेल्या योजनेच्या टप्पा क्र.१ ची अंमलबजावणी करणे करिता एकुण १८ कोटी रूपयांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत खुल्या बाजारातुन व एल.आय.सी कडुन कर्ज उभारणी केलेली आहे. तसेच पाणी वितरण व्यवस्थेचे अदयापही दोन टप्याचे काम पुर्ण करण्यासाठी वरीलप्रमाणे ३६कोटी रूपयांची कर्ज उभारणी करावी लागणार आहे. अशा प्रकारच्या भांडवली कामावर करावयाच्या संपुर्ण खर्च भागविण्यासाठी महापालिकेस आवश्यक वाटेल त्या टक्केवारीने पाणीपुरवठा लाभ कर आकारणीची तरतुद अधिनियमाचे कलम १२९ (अअ) मध्ये करण्यात आलेली आहे. वरील योजनेवरील भांडवली खर्च विचारात घेता सदरहु करात करयोग्य मुल्याच्या सदयाच्या प्रचलित एक टक्के दरामध्ये ९ टक्के वाढ करून एकुण १० टक्के प्रस्तावित वाढीमुळे २.४३ कोटी अतिरिक्त वाढ अपेक्षित आहे.

३)मलप्रवाह सुविधा लाभ कर ( Sewerage Benefit Tax ) :- महानगरपालिकेने वर्ष १९८०-१९८६ दरम्यान शहरातील भुयारी गटार योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अंदाजे ११ कोटी रूपयांची कर्ज उभारणी केली होती. सदर कर्जातुन महानगरपालिकेने मुख्य मलप्रवाह वाहिन्या टाकण्याचे काम पुर्ण केले आहे. परंतु सदर योजना पुर्णपणे कार्यान्वित करण्यासाठी शहरातील प्रत्येक घराच्या मलप्रवाह वाहिन्या मुख्य मल प्रवाह वाहिन्यास जोडणे आवश्यक आहे व सदर काम पुर्ण करण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाकडुन वारंवार तगादे लावण्यात येत आहेत. तसेच सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच अलमित्रा पटेल विरूध्द भारत सरकार या केसमध्ये दिलेल्या निर्णयानुसार घन



कचरा व्यवस्थापन ही महापालिकेची कायदेशिर जवाबदारी असल्याचा उल्लेख केला आहे. या संदर्भात तातडीने व गांभीर्याने कार्यवाही न करणे हा मा. सर्वोच्च न्यायालयाचा अवमान ठरू शकतो. याबाबींचा विचार करता सदरचा कर लादुन त्यातुन उर्वरित भुयारी गटार योजना पुर्ण करणे महापालिकेवर बंधन कारक आहे. सदर योजनेचा काही भाग कार्यान्वित करण्यासाठी दोन कोटी रू.ची तरुतुद २००१-२००२च्या अंदाजपत्रकात करण्यांत आलेली आहे. योजना पुर्ण करण्यासाठी अशा प्रकारची तरतुद भविष्यातील काही वर्षात करावी लागणार आहे. योजनेवर होणारा भांडवली खर्च व परतफेड व कर्ज परतफेड लक्षात घेता मलप्रवाह सुविधा लाभकरा मध्ये प्रचलित एक टक्के करामध्ये ९ टक्के वाढ करून एकुण १० टक्के करणे प्रस्तावित आहे. सदर वाढीमुळे २.४३ कोटी अतिरिक्त वाढ अपेक्षित आहे.

उपरोक्त प्रमाणे सुचविण्यात आलेल्या तिनही करामध्ये वाढ करण्याच्या प्रस्तावातुन रू. ६.७५ कोटी वाढ अपेक्षित आहे. महानगरपालिकेची सध्याची वित्तिय स्थिती सुस्थितीत राखण्यासाठी भारतीय संविधानाच्या ७४व्या घटना दुरूस्तीमुळे महापालिकेचे अतिरिक्त कार्य व कर्तव्य पार पाडणे व आवश्यक तो खर्च भागविण्यासाठी वरील प्रमाणे सुचविण्यात आलेल्या जकात व मालमत्ता करांच्या दरांमध्ये किमान वाढ मंजुर करणे हिताचे राहील. महापालिका हद्दीमध्ये आयात होणा-या विविध मालांवर सुचविण्यात आलेल्या जकात वाढीचे दर सुचविणारा तक्ता सोबत जोडला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ९९ नुसार पुढील आर्थिक वर्षाकरिता कराचे दर निश्चित करणे व अधिनियमाचे कलम ९६ नुसार स्थायी

समितीने अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यासाठी कलम ९५ नुसार उत्पन्न व खर्चाचे अंदाज सादर करण्यात येत आहे.

सन २००१-२००२ वर्षातील अपेक्षित उत्पन्न व खर्चाच्या महत्त्वपुर्ण बाबींची आयुक्तांनी स्थायी समिती सभागृहास माहिती दिली.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- सन २००१-२००२चा जो अर्थसंकल्प तयार केला आहे त्याबाबत आम्हाला येथे असे सांगायचे आहे की, मिळकतींच्या दरांमध्ये जी वाढ केली आहे त्यामुळे उत्पन्नामध्ये फार मोठा फरक पडेल असे काही नाही. १२१ कोटीचे उत्पन्न व २४२ कोटी खर्चाचा अंदाज तयार केला आहे. त्यामध्ये जी तुट आहे ती भरून काढण्यासाठी प्रशासनिक खर्चामध्ये काही कपात केली तर फार चांगले होईल.

मा.आयुक्त :- कोणकोणत्या खर्चामध्ये कपात करायची? त्याबाबत आपण सल्ला दयायचा आहे.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-(आय.आर.डी.पी)एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गतच्या खर्चात काटकसर / कपात करता येण्यासारखी आहे. काही काही अशा बाबी आहेत की, ज्यामध्ये प्रत्यक्ष खर्चापेक्षा आपण जास्त रकमेची तरतुद करून ठेवत असतो त्यामध्ये आपण कपात करू शकतो. (आय.आर.डी.पी) एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमा अंतर्गतच्या खर्चाची सविस्तर माहिती दिली जावी.

मा.आयुक्त :- २९ कोटी खर्च दर्शविला आहे. सी-४ शिर्षामध्ये आम्ही अशी तरतुद ठेवली आहे.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-ज्या प्राकलनांना तुम्ही मंजुरी दिलीत त्याव्यतिरिक्त जी कामे झाली आहेत त्यांची देयके आपण यातुन देणार काय?



या कामांना स्थायी समितीकडुन प्रशासकीय व वित्तिय मंजुरी सुध्दा घेतलेली नाही.

मा.आयुक्त :- त्यासाठी सुधारीत अंदाजपत्रकात तरतुद केली जाईल.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमां अंतर्गत नेताजी ते कैलास कॉलनी पर्यंतचा जो रस्ता घेतला होता त्यांचे मुळ प्राकलन एक ते दिड कोटी खर्चाचे तयार केले होते. आता आम्हाला असे समजते की, त्या रस्त्त्याचा खर्च दिड कोटीवरून साडेतीन कोटी पर्यंत गेला आहे. यामध्ये वाढीव दोन कोटीच्या खर्चास महासभेची मान्यता घेतली आहे का? हा खर्च का वाढवला आहे? यामध्ये वाढीव असे काम कोणते केले आहे?

श्री.चिजवानी (शहर अभियंता) :-हया रस्त्त्याचे काम जेव्हा हाती घेतले तेव्हा या रस्त्त्यावर मंजुर विकास आराखडयातील रूंदीपेक्षा जास्त रूंदी मिळाली त्यामुळे तेथेही अतिरिक्त काम करण्यांत आले. त्याव्यतिरिक्त पुर्वीच्या प्राकलनात गोलाईचे जे अतिरिक्त काम होते ते सुध्दा करण्यांत येणार असल्याने या रस्त्त्याच्या कामात खर्च वाढला आहे.

__मा.आयुक्त :-__ प्रत्यक्षात ब-याचशा ठिकाणी अंदाजित प्राकलनिय रक्कमेपेक्षा जास्त रक्कमेची कामे झाली आहेत. विशेषतः कॅम्प १ ,२ ,३ मध्ये ब-याच ठिकाणी प्राकलनिय रक्कमेपेक्षा जास्त खर्चाची कामे झाली आहेत.

__मा.सदस्य श्री. प्रमोद टाले__ :-रस्ते विकास कार्यक्रमां अंतर्गतच्या कामाची देयके या अर्थसंकल्पीय रक्कमेतुन न देता ती पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पिय रक्कमेतुन दिली जातील का?

__मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी__ :- असा नियम आहे का?

__मा.आयुक्त :-__ रस्ते विकास कार्यक्रमाचे असे आहे की, आपण या कामी जेवढा खर्च करू तेवढीच रक्कम एम.एम.आर.डी.ए. कडुन प्रतिपुर्ती म्हणुन आपणांस मिळेल. आपण खर्च कमी केला तर कर्जे सुध्दा कमी मिळेल...

__मा.सदस्य श्री. प्रमोद टाले__ :-विकास आराखडाच्या(मर्यादे)बाहेर प्राकलनिय काम जाईल काय? विकास आराखडयाच्या प्रमाणेच कामे होतील ना? विकास आराखडयाच्या (मर्यादे) बाहेर जी कामे झाली आहेत त्याचे काय?

__मा.आयुक्त__ :- विकास आराखडयापेक्षा कमी कामे नसावीत. जास्त होऊ शकतात.

__मा.सदस्य श्री. प्रमोद टाले__ :-अशा कामांची सात आठ कोटीची जी बीले आहेत ती देणे थांबवली जावीत. ती बिले पुढील बजेटमधुन दिली जावीत.

__मा.आयुक्त__ :- सध्या चालु असलेली कामे बंद करून ती पुढच्या बजेटमध्ये घ्या, हे कसे होणार? असे केल्याने खर्च वाढेल, वेळ वाढेल.

__मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी__ :-मागच्यावेळी जकात करापासुन अपेक्षित असलेले ३३ कोटीचे उत्त्पन्नात दर वाढवून ३६ कोटी केले होते.१२ महिन्याचा देकार ४६ कोटीचा आला होता आता जकात कराचे दर वाढवून आपण ५२ कोटी केले आहे हे कसे?



__मा.आयुक्त :-__ नैसर्गिक वाढ १० टक्केची आहे.

__मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-__ मागच्या वर्षी किती होती?

__मा.आयुक्त__ :- आता ३३ + ८ असे ५१ कोटी होतात.

__मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण__ :- जकात कर वसुलीचा ठेका ५३ कोटीमध्ये गेला तरीही आपले नुकसानच आहे.

__मा.आयुक्त :-__ स्पर्धात्त्मक निविदा प्राप्त व्हाव्यात म्हणुन आपण ५२ कोटीचे उददीष्ट ठेवले आहे, होऊ शकते, ६० कोटीचाही देकार येऊ शकतो.

__मा.सदस्य श्री.रमेश चव्हाण :-__ मागच्यावर्षीच्या देकार रक्कमेमध्ये १० टक्के वाढ केल्याने किती रक्कम होते?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- ५१ . ८५ कोटी होतात.

मा.आयुक्त :- हे जे दर आहेत ते मागच्यावेळी निविदाकारांच्या एकमेंकांच्या स्पर्धेतुन निर्माण झाले होते. आता आपण ५२ कोटी अपेक्षित धरले आहे. होऊ शकते. ६० कोटीचाही देकार येऊ शकतो. अशाप्रकारची परिस्थिती आपण निर्माण करू शकतो.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- पृष्ठ क्र.२ वर अंदाजे २७ कोटी दर्शविलेले आहेत ते?

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी) :- ते कर योग्य मुल्य आहे, ७२ कोटी रूपयांवर २५ टक्के प्रमाणे आकडेमोड केली तर ती येवढी येते.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-या अर्थसंकल्पात दुर्बल घटकांसाठी किती रक्कमेची तरतुद केली आहे.

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी) :-एकुण ५ कोटी.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- या रक्कमेची कोणकोणत्त्या शिर्षामध्ये कशीकशी विगतवारी केली आहे?

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी) :-अनुदान, पगार, कर्जे इत्त्यादी सर्व वजा जाता जी रक्कम उरते त्त्या हिशोबाने ३ कोटी होतात. परंतु आम्ही ५ कोटी ठेवले आहेत. पृष्ठ क्र.२८ वर शिर्ष सी-४ पहावे.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-किती रक्कमेची तरतुद केली आहे?

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी) :-एकुण ५ कोटी पैकी गलिच्छवस्ती मध्ये विकास कामे दिड कोटी दुर्बल घटक वसाहतीमध्ये विकास कामे २ कोटी व पाणी पुरवठा, सार्वजनिक बांधकाम, दिवाबत्त्ती इत्त्यादीसाठी दिड कोटी असे एकुण ५ कोटी होतात.

मा.आयुक्त :- दुर्बल घटकासाठी २ कोटी, गलिच्छ वस्तीसाठी, दिड, सार्वजनिक दिवाबत्त्तीसाठी, सार्व-शौचालय, मुता-या, पाणीपुरवठा इत्त्यादी सर्व बाबींचा त्त्यामध्ये समावेश आहे.



मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :- अर्थसंकप्लीय अंदाजास मंजुरी दिली जावी.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- जसा आयुक्तांनी माडला आहे. तसाच्या तसा?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- विरोधी पक्षीयांनी प्रथम बोलले पाहिजे. त्त्यांनी सुचना केल्या पाहिजेत, त्त्यांच्या अभ्यासावर, आम्हाला निर्णय घेता येईल म्हणुन सत्त्ताधारी पक्षीयांनी नंतर बोलले पाहिजे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- यापुढे असे होईल काय?

*<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी</u> :- आयुक्तांनी जो अर्थसंकल्पीय अंदाज सादर केला आहे. त्यामध्ये करांचे दर वाढविण्याची जी शिफारस केली आहे त्यानुसार कोणकोणत्त्या करांचे दर किती वाढवायचे किंवा कमी करायचे?*

*<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बहरानी</u> :- विरोधी पक्षीयांच्या हरकती / सूचनां नंतर अर्थसंकल्पीय अंदाजास मंजुरी देता येईल.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- करांचे दर वाढविण्याबाबत विचारले आहे, उत्त्तर दिले पाहिजे.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :- श्री.ठाकुर बेहरानी हे व्यापारी महामंडळाचे अध्यक्ष आहेत त्यांना विचारले जावे, त्याशिवाय करांचे दर वाढविले जावू नयेत, सभापती महोदया हया मुददयाची इतिवृतांतात नोंद घ्यायला सांगा.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> आम्ही तुम्ही असे न बोलता, स्थायी समितीच्या सर्व सदस्यांनी मिळून अर्थसंकल्पास मंजुरी दिली पाहिजे.*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी</u> :- करांचे दर निश्चित करणे विषयी सर्व संमतीने मंजुर केला जावा.*

*<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी</u> :- श्री. राजेंद्र चौधरी म्हणतात, अर्थसंकल्पीय अंदाज सर्व संमतीने मंजुर करत आहोत म्हणुन?*

*<u>मा.सचिव :-</u>नाही तर असे केले जावे का? काही वेळेपुर्वी सर्व पक्षिय नेत्त्यामध्ये जी चर्चा झाली तीलाच अंतीम स्वरूप दिले जावे?*

*<u>मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी :-</u>सर्व पक्षीय नेत्त्याच्या बैठकीत निर्णय झाला आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी</u> :-सर्व पक्षिय नेत्त्यांच्या बैठकीत याबाबत काय निर्णय झाला हे आम्हाला माहित नाही, त्या बैठकीत काय चर्चा झाली? ती सांगीतली जावी.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- तुमच्या नेत्त्यांबरोबर झालेली चर्चा आम्ही तुम्हाला सांगायची? तुम्हाला माहित नाही? गलिच्छ वस्त्त्यांमधील कामासाठी २४ लाख रूपयांचे समायोजन केले जावे. स्थायी समितीच्या एका सभेत जेव्हा मी*



*पिठासिन अधिकारी होतो त्यावेळी असे आश्वासन देण्यांत आले होते की, ही कामे सुधारित अर्थसंकल्पात तरतुद करून केली जातील.*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u> :- त्यावेळी ज्या कामांना मंजुरी दिली आहे ती कामे झाली पाहिजेत.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- ७४ लाखांची जी कामे मंजुर झाली आहेत ती कामे झाली पाहिजेत. ज्या कामांना स्थायी समितीच्या एका सभेत मी पिठासिन अधिकारी असताना मंजुरी दिली आहे, कोण कोणत्त्या रस्त्त्याचे काम हाती घेतले जावे. त्याबाबत*

सुध्दा चर्चा झाली होती, सपना गार्डन मधील एक रस्ता ज्याबाबत श्री. नरेंद्रकुमार ठाकुर व श्री. राजु जग्याशी यांनी आवाज उठविला होता. चव्हाण फर्निचर ते हरव्दार अपार्टमेंट व महेश स्टेशनरी ते सती अपार्टमेंट उल्हासनगर या दोन रस्त्यांचे अनुक्रमे ८ लाख व १२ लाखाचे काम सुध्दा सुधारीत अर्थसंकल्पात म्हणजे २०००-२००१ च्या अर्थसंकल्पात झाले पाहिजे. तसेच बॅरेक क्र.१८२२ उल्हासनगर-५ मच्छीमार्केट शेजारील गार्डनची स्थिती अतिशय खराब आहे, या गार्डनच्या कामाचे ३ लाखाचे प्राकलन तयार आहे. हे काम सुध्दा झाले पाहिजे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :- गार्डनसाठी वेगळी स्वतंत्र तरतुद आहे ना?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> येणा-या वर्षात गार्डनसाठी आयुक्तांनी एक रूपयाची सुध्दा तरतुद केलेली नाही.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u> :- कुठले गार्डन आहे?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-कॅम्प ५ मधील.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u> :-तर श्री.किशोर वनवारी यांच्याच प्रभागातील असेल?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-सन २००१-२००२ या वर्षाचा हा जो अर्थसंकप्लीय अंदाज आयुक्तांनी आपल्या समोर ठेवला आहे. त्यामध्ये पथकर, पाणी पुरवठा लाभ कर व मल प्रवाह कर या तिन्ही करांमध्ये एकुण २५ टक्के वाढ केल्याने ६ लाख रूपये अधिक उत्पन्न मिळेल असा अंदाज आहे. येणारे वर्षे हे निवडणुकांचे वर्षे आहे, त्यामुळे बजेट बाबत आयोजित केलेल्या सर्वपक्षिय नेत्त्यांच्या बैठकीत असे ठरले आहे की,करांचे दर वाढवू नयेत.

<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बहरानी :-</u> शहरातील व्यापाराचाही विचार केला जावा. शेजारिल अंबरनाथ व बदलापुर या नगरपालिकांमध्ये जकात कर अस्तित्त्वात नाही. त्याचाही विचार केला पाहिजे.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- मिळकत कराचे देयका मध्येच पाणीपट्टीची ठराविक रक्कम समाविष्ट करून देयके पाठविण्याची जी नविन पध्दत सुरू केली, झोपडी, घर, दुकान यांना वेगवेगळया दराने पाणीपट्टीचे जे दर आकारले जात होते. त्याबाबत अनेकांनी ओरड सुरू केली. याबाबत मा.महापौरांनी माहिती देताना सांगितले की, आपल्या महानगरपालिकेच्या शेजारी जी कल्याण डोंबिवली महानगरपालिका आहे तेथे प्रत्त्येक झोपडीस ४० रूपये याप्रमाणे पाणी बिल आकारले जात आहे.



म्हणुन माझे असे म्हणणे आहे की येथे सुध्दा प्रत्त्येक झोपडीस ४० रू. ,पऱ्याचे छप्पर असलेल्या घरास ५० रूपये, व्यावसायिकास प्रतिमहा ६० रू. व टिअरगार्ड व आरसीसी. इमारतीत रहाणा-यांना १०० रू.प्रतिमहा याप्रमाणे पाणीपट्टी बिल निश्चित केले जावे. त्यामुळे जे लोक १२५ रू. बिल भरत होते त्यांना ६० रू. बिल भरावे लागेल, या दरामुळे त्यांना फायदा मिळेल, सन २००१-२००२च्या अर्थसंकल्पीय अंदाजात १२१ कोटी उत्पन्न व २४२ कोटी खर्च अपेक्षित आहे. करांच्या दरांमध्ये

काहीही वाढ करायची नसल्याने आयुक्तांनी दिलेल्या या अर्थसंकल्पिय अंदाजातील काही बाबींमध्ये कपात करावी लागेल.

मा.सदस्या श्रीमती. पदमा वलेचा यांचे सायंकाही ५. १५ वाजता स्थायी समिती सभागृहात आगमन झाले.

<u>श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी)</u> :-आयुक्तांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील उत्त्पन्नाच्या व खर्चाच्या काही बाबींमध्ये स्थायी समिती खालील प्रमाणे बदल सुचवित आहे.

<u>सन २००१-२००२ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक</u>

<u>रुपयांचे आकडे हजारात</u>

| पृष्ठ क्र. | उत्त्पन्नाच्या बाबी | रुपये ११२१३७४४ | खर्चाच्या बाबी | रुपये २४२९३११ | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | जकात | कपात २ ,०००० | -पगाराचा ॲरिअस (५ वा वेतन आयोग) | कपात-८९००७ | ११ |
| २/ ९/ २३ | + मालमत्ता कर | वाढ-१५००० | -पगार फरक बाकी | वाढ - ३०० | १४ |
| ३. | + रस्त्यावरील इमारत साहित्य जमा करणे. | वाढ -१००० | +झेरॉक्स/फॅक्स/ टंकलेखन मशीन खरेदी | वाढ - ३०० | १४ |
| ४. | + मार्केट भाडे | वाढ-२१५० | +कार्यालयात फर्नीचर | वाढ - ७०० | १९ |
| ४. | + फेरीवाले परवाना फी | वाढ-४९७ | -उद्यानाची निगा व दुरूस्ती | कपात -२०० | १९ |
| ५. | + रोड कटिंग चार्जेस | वाढ-५००० | -नवीन झाडे व ट्रीगार्ड खरेदी करणे | कपात - १०० | १९ |
| ६. | + डिपीडीसी अनुदान | वाढ-१५०० | -कारंजे दुरूस्ती | कपात - १००० | १९ |
| ९. | + हुडको कर्ज | वाढ- २००००० | +महापालिका इमारतींची दुरूस्ती | वाढ - १००० | १९ |
| ३४ | + एम.एम.आर. डी.ए कर्ज | वाढ ४००००० | -रस्ते दुरूस्ती | कपात - १०० | २० |
| ९. | + हुडको कर्ज | वाढ २०००० | +वाहतुक नियंत्रण देखभाल दुरूस्ती | वाढ -१५०० | २१ |
| | | | +प्राथमिक शिक्षण | वाढ - ५०० | २१ |
| | | | +सांस्कृतिक कार्यक्रम | वाढ -४०० | २२ |
| | | | +नगरसेवकांचे | वाढ - ४०० | २२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | भाडे | | |
| | | | +धर्मदाय संस्थांना देणगी | वाढ -१०० | २४ |
| | | | +संगणक खरेदी | वाढ - ५०० | २६ |
| | | | +साहित्य खरेदी, बागेतील खेळणी खरेदी करणे. | वाढ -१०००० | २६ |
| | | | +नवीन रस्ते बांधणे | वाढ - १५०० | २७ |
| | | | +डिपीटीसी अनुदानातुन रस्ते बांधणे | कपात -५००० | २८ |
| | | | -दुर्बल घटक वसाहती कामे | वाढ + २०००० २०००० | २८ |
| | | | +एमएमआरडी कडुन कर्जातील काम | वाढ - २००००० | २८ |
| | | | +शिक्षण उपकर परतावा | वाढ - २३२८० | ३० |
| | | | + रोजगार हमी उपकर परतावा | वाढ -३२४० | ३० |
| | | | - पगार फरक थकबाकी | कपात -१०९९० | ३६ |
| | | | - एमआयडीसी देणे | कपात- ७२०००० | ३९ |
| | | | -एमडब्लु एसएसबी थकबाकी | कपात १२०००० | ३९ |
| | | | + टॅंकर भाडे | वाढ - ४००० | ३९ |
| | | | - वाहन खरेदी | कपात-६००० | ४३ |
| | | | - इतर खर्च | कपात-१ | ४३ |
| | | | - भुयारी गटार योजनेसाठी साहित्य | कपात-६००० | ४४ |
| | | | -भुयारी गटार योजना कर्ज परतफेड | कपात-७८९२९ | ४५ |
| | | | -पाणी पुरवठा योजना कर्ज परतफेड | कपात -४६३३३ | ४५ |
| | | | | | |
| | एकुण | १६१३८९१ | एकुण | १६१३३७१ | |

<u>मा.सदस्य श्री रामचंद्र पारवानी</u> :-५व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दयावयाच्या थकबाकीची रक्कम देण्यासाठी जो अंदाज आयुक्तांनी तयार केला होता त्यात जी कपात सुचविण्यात येत आहे ती कपात प्रशासनास हे मान्य आहे काय?

<u>मा.आयुक्त</u> :- आमच्या सहमतीची काय गोष्ट आहे?आमची सहमती विचारात घेतली जात नाही, या कपातीस आमची सहमती नाही.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>तीन वेळा,(तीन वर्षी)आपण अर्थसंकल्पीय अंदाजास मंजुरी दिली आहे. ५व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दयावयाच्या पगारच्या फरकाची बाकी देणार नाही असे नाही चालु जी आहे ती देऊ.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :- पूढच्या वर्षी आपण ती देणार आहात काय?

<u>मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी</u> :-पुढच्या वर्षी महापालिकेच्या उत्पन्नात बरीच वाढ होणार आहे.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :-मागील वर्षी (५व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दयावयाच्या पगारच्या फरकाची) किती बाकी दिली होती?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-देणी देणे सद्या आपण कमी करत आहोत.

<u>मा.आयुक्त</u> :- मागच्यावेळी तरतुद करून ठेवली होती परंतु बाकी दिली नव्हती ती यासाठी की, आम्ही कर्मचा-यांना सांगितले होते की, वसुली समाधानकारक नाही,तुम्ही वसुली वाढवा मग सुधारित अर्थसंकल्पात तरतुद करून देता येईल.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- वसुली झाली तर या अटीवर. याची इतिवृतांतात नोंद घेतली जावी.

<u>मा.आयुक्त</u> :- वसुली झाली तर थकबाकी देवू असे श्री. वनवारी म्हणतात याची इतिवृतांतात नोंद घ्या. ५व्या वेतन आयोगाच्या फरका नुसारची देणे असलेली बाकी रक्कम देण्यासाठी आम्ही तरतुद केली होती. परंतु वसुलीचा परफॉरमन्स चांगला नव्हता त्यामुळे त्यावेळी थकबाकी रक्कम दिली नाही. कर्मचा-यांना सांगण्यांत आले होते की, वसुली वाढवून दिलीत तर बाकी देऊ. यावेळी मात्र थकबाकीची रक्कम दिली नाही तर कर्मचारी संघटनांकडुन संप वगैरे होण्याची शक्यता आहे.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-हया रक्कमेपैकी आम्ही काहीच देत नाही असे नाही. १७च्या ऐवजी ७ची तरतुद करत आहोत. १० कोटीचे प्रावधान पुढे ढकलत आहोत.

<u>मा.सदस्य श्री.सेवलदास ठाकुर :-</u> ही तरतुद कमी पडत असेल तर सुधारित अर्थसंकल्पात तरतुद केली जाईल.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी</u> :- मागील अर्थसंकल्पात किती रक्कमेची तरतुद केली होती?

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी) :-पृष्ठ क्र.१९ वर पहावे.



मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-उद्याने दुरूस्ती व निगा या कामी १.१० लाखाची जी तरतुद केलेली होती हा खर्च कुठे केला? स्थायी समितीत सोळा सदस्य आहेत. त्यांना विचारले जावे या तरतुदीनुसार कुठे काम झाले आहे काय?

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी) :-वॉऊचरर्स आहेत, छोटी मोठी कामे करून घेतली आहेत.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-सुधारित अर्थसंकल्पात तर २.५ कोटी दर्शाविले आहेत?

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी) :-नियमितपाणी बिला पोटी एम.आय.डी.सी ला १८ कोटी दयावे लागतात. थकबाकी पोटी सहा कोटी रूपये असे एकुण २४ कोटी वर्षाला दयावे लागतात.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- याचाच अर्थ असा की, प्रत्येक महिन्यास दोन कोटी?

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- याकामी तरतुद कमी का केली आहे?

मा.आयुक्त :- कमी नाही केली डिफर केली आहे, दायीत्त्व पुढे ढकलले आहे. मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ (१)(क)परिवहन उपक्रमाचे संपादन,त्याचा विस्तार, त्याचे प्रशासन, तो चालवणे व त्याची व्यवस्था यामुळे महानगरपालिका ज्याबद्दल जबाबदार असेल अशा सर्व रकमा व मुदलाचे व व्याजाचे हप्ते याव्यतिरिक्त, महानगरपालिका ज्या देण्याबद्दल या अधिनियमान्वये जबाबदार असेल अशा सर्व रकमा व मुदल व व्याज यांचे हपते जसजसे देय होतील तसतसे ते भरण्याबदल तरतुद केली पाहिजे.

मा.सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- जर कुणाला या कामाची आवश्यकता भासली तर?

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी) :-या सर्व मुख्य बाबी होत्त्या. या व्यतिरिक्त छोटया मोठया दुस-या काही बाबी आहेत.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- हुडको कडुन कर्ज घेणार आहात ना?

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी) :-हुडको कडुन चार कोटी कर्ज घेवु परंतु तीन वर्षा पर्यंत तरी त्याची परतफेड करणार नाही आहोत. हे खर्चामध्ये दाखवु. रस्ते दुरूस्ती, वाहतुक नियंत्रण दुरूस्तीसाठी एक लाखाची तरतुद केली आहे ती कपात केली जावी.

मा.आयुक्त :- वाहतुक नियंत्रण दुरूस्ती बाबत अनेक तक्रारी येत असतात यास्तव याकामी केलेली तरतुद कमी करणे उचित होणार नाही.

मा.सदस्य श्री. ठाकुर बहरानी / श्री. विनोद तलरेजा :-याकामी केलेली तरतुद कायम ठेवली जावी.

मा.सदस्य श्री. ठाकुर बहरानी :- याकामी मिळणारे अनुदान श्री. मुकेश आयलानी हे ठाणे येथुन घेवुन येत असतात.

**श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता)** :- भांडवली खर्चासाठी ही तरतुद करून ठेऊ. कामांचा सविस्तर प्रस्ताव तयार करून शासनास सादर करू त्यांच्याकडुन जो निधीपैसा प्राप्त होईल त्यातुन ही कामे करू. यदा कदाचित हे पैसे कमी पडत असतील तर सुधारित अर्थ संकल्पात तरतुद करू.



**श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी)** :-मिळकत कराचे दरांमध्ये वाढ केली आहे. पाणी टॅकर्स भाडेसाठी मागील वर्षी ६५लाख खर्च झाले होते. यावर्षी आयुक्तांनी ३० लाखाची तरतुद केली होती त्यात ४० लाखाची वाढ करून ७० केले आहे. १६१ कोटी ३८ लाख उत्पन्न अपेक्षित आहे व १६१ कोटी ३३ लाख खर्च.

**मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी** :- ७ लाखामध्ये महापालिकेला एक नविन टॅकर घेता येईल.

**मा.सदस्य श्री. प्रमोद टाले** :- संगणकासाठी किती तरतुद ठेवली आहे.

**श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी)** :-दोन लाखाची तरतुद ठेवली होती त्यामध्ये आणखी एक लाखाची वाढ केली आहे.

**मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-** ती वाढ का केली आहे हे सुध्दा सांगा.... महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती यांच्या कार्यालयामध्ये झेरॉक्स मशीन साठी ही तरतुद वाढविण्यात आलेली आहे.

**मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी** :- धर्मदाय - नोंदणीकृत सामाजिक, शैक्षणिक संस्थाना अनुदाने दिली जात नसताना येथे तरतुद कशी दाखविली आहे.

**श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी) :-**दक्षिण आफ्रिकेस एक अपंग व्यक्ती गेली होती. त्यांना स्कॉलरशिप म्हणुन अनुदान दिले होते मात्र त्यावेळी बजेटमध्ये तरतुद नव्हती आता ती रक्कम या बजेटमधुन देऊ.

**मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी / श्री. रमेश चव्हाण** :- टाऊन हॉलसाठी किती रक्कमेची तरतुद केली आहे?

**मा.सदस्य श्री. प्रमोद टाले** :- मा. महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती यांचा निधी किती ठेवला आहे.

**मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :-** टाऊन हॉलचे प्रकरण आता न्यायालयात गेले असल्याने न्यायप्रविष्ट प्रकरणावर भाष्य करणे उचित नाही.

**मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-** महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती यांचा निधी टाऊन हॉलसाठी वर्ग केला जावा.

**मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-** ठिक आहे. उपमहापौर व स्थायी समिती सभापतींचा निधी टाऊन हॉलसाठी वर्ग करू.

मा.सदस्य श्री.राजेंद चौधरी / श्री. रमेश चव्हाण :- महापौर निधी सुध्दा टाऊन हॉलसाठी वर्ग केला जावा.

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :- हे वर्ष निवडणुक वर्ष असल्याने नगरसेवक निधी कमी करून ४ लाख केला जावा. यावर्षी जास्त खर्च केला जाऊ नये.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-नागरिकांना सुविधा दिल्या नाहीत तर नागरिक मते कशी देतील?



मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- मागच्या वर्षी किशोर वनवारी म्हणत होते नगरसेवक निधी २ लाखाचा ४ लाख करा नाही तर मी स्थायी समितीच्या हया सभेचे कामकाज चालु देणार नाही. त्याप्रमाणे आम्ही असे म्हणतो की, नगरसेवक निधी १० लाखाचा १५ लाख केला जावा.

मा.सदस्य श्री किशोर वनवारी :- मागील वर्षी मी असे म्हणाल्याचे श्री. पारवानी म्हणतात त्यांनी त्यांच्या या शब्दांमध्ये सुधारणा करून घ्यावी. हे जे म्हणतात ते मागील वर्षाच्या मागील वर्षाबाबत आहे. मयुर हॉटेलमध्ये बैठक झाली होती. त्यावेळेला असा निर्णय घेण्यात आला होता की, सत्ताधारी नगरसेवकांचा नगरसेवक निधी ४ लाख व विरोधी पक्षीय नगरसेवकांचा नगरसेवक निधी २ लाख केला जावा. त्यानंतर श्री.प्रकाश माखिजा हे स्थायी समितीचे सभापती असताना नगरसेवक निधी ४ लाख करून घेतला. व त्यानंतर १० लाख करून घेतला. आमची युती जेव्हा सत्तेवर आली तेव्हा पासुन नगरसेवक निधी ४ लाखाचा १० लाख केला गेला.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- श्री.पारवानी म्हणतात की, आता पण आपणच सत्तेवर आहात म्हणुन नगरसेवक निधी दहा लाखावरून १५ लाख केला जावा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- महापालिकेची आर्थिक स्थिती पहाता नगरसेवक निधी १० लाखावरून १५ लाख करणे योग्य नाही. निधी वाढवा म्हणता परंतु ३४५ लाख रू. कुठून येतील? ते तर सांगा?

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :- करांचे दर पण वाढवायचे नाहीत म्हणता तर मग एवढया पैशांची ॲडजेसमेंट कशी करणार?

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- आपण म्हणता आम्ही नगरसेवक निधी वाढविला परंतु स्विकृत सदस्याचा नगरसेवक निधी का हिरावून घेतला?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मुंबई महानगरपालिकेत व कल्याण महानगरपालिकेत सुध्दा स्विकृत सदस्यांना नगरसेवक निधी दिला जात नाही.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- पाणी पुरवठ्यापोटी १७ कोटी रू.भरले तर आम्ही आपणांस पाणी पुरवठा वाढवून देऊ असे एक पत्र आपल्या महानगरपालिकेस आलेले आहे त्याबाबत आपण काय विचार केलेला आहे?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-आजच सर्व पक्षीय नेत्त्याची बैठक झाली. आजच्या स्थितीला महानगरपालिका १७ कोटी रू. भरण्याच्या स्थितीत नाही. म्हणुन याबाबत एक शिष्टमंडळ घेऊन मा. मुख्यमंत्र्यांना आम्ही भेटू व सर्व परिस्थिती त्यांना समजावुन सांगु त्यातुन काही मार्ग निघु शकेल. नगरसेवक प्रशिक्षण प्रवास भत्त्यासाठी मागच्या वर्षी एक लाखाची तरतुद होती. यावेळी ती ५ लाख केली आहे. ही सुध्दा एक आनंदाची गोष्ट आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- पाण्याचे दर कमी करून काही फरक पडणार आहे काय? जे लोक पैसे भरत नाही त्यांचे काय?

मा.आयुक्त :- याबाबत मी यापुर्वीच सांगीतले आहे की, १०० टक्के वसुली झाली तरी १३ कोटी रू. मिळतील परंतु आम्हाला तर वर्षाला २४ कोटी त्यांना दयायचे आहेत व प्रत्यक्षात पाणी पट्टीची मागणी सात कोटीची असेल, दयावे मात्र लागणार आहेत २४ कोटी.



मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-तर पुढे मागे ते पाणी कपात सुध्दा करू शकतील?

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :- म्हणुनच तर आपण म्हणत असाल तर पाण्याचे दर वाढवु.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- विरोधी पक्ष नेत्त्या श्रीमती. सुनिता राजवानी तसेच श्री. लाल पंजाबी, श्री. नरेंद्र राजानी यांनी या प्रस्तावावर संमती दर्शविली आहे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- मागच्यावेळीच एम.आय.डी.सी वाले पाणी कपात करणार होते परंतु श्री. कावळे साहेब यांच्याशी बोलणी करून पाणी पुरवठा दाब पूर्ववत केला आहे.

मा.आयुक्त :- आपण दरमहा त्यांनी दोन कोटी रूपये देत आहोत.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-पऱ्याचे छप्पर असलेले लोक पाणी पट्टी पोटी जर ५० रू.प्रतिमहा भरू लागले तर झोपडपट्टीवाले लोक पाणीपट्टी पोटी ४० रू.कसे भरतील? झोपडपट्टीवाशीयांना पाणीपट्टी बिल प्रतिमहा ३० रूपयांप्रमाणे आकारले जावे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-पहिले म्हणतात की, एम.आय.डी.सी चे पैसे दिले नाहीत तर पाणी कपात केली जाईल, आता पाण्याचे बिल आणखी कमी करण्यास सांगत आहेत. हे कसे?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-सभापतींची निवड करण्यावेळी आम्हाला बोलावले जात नाही मात्र अशा या सभांसाठी कसे बोलावता? आमच्या प्रभागामध्ये झोपडपट्टया आहेत त्यातील झोपडधारकांच्या हिताचे रक्षण करणे हे आमचे कर्तव्य आहे.

मा.सदस्य श्री. ठाकुर बहरानी :-आपल्या ऐकटयाच्याच प्रभागात झोपडपट्ट्या आहेत काय?

**मा.सदस्य श्री.राजेंद्र चौधरी :-**आपण व्यापारी महामंडळाचे प्रतिनिधी आहात त्यांचेच हित पाहणार...

**मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-** हा अर्थसंकल्पीय अंदाज बोगस आहे.

**मा.सदस्या श्रीमती. लविना कुंदनानी** :-झोपडीधारकास ४०, ऐसीसी पऱ्याचे छप्पर असलेल्यांना ५० रू, इमारतीत रहाणा-या लोकांना पाणीबिल प्रतीमहा १०० रू.का? त्यांना पाणी बिल ७५ रू. प्रतीमहा याप्रमाणे आकारले पाहिजे, इमारतीत रहाणा-यांना जर १०० रू. याप्रमाणे पाणी बिल देणार असाल तर मग बंगल्यामध्ये रहाणा-यांना काय ५०० रू.प्रतीमहा प्रमाणे पाण्याचे बिल आकारणार आहात काय?

**मा.सदस्य श्री. प्रमोद टाले** :-असे करा सर्वांचे संपुर्ण पाणी बिलच माफ करून टाका.

**मा.सदस्य श्री.किशोर वनवारी :-** पाणीपट्टी आकारणीची सुमारे १५ हजार ते २० हजार वादग्रस्त प्रकरणे होती म्हणुन पाणीबिल आकारणीची नविन पध्दत



अंमलात आणली. ज्यांना कमीत कमी ११० रूपये पाणी बिल जात होते त्यांना ते १०० रू. केले, ज्यांना कमीत कमी २०० रू. पाणी बिल जात होते त्यांच्यासाठी १२५रू. याप्रमाणे पाणी बिल निश्चित करून दिले होते.

मा.सदस्या श्रीमती कांता गजवानी यांचे सायंकाळी ५. ४३ वा. स्थायी समिती सभागृहात आगमन झाले.

**मा.सदस्या श्रीमती किशोर वनवारी** :-सोसायटी मध्ये रहाणा-या लोकांच्या पाणी बिलाची स्थिती काय होती? प्रत्येक फ्लॅट धारक २५०-२५० रू. याप्रमाणे पाणी बिल भरत होते, लिफ्ट, वॉचमेन इत्यादी बाबतचा मेन्टेनन्स चार्ज म्हणुन १५० रू. वेगळे भरत होते. आता ते १००-१०० रूपये भरत आहेत. आज आपण सर्वांना पाणी बिल निश्चित करून दिले आहे. फ्लॅटधारक १००पक्के घरवाला ५० रू. झोपडीधारकास ४० रू. याप्रमाणे पाणी बिल आकारले जाईल.

**मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-** काही ठिकाणी दुकानांमध्ये नळ जोडणी नाही तरी ही त्या लोकांना पाणी बिल भरावे लागत आहे. तसेच झोपडपट्यामध्येही काही लोकांनी नळजोडणी घेतली नसतानाही त्यांना पाणी बिल भरावे लागत आहे.

**मा.सदस्य श्री. किशोर वनवारी** :- (चौधरी) आपण म्हणालात तसेच श्री. बी.बी.मोरे हे सर्व पक्षीय नेत्त्यांच्या बैठकीमध्ये म्हणाले की,झोपडपट्टीधारकांचे पाणी बिल माफ करा, भाऊ ठाकुर बेहरानी म्हणतात दुकानदारांचे पाणी बिल कमी करा, श्री. प्रमोद टाले म्हणतात की, सर्वाचेच पाणी बिल माफ करा. यामुळे
महापालिका दरवर्षी २४ कोटी रूपयांनी तोटयात जात राहील, आजच्या घडीला पाणी बिल माफ करण्यासारखी महापालिकेची आर्थिक स्थिती नाही. महापालिकेची आर्थिक स्थिती जेव्हा सुधारेल तेव्हा सर्वांची पाणी बिले माफ करू. आपण सर्वजण जे येथे बसलो आहेत ते सर्वांच्या अडचणी सोडविण्यासाठी नागरिकांच्या अडचणी सोडविण्याबरोबर महापालिकेच्या ही अडचणी सोडविणे हे आपले कर्तव्य आहे.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-समजा एखादया इमारतीत १६ फ्लॅट असतील तर १६ पाणी बिले येतील त्याचबरोबर सोसायटीच्या नावे जे पाणी बिल येते त्यांचे काय?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- सोसायटीच्या नावाने येणारे ते पाण्याचे बिल रद्द केले पाहिजे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- पाणी टॅंकर भाडे देण्यासाठी किती रक्कमेची तरतुद केलेली आहे?

श्री. हरेश इदनानी (उपमुख्य लेखा अधिकारी) :-७० लाख रूपयांची याकामी तरतुद केली आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- यापूर्वी किती तरतुद केली होती? हि नोंद कोणत्त्या पानावर आहे?

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- हा तर टॅंकर घोटाळा आहे, एवढया पैशात तर महापालिकेला स्वतःचे टॅंकर विकत घेता येतील, आपलेच पाणी टॅंकरवाले आपणांस विकतात.

टॅंकरने पाणी पुरविण्याबाबतच्या प्रस्तावास स्थायी समितीची मंजुरी सुध्दा घेतली नाही.



मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-मागील वर्षी पाणी टॅंकर भाडे देण्यासाठी ६५ लाख रू. खर्च झाले आहेत, ऑगस्ट पर्यंत त्यांना कार्य आदेश होते. ऑगस्ट नंतर कार्यआदेश नसतानाही टॅंकरने पाणी पुरवठा केला जात आहे.

तसेच यावर्षी महापालिकेस स्वतःचे नविन टॅंकर घेता येण्यासारखे नाही कारण की ड्रायव्हर, क्लीनर व इतर सुविधा आपणाकडे उपलब्ध नाहीत. महापालिकेचे स्वतःचे गॅरेजसुध्दा नाही. महापालिकेची वाहने दुरूस्तीसाठी दुस-यांच्या (खाजगी) गॅरेजमध्ये पाठवावी लागतात. तेथे त्या वाहनांचे महिनोमहिने काम चालते.

जसे काही दिवसापुर्वी महापालिकेची ॲम्ब्युलन्स खराब होती, ती दुरूस्त करून आणल्या नंतर हाजीमलंग येथे गेल्यावर ती तेथेच बंद पडली, खराब झाली, दुस-यांच्या गॅरेज मधुन वाहानांची दुरूस्ती केल्याने २ वर्षानंतर ती वाहने लिलाव करण्यासारख्या स्थितीत येतात.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- जेव्हा पाणी पुरवठयाबाबत तक्रारी होत्त्या तेव्हा पाणी पुरवठयाच्या सभापतींनी महासभेत सांगितले होते की, पाणी पुरवठयाबाबतच्या अडचणी ९० टक्के सुटल्या आहेत. आता तर पाण्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसत आहेत. मला तर हा टॅंकर घोटाळा वाटत आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-कार्य आदेश नसतानाही ६ महिन्यांपासुन टॅंकरने पाणी पुरवठा कसा केला जात आहे. याबाबत अर्थसंकल्पीय अंदाज महासभेपुढे जेव्हा चर्चेस येईल तेव्हा आम्ही विचारणा करू.

*__मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी__* :- श्री. ठाकुर बेहरानी व्यापारी महामंडळाची बाजु घेऊन पाणी बिले कमी करा म्हणुन बोलत आहेत. त्यानुसार मी असे म्हणतो की, झोपडपट्टीवासीयांना ३० रू. प्रतीमहा याप्रमाणे बिल आकारणी केली जावी.

*__मा.सदस्या श्रीमती. कुंदनानी लविना__* :- तर मग इमारतीत रहाणा-या लोकांना ७५ रू. प्रतीमहा याप्रमाणे पाणी बिलाची आकारणी केली जावी.

*__मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी__* :- रस्त्त्याची काही कामे रदद तर केली नाहीत ना?

*__श्री. चिजवानी (शहर अभियंता)__* :-रस्त्त्याची कामे रदद केली नाहीत, खेमाणी येथील रोड, तसेच शहाड फेरीफेरी व कल्याण अंबरनाथ हया तीन रस्त्त्याची कामे पूढे ढकलली आहेत.

*__मा.सचिव__* :- रदद केली नाहीत, पुढे ढकलली आहेत.

*__मा.सदस्य श्री रामचंद पारवानी__* :-खेमाणी येथे रस्ता रूंदीकरणात येणारी बांधकामे तोडली आहेत. रस्त्त्याच्या बाजुने गटारे,नाल्याची बांधकामे सुध्दा केली आहेत. याकामाची देयक रक्कम कशी देणार?

*__श्री. चिजवानी (शहर अभियंता)__* :-या कामास आपण लोकांनीच मंजुरी दिलेली आहे. आम्ही कुठे आमच्या मनानेच काम चालु केले आहे?

*__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-__* कल्याण अंबरनाथ रस्त्त्याचे काम वगळण्यांत आले आहे. कारण आपली अनामत रक्कम परत करावी अशी विनंती



या रस्त्त्याचे काम करणा-या ठेकेदाराने केली आहे. अनामत रक्कम परत केली नाही तर मला न्यायालयात दाद मागावी लागेल असेही त्याने लिहिले होते त्यामुळे त्यांने भरलेली अनामत रक्कम त्यास परत केली आहे. या कारणांमुळे दोन रस्त्त्यांचे काम वगळण्यांत येऊन ते पुढे ढकलले आहे. रदद केलेले नाही.

*__मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी__* :- महासभेने घेतलेल्या निर्णयात स्थायी समिती बदल करू शकते काय?

*__मा.आयुक्त__* :-अमुक एका ठराविक रस्त्त्यासाठी तरतुद केलेली नव्हती हेच आपल्या या प्रश्नाचे उत्त्तर आहे.

*__मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी__* :-माझे म्हणणे आहे, महासभेच्या निर्णयामध्ये स्थायी समिती बदल करू शकते काय?

*__मा.सदस्य श्री. ठाकुर बहरानी__* :- सांगा कोणत्त्या रस्त्त्याचे काम पुढे ढकलले आहे? पुढे ढकलले नाही तर उशीराने होत आहे.

*__श्री. चिजवानी (शहर अभियंता)__* :-याबाबत चर्चा झाली होती.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- नाही. नाही. या रस्त्याचे काम पुढे ढकलले आहे असे म्हणतात.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- ३३ रस्त्यांचे कामांमध्ये या दोन रस्त्यांची कामे मंजुरीस आणली होती ना? तर मग आता या दोन रस्त्याची कामे पुढे ढकलली आहेत ना? या दोन रस्त्यांच्या कामाची रक्कम किती होते?

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :-या कामाची रक्कम १ कोटी ३० लाख एवढी आहे.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- तर मग ही रक्कम खर्चामध्ये वाढेल? हि रक्कम आपण कमी कशी करू शकाल?

मा.सदस्य श्री. ठाकुर बहरानी :- रस्त्याचे काम पुढे ढकलत नाही तर उशीराने/ विलंबाने करत आहेत.

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- ते काम पुढे ढकलणे हे आयुक्तांच्या अधिकारात आहे.

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :-ठराविक एक काम पुढे ढकलले नाही तर आम्हाला काही आर्थिक अडचण असल्यामुळे, निधी कमी उपलब्ध झाल्यामुळे याकामास विलंब होत आहे.

मा.सदस्य श्री.रामचंद पारवानी :- तरतुद कमी केली नाही ना?

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :-या कामासाठी जेवढया पैशाची आवश्यकता होती त्यापेक्षा थोडा कमी पैसा उपलब्ध झाल्यामुळे तरतुद थोडी कमी केली आहे.



मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांसाठी पैसे दिले गेले आहेत त्यामुळे ठराविक एका रस्त्याचे काम कमी केले नाही. उलट आणखी काही रस्त्यांची कामे घेतली आहेत. भाभी ज्योती कालानी यांच्या निवेदनातच त्याचा उल्लेख आहे. समजा आपल्याला २५ रस्ते तयार करावयाचे आहेत. त्यापैकी आपण जेवढे पेमेंट करू शकतो तेवढीच कामे हाती घेतली आहेत. १२१ कोटी उत्पन्न व २४२ कोटी खर्च यामध्ये जी तुट आहे ती तुट आपण कशी कमी करू शकतो यासाठी......

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- त्यापैकी काही रस्त्यांचे काम सुध्दा चालु झाले आहे. त्यांचे पेमेंट आपण कसे कराल?

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- रस्ते रूंदीकरणासाठी लोकांनी आपली बांधकामे तोडुन रस्त्याची जागा मोकळी करून दिली आहे अशा रस्त्यांचे काम करणार नाहीत काय?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- ही कामे तर करूच. परंतु त्याव्यतिरिक्त कामांसाठी निविदा मागवू व त्यानंतर ती कामे सुध्दा करु.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- पाणी टॅकरवाले कार्यआदेश नसतानाही सहा महिन्यांपासुन टॅकरने पाणी पुरवठा करीत आहेत.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- ५० लाख रू.चा खर्च आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मागील वर्षी ६५ लाख रू. बिल आले होते. आता नविन टॅकर खरेदी करण्यासाठी तीस लाख ठेवले असुन टॅकर भाडयासाठी ४० लाख रू. तरतुद करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. सर्व प्रभागात पाणी पुरवठा करण्यासाठी हा प्रस्ताव ठेवला आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- ६३ लाख खर्च केला आहे. मुंजरी घेतली का? मंजुरी न घेता खर्च कसा केला?

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- ३१ रस्त्त्यांचे कामाबाबत सहमत आहोत. दोन रस्त्त्यांचे कामास आम्ही सहमत नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- वसुली वाढवुन या दोन रस्त्त्यांची कामे करू.

मा.सदस्य श्री. ठाकुर बहरानी :- कल्याण अंबरनाथ रस्त्त्यासाठी निविदा मागविल्या जाव्यात.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- सभागृहनेता म्हणतात....

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- उद्यानासाठी तरतुद केलेली रक्कम कमी केली जाऊ नये तसेच नगरसेवक निधी १५ लाख केला जावा.

मा.आयुक्त :- दहा लाख नगरसेवक निधि सुध्दा जास्त आहे असे मला वाटते.

मा.सदस्य श्री. ठाकुर बहरानी :- आयुक्त म्हणतात आठ लाख करा, आम्ही दहा लाख केले.



मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-झोपडयासाठी पाणी बिल ३० रू. प्रतिमहा केले जावे.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-मा. महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती यांचा निधी कमी केला जावा.

मा.सदस्य श्री. ठाकुर बहरानी :- उपमहापौर व स्थायी समिती सभापतींचा निधी कमी करा व महापौर निधी वाढवा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- महापौरांना राज्य मंत्र्यांचा दर्जा मिळणार आहे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- राज्यमंत्र्यांचा दर्जा मिळणार आहे, ही भविष्यातील गोष्ट आहे.

मा.सदस्य श्री. ठाकुर बहरानी :- नगरसेवक निधी दहा लाखापेक्षा कमी करू शकत नाही.

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :-अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सर्व संमतीने मंजुर करू या.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :-</u> हे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक बोगस आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-बोगस कसे आहे हे सिध्द तर करा.*

*<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी</u> :- यात चर्चा बरीच झाली आहे. करांचे दर वाढविण्याचा जो प्रस्ताव आहे. तो सर्व संमतीने मंजुर करू या.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :- आमचा विरोध आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-नगरसेवक निधीसाठी विरोध आहे काय?*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :</u>- ४० रू. प्रमाणे पाणी बील आकारण्याचा जो प्रस्ताव आहे त्यास सुध्दा आमचा विरोध आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-</u>पाण्याचे दर जे कमी केले आहे त्यास आमची सहमती आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बहरानी :-</u> त्यांच्या सहमतीबददल त्यांना धन्यवाद दिले जावेत.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-दोन-तीन मुदयांना विरोध आहे ना?*

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u> मी पुन्हा एकदा विनंती करते की, शहराबाबतचा एखादा मोठा मुददा असेल तर त्यावर जरूर चर्चा करा. परंतु अर्थ संकल्प सर्व संमतीने मंजुर करू या.*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :-</u> तर मग नगरसेवक निधी १५ लाख ऐवजी १२ लाख तरी करा.*



*<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी</u> :- पुढच्यावर्षी पंधरा लाख करू.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी</u> :- दहा लाखाचा नगरसेवक निधी जुन महिना उजाडण्यापुर्वी संपुन जातो म्हणुन संपुर्ण अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात आमचा विरोध आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> आमचा पण विरोध आहे.*

*<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले</u> :- नगरसेवक निधी १२ लाख केला जावा.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-नगरसेवक निधी १२ लाख करू परंतु रक्कम कशी जमवायची ते तर जमवुन दाखवा?*

*<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u> नगरसेवक निधी बारा लाख केल तर १.८४ कोटी रूपयांची तुट पडेल.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- आमची विनंती आहे की, करांच्या दरामध्ये एक रू. सुध्दा वाढविला जाऊ नये. येत्त्या सप्टेंबर ऑक्टोबर महिन्यामध्ये आचारसंहिता लागु होणार आहे. यास्तव आमच्या प्रभागामधील लहान मोठी कामे. दहा-दहा लाखाची कामे त्यापुर्वी झाली तर फार चांगले होईल. त्यामुळे आमचे सर्व नगरसेवक पुन्हा निवडुन येऊ शकतील.*

*<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा</u> :- जकात वसुलीची निविदा ५५-६० कोटी मध्ये गेली तर नगरसवेक निधी पाच लाखाने वाढवुन दिला जावा.*

*<u>मा.सचिव:-</u> त्यापेक्षा कमी रकमेत निविदा गेली तर नगरसेवक निधीमध्ये कपात करणार काय? अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मंजुर समजायचे?*

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :- श्री. पारवानी हे नगरसेवक निधीबाबत समझौता करण्यास तयार नाहीत.*

*<u>मा.आयुक्त :-</u> जकात निविदा जास्त रक्कमेत गेली तर सुधारित अर्थसंकल्पात विचार करू.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी</u> :- नगरसेवक निधी १५-१५ लाख करण्याबाबत कोण सहमत आहे?*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u> :- यास तर सर्व सदस्य सहमत होतील.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-नगरसेवक निधी १५-१५ लाख करून आपण अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करून दाखवा.*

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :- करांचे दर निश्चित करण्याच्या बाजुने जे सदस्य आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.*

*<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी</u> :-करांच्या दरास आमची संमती आहे. अर्थसंकल्पीय अंदाजास विरोध आहे.*



*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :- करांच्या दराचा प्रस्ताव खालील प्रमाणे सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

*<u>विषय :-</u> सन २००१ -२००२ करिता करांचे दर व मर्यादा प्रस्तावित करणे व अर्थ संकल्पीय अंदाज <u>तयार करणे बाबत.</u>*

*<u>प्रस्तावना :-</u>*

*आयुक्तांनी सन २००१-२००२ करिता उत्पन्न रू.१२१.३७ कोटी व खर्च रू.२४२.९३ कोटी यांचे अंदाज तयार करून दिले आहेत. सन २००१-२००२चे अपेक्षित उत्पन्न व खर्च लक्षात घेता राहणारी तुट रू. १२१.५६ कोटी पुढील*

सरकारी वर्षात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे तरतुदी अन्वये जे कर लादणे आयुक्तांच्या मते आवश्यक किंवा इष्ट असेल अशा कराधाना संबंधिच्या प्रस्तावाचे विवरण पत्र व कराधाना पासुन मिळणा-या आतिरिक्त उत्पन्न रकमेचा अंदाज रू. १५ कोटी पुढील स्वरूपात प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | विवरण | प्रचलित कराचे दर | प्रस्तावित कर वाढ | एकुण टक्के वाढ |
|---|---|---|---|---|
| १. | पथकर | ३ % | १० % | ७ % |
| २. | पाणि पुरवठा सुविधा लाभ कर | १ % | १० % | ९ % |
| ३. | मल प्रवाह सुविधा लाभ कर | १ % | १० % | ९ % |

उपरोक्त प्रमाणे सुचविणेत आलेल्या तिन्ही करांमध्ये वाढ करणेच्या प्रस्तावातुन रू. ६.७५ कोटी उत्पन्न वाढ अपेक्षित आहे.

तसेच जकात मधील पुढील दर्शाविलेल्या काही वस्तुंवर दर वाढी प्रस्तावित करण्यात आली आहे.

| अ.क्र. | जकात नियम अनुसूचीतील बाब | मालाचे वर्णन | प्रचलित दर | प्रस्तावित दर | अंदाजे अपेक्षित उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| १. | ७ | मद्य व मद्यार्क,बियर, गांजा, भांग, अफु, चरस. | ३.७५% | ४% | १५ लाख |
| २. | ४०ब | सर्व प्रकारची रसायने, सोडियम सल्फेट सायसिंग साल्टोआर्यन सल्फेट,कॉपर सल्फेट(मोरचुद)ॲल्युमिनियम सल्फेट सोडा सिलीकेट, कॉस्टिक सोडा आणि अन्यथा विनिर्दिष्ट केलेले नसतील असे इतर क्षार असे इतर क्षार, सल्फर पोटेशचे क्लोराईड स्ट्रॉन्टिया, झिंक क्लोराईड, मॅग्नेशियम क्लोराईड, सोरा (सॉल्ट पिटर) सर्व प्रकारची आम्ले सॅलेमोनिॲक बोरेक्स, पांजणीचे पीठ. | ३.००% | ४% | १ करोड |
| ३. | ४६ | चकाकी दिलेल्या विटा, टाईल्स, संगमरवरी दगड, | ३.००% | ४ % | ८ लाख |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | भट्टीच्या विटा, विटा, सर्व प्रकारची छप्परी कौले ,फरसबंदीच्या टाईल्स ,फरशीच्या लादया, इत्यादी चायना मोझइक चिप्स, मोझाइकचा संगमरवरी दगड, मोझाइकची किंवा टॅरेझोची कौले, मातीचे नळ, चिनीमातीचे नळ, सिमेंटचे नळ, आणि ॲसबेसटॉस सिमेंटचे पत्रे. | २ ५० % | ४ % | |
| ४. | ४८ | रंग डिसटेंबर व कलर वॉशेस आणि इमारतीस रंग देण्यासाठी वापरले जाणारे इतर साहित्य, वॉर्निश ,अळशिचे उकळवलेले तेल, टरपेंन्टाईन, झिंक ऑक्साईड, व रेड ऑक्साईड. | २ ५० % | ४ % | १० लाख |
| ५. | ४९ | काच, काचेच्या वस्तु चिनीमातीच्या वस्तु, ॲनमेलच्या वस्तु, इमारतीच्या बांधकामासाठी व सजावटीसाठी व सॅनिटरी फिटिग्जसाठी वापरण्यात येणारी सर्व प्रकारची क्रांकरी, धातुचे व्हॉल्व, तांब्याच्या तोटया व त्याची उपकरणे. | ३ .०० % | ४ % | ७लाख |
| ६. | ५१ | इमारती लाकुड ,वल्या, बांबु, वेत व यापासुन तयार केलेल्या वस्तु, दरवाजे व खिडक्या, चौकटी, खुंटया, जिने, चंदनाचे लाकुड व अशा लाकडापासुन तयार केलेल्या वस्तु. | ३ .०० % | ४ % | २०लाख |
| ७. | ५२ | प्लायवुड, सॉप्टवोर्डस, हार्डवोर्डस, पेसोनाईट किंवा कोणतेही घटक असलेले व [illegible] | | ४ % | १५लाख |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | कृत्रिम प्रक्रीयेने तयार करण्यात आलेले इतर कोणत्त्याही प्रकारचे लाकुड व त्यापासुन तयार केलेल्या वस्तु. | | | |
| ८. | ५३अ | केसांचे तेल, सुगंधी तेल व सर्व प्रकारची सुगंधी द्रव्ये, सेंटस् अत्तरे, सुगंधी वस्तु, उदबत्त्या, सुगंधीत रसायने, सर्व प्रकारची प्रसाधने, दाढीचे क्रिम, दाढीचा साबण, दंत मंजन, टूथपेस्ट, पोमेड, कंगवे, ब्रश, आरसे, केसांच्या पिना, ब्रेसेस,गार्टस् व सस्पेंन्डर्स. | १.७५% | ४ % | |
| | ५३ब | काऱ्या, वस्तरे, सेप्टी वेझर्स, ब्लेडस्, सुया, छोटया सु-या, (पेन वाईव्हज) चमचे काटे सर्व प्रकारची कटलरी, सर्व प्रकारच्या सुया, कुलूपे व किल्या, स्टोव्ह,व पेट्रोमॅक्स आणि त्यांचे भाग व उपसाधने आणि लोखंडी सामान. | १.७५% | ४ % | १.२० करोड |
| | ५३क | लेसेस, टेप्स, लाकडी व धातूच्या रिंग्ज, भरतकामाच्या वस्तु, सेल्युलाईड, व सेल्युलाईडच्या वस्तु, सर्व प्रकारचे मणी, कृत्रिम मोती, प्लास्टीक व प्लास्टीकचा माल, प्लास्टिक पावडर, बेकेलाईट व बेकेलाईटचा माल, हस्तीदंत व हाडे यापासुन बनविलेल्या वस्तु व सर्व प्रकारची बटने आणि किरकोळ जिन्नस, (इंबरड्रेशरी) | २.००% | ४ % | |
| ९. | ५४क | सोने किंवा चांदी यापासुन बनविलेले दागिने व इतर | १.७५% | ४ % | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | बनविलेले दागिने व इतर वस्तु. | | | |
| १०. | ५४ड | इतर मौल्यवान धातु व त्यापासुन बनविलेले दागिने व इतर वस्तु. | १.७५% | ४ % | -- |
| ११. | ६१ | लोकरी, रेशमी, लिनन, ताग, कापुस, कृत्रिम व सिंथेटीक वस्तुंचे कापड व वरील वस्तुंपैकी कोणत्त्याही एकाच्या किंवा अंशतः अशा वस्तुच्या व अन्यथा निर्दिष्ट करण्यात आल्या नसतील अशा वस्तु आणि वरील वस्तुंपासुन बनविण्यात आलेल्या तयार वस्तु. | १.६०% | २ % | २ करोड |
| १२. | ७१ | लोखंड व पोलाद. | २.५०% | ४ % | ४५ लाख |
| १३. | ७३ | लोखंड व पोलाद-विशिष्ट रित्त्या तरतुद करण्यात आली असेल अशी कटलरी / लोखंडी सामान व यंत्रे व यंत्रांचे भाग या व्यतिरिक्त लोखंड व पोलाद यापासुन इतर कोणत्त्याही वस्तु. | २.५०% | ४ % | १० लाख |
| १४. | ७४ | यंत्र सामुग्री व त्यांचे घटक व सुटे भाग. | ३.१०% | ४ % | १ करोड |
| १५. | ७६ | उपकरणे संच व उपयंत्रे व त्यांचे भाग. | ३.१०% | ४ % | १ करोड |
| १६. | ७७ | अलोह धातु म्हणजेच पितळ, तांबे, टीन,ॲल्युमिनियम, शिसे, जस्त, जर्मन, सिल्वर, स्टेनलेस स्टील व त्यांचे मिश्र धातु, तारा सामान व पत्रे इन्गॉट्स व सर्कलस इत्त्यादी. | १.२०% | ४ % | ८० लाख |

सभेच्या चर्चेअंती सभासदांचे असे मत झाले आहे की, वरील सुचविलेल्या विविध करांमध्ये काही फेरबदल करणे आवश्यक नाही व सन २००१-२००२ करिता पुर्वीच्या पाणीपट्टी कर किंवा ठराविक आकारामध्ये पुर्न-निश्चिती करणे आवश्यक आहे. म्हणुन पुढील प्रमाणे पाणीपट्टीचे दर किंवा ठराविक आकार प्रस्तावित आहे.

--२६--

| अ.क्र. | उपभोक्ता प्रकार | कराचे दर किंवा ठराविक आकार प्रतिमहा |
|---|---|---|
| १. | घरगुती घरपट्टीधारक | |
| | अ)आर.सी.सी. बांधकामां इमारत | १०० प्रतिमहा |
| | ब)टीयर गर्डराइमारत बांधकाम | १०० प्रतिमहा |
| | क)पत्र्याचे छत व विट बांधकाम | ५० प्रतिमहा |
| २. | व्यापारी घरपट्टी धारक | ६० प्रतिमहा |
| ३. | झोपडपट्टी घरपट्टी धारक | |
| | अ)लफाटा किंवा पत्र्याचे छत असलेले झोपडे | ४० प्रतिमहा |
| | ब)मातीचे झोपडे | ४० प्रतिमहा |

स्थायी समिती ठराव क्र. १८७ दि:-१२.२.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन २००१-२००२ करिता वरील प्रमाणे आयुक्तांनी सुचविलेल्या जकातीमधील काही वस्तुंवर, मालमत्ता कर, पथ कर, पाणी पुरवठा सुविधा लाभ कर व मल प्रवाह सुविधा लाभ कर यामध्ये फेरफार किंवा प्रस्तावित कर वाढ न करता पाणी वापराचे प्रयोजनानुसार किंवा पुरविलेल्या पाण्याबाबत पाणीपट्टी कर किंवा ठराविक आकार किंवा मोजणी करून किंवा नळाच्या आकारानुसार सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमुद केलेल्या पाणी पट्टीचे दर, ठराविक आकार, नळ संयोजकाची जोडणी व तोडणी करण्याबाबतचे दर, नळ संयोजकांची अनामत रक्कम व मीटर तपासणी फी महासभेच्या अधिन राहुन निश्चित करणेत प्रस्तावित करीत आहे.

तसेच पाण्याचा वापरासंबंधीच्या अटी व शर्ती निश्चित करणेस आयुक्तांना महासभेच्या अधिन राहून प्राधिकृत करण्यात येत आहे.

तसेच सोबत जोडलेले परीशिष्ट हे या ठरावाचा भाग मानले जाईल.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--२७--

## परिशिष्ट

| अ.क्र. | उपभोक्ता प्रकार | कराचे दर किंवा ठराविक आकार प्रतिमहा |
|---|---|---|
| १. | घरगुती घरपटटीधारक | |
| | अ)आर.सी.सी. बांधकाम/ इमारत | १०० प्रतिमहा |
| | ब)टीयर गर्डरइमारत बांधकाम | १०० प्रतिमहा |
| | क)पत्र्याचे छत व विट बांधकाम | ५० प्रतिमहा |
| २. | व्यापारी घरपटटी धारक | ६० प्रतिमहा |
| ३. | झोपडपटटी घरपटटी धारक | |
| | अ)लफाटा किंवा पत्र्याचे छत असलेले झोपडे | ४० प्रतिमहा |
| | ब)मातीचे झोपडे | ४० प्रतिमहा |

किंवा

स्थायी समितीने सामान्यपणे मान्यता देईल अशा बाबतीत कोणत्त्याही जागेला घरगुती/ दुकाने प्रयोजनासाठी पाणी पुरवल्याबददल मोजणी करून आकारावयाची दर.

**घरगुती नळधारक** - रू. ६.०० प्रति हजार लिटर्स.

बिगर घरगुती/सार्वजनिक संस्था व शासकीय कार्यालय इत्त्यादीसाठी पाणीपटटीचे दर मिटर वाचनाप्रमाणे खालील प्रमाणे राहतील.

**बिगर घरगुती** - रू. १८.०० प्रति हजार लिटर्स.

**सार्वजनिक संस्था** - रू. १२.०० प्रति हजार लिटर्स.

ज्या नळजोडणीचे मीटर बंद आहे किंवा दुरूस्तीमध्ये असेल किंवा जागा/मालमत्ता बंद असेल अशा नळ धारकांना ठराविक नियतकालिक रक्कम नळाच्या आकाराप्रमाणे खालील प्रमाणे राहतील.

| अ.क्र. | आकार | घरगुती वापरासाठी | बिगर घरगुती वापरासाठी | सार्वजनिक संस्था |
|---|---|---|---|---|
| १. | १५ मि. मि. | रू.१०८/- | रू.४८६/- | रू.२५०/- |
| २. | २० मि. मि. | रू.१९८/- | रू.९००/- | रू.४६२/- |
| ३. | २५ मि. मि. | रू.२८८/- | रू.१२९६/- | रू.६७२/- |
| ४. | ४० मि. मि. | रू.७५६/- | रू.३४००/- | रू.१७६६/- |
| ५. | ५० मि. मि. | रू.१५६/- | रू.४२००/- | रू.२२००/- |

--२८--

<u>नळ संयोजकांची जोडणी व तोडणी करणे बाबत दर.</u>

| अ.क्र. | आकार मिमि. | दर रूपये. |
|---|---|---|
| १. | १५ मिमि. | ४०.०० |
| २. | २० मि. मि | ४५.०० |
| ३. | २५ मिमि. | ५०.०० |
| ४. | ४० मि. मि. | ६०.०० |
| ५. | ५० मि. मि. व त्यापेक्षा जास्त प्रत्येक संयोजकाच्या स्थितीनुसार अंदाजित केल्याप्रमाणे | |

<u>नळ संयोजकांची अनामत रक्कम</u>

| अ.क्र. | आकार | घरगुती वापरासाठी | बिगर घरगुती वापरासाठी | सार्वजनिक संस्था व सरकारी संस्था |
|---|---|---|---|---|
| १. | १५ मि. मि. | ५००.००/- | २०००.००/- | १०००.००/- |
| २. | २० मि. मि. | ९००.००/- | ३६००.००/- | १८००.००/- |
| ३. | २५ मि. मि. | १३००.००/- | ५२००.००/- | २६००.००/- |
| ४. | ४० मि. मि. | ३४००.००/- | १३५००.००/- | ६८००.००/- |
| ५. | ५० मि. मि. | ४३००.००/- | १७२००.००/- | ८६००.००/- |
| ६. | ८० मि. मि. व त्यापेक्षा जास्त | प्रत्यक्ष जलवाहिनीच्या वाहनधारक क्षमतेच्या तीन महिन्याच्या देयकावर आधारित. | | |

<u>मीटर तपासणी फी:-</u>

| अ.क्र. | आकार | तपासणी फी | संयोजकावरून मीटर काढण्याची फी |
|---|---|---|---|
| १. | १५ मिमि. | ४०.०० | ३०.०० |
| २. | २० मि.मि | ४५.०० | ४०.०० |
| ३. | २५ मिमि. | ५०.०० | ४०.०० |
| ४. | ४० मि.मि. | ६०.०० | ५०.०० |
| ५. | ५० मिमि. | ७०.०० | ६०.०० |
| ६. | ८० मि.मि | १००.०० | १००.०० |
| ७. | १००मिमि. ते ३०० मि.मि. | ३००.०० | १५०.०० |

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :- या प्रस्तावावर बरीच चर्चा झाली आहे, अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मंजुर करण्याच्या बाजुने जे सदस्य आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

<u>मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी / श्री. प्रमोद टाले / श्री. रमेश चव्हाण</u> :-संपुर्ण अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास आमचा विरोध नाही. २-४ मुदयांस आमचा



विरोध आहे. गटनेते श्री. रामचंद पारवानी आहेत. ते सांगतील त्याप्रमाणे आम्ही करू.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :- आयुक्त साहेब आश्वासन देत आहेत.जकात कर वसुली निविदेचा देकार जास्त रक्कमेचा आला तर नगरसेवक निधी वाढवुन देऊ म्हणुन....

पाणी कपाती बाबत आम्ही मंत्रालयात जाऊन संबंधित मंत्री महोदयांशी चर्चा करून पाणी कपातीवर तोडगा काढु.

<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बहरानी :-</u> श्री. पारवानी, लहानशी गोष्ट आहे. शहराच्या हिताचा विचार करून अर्थसंकल्पीय अंदाजास मंजुरी देऊ या.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :- आमचे म्हणणे ऐकत नाही तर काय करायचे?

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u> नगरसेवक निधी आणखी पाच लाख वाढविण्याबाबत आयुक्त साहेब आश्वासन देत असताना आपली काय हरकत आहे?

<u>मा.आयुक्त</u> :-नगरसेवक निधी आम्ही यापुर्वीच वाढवुन दिला आहे.

<u>मा.सदस्य रामचंद पारवानी :-</u> नगरसेवक निधी कुठे वाढवून दिला आहात?

<u>मा.आयुक्त :-</u> नगरसेवक निधी ४ लाखाचा १० लाख केला आहे.

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :-</u>* *अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मंजुरी दिल्यानंतर जकात कर वसुलीचा देकार आलेला आहे. त्यानंतर कुठे नगरसेवक निधी वाढवुन दिला?*

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :- अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सर्व संमतीने मंजुर?*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :- आमचा विरोध आहे.*

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :- कुणाकुणाचा विरोध आहे?*

*<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण</u> :- आमचा विरोध आहे.*

*<u>प्रस्तावाच्या बाजुने :-</u>*

*१. श्रीमती. ज्योती कालानी.*
*२. श्रीमती. कुंदनानी लविना.*
*३. श्रीमती. गजवानी कांता*
*४. श्री. पंजाबी नारायण*
*५. श्री. बहरानी ठाकुर*
*६. श्री. टाले प्रमोद*
*७. श्री. तलरेजा विनोद*
*८. श्री.वनवारी किशोर*
*९. श्रीमती. वलेचा पदमा*



*<u>प्रस्तावाच्या विरूध्द :-</u>*

*१. श्री.चौधरी राजेंद*
*२. श्री. चव्हाण रमेश*
*३. श्री. पारवानी रामचंद*
*४. श्री. भांडे भगवान*
*५. श्री. तेजी कैलास*
*६. श्री. राजानी नरेंद्र*

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :- सदरचा प्रस्ताव पुढील प्रमाणे बहुमताने समंत करण्यांत येत आहे.*

*<u>विषय :-</u> सन २००१ -२००२ करिता अर्थ संकल्पीय <u>अंदाज तयार करणे बाबत.</u>*

*<u>प्रस्तावना :-</u>*

*मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदीप्रमाणे आयुक्त यांचेकडुन पुढील वर्षाच्या उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक सादर करणे अपेक्षित आहे.*

अ) त्याप्रमाणे वित्तिय वर्ष २००१-२००२ या वर्षात महानगरपालिका निधीतुन प्राथमिक शिक्षण निधीस महानगरपालिकेने दयावयाच्या अनुदानाची रक्कम धरून अधिनियमाच्या तरतुदीनुसार करावयाच्या खर्चाचा अंदाज दर्शविणारे वर्गीकृत विवरण.
ब) वित्तिय वर्ष २००१-२००२ वर्षातील अपेक्षित उत्त्पन्नाचा अंदाज दर्शविणारे विवरण पत्र.

क) उत्त्पन्नाच्या अनुषंगाने आवश्यक वाटणारे कराधना संबधीचे प्रस्तावाचे विवरण पत्र व त्यापासुन मिळणा-या जमा रक्कमांचा अंदाज सादर करण्यात आलेला आहे.

तसेच सोबत सन २०००-२००१ चे सुधारीत जमा खर्चाचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. माहे नोव्हेंबर २००० पर्यंतचे प्रत्यक्ष झालेले उत्त्पन्न व माहे डिसेंबर २००० ते मार्च २००१ अखेरपर्यंत अपेक्षित उत्त्पन्न लक्षात घेवुन रूपये ९७.७० कोटी उत्त्पन्न अपेक्षित आहे. सन २०००-२००१ चे अपेक्षित उत्त्पन्नाचा (रूपये १३३.३०) लक्षांक गाठता येत नसल्यामुळे या आर्थिक वर्षातील मार्च २००१ पर्यंतचा खर्च रूपये ९७.६८ कोटी पर्यंत सिमित करणे आवश्यक आहे.

सन २००१-२००२ या आर्थिक वर्षात एकुण खर्च रूपये २४२.९३ कोटी अपेक्षित आहे व महापालिकेचे उत्त्पन्न रूपये १२१.३५ कोटी अपेक्षित आहे. सदरची तुट पुढील काही कालावधीमध्ये भरून काढणे आवश्यक असल्यामुळे महानगरपालिकेतर्फे आकारण्यात येणारा पथकर, पाणी पुरवठा लाभ कर, मलप्रवाह सुविधा लाभकर, व शहरात आयात होणा-या मालाच्या काही बाबींवर जकात दर वाढविणे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ अन्वये अंदाजपत्रक तयार करणेसाठी स्थायी समितीस सादर.

--३१--

<u>स्थायी समिती ठराव क्रमांक :-१९४ (अ)</u> <u>दिनांक</u> :-१२.२.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

श्री. नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

श्री. प्रमोद टाले.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार आयुक्तांचे सन २०००-२००१ चे जमा खर्चाचे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००१-२००२ चे जमाखर्चाचे अंदाजपत्रक विचारात घेवुन व आयुक्तांकडुन आवश्यक ती तपशिलवार माहिती घेवुन तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या सर्व तरतुदी लक्षात घेवुन व सभेत चर्चेअंती सुचविलेल्या फेरफाराच्या व ठराव क्र.१९४ च्या अधिन राहून सोबत जोडलेला अर्थसंकल्पीय अंदाज तयार करीत आहे. मुख्य लेखा अधिकारी, या बाबतची छापील प्रत महासभेपुढे ठेवतील ती प्रत या ठरावाचा भाग मानला जाईल.

तसेच शासनाने विनिर्दिष्ठ केलेली मार्गदर्शक तत्त्वे लक्षात घेवून वर्ष २००१-२००२ करिता जकात वसुलीसाठी अभिकर्त्याची नेमणुक करणे आणि निविदा संबंधी अटी व शर्ती यांचे अंतिम निर्णय घेण्याकरिता आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

बहुमताने मंजुर

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ६. २५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-१ ३ .२००१ .

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक १ ३ . २००१ रोजी सायंकाळी ४ ३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | |
|---|---|
| १ . श्री.कुमार आयलानी | सदस्य |
| २ . श्रीमती.कुंदनानी लविना | सदस्या |
| ३ . श्री.चौधरी राजेंद्र | सदस्य |
| ४ . श्री.चव्हाण रमेश | सदस्य |
| ५ श्री.पंजाबी नारायण | सदस्य |
| ६ . श्री.बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ७ . श्री.भांडे भगवान | सदस्य |
| ८ . श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| ९ . श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| १०श्री.तेजी कैलास | सदस्य |
| ११ श्री. किशोर वनवारी | सदस्य |

तर

मा. श्री.पारवानी रामचंद्र, श्रीमती. गजवानी कांता, श्रीमती.राजानी भारती, श्री.पदमा वलेचा हे सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते/ होत्त्या.

मा.सचिव :-विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक ८/२/२००१ सह १२/२/२००१ व १६/२/२००१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- सात नं. पेजवर आपण सर्व संमतीने मंजुर केला जावा असे लिहिले आहे. मी असे नाही म्हणालो.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- मला आठवते तुम्ही म्हणाला होतात.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- मी दर निश्चित करण्याबाबत सहमती दाखवली होती, अंदाजपत्रक मंजुर करणे विषयी नाही?

मा.सचिव :- आपण दर निश्चित करण्याविषयी मंजुरी दिली होती.

***मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :*** *सदर इतिवृत वरील सुधारणे सह सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.*

***मा.सचिव :-*** *विषय क्र.२ वाचुन दाखवितात.*



***मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी*** *:-नगरसेवक निधीचे काम आहे. ठेकेदार काम करित नाहीत. याला जवाबदार कोण?तुम्ही त्यांच्यावर काय कार्यवाही करता? दोन-दोन, तीन-तीन वर्ष कामाला लावतात.*

***मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-*** *५(२)(२)अंतर्गत होणारे एकही काम अजुन झाले नाही.*

***मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :-****श्री. लाल पंजाबी यांचा कधीचा निधी आहे तो आता तुम्ही आणला आहे?*

***श्री. चिजवानी (शहर अभियंता)*** *:- ठेकेदारांना तशी नोटीस देऊ.*

***मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-****५(२)(२) चा अर्थ काय? जेव्हा अत्त्यावश्यकता असते तेव्हा याचा वापर करतात.*

***मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :-*** *ठेकेदारांना पेमेंट नाही दिले म्हणुन त्यांनी काम अर्धवट ठेवले आहे. ३३ रस्त्याचे काय झाले? अजुन कामे अर्धवट राहिली आहेत. रिक्षावाले आंदोलन करणार आहेत.*

***श्री. चिजवानी (शहर अभियंता) :-*** *आम्ही आता काम करून घेऊ.*

***मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-*** *जे ठेकेदार काम करीत नाहीत त्यांची नावे ब्लॅक लिस्टमध्ये टाका.*

***मा.सदस्य श्री. कैलास तेजी :-*** *माझ्या प्रभागातील प्रदीप काही काम करीत नाही. त्याचे नाव पण ब्लॅक लिस्टमध्ये टाका. आणि त्याला माझ्या प्रभागात पाठवु नका दुसरा ठेकेदार दया. यापुढे माझ्या प्रभागात त्याला काम देऊ नका.*

***मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-*** *श्री. कैलास तेजी बोलतात ते बरोबर आहे. प्रभाग क्र.१९ मध्ये अजुन देखिल काम सुरू नाही झाले. त्यांनी जे खड्डे भरलेत ते उखडले गेले आहेत. कित्त्येक महिने झाले तो काम नाही करत आहे. तुम्ही दुस-याला ठेका दया. त्यांचे बिल थांबवा.*

***मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :-*** *ठेकेदारांवर कार्यवाही करा नाहीतर ठेका रदद करून दुस-यांना दया.*

***मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-****सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

विषय :- नगरसेवक निधीतून प्रभाग क्र ५६ मध्ये जलवाहिनी टाकणे कामीच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

खाली उल्लेख केलेल्या ठिकाणी जलवाहिनी टाकणे आवश्यक असल्याने, त्यांचे प्रस्ताव नगरसेवक फंडातुन प्रस्तावित करण्यात येत आहे.

--३--

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र ५६ मध्ये लक्ष्मी ज्वेलर्स ते बॅ.क्र.. ९४० पर्यंत (सेक्शन २२) ५० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणे. (नगरसेवक निधीतून) | रू. ७९ ,७५०/- |

वरील कामाकरिता नगरसेवक यांनी त्यांचा आर्थिक वर्ष १९९९-२००० चा नगरसेवक फंड उपलब्ध करून दिला आहे व त्यास मा. आयूक्त यांनी मान्यता दर्शाविली आहे.

तरी सदर प्राकलन प्रशासकिय व वित्तीय मंजूरी करीता, तसेच सदर काम मजूर कामगार सहकारी संस्था यांचेकडुन करून घेण्यास मंजूरी स्तव स्थायी समिती पुढे सादर.

स्थायी समिती ठराव क्र. २०१ दिनांक :- १.३.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :- श्री. कुमार आयलानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार नगरसेवक निधितुन प्रभाग क्र. ५६ येथे लक्ष्मी ज्वेलर्स ते बॅ. क्र. ९४० पर्यंत सेक्शन २२ ,उल्हासनगर-३ येथे ५० मी.मी.व्यासाची जलवाहिनी टाकणे कामी रू. ७९ ,७५०/-खर्चाचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्त्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधीकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र.३ वाचुन दाखवितात.

--४--

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- नगरसेवक निधीतून प्रभाग क्र ४७ मध्ये ब्लॉक बी. ७५ गागनमल हाऊस ते गुरूव्दारा, पर्यंतचा रस्ता बी.एम आणि ऐ.सी ने विकसित करण्या कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर येथील प्रभाग क्र.४७ मध्ये ब्लॉक सी.७५ गागनमल हाऊस ते गुरूव्दारा पर्यंतचा रस्ता बी.एम. आणि ए.सीने विकसिमत करणे आवश्यक आहे. हे काम करण्यासाठी नगरसेविका श्रीमती जया साधवानी प्रभाग क्र.४७ यांनी त्यांच्या नगरसेवक निधीतून करणेसाठी दिनांक ८.२.२००० च्या पत्रानुसार विनंती केलेली आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने हे काम करण्यासाठी जागेची पहाणी करून रूपये २,३७,२३०/- किंमतीचे प्राकलन तयार केलेले आहे. या कामाच्या खर्चासाठी अंदाजपत्रकात महानगरपालिका भाग क्रमांक लेखा शिर्ष सी-४(५)पी.११ मधुन काम करावयाचे आहे. त्यानुसार सदर रूपये २,३७,२३०/- किंमतीचे प्रभाग क्रमांक ४७ मधील सदर काम घेणेसाठी प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळण्यासाठी स्थायी समिती सभेपुढे ठेवणेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.२०२ दि:-१.३.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर येथिल प्रभाग क्र४७ मध्ये ब्लॉक बी-७५ गागनमल हाऊस ते गुरुद्वारा पर्यंत चा रस्ता बी. एम.आणि ए.सी. ने बांधण्याकामीचे रु. २,३७,२३०/- खर्चाचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयूक्तांना मजूर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--५--

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :</u>- हे काम ५ (२)(२)अंतर्गत दया.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :</u>-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> नगरसेवकनिधीतून प्रभाग क्र. ३८ मध्ये यात्री निवास येथे फाउंटन बांधणे या कामाऐवजी यात्री निवास येथे बगीचा आणि स्टेज विकसित करणे कामीचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर-२ येथील प्रभाग क्र.३८ मध्ये यात्री निवास येथे फाउटंन बांधणे या कामाची अंदाजित किंमत ३,००,०००/-इतकी होती. सदर काम ठेकेदाराने सुरू केलेले नाही. त्यामुळे सदर प्रभागाचे नगरसेवक श्री. विनोद तलरेजा यांनी त्यांचे दिनांक १६. १०.२००० च्या पत्रानुसार सदर काम रद करून ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करावी असे सुचविले होते. त्यानुसार संबंधित ठेकेदाराची अनामत रक्कम महापालिकेने जप्त केले आहे. संबंधित नगरसेवक श्री. विनोद तलरेजा यांनी त्यांचे दिनांक १४.२.

२००१ च्या पत्रानुसार याच निधीतुन सदर कामाऐवजी यात्रीनिवास येथील बगीच्याचा व स्टेजचा विकास करणेस विनंती केलेली आहे.

त्यानुसार संबंधीत कनिष्ठ अभियंता व उप-अभियंता यांनी प्रत्यक्ष बगीच्याची व स्टेजची पहाणी करून त्याप्रमाणे प्राकलन तयार केलेले असून त्याची अंदाजीत किंमत रू.२ ,०० ,९५०/-इतकी होत आहे. तरी सदर प्रभाग क्र.३८ चे रू.२ ,०० ,९५०/-किंमतीच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेसाठी स्थायी समिती सभेपुढे ठेवणेसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र</u>. २०३ <u>दि:-</u>१ ३ .२००१ .

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. लविना कुंदनानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार नगरसेवक निधितून प्रभाग क्र. ३८ मध्ये यात्री निवास येथे फाऊंटन बांधणे याकामाऐवजी यात्री निवास येथे बगीचा आणि स्टेज विकसित करण्याकामी रु. २ ,०० ,९५०/-रु. खर्चाचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.



तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयूक्तांना मजूर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> नगरसेवकनिधीतून प्रभाग क्र४० मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती बसविण्या कामीचे प्राकलनास <u>प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत</u>.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र४० चे नगरसेवक श्री. प्रभुनाथ दुखंती गुप्ता यांनी रस्त्यावरील दिवाबत्ती बसविणे याकामी मागणी त्यांच्या नगरसेवक फंडातुन केली आहे. विद्युत विभागाने जागेवर पहाणी करून यासंबंधी रूपये ७५,०००/- इतक्या किंमतीचे खर्च अनुमानित केला होता. या कामाच्या खर्चासाठी नगरसेवक फंडाच्या लेखा शिर्षात तरतुद उपलब्ध आहे. त्यानुसार सदर रू.७५,०००/-किंमतीचे प्रभाग क्र४० मधील रस्त्यावरील दिवाबत्ती बसविणे. या अभिकरणाने प्राकलन विद्युत खात्याने तयार केलेले आहे. सदर कामाच्या खर्चासाठी अंदाजपत्रकात तरतुद शिल्लक असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी त्यांच्या शे-यानुसार यासंबंधी कामाचे प्राकलनास मंजुरी करण्याची शिफारिश केलेली आहे. त्यानुसार सदर कामास प्रशासकिय व वित्तिय मान्यतेसाठी तसेच काम चालु करण्यासाठी डी.डी.आर यांचेकडुन मजुर कामगार सहकारी संस्थेकडुन शिफारशीसाठी पाठविणे अथवा निविदा मागविणेची कार्यवाही करणेसाठी स्थायी समितीकडून मान्यता घेणेंसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र</u>. २०४ <u>दिनांक</u> :- १.३.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार नगरसेवक निधीतून उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र४० मध्ये रस्त्यावरील दिवाबत्ती बसविण्याकामी रू.७५,०००/- खर्चाचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

--७--

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहेत.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> मार्ग प्रकाशासाठी उभ्या केलेल्या खांबांची वित्तिय वर्ष २०००-२००१ करिता निगा व दुरूस्ती करणे कामी मे. जाधव ॲण्ड सन्स, कल्याण यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असुन संविदेस मान्यता <u>देणे बाबत</u>.

<u>प्रस्तावना :-</u>

सादर करण्यात येत आहे की, सालाबादाप्रमाणे वित्तिय वर्ष २००१-२००२ करीता मार्ग प्रकाश साठी बसविलेल्या दिवाबत्तीचे खांब देखभाल व दुरूस्ती करीता १९९९-२००० च्या डी.एस.आर. प्रमाणे रूपये १९,८७,३८७.५० च्या अंदाज पत्रक बनवून वर्तमान पत्रात निविदा सुचना देऊन सिलबंद निवीदा सादर केल्या. त्त्यांचा तुलनात्त्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे. मे. बजाज इलेक्ट्रीकल्स लिमीटेड मुंबई अंदाज पत्रकीय रक्कमे पेक्षा २.२% जास्त दर दिला आहे. मे. बी.जे.इलेक्ट्रीकल्स कंपनी नाशिक यांनी अंदाज पत्रकीय रक्कमे पेक्षा १.३% कमी दर दिलेला आहे. मे. जयेश इंजिनिअरींग कार्पोरेशन मुंबई यांनी अंदाज पत्रकीय रक्कमेपेक्षा ५.५% कमी असे दर दिलेले आहेत आणि मे. जाधव ॲन्ड सन्स कल्याण यांनी अंदाज पत्रकीय रक्कमेपेक्षा ७.१४% कमी असे दर दिलेले आहेत. सदर तुलनात्त्मक तक्त्या नुसार मे. जाधव ॲन्ड सन्स कल्याण यांचे दर सर्वात कमी व अंदाज पत्रकीय रक्कम रूपये १९,८७,३८७.५० पेक्षा ७.१४% कमी आणी वाजवी असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी पण मान्यतेसाठी सिफारिश केलेली असुन मे. जाधव ॲन्ड सन्स कल्याण यांचे सर्वात कमी दराच्या निविदेस मंजुरी देऊन लागणा-या खर्चास मान्यता मिळण्यासाठी स्थायी समिती पुढे प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. २०५</u>  <u>दि:-१.३.२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मार्ग प्रकाशासाठी उभ्या केलेल्या खांबाची वित्तीय वर्षे २००१-२००२ करीता निगा व दुरुस्ती करणे कामी मे.



जाधव ॲण्ड सन्स कल्याण यांची सर्वात घलुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून संविदेस मान्यता व अंर्तभुत खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५.०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-१७.३.२००१.

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शनिवार दिनांक १७.३.२००१ रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योति कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | |
|---|---|
| १. श्रीमती.कुंदनानी लविना | सदस्या |
| २. श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ३. श्री.चौधरी राजेंद | सदस्य |
| ४. श्री.चव्हाण रमेश | सदस्य |
| ५. श्री.पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ६. श्री.पंजाबी नारायण | सदस्य |
| ७. श्री.ब्रहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ८. श्री.भांडे भगवान | सदस्य |
| ९. श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| १० श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ११. श्री.तेजी कैलास | सदस्य |
| १२. श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| १३. श्री. किशोर वनवारी | सदस्य |
| १४. श्री.पदमा वलेचा | सदस्या |

तर

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी हे सभेस अनुपस्थितीत होते.

मा.सचिव :-विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक १.३.२००१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :- इतिवृत्त कायम केले जावे.

सदस्य श्री. किशोर वनवारी :- इतिवृत्त दिनांक १.३.२००१ रोजीचे आहे?

मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी:- मागील सभेचे दिनांक १.३.२००१ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिव :- विषय क्र. २ वाचून दाखवितात.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी: कोण-कोणती खेळणी आणणार आहेत?

मा.सदस्या श्रीमती कांता गजवानी:- झोके, घसरगुंडी इत्त्यादी....

मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

--२--

विषय :- प्रभाग क्र.५७ व ६६ मधील बगीचामध्ये मुलांसाठी खेळण्याचे साहित्य बसविणेकामी मेसर्स स्टील रेंज या निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

प्रभाग क्र. ५७ मधील बॅरेक नं.९८२ जवळील बगीच्यामध्ये व प्रभाग क्र. ६६ मधील बगीचा क्र.४४४ (भाजी मार्केट)येथे मुलांना खेळण्याचे साहित्य बसविण्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रस्तावानुसार आवश्यक ते साहित्य मेसर्स स्टील रेंज गोरेगांव (पं)मुंबई यांचेकडुन खरेदी करण्याचे असुन त्याकरिता येणारा खर्च हा संबंधीत प्रभागातील नगरसेवक व मा.महापौर यांचे सन २०००-२००१ च्या मंजुर निधीतुन करावयाचा असुन त्यास संबंधीतांची अनुमती आहे.

प्रभाग क्र.५७ मधील बगीचाचे खेळणीकरिता येणारा खर्च रू. २,२८,०८३/- व प्रभाग क्र. ६६ करिता रू.६६,०००/-मंजुर करणेत आलेला आहे.

तरी मागविण्यात आलेल्या ५ निविदांपैकी मे. स्टीलरेंज यांची एकच निविदा वैध ठरलेली आहे. म्हणुन पुन्हा टेंडर मागविल्याऐवजी प्रकरण ५-२(२)अन्वये सादर निविदा मंजुर करणेकरिता मा.आयुक्तांना प्राधिकृत करणेकरिता स्थायी समितीसमोर सविनय सादर.

मा.आयुक्त साहेब यांचे मान्यतेनुसार.

<u>स्थायी समिती ठराव क्र. २०६</u> <u>दि:-१७.३.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रमेश चव्हाण.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे प्र.क्र ५७ व ६६ मधील बगीच्यामध्ये मुलांसाठी खेळण्याचे साहित्य बसविणेकामी मे. स्टीलरेज यांची एकच घलुत्तम दराची निविदा वैद्य आणि स्विकृती योग्य असून आयुक्तांस त्यांच्याशी संविदेस मान्यता व अंर्तभुत खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव:-</u> विषय क्र. ३ वाचून दाखवितात.
--३--

<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी:-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>विषय :-</u> नगरसेवक निधीतून प्रभाग क्र २७,३३ व १७ मध्ये सार्वजनिक बांधकामांतर्गत करावयाच्या ३ कामाच्या <u>प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत</u>.

<u>स्थायी समिती ठराव क्र</u>. २०७ <u>दिनांक</u> :- १७.३.२००१.

सुचकाचे नाव :-श्री.नारायण पंजाबी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहे.

---

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.२७ मध्ये बॅ.क्र.११५० ,११५६ ,११७६ जवळ महापालिका शौचालय दुरूस्ती करणे. (नगरसेवक निधीतून) | रू.९९ ,९८०/- |
| २. | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.३३ मध्ये सम्राट अपार्टमेंट आणि एस.एल.लुल्ला स्कुल जवळ जवळ आणि विविध ठिकाणी सी.सी.पायवाटा व नाल्या बांधणे. (नगरसेवक निधीतून) | रू.७५ ,०००/- |
| ३. | उल्हासनगर येथील प्र क्र.१७ मध्ये शाहिद भगतसिंग चौक ते शिवसेना ऑफिस पर्यंतचा रस्ता व्ही.एम. आणि एसी. ने विकसित करणे. | रू.३ ,०२ ,८८०/- |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--४--

<u>मा. सचिव :-</u> विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

<u>मा. सदस्य किशोर वनवारी:</u>- हा प्रस्ताव संमत केला जावा..

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी</u> :-या प्रस्तावाचे स्पष्टीकरण करण्यासाठी संबंधित अधिकारी, नगररचनाकार या सभेत उपस्थित नसल्याने सदरचा प्रस्ताव पूढे ढकलला जावा.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> कुणाच्या प्रभागातील एस.टी.डी. बुथचा हा प्रस्ताव आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> श्री. सुभाष मनसूलकर यांच्या प्रभागातील आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-</u> याबाबत शासनाचे काही पत्र आले आहे की, एस.टी. डी. बुथ साठी परवानगी देवू नये.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:- अपंग अर्जदार आहे, एस.टी.डी. बुथ साठी मंजूरी दिली जावी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी/ श्री. विनोद तलरेजा:- हा प्रस्ताव संमत केला जावा.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :- नगररचनाकार , कधीही स्थायी समितीच्या सभेत येत नाहीत. याबाबत पूढील स्थायी समिती सभेत आम्ही त्यांना विचारणा करु.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- ताकिदपत्र दिले जावे.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- श्री. सुधीर मुरलीधर प्रधान या अपंग व्यक्तीस जिजामाता चौक,पोलीस चौकीच्या बाजुला मराठा सेक्शन-३२ ,उल्हासनगर. ४ येथील महानगरपालिकेच्या जागेवर तात्पुरत्त्या स्वरूपाचे टेलिफोन बुथ बांधणेस परवाना देणे बाबत.

प्रस्तावना:-

श्री. सुधीर मुरलीधर प्रधान हया अपंग व्यक्तीने टेलिफोन बुथ चालविणेसाठी उल्हासनगर शहरातील जिजामाता चौक,पोलीस चौकीच्या बाजुला मराठा सेक्शन-३२ , उल्हासनगर. ४ मधील "४ x ४" ची जागा मागीतली आहे.

अर्जदार व्यक्तीस अपंग असल्यामुळे अत्त्यंत तात्पुरत्त्या स्वरूपात"४ x ४" ची लाकडी कॅबीन मध्ये टेलिफोन बुथसाठी खालील अटींवर परवानगी बाबत स्थायी समितीची संमती घेणे आवश्यक आहे.

--५--

१) महानगरपालिका सांगेल त्यावेळी लाकडी कॅबीन (बुथ)हटवून जागा खाली करावी लागेल.
२) सदर जागेचा वापर केवळ तात्पुरत्त्या स्वरूपात असून जागेबाबत मालकी हक्क पुर्णत: महानगरपालिकेचा असेल.
३) फक्त आपणच तेथे काम करावे. जागेचा वापर केवळ अर्जदार यांनाच करता येईल. भाडेकरू ठेवता येणार नाही.
४) एस.डी.ओ ऑफीसचा नाहरकत दाखला या कार्यालयात सादर करावा लागेल.
५) कोर्टातून कोणत्त्याही प्रकारचा स्टे आणता येणार नाही.
६) वरील बाबी अर्जदारास मान्य असल्याबाबत २०/-स्टॅम्प पेपर वर ऑफिडेव्हीड करावे लागेल.

स्थायी समिती ठराव क्र.    २०८                    दिनांक :- १७.३.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अपंग अर्जदार श्री. सुधीर मुरलीधर प्रधान हया अपंग व्यक्तीस वर नमुद केलेल्या महापालिकेच्या जागेवर आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्ती वर तात्पुरत्त्या स्वरूपात टेलिफोन बुथ बांधणे व चालविणे कामी एक वर्षाच्या कालावधीसाठी परवाना देणेस मान्यता देत आहे.

तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधिन राहून सदरचा परवाना वेळोवेळी एका वर्षापेक्षा अधिक नसेल ऐवढया कालावधीसाठी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

श्री. ढाकरे (उपायुक्त,मुख्यालय) :- आपणसर्वांची संमती असेल तर आयत्त्यावेळचे विषय चर्चेस आणू इच्छितो. या प्रस्तावामध्ये विद्युत साहित्त्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी :- उपायुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये मंजुरीस आणलेला प्रस्ताव सर्वानुमते आजच्या या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असुन तो सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.



श्री. ढाकरे (उपायुक्त,मुख्यालय) :-आपणा सर्वांची संमती असेल तर आयत्त्यावेळच्या विषयान्वये शहाड येथे हायमास्ट दिवा बसविण्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीस आणु इच्छितो.

मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी :- हायमास्ट लावण्यासाठी निविदा न मागविता थेट संविदा करण्यास आयुक्तांना प्राधिकृत करायचे आहे.

मा. सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- शहाड व विठ्ठलवाडी , येथे सुध्दा एक-एक हायमास्ट लावला जावा.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- आमच्या येथे सुध्दा एक हायमास्ट लावला जावा.
मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी :- उप -आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेला प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करुन सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

आयत्त्यावेळचा विषय :-

विषय :- मा.स्थायी समिती सभापती निधीतुन शहाड येथे हायमास्ट दिवा बसविणे कामी आयुक्तांना निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

प्रस्तावना:-

सभापती स्थायी समिती यांनी असे स्थायी समितीच्या निर्दशनात आणले की शहाड स्टेशन जवळ एक हाय मास्ट लाईट सभापती स्थायी समितीच्या निधीतुन बसवण्यात यावी. आमची अशी पण विनंती आहे की, हायमास्ट लाईट दोन महीन्या पुर्वी मागविलेल्या निविदांच्या दरानुसार मे. बजाज इलेक्ट्रीकल लिमिटेड यांच्याकडुन लावुन घ्यावी कारण त्यांनी लावलेली हायमास्ट अतिशय चांगले व त्यांचे दर अतिशय वाजवी आहे आणि जाहिरातीचा खर्च वाचणार आहे तसेच टेंडर कार्यवाही करण्यासाठी लागणारा वेळ पण वाचणार आहे. अन्यथा ३१.३.२००१ नंतर बजेट मध्ये उपलब्ध तरतुद लॅप्स होणार व या कामासाठी सभापती स्थायी समितीच्या निधीतुन रूपये. ४,५०,०००/-देत आहे व मा.आयुक्त यांना सदर काम स्थायी समितीच्या पुर्वीचा ठराव क्र. १८४ दि.५.१.२००१नुसार मेसर्स बजाज इलेक्ट्रीकल लिमिटेड यांच्याकडुन पुर्वीच्या दरानुसार निविदा नमागविता हायमास्ट लावण्याकरिता प्राधिकृत करणेसाठी प्रस्तावित करीत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. २१० दिनांक :-१७.३.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या कारणामुळे वर्ष २०००-२००१ करिता सभापती स्थायी समिती निधीतुन शहाड येथे हायमास्ट दिवा बसविणे कामी आयुक्तांना मेसर्स. बजाज इलेक्ट्रीकल लिमिटेड यांच्याशी पुर्वीच्या निविदातील दराने तसेच अटी व शर्तीवर निविदा न मागविता थेट

--९--

संविदेस प्राधिकृत करीत आहे व अंर्तभुत खर्च रू. ४,५०,०००/-यास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>श्री. ढाकरे (उपायुक्त, मुख्यालय) :</u>- पाणी पुरवठा विभागा अंतर्गत ५० मिमि व्यासाची एक जलवाहिनी टाकण्याचा प्रस्ताव आहे, याबाबत आयुक्तांनी असे निर्देश दिले आहेत की, हया कामाची तातडीने आवश्यकता आहे काय?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>साहेब, २५ हजाराचेच तर प्राकलन आहे, कशासाठी हरकत घेता? माझ्या प्रभागात दुषीत पाण्याची तक्रार आहे.

<u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी :-</u> कुणाच्या प्रभागातील काम आहे?

<u>मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी:-</u> एका प्रभागासाठी आपण २५ हजार देत आहात, आमच्या प्रभागात सुध्दा ही कामे झाली पाहिजेत.

<u>मा. सचिव:</u>- पाईप लाईनच्या प्राकलनाचे काय केले?

<u>श्री. ढाकरे (उपायुक्त, मुख्यालय) :</u>-आयुक्तांनी मला अशा सुचना दिल्या आहेत की, या कामाची तातडीने आवश्यकता आहे काय? याबाबत शहर अभियंता यांना विचारणा करा. तातडीने आवश्यकता असेल तर आयत्त्यावेळच्या विषयामध्ये हा प्रस्ताव ठेवा ,नंतर माझी कार्योत्तर मंजुरी घ्या.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- आयत्त्यावेळच्या विषयान्वये ज्या कामांना मंजुरी घ्यायची असेल, जेवढी काही प्राकलने तयार असतील ती आजच्या या सभेतील आयुक्तांना दया.आयुक्तांच्या गैरहजेरीत प्रभारी आयुक्त म्हणुन जे आयुक्तांच्या आसनावर बसतात ते प्राकलनांवर स्वाक्षरी करतात.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :- ते त्यांच्या मर्जी नुसारच ना? की त्यांना दम देवून?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>आपले काय मत आहे? मंजुरी दिली जाऊ नये काय?



<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:</u>-हे काम तातडीने मंजुरीस आवश्यक आहे काय?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:</u>- नगरसेवक निधीतील कामांसाठी केलेली तरतुद ३१ मार्च पर्यंत खर्च करायची असते, जेवढी काही प्राकलने आहेत त्या प्राकलनांना ३१ मार्च पर्यंत मंजुरी दिली गेली नाही तर तो निधी लॅप्स होईल.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-हे लोक सत्ताधारी पक्षाचे आहेत ते अधिका-यांवर दबाव आणु शकतात. काहीही करू शकतात?

श्री. ढाकरे (उपायुक्त, मुख्यालय) :-मी आयुक्त नाही, आयुक्तांनी मला असे निर्देश दिले आहेत की, शहर अभियंता यांना विचारा या कामांची तातडीने आवश्यकता आहे का? तातडीने आवश्यकता असेल तर मी या प्राकलनांवर स्वाक्षरी करतो.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-ही प्राकलने पूढच्या स्थायी समिती सभेत मंजुरीस आली तरी चालतील.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-कामाची तातडीने आवश्यकता आहे की नाही हे शहर अभियंत्यांनी सांगितले पाहिजे. शेवटी शहर अभियंता यांची सुध्दा काही जबाबदारी आहे की नाही?

श्री. ढाकरे (उपायुक्त, मुख्यालय) :-आयत्त्यावेळच्या विषयान्वये हया प्राकलनास या सभे पुढे ठेवण्यास मी नाकारत नाही, परंतु शहर अभियंत्यांनी प्रमाणीत करू दया की कामाची तातडीने निकड आहे की नाही.

श्री. चिजवानी(शहर अभियंता):-माझ्याकडे सर्व प्राकलने तयार आहेत त्यांच्यावर फक्त आयुक्त साहेबांच्या स्वाक्ष-या घ्यायच्या आहेत, त्याची पुढील स्थायी समिती सभेच्या वेळी सुध्दा मी स्वाक्षरी घेऊ शकतो.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण/ श्री. किशोर वनवारी :-ही प्राकलने नगरसेवक निधीतील कामांची आहेत हे सांगा ना.....

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-प्रशासनाचे काही कामांचे प्रस्ताव जेव्हा आयुक्त साहेब आयत्त्यावेळच्या विषयान्वये मंजुरीस आणतात तेव्हा आम्ही सर्व सदस्य सहकार्याच्या भावनेने त्यास मंजुरी देतो परंतु आम्हा नगरसवेकाचे नगरसेवक निधीतील काही कामांचा प्रस्ताव आयत्त्यावेळच्या विषयान्वये मंजुरीस ठेवला जात नाही, अशा प्रकारच्या प्रस्तावास आयुक्तांकडुन आम्हाला सहकार्य मिळत नाही.



मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-टाटा इन्फोटक बाबतचा प्रस्ताव आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये मंजुरीस आणला होता तेव्हा आम्ही त्यास मंजुरी दिली होती.

मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी :- त्याप्रमाणे नगरसेवक निधीतील कामांची प्राकलने सुध्दा आयत्त्यावेळच्या विषयान्वये मंजुरीस ठेवली जावीत.

श्री. ढाकरे (उपायुक्त, मुख्यालय) :-मी, शहर अभियंता यांना विचारू इच्छितो की, या कामाची तातडीने आवश्यकता आहे काय?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-कुण्या प्रभारी आयुक्तांने आपल्या सारखे असे म्हंटले नव्हते.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः- पाहिजे तर याबाबत आम्ही आयुक्तांना बोलतो.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः- पाहिजे तर सभेचे कामकाज ५ मिनिटासाठी स्थगित करा. शांतपणे विचार करून निर्णय घ्या.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः-नगरसेवक निधीतील कामे झाली पाहिजेत.

मा.सदस्या श्रीमती. कुंदनानी लविना व पदमा वलेचा या सायंकाळी ५ . २० वाजता स्थायी समिती सभागृहातुन बाहेर पडल्या.

श्री. ढाकरे (उपायुक्त, मुख्यालय) :-शहर अभियंता यांनी जी प्राकलने सादर केली आहेत ती आयत्त्यावेळच्या विषयान्वये मंजुरीस ठेवत आहे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः- उपआयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये आणलेला प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असुन तो सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--१६--

सायंकाळी ५. ४० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-२२.३.२००१.

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक २२.३. २००१ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सदस्य श्री. किशोर वनवारी हे पिठसीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | |
|---|---|
| १. श्रीमती.कुंदनानी लविना | सदस्या |
| २. श्रीमती. गजवानी कांता | सदस्या |
| ३. श्री.चौधरी राजेंद | सदस्य |

| | |
|---|---|
| ४. श्री.चव्हाण रमेश | सदस्य |
| ५. श्री.पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ६. श्री.पंजाबी नारायण | सदस्य |
| ७. श्री.ब्रहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ८. श्री.भांडे भगवान | सदस्य |
| ९. श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| १० श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ११. श्री.तेजी कैलास | सदस्य |
| १२. श्रीमती.राजानी भारती | सदस्या |

तर

श्रीमती. ज्योती कालानी, श्री.कुमार आयलानी व श्रीमती.पद्मा वलेचा हे सन्माननिय सदस्य /सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

<u>श्री. जे. एम. ढाकरे (उपायुक्त मुख्यालय) :-</u> हे आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ होते.

<u>मा.सचिवः-</u> कृपया लक्ष दया. आजच्या या सभेत मा.सभापती महोदया उपस्थित नाहीत. त्यांच्या अनुपस्थितीत सभेचे कामकाज चालविण्यासाठी आपणामधील एका सदस्याची पिठासिन अधिकारी म्हणुन निवड करणे आवश्यक असल्याने त्यासाठी आपणामधील कुणा एका सदस्याचे नाव सुचविले जावे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः-</u> श्री. किशोर वनवारी यांची पिठासिन अधिकारी म्हणुन निवड करावी.

श्री. किशोर वनवारी यांची सर्वानुमते पिठासिन अधिकारी म्हणुन निवड झाल्यानंतर ते पिठासिन अधिका-यांच्या आसनावर आसनस्थ झाले.

मा<u>.सचिव</u> :- विषय क्र. १ वाचून दाखवितात.

मागील सभेचे दि. १७.३.२००१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u> इतिवृत्त कायम केले जावे.



<u>मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारीः-</u> दि.१७.३.२००१ रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र. २ वाचून दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u> हा प्रस्ताव समंत केला जावा.

<u>मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारीः-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर-५ येथील जुने बस टर्मिनस ते स्वामी

शांतीप्रकाश आश्रम, बसंत बहार मार्गेचा रस्ता सिमेंट कॉंक्रिट करणे कामी मे.डी.एस.कंन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटी अंती लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असुन संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर -५ येथील जुने बस टर्मिनस ते स्वामी शांतीप्रकाश आश्रम बसंत बहार मार्गेचा रस्ता सिमेंट कॉंक्रिटीकरण बांधकाम करण्यासाठी महानगरपालिकेने निविदा मागविल्या होत्त्या. सदर निविदा दिनांक १३.३.२००१ रोजी उघडण्यात आल्या. सदर निविदा खालील निविदाकारांनी भरलेल्या आहेत. त्यांनी दिलेले दर त्यांचे समोर नमुद आहे.

| अ.क्र. | ठेकेदारांचे नाव | भरलेले दर | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मे.सुंदर कंन्स्ट्रक्शन कंपनी | ६.०३ %जास्तीने | २ रे कमी दराने |
| २. | मे. डि. के. ॲण्ड सन्स | १५.००%जास्तीने | ४ थे कमी दराने |
| ३. | गे. ज्योती कंन्स्ट्रक्शन | ८.०० %जास्तीने | ३ रे कमी दराने |
| ४. | मे. डि.एस. कंन्स्ट्रक्शन | ५.००%जास्तीने | १ ले कमी दराने |

उपरोक्त निविदाकारांनी दिलेल्या निविदेनुसार मे. डी. एस. कंन्स्ट्रक्शन यांनी निविदेचे दर सर्वात कमी दर म्हणजे ५. ०० % जास्त दराचे आहे. सदर कामाची प्राकलनीय किंमत वर्ष ९८-९९च्या जिल्हा प्रचलित दरसुची नुसार तयार केली आहे. तसेच जिल्हा प्रचलित दरसुची वर्ष २०००-२००१ नुसार सदर कामाच्या निविदेची किंमत <u>६१४३५६६/-</u> इतकी होत आहे. ९८-९९च्या व २०००-२००१च्या जिल्हा प्रचलित दरसुची मधील निविदेच्या किंमतीत होत असणारा फरक रू. <u>३१७१६९/-इतका</u> आहे. सन २०००-२००१ च्या जिल्हा प्रचलित दरसुचीनुसार निविदा किंमतीवर ५. ४४% एवढी जास्त किंमत होते. म्हणजे नविन दराच्या तुलनेत मे. डि.एस. कंन्स्ट्रक्शन यांची निविदा ०.४२% नी कमी दराची आहे. मे. डि.एस.कंन्स्ट्रक्शन यांना उल्हासनगर महानगरपालिकेने दिनांक १५.३.२००१ च्या पत्रानुसार वाटाघाटी करण्यासाठी व दर कमी करणेसाठी शहर अभियंता यांचे दालनात दिनांक १६.३.२००१ रोजी बोलविण्यात आले होते. त्यानुसार मेसर्स डी.एस. कंन्स्ट्रक्शन यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर त्यांनी दिनांक १६.३.२००१रोजी दिलेल्या पत्रानुसार ०.२०%दराने कमी करून काम करण्यास तयारी दर्शाविली आहे त्यामुळे प्रचलित दरसुची वर्ष २०००-२००१नुसार सदर कामाच्या निविदेच्या किंमतीवर मेसर्स डि.एस. कंन्स्ट्रक्शन यांची निविदा ०.६१% इतकी कमी दराची होत आहे. मेसर्स डि.एस. कंन्स्ट्रक्शन यांनी वाटाघाटीनंतर कमी केलेल्या दरानंतर सदर निविदेचा दर ४.८०% ने जास्तीचे होत आहे. मेसर्स डि.एस. कंन्स्ट्रक्शन यांनी भरलेले दर सर्वात



कमी असुन स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे तरी मेसर्स डि.एस. कंन्स्ट्रक्शन यांनी भरलेल्या जुन्या सन ९८-९९च्या दरसुचीवर आधारित निविदा किंमतीवर ४.८०%जास्त पण सन २०००-२००१च्या जिल्हा प्रचलित दरसुची नुसार ०. ६१% कमी दराची निविदा होते तरी मेसर्स डी.एस. कंन्स्ट्रक्शन यांनी जुन्या निविदा किंमतीवर ४.८०%जास्त दराचे असले तरी नव्या सन २०००-२००१च्या दरसुचीप्रमाणे

निविदा ०.६१ % दराने कमी असल्याने वाजवी वाटत असल्याने निविदेस स्थायी समितीची मान्यता व स्थायी समिती सभेपुढे मंजुरी मिळण्यासाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. २१२</u> <u>दिः-२२.३.२००१.</u>

सुचकाचे नाव :- १)श्री. विनोद तलरेजा.

२)श्री. राजेंद चौधरी.

अनुमोदकाचे नाव :- १) श्री. प्रमोद टाले.

२)श्री.रामचंद पारवानी

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-४ येथील जुने बस टर्मिनस ते स्वामी शांती प्रकाश आश्रम, बसंत बहार मार्गेचा रस्ता सिमेंट कॉक्रिटीकरण करणे कामी मेसर्स. डी.एस. कंन्स्ट्रक्शन यांची वाटाघाटी अंती लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असुन संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-१)

२)

अनुमोदकाची सही-१)

२)

<u>एकमताने मंजुर</u>

<u>पिठासिन अधिकारी</u>
<u>स्थायी समिती सभा</u>
<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>मा.सचिवः-</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u> हा प्रस्ताव समंत केला जावा.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानीः-</u> नाही नाही. हे काम कोणत्या निधीतुन करणार? हे काम सर्वसाधारण निधीतुन का करता?

मा.सदस्या श्रीमती. कांता गजवानी: काही नगरसेवकांच्या प्रभागात नगरसवेक निधीतील कामे होत नसताना काही नगरसेवकांच्या प्रभागात मात्र सर्वसाधारण निधीतुन कामे होत आहेत?

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:- या कामाबाबत स्पष्टीकरण करणारा कुणी येथे उपस्थित नाही.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- प्रत्त्येक प्रभागामध्ये जी उदयाने आहेत. त्यामध्ये करावयाची कामे सर्वसाधारण निधीतुन केली गेली पाहिजे.

मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारी:- महानगरपालिकेने मागच्यावर्षी जो बजेट तयार केला होता. त्यामध्ये उदयानासाठी तरतुदच ठेवली नव्हती. सुधारित अर्थसंकल्पात आम्ही तीन लाखाची तरतुद केली. आपणास जो गोषवारा दिला गेला आहे. त्यामध्ये रू. ३,०१,८००/-खर्चाच्या कामाचे प्राकलन तयार केल्याचे दर्शाविले असुन पुढील वर्षासाठी बजेट मध्ये फक्त एक लाख रू. ची तरतुद केली आहे. या उदयानाची भिंत पडली असल्याने ती बांधणे कामीचे खर्चास मंजुरी देऊन बाकी प्राकलनीय रक्कम पुढील अर्थसंकल्पात समाविष्ठ केली जाईल.

मा सदस्य श्री. प्रमोद टाले :- दहा लाखाचा आमचा जो नगरसेवक निधी आहे तो. कमी असल्याने उद्यानाची कामे सर्वसाधारण निधीतुन केली जावीत.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा:- जेवढया रक्कमेची तरतुद आहे तेवढे काम केले जावे उर्वरित काम पुढील बजेट मधुन केले जावेत.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:- याकामास मंजुरी देऊया व उर्वरित कामे येणा-या स्थायी समितीमध्ये मंजुरीस आणली जावीत.

मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारी:- बाकीच्या ज्या प्रभागामधील उद्यानांची कामे करावयाची आहेत त्याबाबतचे प्राकलने / प्रस्ताव तयार करून घेतले जावेत.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा:- हा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:- आमचा या प्रस्तावास विरोध आहे. भलेही उद्यानाचे काम आहे. परंतु ते वनवारी यांच्याच प्रभागातील आहे ना?

मा.सदस्य श्री. कैलास तेजी:-शहरामध्ये काही प्रभागामध्ये पाण्याची गंभीर समस्या आहे. दोन-दोन, तीन-तीन दिवस पाणी येत नाही.

मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारी:- त्या उद्यानाची भिंत पडली आहे. ती बांधणे आवश्यक आहे. तीचा पाण्याशी काय संबंध?

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:- कुणी अतिक्रमण करू नये म्हणुन ना?आपल्या प्रभागामध्ये कोण अतिक्रमण करणार आहे? कुणीही अतिक्रमण करू शकणार नाही?

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :- त्यांच्या प्रभागात काय? आजुबाजुच्या प्रभागात सुध्दा कुणी अतिक्रमण करू शकणार नाही.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:-</u> प्रभाग क्र. ५४ मधील उद्यानाची ही कामे मंजुरीस आणली जावीत.

<u>मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारी:-</u> मी आपणास आश्वासन देतो. सर्व प्रभागामधील उद्यानांची कामे केली जातील.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:-</u> प्रभाग क्र. १४ , १७ , २८ ,५१ ,५४ ,५५ ,५९ ,६० यासर्व प्रभागातील उद्यानातील कामांची प्राकलने स्थायी समितीपुढे मंजुरीस ठेवली जावीत. स्थायी समितीच्या सदस्यां व्यतिरिक्त ज्या ज्या प्रभागातील उद्यानाची कामे असतील त्या सर्व प्रभागाची कामे मंजुरीस आणली जावीत.

<u>मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारी:-</u> सदरचा प्रस्ताव सर्वांनुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> प्रभाग क्र ४९ मधील बॅरेक क्र. १८२२ जवळील बगीच्याचा विकास करणे कामीचे प्राकलनास <u>प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर -५ येथील प्र.क्र. ४९ मधील बॅ.क्र. १८२२ जवळ अस्तित्त्वात असलेल्या जुन्या बगीचे विकास करण्याचा प्रस्ताव संबंधित प्रभागाचे नगरसेविका श्रीमती मोना वनवारी यांनी पाठविलेल्या त्यांच्या दिनोक ७.३.२००१ च्या पत्रानुसार प्रस्तावित केलेले आहे. या कामासाठी जागेवर पहाणी करुन प्राकलन तयार करण्यात आले असून त्याची किंमत रुपये ३ ,०१ ,८००/- इतकी होत आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या वर्ष २०००-२००१ च्या सुधारीत अंदाजपत्रकात या कामासाठी तरतुद केली आहे. व तसे स्थायी समितीच्या पान क्र. ८ या इतिवृत्तात दिनांक ११.३.२००१ कायम केले आहे. सदर प्राकलनासाठी आर्थिक वर्षात २०००-२००१ मध्ये रु. १ ,४० ,०००/- खर्चास अधिन राहून मंजूरी देणे रास्त राहिल. असा शेरा मुख्य लेख अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी दिलेला आहे. तरी धोरणात्त्मक निर्णय घेण्यासाठी व प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेसाठी स्थायी समिती सभेपूढे ठेवण्यासाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. २१३</u> <u>दि:-२२.३.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :- श्री. ठाकुर बेहरानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-५ येथील प्र. क्र. ३९मधील बॅरेक क्र.१८२२ जवळील बगीच्याचा विकास करणे कामी रू. ३,०१,८००/-च्या प्राकलनास या आर्थिक वर्षात २०००-२००१ मध्ये रू. १,४०,०००/-पर्यंतच्या खर्चास अधिन राहुन प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.



तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असुन आयुक्तांना निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

पिठासिन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

<u>श्री. ढाकरे (उपायुक्त मुख्यालय):-</u> श्री. धुत साहेब, आयत्त्यावेळच्या विषयान्वये मंजुरीस आणलेले पाणी पुरवठा विभागाचे हे काम तातडीचे आवश्यक आहे का?

<u>मा.सचिव :-</u> एकुण चार प्राकलने आहेत.

<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी:-</u> दुषित पाण्याची तक्रार दुर करण्यासाठी करावयाच्या कामाचे एक प्राकलन आहे.

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा</u> :- दुषित पाण्याची तक्रार दुर करण्यासाठी करावयाच्या कामांमध्ये श्री. ठाकुर बेहरानी व श्री. नारायण पंजाबी यांच्या प्रभागातील कामाचाही समावेश केला जावा व अशी प्राकलने पुढच्या सभेत मंजुरीसाठी आणली जावीत.

<u>मा.सचिव:-</u> या कामांची प्राकलने पुढच्या सभेत मंजुरीसाठी आणता येण्यासारखे आहे.

<u>मा.सदस्य श्री.प्रमोद टाले :-</u> दुषित पाण्याची तक्रार दुर करण्यासाठी करावयाची कामे झाली पाहिजेत. मागच्यावेळी शहरात कॉलराची साथ आली होती. त्यावेळी खासदार श्री. परांजपे साहेब यांच्या खासदार निधीतुन १५ लाख खर्चाच्या प्राकलनांना मंजुरी दिलेली आहे. ते पैसे आले आहेत कींवा नाही? ते पैसे मिळण्यासाठी पाठपुरावा केला जावा.

<u>श्री. धुत (कार्यकारी अभियंता):-</u> मा. जिल्हाधिका-यांकडे तो प्रस्ताव मंजुरीसाठी पडुन आहे. आम्ही त्यांच्याशी संपर्क साधला होता. ते म्हणाले की, मी पाठवितो म्हणुन?

<u>मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारी:-</u> धुत साहेब, शहरामध्ये पाणी टंचाईच्या प्रभागात टॅकरने ज्या ठेकेदारांनी पाणी पुरविले त्या ठेकेदारांची बिले अदयाप दिली गेली नाहीत. ते ठेकेदार गेल्या सात-आठ महिन्यांपासुन आदेश नसतानाही टॅकरने पाणी पुरवठा करत आहेत. त्या सेक्शनचे जे प्रमुख आहेत ते एक-एक महिन्यांने सारखे बदली केले जात आहेत. कधी श्री. खान, श्री. लाड तर कधी श्री. ठाणेकर असतात. मी

श्री. ठणेकर यांना याबाबत विचारणा केली की, टॅकरवाल्याचे बिल अदयाप का पुटअप केले नाहीत? तर श्री. ठणेकर बरोबर उत्तर देऊ शकले नाहीत. श्री. ठणेकर यांची मनस्थिती बरोबर दिसत नाही. त्यांना रूग्णालयात भरती करून महापालिकेच्या खर्चाने त्यांच्यावर औषधोपचार केले पाहिजेत?



<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-</u> जेट पंपाची प्राकलने अदयाप तयार केली नाहीत. ती केव्हा तयार केली जातील?

<u>मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारीः-</u> श्री. धुत साहेब, यांची नोंद घ्या. येणा-या स्थायी समिती सभेत ही प्राकलने मंजुरीस आली पाहिजे. ३१ मार्च पर्यंत सर्व तरतुद पुर्ण झाली पाहिजे.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण</u> :- बोरवेल सेक्शन कोण पाहतो? त्या सेक्शनवर कोणाचे नियंत्रण दिसत नाही.

<u>श्री. धुत (कार्यकारी अभियंता):-</u> बोरवेल दुरूस्तीचे काम ठेकेदारास दिलेले असुन काम चालु आहे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानीः-</u> बोरवेल दुरूस्तीसाठी मी अर्ज दिला होता परंतु त्यानुसार बोरवेल दुरूस्तीचे काम अदयाप झालेले नाही. ठेकेदार ज्या बोरवेल दुरूस्त केल्याचे दाखवतात त्याबाबत त्या त्या प्रभागातील नगरसेवकाचे पत्र आहे का? आपणाकडे जर तसे पत्र असेल तरच ठेकेदारास बिल दिले जावे नाहीतर नाही.

<u>मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारीः-</u> बोरवेल दुरूस्तीचे काम ज्या ठेकेदारास दिले आहे त्यांनी हे काम केल्याचे कागदावर दाखविले आहे. परंतु प्रत्यक्षात साईटवर काम झालेले नाही. सर्व ठिकाणी हि कामे झाली पाहिजेत. कॅम्प १ ते ५ मधील सर्व विंधन विहिरींची दुरूस्ती झाली पाहिजे. दुरूस्ती केल्याबाबत आजु बाजुंच्या लोकांचे संमतीपत्र किंवा स्वाक्षरी घेतली पाहिजे. त्यानंतर पेमेंट दिले पाहिजेत.

<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :-</u> सर्व प्रभागामध्ये हि समस्या आहे. माझ्या प्रभागात व भाऊ श्री. गोप बेहरानी यांच्या प्रभागात सुध्दा ही समस्या आहे.

<u>मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारीः-</u> लांजेवार साहेब, नालासफाई कामी मागच्या वर्षी दोन महिने प्रत्येक प्रभागात दहा-दहा रोजंदारी सफाई कामगारांची नेमणुक केली होती. या कामगारांकडुन काम करवुन घेतल्याने शहरात कोठेही पुर आला नव्हता. आमच्या महापौरांनी ''स्वच्छ उल्हासनगरची'' घोषणा केली होती.

<u>श्री. लांजेवार(आरोग्य अधिकारी) :-</u> शहरातील मोठया नाल्यांची सफाईची स्थिती अतिशय खराब आहे. १५ मे पासुन रोजंदारीवरील सफाई कामगार नेमुन हे काम करवुन घेणे आवश्यक आहे. प्रमुख नाल्याची सफाई करून घेतली पाहिजे.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> मागच्या सभेत आयत्त्यावेळच्या विषयान्वये मंजुरीस आणलेली पी.डब्लु.डी.ची प्राकलने कुठे आहेत?

*__मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारी:-__* त्या २७ प्राकलनांपैकी २ प्राकलने सभेच्या नियमित अजेंड्यावर आणा म्हणुन आयुक्तांनी सांगितले होते. उर्वरित २५ प्राकलने स्थायी समितीच्या मागील सभेत मंजुर केली आहेत. उपायुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये मंजुरीस आणलेला प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असुन तो सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--८--

__आयत्त्यावेळचाविषय :-__

__स्थायी समिती ठराव क्र__. २१४ __दिनांक__ :- २२.३.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी.
अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र.२१ मध्ये एम.एस.ई.बी. ऑफीस ते मारूती अपार्टमेंट आणि अब्बु हॉटेल ते ए.सी पाईप पर्यंत १००मी.मी व ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत. | रू.१,३८,०००/- |
| २. | उल्हासनगर-१ मातामंदीर ते निरंकारी हॉल पर्यंत ५० मी.मी. व्यासाची एम.एस.जलवाहिनी टाकणे बाबत. | रू.१,४५,२५०/- |
| ३. | उल्हासनगर-१ येथील प्र क्र.१ येथे सेंच्युरी रेयॉन स्टॉफ ऑफिस मागील भागात १०० मी.मी. व ५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे. (नगरसेवक निधीतून) | रू.१,५६,६००/- |
| ४. | उल्हासनगर-४ येथील प्र क्र.४५ येथे दुषित पाण्याचा प्रश्न सोडवण्याकरिता ६५ मी.मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी संतोषी माता कॉलनी ते राधेश्याम नगर वरून मेनलाईन पर्यंत टाकणे. | रू.८७,७००/- |

सुचकाची __सही-__

अनुमोदकाची __सही-__

__एकमताने मंजुर.__

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>श्री. ढाकरे. (उपआयुक्त मुख्यालयः-</u> आपणासर्वांची संमती असेल तर आयत्त्यावेळच्या विषयान्वये आणखी एक प्रस्ताव चर्चेच आणु इच्छितो.

<u>मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारीः-</u> उपायुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेला प्रस्ताव सर्वांनुमते आजच्या सभेत समाविष्ट करण्यांत येत असुन तो सर्वांनुमते समंत करण्यांत येत आहे.

--११--

सायंकाळी ५. २५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>दिनांकः</u>-३१.३.२००१.

### <u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शनिवार दिनांक ३१.३. २००१ रोजी दुपारी १. ०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी या पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

<u>मा.सभापती</u> :- श्रीमती. कालानी ज्योती.

| | |
|---|---|
| २. श्री.कुमार आयलानी | सदस्य |
| ३. श्रीमती.कुंदनानी लविना | सदस्या |
| ४. श्री.चौधरी राजेंद | सदस्य |
| ५. श्री.चव्हाण रमेश | सदस्य |
| ६. श्री.पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ७. श्री.पंजाबी नारायण | सदस्य |
| ८. श्री.बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ९. श्री.भांडे भगवान | सदस्य |
| १० श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| ११ श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| १२ श्री.तेजी कैलास | सदस्य |

१३ श्रीमती.राजानी भारती सदस्या
१४ श्री.वनवारी किशोर सदस्य
१५ श्रीमती. वलेचा पदमा सदस्या

तर
मा. सदस्या श्रीमती. गजवानी कांता हया सभेस अनुपस्थितीत होत्त्या.

श्री. जे. एम. ढाकरे (उपायुक्त मुख्यालय) :- हे आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ होते.

मा.सचिवः- विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

मगील सभेचे दि. २२.३.२००१ रोजीचे इतिवृत कायम करणेबाबत.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः- मागील सभेचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानीः- हया सभेचे कामकाज स्थगीत केले पाहिजे कारण काही वस्तुच्या जकात करदरामध्ये वाढ करण्याचा जो प्रस्ताव आता येथे मंजुरीस आणण्यात आला आहे तो कसा आणला?

श्री. जे. एम. ढाकरे (उपायुक्त मुख्यालय) :- श्री.पाटणकर साहेब, जकात कर दरामध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव आजच्या हया सभेतच मंजुरीस घेतला पाहिजे का? की पुढच्या सभेत घेतला तरी चालेल?

श्री. पाटणकर (उपायुक्त):- हो, प्रस्ताव अत्त्यंत निकडीचा असल्याने आजच्याच सभेत तो मंजुरीस घेणे आवश्यक आहे. जकात कर वसुलीच्या



ठेक्यास मुदत वाढ दयाची की या कामी नव्याने निविदा मागवायच्या? याबाबत आयुक्तांकडुन प्रस्ताव आणलेला आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- आयत्त्यावेळच्या विषयान्वये हा प्रस्ताव मंजुरीस आणला आहे. मागील वर्षी जकात वसुलीचा ठेका ४६ कोटी रूपयांत देण्यांत आलेला होता. यावर्षी जकात वसुलीचा ठेका त्त्यांनाच दयावा किंवा नाही यासाठी हा प्रस्ताव चर्चेस आणला आहे, या प्रस्तावाबरोबर काही वस्तुंच्या जकात कर दरामध्ये वाढ करण्याचाही प्रस्त्ताव आणलेला आहे. तो प्रस्ताव याबरोबर आणला पाहिजे किंवा नाही?

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :- एवढा महत्त्वपुर्ण प्रस्ताव आयत्त्यावेळच्या विषयामध्ये येऊ शकतो का?

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- हा प्रस्ताव अत्त्यंत महत्त्वपुर्ण असल्याने त्त्यावर सर्व बाजुने सखोल चर्चा होण्यासाठी हा प्रस्ताव आयत्त्यावेळच्या विषयाऐवजी सभेच्या नियमित अजेंडयावर यायला पहिजे, परंतु अशाचप्रकारे टाटा इन्फोटेकचा प्रस्ताव आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणला होता, असे होता कामा नये.

*<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> याविभागाचे जे उपायुक्त आहेत श्री. पाटणकर यांनी याबाबत सविस्तर खुलासा करावा.*

*<u>श्री.पाटणकर (उपआयुक्त):-</u> सन २००१-२००२ साठी जकात वसुली कामी अभिकर्ता नेमण्यासाठी आम्ही निविदा सुचना मागविल्या होत्त्या, याकामी आम्ही जी किमान देकार रक्कम निर्धारित केली होती तेवढया रक्कमेचा देकार न आल्याने ज्या निविदाकारांनी निविदा भरल्या होत्त्या.त्यांना वाटाघाटीस बोलावले होते.*

*परंतु त्त्यांच्याकडुन अपेक्षित तो प्रतीसाद मिळाला नाही. मागील वर्षीचा जो अभिकर्ता होता तो यावर्षी वर्षीच्या दराने जकात वसुलीचे काम करण्यास तयार आहे. परंतु त्त्याचे म्हणणे आहे की, काही वस्तुच्या जकात कर दरामध्ये वाढ करून दिली जावी कारण महापालिकेस मोठया प्रमाणावर जकात उत्त्पन्न मिळवुन देणारी. आय. डी. आय ही कंपनी बंद होण्याच्या मार्गावर आहे. या कंपनीकडुन वर्षाला जवळ जवळ २ कोटी रू. जकात करापोटी महापालिकेस प्राप्त होत आहेत, सन २००१-२००२यावर्षासाठी मे. मोनार्च इन्फास्ट्रक्चर प्रा.लि.हे ४२. ३ कोटी रूपये देण्यास तयार होते, महापालिकेने ४६ कोटीचे उदिष्ट ठेवले आहे. जकात वसुली निविदेचा देकार कमी रक्कमेत आल्याने आम्ही त्त्यांना ठेका दिला नाही, महापालिकेचे आर्थिक हित जोपासण्याच्या दृष्टीने, अल्प कालावधीचा विचार करता, शेवटचा प्रयत्त्न म्हणुन निविदाधारकास आयुक्तांनी ठाणे येथील त्त्यांच्या दालनात वाटाघाटीस बोलावले असता मे. मानार्च इन्फास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी मुळदेकार रक्कमेत ३ कोटी २५ लाख वाढवुन ४२ कोटी ०३ लाख रक्कमेत जकात वसुली ठेका घेण्यास सहमती दर्शविली परंतु ही रक्कम सुध्दा निर्धारित केलेल्या ४६ कोटी या रक्कमेपेक्षा कमी असल्याने देकार स्विकृत न करता, सन २००१-२००२करिता जकात वसुली अभिकर्ता नेमणे बाबत मागविलेल्या निविदा ना इलाजास्तव रदद करण्यांत आल्या, याच वेळेस मे. मोनार्च इन्फास्ट्रक्चर यांनी आयुक्तांना एक पत्र देवुन मागील वर्षीची देकार रक्कम रू. ४५ कोटी ७६ लाख व महापालिकेने काही बाबीच्या जकात कर दरामध्ये वाढ करून दिल्यास त्त्यापासुन मिळणा-या वाढीव उत्त्पन्नातुन ५० लाख असे (४५ कोटी ७६ + ५० लाख)एकुण ४६ कोटी २६ लाख रूपये देण्याची तयारी दर्शाविली आहे, मोनार्च इन्फास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी सुचविलेल्या काही वस्तुंच्या जकात कर दरामध्ये वाढ केल्याने प्रशासनाचे आकडेवारी नुसार ६. ५ कोटीची*



*वसुली वाढण्याची शक्यता आहे. आम्ही ज्या निविदा मागविल्या होत्त्या त्त्यामध्ये सर्वात जास्त रक्कमेचा जो देकार होता तो ४२. ३ कोटीचा होता व आम्ही ४६ कोटीचा आकडा निर्धारित केला होता. ४२. ३ कोटी पेक्षा जास्त रक्कमेचा देकार कुणी भरण्यास तयार नसल्याने जर ४२. ३ कोटी देकाराची रक्कम ठरली व आय.डी.आय. कंपनी बंद झाल्याने त्त्यांच्याकडुन येणारी जकात वसुली जी दोन कोटी पर्यंत होती ती कमी झाली तर मोनार्च इन्फास्ट्रक्चर सद्या कार्यरत असलेला जकात अभिकर्ता यांना ४६ कोटी २६ लाख या किमान देकार रक्कमेत पुढील वर्षे सन २००१-२००२ करिता मुदत वाढ देणेस व संविदा करणेस काही हरकत नसावी असे प्रशासनाचे मत आहे. कारण काही वस्तुंवर जकात कर दर वाढीमुळे ४. २५ कोटी व आय.डी.आय. कंपनी बंद झाल्याने जकात वसुलीत होणारी २ कोटीची तुट समायोजित करून मुदत वाढ देणेस योग्य ठरेल.*

*<u>मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी :-</u> म्हणजे सन २००१-२००२ या वर्षात जकात कर वसुली पोटी ते महापालिकेस ४६ कोटी २६ लाख रू. देतील? परंतु याबाबत निर्णय घेणे हे महासभेच्या अधिकार क्षेत्रातील विषय आहे.*

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- ते (मोनार्च वाले) फक्त ४६ कोटी रू. देत असताना, काय जरूरत आहे, काही वस्तुच्या जकात कर दरामध्ये वाढ करून देण्याची? व लोकांवर करांचे ओझे वाढविण्याची?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- सन २००१-२००२ करिता जकात वसुली अभिकर्ता नेमण्याकामी तयार केलेल्या प्रस्तावाचा गोषवारा आयत्त्यावेळी येथे देण्यांत आलेला आहे. हा गोषवारा आम्ही वाचला नाही. त्यावर आम्ही अभ्यास केला नाही. या प्रस्तावाबाबत मा.महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती सर्व पक्षाचे गटनेते याची बैठक घेवुन सर्व संमतीने निर्णय घेतला तर खुप चांगले होईल यासाठी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत या सभेचे कामकाज स्थगित केले जावे.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- हा अतिशय महत्त्वाचा विषय असल्याने या विषयावरील चर्चेच्या वेळी आयुक्तांची येथे उपस्थित असणे आवश्यक आहे.

श्री. पाटणकर (उपआयुक्त):-आयुक्त साहेबासाठी ठाण्यामध्ये अतिशय महत्त्वाची मिटींग असल्यामुळे या सभेत ते येवु शकणार नाहीत.

मा.सचिव :- आयत्त्यावेळच्या विषयान्वये दोन प्रस्ताव या सभेच्या कामकाजात समावेश करण्यासाठी आणलेले आहेत. एक प्रस्ताव आहे. पी.सी.ओ. बाबत तर दुसरा विषय आहे. जकात अभिकर्ता नेमण्याबाबतचा.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- उपआयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेले दोन्ही प्रस्ताव आजच्या हया सभेच्या कामकाजात समाविष्ट करून हया सभेचे कामकाज आज सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

दुपारी १.४५ वाजता सभेचे कामकाज सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यांत येत असल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-३१.३.२००१.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

दुपारी १.४५ वाजता स्थगित केलेल्या सभेचे कामकाज सायंकाळी ४.०० वाजता सुरू झाले त्यावेळी मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासिन अधिकारी यास्थानी आसनस्थ होत्त्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

मा.सभापती :- श्रीमती. कालानी ज्योती.

४.श्री.कुमार आयलानी सदस्य

३. श्रीमती.कुंदनानी लविना सदस्या
४. श्री.चौधरी राजेंद्र सदस्य
५. श्री.चव्हाण रमेश सदस्य
६. श्री.पारवानी रामचंद्र सदस्य
७. श्री.पंजाबी नारायण सदस्य
८. श्री.बहरानी ठाकुरदास सदस्य
९. श्री.भांडे भगवान सदस्य
१० श्री.टाले प्रमोद सदस्य
११ श्री.तलरेजा विनोद सदस्य
१२ श्री.तेजी कैलास सदस्य
१३ श्रीमती.राजानी भारती सदस्या
१४ श्री.वनवारी किशोर सदस्य
१५ श्रीमती. वलेचा पदमा सदस्या

तर
मा. सदस्या श्रीमती. गजवानी कांता हया सभेस अनुपस्थितीत होत्त्या.

श्री. जे. एम. ढाकरे (उपायुक्त मुख्यालय) :- हे आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ होते.

मा.सचिवः- विषय क्र.२ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-सदरचा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- नगरसेवक निधीतुन प्रभाग २५ मध्ये भुयार गटार
पाईप लाईन टाकणे व जोडणे कामीचे प्राकलनास
प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त वार्डात भुयार गटार पाईप लाईन टाकणे अत्त्यंत गरजेचे आहे. त्याकरिता रक्कम रू. १,९९,१००/-चे प्राकलन जिल्हा दरसुचि १९९८-९९ च्या अधिन राहुन तयार करण्यात आलेले आहे.



त्याभागातील नगरसेवक श्री. धनंजय बोडारे यांनी आपल्या नगरसेवक निधीतुन त्या कामासाठी निधी उपलब्ध करून दिलेला आहे.

सदर प्रस्तावास मा.आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता तसेच काम मजुर कामगार सहकारी संस्थेमार्फत करून घेण्यास स्थायी समिती कडुन मंजुरी मिळावी.

स्थायी समिती ठराव क्र. २१६ दिः-३१.३.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. नारायण पंजाबी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार नगरसेवक निधीतुन प्र.क्र.२५ उल्हासनगर-४ येथील भुयार गटार पाईप लाईन टाकणे व जोडणे कामी १ , ९९ ,१००/- च्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असुन आयुक्तांना निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- सदरचा प्रस्ताव समंत केला जावा.

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा</u> :- कसला प्रस्ताव आहे?

<u>मा.सचिव</u> :- पंपींग स्टेशनच्या देखभाल दुरूस्तीचा प्रस्ताव आहे.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> विविध पंपींग स्टेशन चालविणे, व देखभाल दुरूस्ती कामीचे प्राकलनिय रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय <u>मान्यता देणे बाबत</u>.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर शहराच्या वितरण व्यवस्थेतील विविध ठिकाणी बसविण्यांत आलेले पंपिंग स्टेशन्स बारा महिन्यांचे कालावधीकरिता ठेकेदारी



पध्दतीने चालविण्याकरिता अंदाजित खर्च रू. २२ ,३६ ,५६८/- मात्र चे प्राकलन तयार करण्यात आलेले आहे. सध्या हे काम मे. ओम इंडस्ट्रियल इंजिनिआरिंग सर्व्हिसेस, डोंबिवली ही संस्था करित असुन त्यांचा कालावधी दि. ९.१२.२००० रोजी संपलेला आहे. तथापि निविदेतील अटीनुसार पुढील ठेकेदार नियुक्त होईपर्यंत पूर्वीच्या ठेकेदाराने काम

सुरू ठेवावयाचे असल्याने सदर ठेकेदाराने काम सुरू ठेवलेले आहे. म्हणुन निविदा मागवुन नविन ठेकेदार नियुक्त करण्यासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे.

या प्रस्तावास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांची शिफारस असुन मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव प्रशासकीय व वित्तिय मान्यतेकरिता स्थायी समितीसमोर सादर करण्यांत येत आहे. त्यांस मंजुरी मिळण्याची विनंती आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. २१७</u> <u>दि:-३१.३.२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. लविना कुंदनानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार विविध पंपिंग स्टेशन चालविणे व देखभाल दुरूस्ती करणे कामी रू.२२,३६,५६८/- च्या अंदाजित रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u>:- कसले प्राकलन आहे?

<u>मा.सचिव</u> :- झडपांची देखभाल दुरूस्ती करण्याबाबतचे.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> वितरण व्यवस्थेतील झडपांची दुरूस्ती करणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय <u>मान्यता देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

वितरण व्यवस्थेत दैनंदिन कामात असणा-या झडपांची दुरूस्ती करण्यासाठी लागणा-या सामानाची मागणी उपविभागांकडुन करण्यांत आली आहे. त्यानुसार वितरण व्यवस्थेतील ५० मि. मि. ते ६०० मि. मि.



व्यासापर्यंतच्या झडपांची दुरूस्ती करिता लागणारे स्पिंडल, नट इत्यादी साहित्त्यांचा पुरवठा करण्यासाठी रू. १० ,५८ ,२८८/-मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.

सदर प्रस्तावास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांची शिफारस असुन मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव प्रशासकीय व वित्तिय मंजुरीकरिता स्थायी समितीसमोर सादर करण्यांत येत आहे. त्यांस मंजुरी मिळण्यांची विनंती आहे.

<u>स्थायी समिति ठराव क्र. २१८</u> <u>दि:-३१.३.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. पदमा वलेचा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वितरण व्यवस्थेतील झडपांची दुरूस्ती करीता लागणारे स्पिंडल, नट इ. साहित्त्य पुरविणेकामी रू.१० ,५८ ,२८८/-च्या अंदाजित रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :-</u> संबंधित प्रभागाच्या नगरसेवकांचे संमती पत्र आहे का?

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> अपंग अर्जदार श्री. शिवमोहन के. यादव या व्यक्तीस शहाड जकात नाक्याजवळ उल्हासनगर-१ येथे महापालिकेच्या जागेवर तात्पुरत्त्या स्वरूपात टेलिफोन बुथ <u>बांधणे कामी परवाना देणे बाबत</u>.

<u>प्रस्तावना :-</u>

अर्जदार श्री. शिवमोहन के. यादव हया अपंग व्यक्तीने टेलिफोन बुथ चालविणेसाठी "४ x ४" ची जागा ८० फुट अस्तित्त्वातील रोडच्या लगत फुटपाथ वर तसेच फुटपाथवर मंदीर व जकात नाका जवळ उल्हासनगर.१ येथे जागा मागीतली आहे.

--५--

अर्जदार व्यक्तीस अपंग असल्यामुळे अत्यंत तात्पुरत्त्या स्वरूपात"४ x ४" ची लाकडी कॅबीन मध्ये टेलिफोन बुथसाठी खालील अटींवर परवानगी बाबत स्थायी समितीची संमती घेणे आवश्यक आहे.

१) महानगरपालिका सांगेल त्यावेळी लाकडी कॅबीन (बुथ)हटवून जागा खाली करावी लागेल.
२) कोर्टातून कोणत्त्याही प्रकारचा स्टे आणता येणार नाही.
३) फक्त आपणच तेथे काम करावे.
४) एस.डी.ओ ऑफीसचा नाहरकत दाखला या कार्यालयात देण्यात यावा.
६) वरील बाबी अर्जदारास मान्य असल्याबाबत <u>१०/-स्टॅम्प</u> पेपर वर ॲफिडेव्हीड करावे लागेल.

<u>स्थायी समिती ठराव क्र</u>. ११९ <u>दिनांक</u> :- ३१.३.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. राजेंद्र चौधरी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रमेश चव्हाण.

हि स्थायी समिती वरील प्रस्त्तावनेनुसार अपंग अर्जदार श्री.शिवमोहन के. यादव हया अपंग व्यक्तीस वर नमुद केलेल्या महापालिकेच्या जागेवर आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्ती वर तात्पुरत्त्या स्वरूपात टेलिफोन बुथ बांधणे व चालविणे कामी एक वर्षाच्या कालावधीसाठी परवाना देणेस मान्यता देत आहे.

तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधिन राहून सदरचा परवाना वेळोवेळी एका वर्षापेक्षा अधिक नसेल ऐवढया कालावधीसाठी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--६--

<u>विषय :-</u> मा.महापौर , मा.उपमहापौर व नगरसेवक निधीतुन प्रभाग क्र. ६९ , ५४व २८ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या तीन कामांस प्रशासकीय व <u>वित्तिय मान्यता देणे बाबत.</u>

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> २२० <u>दिनांक</u> :- ३१.३.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. तेजी कैलाश.

अनुमोदकाचे नाव :- श्री. भगवान भांडे.

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.६९ मध्ये बॅ. क्र.१००४ समोरील उद्यानासाठी बांधकाम करणे बाबत.(मा.महापौर निधीतुन) | रू.१ ,४५ ,३३५/- |
| २. | उल्हासनगर येथील प्रभाग क्र.५४ मध्ये गणेश नगर येथे सहा बैठकीचे शौचालय बांधणे बाबत.(मा. उप-महापौर निधीतुन) | रू.२ ,०० ,०००/- |
| ३. | उल्हासनगर-३ येथील प्र क्र.२८ मध्ये भाउजी नगर झोपडपट्टी मध्ये शौचालय दुरूस्ती करणे बाबत. (नगरसेवक निधीतून) | रू.९३ ,२२५/- |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--७--

विषय :- नगरसेवक निधीतुन प्रभाग क्र २५व २६मध्ये जलवाहिनी टाकणे व प्रभाग क्र. ४२ व ५७ मध्ये विंधन विहीरीवर जेटपंप बसविण्याकामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. २२१ | दिनांक :- ३१.३.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. रमेश चव्हाण.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर प्रभाग क्र.२५ सेक्शन -३० मेन रोड उल्हासनगर-४ ते व्ही.टी.सी.चौक पर्यंत ८० मि. मि. व्यासाची व व्ही.टी.सी.चौक ते गीता कॉलनी पर्यंत ५० मि. मि. जी. आय. पाईप लाईन टाकणे बाबत. (मा.नगरसेवक निधीतुन) | रू.१,७७,०००/- |
| २. | उल्हासनगर-४ प्रभाग क्र.२५ मध्ये व्ही.टी.सी. चौक ते महादेव नगर बंजारा कॉलनी पर्यंत ५० मि. मि. व्यासाची जलवाहिनी टाकणे | रू.१,२१,४००/- |

बाबत.(मा. नगरसेवक निधीतुन)

| | | |
|---|---|---|
| ३. | प्रभाग क्र४२मध्ये नगरसेवक निधीमधुन विंधन विहीरीवर जेटपंप बसविणे बाबत. (नगरसेवक निधीतून) | रू.५८,५७०/- |
| ४. | प्रभाग क्र५७मध्ये नगरसेवक निधीमधुन दोन विविध ठिकाणांच्या विंधन विहीरीवर जेटपंप बसविणे बाबत.(नगरसेवक निधीतून) | रू.१,१७,१४०/- |

---

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--८--

मा.सचिव :- विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- हया कामाचा प्रस्ताव सर्व साधारण निधीतुन कसा आणला?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- सुभाष मनसुलकर यांच्या प्रभागातील कामाचा प्रस्ताव आहे, समंत केला जावा.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- दुषीत पाण्याच्या तक्रारी दुर करण्यासाठी करावयाची कामे होत नाहीत, व हे काम तुम्ही सर्व साधारण निधीतुन करत आहात?

मा.सदस्य श्री रामचंद पारवानी:- हे काम सर्वसाधारण निधीतुन का करत आहात? हे काम नगरसेवक निधीतुन केले जावे यासाठी १ तारखेला संबंधित नगरसेवकाकडुन पत्र घेतले जावे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- नाही,नाही, मंजुर करू या, सुभाष मनसुलकर यांच्या प्रभागातील हे काम आहे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- आणखी कुठला निधी बाकी आहे का?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- नविन अर्थसंकल्पीय तरतुद उपलब्ध होणार असल्याने ज्या ज्या सदस्यांच्या प्रभागात या प्रकारची कामे करवुन घ्यायची आहेत. त्यांची प्राकलनें प्रस्ताव मंजुरीस आणले जावेत.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- माझ्या प्रभागात येत असलेल्या दुषीत पाण्याबाबत मी १० अर्ज दिले परंतु अदयाप त्याबाबतचे काम करण्यांत आलेले नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- दुषित पाण्याची तक्रार दुर करण्यासाठी सर्व प्रभागातील कामांची प्राकलने मंजुरीस आणली जावीत.

मा.सदस्य श्री. पारवानी रामचंद्र /मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- माझ्या प्रभागातील दुषीत पाण्याबाबतची प्राकलने मंजुरीस आणली पाहिजेत.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- दुषित पाण्याबाबतचे माझ्या प्रभागातील काम पुढील स्थायी समिती सभेत मंजुरीस आले पाहिजे.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी / श्री. रमेश चव्हाण / श्री. तेजी कैलास :-प्रभाग क्र. ५२ मध्ये सर्व साधारण निधीतुन जलवाहिनी टाकण्याच्या प्रस्तावास आमचा विरोध आहे.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :- दुषीत पाण्याची तक्रार दुर करण्यासाठी माझ्या प्रभागात करावयाच्या कामाचे प्राकलन पुढील स्थायी समिती सभेत मंजुरीस आणले जावे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव बहुमताने समंत करण्यांत येत आहे.

--९--

विषय :- सर्वसाधारण निधीतुन प्रभाग क्र. ५२ मध्ये
जलवाहिनी टाकणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय
व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त विषयांकीत ठिकाणी पाणी टंचाई जाणवत असल्याने सदर कामाचे रक्कम रू. १,१०,४१५/- चे प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च सर्वसाधारण लेखा शिर्षकातुन करण्यात येणार आहे. त्याकरिता मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी सदर कामाचे प्राकलन प्रशासकीय व वित्तिय मंजुरी करिता तसेच काम मजुर कामगार सहकारी संस्थेतर्फे करून घेण्यास प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर.

स्थायी समिती ठराव क्र. २२२ दि:-३१.३.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. पदमा वलेचा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-४ चे प्र. क्र ५२ मध्ये गांगल सायकल मार्ट ते बॅरेक क्र. १४१८ पर्यंत ६५ मी. मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे कामी रू. १ ,१० ,४१५/- प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयुक्तांना निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>बहुमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-</u> या प्रस्तावाचे कोण स्पष्टीकरण करेल? आजपर्यंत का दिले नाही, व आजच हा प्रस्ताव का आणला?

<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी</u> :-स्पष्टीकरण तर करू दया, स्पष्टीकरण करण्यापुर्वीच विरोध करता?

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी</u> :- कोण स्पष्टीकरण करेल? हे प्रस्ताव प्रत्येक वर्षी ३१ मार्च लाच कसे चर्चेस आणता?



<u>श्री. धुत (कार्यकारी अभियंता):-</u>टॅकरवाल्यांनी बिले सादर केल्यानंतर आता हा प्रस्ताव मंजुरीस ठेवला आहे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-</u> टॅकरने पाणी पुरवठा करण्यासाठी मान्यता घेतलेला आहे का?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>माहे ऑगस्ट पर्यंतच्या कामास स्थायी समितीने मंजुरी दिलेली होती. त्यानंतर स्थायी समितीची मंजुरी घेतलेली नाही.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> केलेल्या पाणी पुरवठयाचे बिल मंजुर करण्यास हरकत नाही. परंतु टॅकरने बरोबर पाणी पुरवठा केला जातो काय? इमारतीमध्ये ते जास्त पाणी देतात. प्रभागात इतरत्र ते टॅकरने पाणी पुरवठा करत नाहीत.

__श्री. धुत (कार्यकारी अभियंता)__ :- टॅंकरने पाणी पुरवठा करण्याचे काम शाखा अभियंता पहातात, जशी मागणी येते तसे पाण्याचे टॅंकर पुरविले जातात.

__मा.सदस्य श्री. प्रमोद टाले__ :- पुजा वॉटर सप्लाय यांनी दिड कोटी -दिड कोटी इंचाच्या अनाधिकृत नळजोडण्या घेतल्या आहेत. त्यांच्यावर कधी कारवाई करणार?

__मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी__ :- त्यांना जोडण्या कुणी करून दिल्या?

__मा.सदस्य श्री. कुमार आयलानी__ :- त्यांच्यावर गुन्हा दाखल केला का? केला असेल तर सांगा? एफ. आय. आर नंबर सांगा.

__मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी / राजेंद चौधरी :-__ आमचा या प्रस्तावास विरोध आहे.

__मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी__ :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

__विषय :-__ शहरात पाणी टंचाईच्या विविध ठिकाणी महानगरपालिकातर्फे मा. आयुक्तांच्या थेट कार्यादेशान्वये मे. विजय वॉटर सप्लायर्स आणि गायत्री वॉटर सप्लायर्स यांनी दिनांक १.७.२००० ते ३१.१०.२००० पर्यंत आणि मेसर्स. जयराम वॉटर सप्लायर्स यांनी दिनांक १.६.२००० ते ३१.१०.२००० पर्यंत पुर्वीच्या निविदेतील दराने तसेच अटी व शर्तीवर टॅंकरव्दारे पुरविलेल्या पाण्याच्या __संविदेस कार्योत्तर मान्यता देणे बाबत.__

__प्रस्तावना :-__

उपरोक्त विषयातील प्रकरणी सदर ठेकेदारांनी स्वत:च्या टॅंकरने महानगरपालिके तर्फे शहरात पाणी टंचाईच्या विविध ठिकाणी पिण्याचे पाणी पुरविलेले आहे. त्यांनी सर्वांनी जुन्या मंजुर निविदा दर रू. २०३/- प्रती ७००० लि. क्षमता टॅंकर याच दराने सदर काम या कार्यालयाच्या आदेश क्र/उमपा/डब्लु एस.एस.बी/इइ/१४४० दि. ५.४.९९ अन्वये केलेले आहे. आणि त्यांनी खाली नमुद केले प्रमाणे देयके या कार्यालयास अदा गयी साठी सादर केलेली आहेत.



| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव पत्ता | कालावधी एकुण | एकुण टॅंकर्स | टॅंकर दर रू. | एकुण रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १) | मे.विजय वॉटर सप्लाय उल्हासनगर-४ | १-७-२००० ते ३१-१०-२००० | ५९६९ | २०३/- | १२,११,७०७-०० |
| २) | मे.गायत्री वॉटर सप्लाय उल्हासनगर-४ | १-७-२००० ते ३१-१०-२००० | ५९३३ | २०३/- | १२,०४,३९९-०० |
| ३) | मे.जयराम वॉटर सप्लाय उल्हासनगर-३ | १-६-२००० ते ३१-१०-२००० | ११०४९ | २०३/- | २२,४२,९४७-०० |

उपरोक्त खर्च ठेकेदारांनी पुर्वीच्या निविदेतील नियम अटी आणि करारनाम्यातील शर्ती व अटी यांच्या आधीन राहुन गरजेनुसार शहरात पाणी टंचाईच्या ठिकाणी पाणी पुरवठा केलेला असुन लेखा विभाग व मा. आयुक्त यांची मान्यता असुन सदर काम आणि प्रत्येक ठेकेदारांच्या एकुण देयक रक्कमेला प्रशासकीय आणि वित्तिय मान्यता देणे आणि सदर कामाची ३१-३-२००१ पर्यंत मुदतवाढ मंजुर होण्यासाठी सदर प्रकरण स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यास सादर करीत असुन नवीन निविदा सुचना काढणे बाबत प्रक्रीया यापुर्वी सुरू झालेली आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. २२३</u> दिः-३१.३.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. पारवानी रामचंद.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार शहरात पाणी टंचाईच्या विविध ठिकाणी मा. आयुक्तांचा थेट कार्यादेशान्वये मे. विजय वॉटर सप्लायर्स व मे. गायत्री वॉटर सप्लायर्स यांनी दि. १.७.२००० ते ३१.१०.२००० पर्यंत आणि मे

जयराम वॉटर सप्लायर्स यांनी दि. १.६.२००० ते ३१.१०.२००० पर्यंत पुर्वीच्या निविदेतील दराने तसेच अटी व शर्तीला टॅकर्सव्दारे पुरविलेल्या पाण्याच्या संविदेस कार्योत्तर मान्यता व अंतर्भुत खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

--१२--

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> झुलेलाल बाजार उल्हासनगर ५ येथे अस्तित्त्वातील ट्रॉन्सफार्मर स्थलांतर करून मंजुर आराखडयामधील आरक्षण क्र. १६ या जागेत ट्रॉन्सफार्मर <u>बसविणेकामी परवाना देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

उपरोक्त विषयांकित प्रकरणी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांनी संदर्भीत पत्रान्वये अस्तित्त्वात असलेले ट्रान्सफार्मर सलिांतरीत करावयाचे असल्याने इतरत्र जागेची मागणी केलेली आहे. त्यानुसार जागेची पहाणी केली असता अस्तित्त्वातील ट्रॉन्सफार्मर हा झुलेलाल बाजार उल्हासनगर५ येथे असुन तो दाट वस्तीत असल्याने दुर्घटना झाल्यास जीवीत हानी होण्याची शक्यता आहे व सध्या त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने अस्तित्त्वात असलेल्या ट्रान्सफार्मर जवळील जागेची मागणी केलेली आहे. हया जागेवर प्राथमिक शाळेचे आरक्षण आहे. (आरक्षण क्र १६)या जागेत अस्तित्त्वातील ट्रॉन्सफार्मर सध्या आहे. जागेवर प्राथमिक शाळा नाही. स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यास सादर करीत असुन नवीन निविदा सुचना काढणे बाबत प्रक्रीया यापुर्वी सुरू झालेली आहे. हया भुखंडाचे क्षेत्रफळ १.८९ हेक्टर असुन हया भुखंडाच्या काही भागात रस्ता रूंदी करण्यात बेघर झालेले लोकांना पर्यायी जागा देण्यात आलेली आहे. भुखंडाचा काही भाग अतिक्रमित असुन काही भाग मोकळा आहे. हया भुखंडात अस्तित्त्वात असलेल्या ट्रान्सफार्मर जवळ १५'x १५' म्हणजे (२२५ चौ. फुट) जागा पुढील अटींवर म.रा.वि. मंडळाकडुन प्रतिज्ञा पत्र घेऊन जागा देण्यास हरकत नसावी.

१)सदर ट्रॉन्सफार्मर असलेले जागेचे मालकी हक्क उ. म.पा.कडे राहिल.

२)सदर भुखंडाचे विकास करावयाचे असल्यास त्यावेळी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ स्वखर्चाने ट्रॉन्सफार्मर इतरत्र स्थलांतर करावा लागेल.

वरील प्रमाणे मा. आयुक्त यांनी मान्य केले आहे. सदर विषय स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. २२४</u> <u>दि:-३१.३.२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार झुलेलाल बाजार, उल्हासनगर-५ येथे अस्तित्त्वातील ट्रॉन्सफार्मर स्थलांतर करून मंजुर आराखडयामधील आरक्षण क्र. १६ या महानगरपालिकेच्या जागेत ट्रॉन्सफार्मर बसविणे कामी आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्तीवर परवाना देणेस मान्यता देणे बाबत.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--१३--

<u>मा. उपआयुक्त (मुख्यालय):-</u>आयत्त्यावेळच्या विषयान्वये दोन प्रस्ताव चर्चेस आणलेले आहेत. त्यातील पहिला प्रस्ताव आहे. एस.टी.डी. बुथ (पी.सी.ओ.)बाबतचा.

*__मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी__ :- उपायुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेला एस.टी.डी. बुथचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

*__आयत्त्यावेळचाविषय :-__*

*__प्रस्तावना:-__*

*श्री. कन्हैयालाल पी. मिरानी हया अपंग व्यक्तीने टेलिफोन बुथ घालण्यासाठी उल्हासनगर शहरातील सेक्शन २५, रतन सोप वर्कस् चे पाठीमागे पाण्याच्या कारंज्यांच्या समोर, उल्हासनगर-४ मधील "४ x ४" ची जागा मागीतली आहे.*

*अर्जदार व्यक्तीस अपंग असल्यामुळे अत्त्यंत तात्तपुरत्त्या स्वरूपात "४ x ४" ची लाकडी कॅबीन मध्ये टेलिफोन बुथसाठी खालील अटींवर परवानगी बाबत स्थायी समितीची संमती घेणे आवश्यक आहे.*

*१) महानगरपालिका सांगेल त्यावेळी लाकडी कॅबीन (बुथ)हटवून जागा खाली करावी लागेल.*
*२) सदर जागेचा वापर केवळ तात्तपुरत्त्या स्वरूपात असून जागेबाबत मालकी हक्क पुर्णत: महानगरपालिकेचा असेल.*
*३) फक्त आपणच तेथे काम करावे. जागेचा वापर केवळ अर्जदार यांनाच करता येईल. भाडेकरू ठेवता येणार नाही.*
*४) एस.डी.ओ ऑफीसचा नाहरकत दाखला या कार्यालयात सादर करावा लागेल.*
*५) कोर्टातून कोणत्त्याही प्रकारचा स्टे आणता येणार नाही.*
*६) वरील बाबी अर्जदारास मान्य असल्याबाबत __२०/-स्टॅम्प__ पेपर वर ऑफिडेव्हीड करावे लागेल.*

*__स्थायी समिती ठराव क्र__. २२५ __दिनांक__ :- ३१.३.२००१.*

*सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.*

*अनुमोदकाचे नाव :-श्री. प्रमोद टाले.*

*हि स्थायी समिती वरील प्रस्त्तावनेनुसार अपंग अर्जदार श्री. कन्हैयालाल पी. मिरानी यांस वर नमुद केलेल्या महापालिकेच्या जागेवर आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्ती वर तात्तपुरत्त्या स्वरूपात एस.टी.डी. बुथ बांधणे व चालविणे कामी एक वर्षाच्या कालावधीसाठी परवाना देणेस मान्यता देत आहे.*

तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधिन राहून सदरचा परवाना वेळोवेळी एका वर्षापेक्षा अधिक नसेल ऐवढया कालावधीसाठी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

श्री. ढाकरे (उपायुक्त मुख्यालय):- आयत्त्यावेळच्या विषयामधील दुसरा प्रस्ताव आहे. जकात वसुलीकामी अभिकर्ता नेमणे बाबत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- कोण स्पष्टीकरण करेल? श्री. ढाकरे स्पष्टीकरण करतील की श्री. पाटणकर?

श्री. ढाकरे (उपआयुक्त मुख्यालय) :-सर्वजण मिळुन चर्चा करू या.

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :- प्रथम आपण सांगा काय झाले? कसे झाले?

मा.सदस्य श्री. नारायण पंजाबी हे सायंकाळी ५. ३० वाजता स्थायी समिती सभागृहातुन बाहेर पडले.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- जकात वसुलीचे काम आपल्या हाती घ्यायचे असेल तर त्याबाबत आपण तयारी केली आहे का?

श्री. पाटणकर :- निविदा नंतर दोन वेळा वाटाघाटी केल्यानंतर सुध्दा प्रतिसाद मिळाला नाही. सर्व निविदा रद्द केल्यानंतर मोनार्च कंपनीवाल्याचा टेलिफोन आला होता. काही वस्तुंवरील जकात करांच्या दरामध्ये वाढ करण्याची त्यांनी मागणी केली. त्याबाबतच्या प्रस्तावाचा सविस्तर गोषवारा आपणास दिलेला आहे. अंतिम निर्णय आपण घ्यायचा आहे कारण की आज रात्रौ १२ वाजता, जकात नाके ताब्यात देणे किंवा घेणेची प्रक्रिया चालु करावी लागणार आहे.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- काही वस्तुंवरील जकातकर दर वाढविण्याचा प्रस्ताव प्रशासनाकडुन आलेला आहे की, ठेकेदाराकडून?

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- हया प्रस्तावाबाबत आयुक्त साहेबांना माहित आहे का? कारण की या प्रकारची कागदपत्रे कुणी ही अजुन देऊ शकतो? गोषवा-यांवर त्यांची स्वाक्षरी आहे. याचा अर्थ त्यांना माहित आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- प्रशासनाने गोषवारा तयार करून आपल्या समोर ठेवला आहे. या गोषवा-यावर आयुक्तांची स्वाक्षरी आहे.

श्री. पाटणकर :-हा प्रस्ताव प्रशासनाकडुन आपणापुढे ठेवण्यांत आलेला आहे. ठेकेदारांकडुन नाही.



मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- या प्रस्तावाबाबत आजच निर्णय घ्यायचा आहे. जकात वसुलीचे काम ठेकेदारास दयायचे की, महानगरपालिकेने स्वतः आपल्या हाती घ्यायचे? आज रात्रौ १२ वाजेपर्यंत जकात नाके ताब्यात दयायचे किंवा घ्यायचे आहेत. प्रशासनाने हा प्रस्ताव आमच्या पुढे आणण्यात खुपच उशिर केला आहे. प्रशासन असे प्रस्ताव आयत्त्यावेळी आणते हे चुकीचे आहे. फेब्रुवारी महिन्यामध्ये आपण करांचे दर व अर्थसंकल्पीय अंदाज निश्चित करत असतो त्यावेळी हा प्रस्ताव का नाही आणला? आज ३१ मार्च ला हा प्रस्ताव ऐनवेळी आमच्या समोर आणला आहात. ठाण्यामध्ये हा गोषवारा तयार केला गेला व तेथुनच टेलिफोन वरून मा. महापौर व स्थायी समिती सभापती यांना कळविण्यांत आले की, जकात अभिकर्ता नेमण्याबाबतचा प्रस्ताव आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणत आहे. ठेकेदार येथे माझ्या समोर बसलेला आहे, कोण कोणत्त्या बाबींवर किती जकात कर वाढवित आहे ते त्यांनी सांगितले नाही. हा प्रस्ताव चर्चेस आणत आहे, आपण त्याबाबत जरा लक्ष दयावे. असे आयुक्तांनी टेलिफोनवर सांगितले.

मी त्यांना सांगितले की, आपण हा प्रस्ताव आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणला आहे. या चर्चेच्या वेळी आपण स्वतः प्रत्यक्ष उपस्थित राहावयास पाहिजे. त्यांनी सांगितले की, ठाण्यामध्ये एका महत्त्वाच्या कामात मी व्यस्त असल्याने सभेस येऊ शकणार नाही.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- (उपआयुक्त साहेब) आपणास काय वाटते? जकात वसुली महानरगपालिकेने स्वतःच्या ताब्यात घ्यावी की, ठेकेदारास दयावी?

श्री. पाटणकर :- यांचा निर्णय स्थायी समितीने घ्यायचा आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- आपणास ऐवढी वसुली मिळु शकेल का?

श्री. पाटणकर :- ते तर माहित नाही.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- जकात वसुली महानगरपालिकेने आपल्या ताब्यात घेतली तर वसुलीचे हे काम आपणास करवुन घ्यायचे आहे, आपण ४६ कोटी रूपयांची जकात वसुली करू शकाल काय?

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :- महानगरपालिका जर एवढी वसुली करू शकत असेल तर त्यावर आम्ही विचार करू...

मा.सदस्य श्री. राजेंद चौधरी :- मला वाटते याबाबत श्री. ढाकरे साहेबांना अधिक माहिती आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- श्री. ढाकरे साहेबांनी स्पष्टीकरण करावे.

*__श्री. ढाकरे (उप-आयुक्त):-__करांचे दर वाढविण्याचा प्रस्ताव फेब्रुवारीमध्ये आणला जातो हा प्रस्ताव आणण्यात प्रशासनाकडुन उशिर झालेला नाही. या प्रस्तावाबाबत निर्णय घेणे हे स्थायी समिती व महासभेच्या अधिकारात होते, गोषवा-यामध्ये हे स्पष्टपणे लिहिले आहे. आज रात्री १२ वाजता मागील ठेकेदाराचा एक वर्षाचा कालावधी पुर्ण होत आहे. निविदा भरल्यानंतर जे जे झाले. ज्या वाटाघाटी झाल्या, त्यानंतर महानगरपालिकेचे हित लक्षात घेवून स्थायी समितीने निर्णय घ्यायचा आहे.*



*__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी__ :- कायदयामध्ये काय तरतुद आहे?*

*__श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):-__जकात अभिकर्ता नेमण्यासाठी महानगरपालिकेस शासनाच्या काही मार्गदर्शक सुचना आहेत, महानगरपालिकेसाठी नाहीत. आम्ही आयुक्त साहेबां समोर प्रस्ताव ठेवला होता की, निविदेची प्रक्रिया प्रोसेस चालु असताना जकात कराच्या दरामध्ये वाढ करू शकत नाही. सदरच्या कार्यरत ठेकेदारास जर काही वस्तुच्या जकात कर दरात वाढ करून दिली तर ते बेकायदेशिर ठरेल.*

*__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी__ :- जर निविदा प्रोसेसमध्ये असतील तर, मागविलेल्या निविदा रदद केल्या गेल्या आहेत. मागील वर्षीच्या ठेकेदारास आम्ही मुदत वाढ देऊ शकतो का?*

*__श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):-__ जर आपण काही वस्तुच्या जकात कराचे दर वाढवित आहात तर या दर वाढीमुळे निविदेची रक्कम वाढते त्यामुळे....*

*__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी__ :- जर या प्रस्तावास आम्ही मंजुरी दिली तर तो प्रस्ताव महासभेपुढे सुध्दा मंजुरीस जाईल काय?*

*__श्री. ढाकरे (उपआयुक्त):-__मुदत वाढीचा जो प्रस्ताव आहे, तो स्थायी समितीच्या अधिकार कक्षेत आहे, कायदेशिर तरतुदीनुसार ७ दिवसाची नोटीस देणे आवश्यक आहे. त्याची कार्यवाही तात्काळ नाही.*

*__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी__ :- गोषवा-यामधील आपल्या अटी व शर्ती वेगळया आहेत.*

*__मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-__ नाही तर असे होवू शकते का? महासभेच्या मंजुरीस अधिन राहुन स्थायी समितीने मान्यता दिली तर? अशी अट घालता येईल काय?*

*__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-__ आज तात्काळ ठराव लागु करण्याचा फायदा काय?*

*__श्री. ढाकरे (उपआयुक्त)__ :- याबाबत विधी अधिका-यांनी मार्गदर्शन करावे.*

*__मा.विधी अधिकारी :-__ मार्गदर्शन कसे करणार? आपण मुदये तर उपस्थित करा.*

*__मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-__ काही वस्तुवरील जकात कराचे दरामध्ये वाढ करू शकत नाही तर प्रशासनाने स्थायी समितीपुढे हा प्रस्ताव कसा आणलात?*

श्री. ढाकरे (उपआयुक्त) :- प्रोसीजर फॉलोअप करण्यासाठी.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- कोणती प्रोसिजर?
श्री. ढाकरे (उपआयुक्त) :- स्थायी समितीची मंजुरी, महासभेची मंजुरी... इत्त्यादी.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- महासभेच्या मंजुरीच्या अधिन राहुन आम्ही या प्रस्तावास मंजुरी देवून महासभेपुढे ठेवून त्यांनी त्यास मंजुरी दिली तर?



मा.सचिव :- काही वस्तुंवरील जकात कराचे दरांमध्ये वाढ केली तर कायदयात तरतुदी असलेल्या सर्व प्रक्रिया व पध्दत असलंबवावी लागेल.

श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक) :- काही वस्तुंच्या जकात करामध्ये वाढ केल्यास निविदेच्या किंमतीत वाढ होईल त्यामुळे पुन्हा निविदा मागवाव्या लागतील...

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- आपण आता तेच म्हणालात जे यापुर्वी म्हणालात.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- तर मग हा प्रस्ताव आमच्या समोर प्रशासनाने ठेवला कसा? आयुक्तांनी आम्हाला सांगितले की, आपण निर्धारित केलेले दर त्यांना वाजवी योग्य वाटत नाहीत, व त्यांनी निविदेत लिहिलेले दर आपणास योग्य वाटत नाहीत. म्हणुन या दोन्ही मधील मध्य काढावा लागत आहे, तर मी आयुक्तांना विचारले की, काही वस्तुंवरील जकात कराचे दरामध्ये वाढ करण्याचा स्थायी समितीला अधिकार आहे का? दर वाढविण्याबाबत आम्ही सर्व पक्षीय नेत्त्यांची बैठक बोलावली होती.

श्री. काळे साहेब म्हणतात, पुन्हा निविदा मागवाव्या लागतील, आजच्या या महत्त्वपुर्ण व निकडीच्या वेळच्या सभेत आयुक्तांनी उपस्थित रहाणे आवश्यक होते. परंतु ते आले नाहीत. काही वस्तुंच्या जकात कराचे दरामध्ये वाढ करण्याविषयी व या प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी आयुक्तांनी प्राधिकृत केलेले उपायुक्त श्री. ढाकरे यांनी मार्गदर्शन करावे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-काही वस्तुवरील जकात कर दरामध्ये जी वाढ करण्याबाबत बोलले जात आहे त्याचा जो प्रस्ताव आहे तो प्रशासनाकडुन आलेला आहे, या प्रस्तावाबाबत जर कुणी न्यायालयात गेला तर त्यास स्थायी समिती जबाबदार राहाणार नाही, आम्ही हया प्रस्तावास मंजुरी देवू.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- या प्रस्तावाबाबत आम्ही जेव्हा आयुक्तांना विचारले होते तेव्हा त्यांनी सांगितले होते की, ठेकेदार मागील वर्षी पेक्षा ५० लाख रूपये वाढवुन देईल.

मा.सचिव :- श्री. ढाकरे साहेब, काल आपण आयुक्त साहेबांबरोबर होतात त्यावेळी या प्रस्तावाबाबत जे मुददे उपस्थित झाले होते ते सांगितले जावेत.

श्री. ढाकरे (उपआयुक्त) :- गोषवा-यामध्ये सविस्तर माहिती दिली आहे. प्रत्त्येक मुददयाचे स्पष्टीकरण केले आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- आपले मुख्यलेखापरिक्षक म्हणतात की, पुन्हा निविदा मागवाव्या लागतील म्हणुन?

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- निविदेची किंमत वाढत असेल तर देण्यास काय हरकत आहे?

श्री. ढाकरे (उपआयुक्त) :- काही वस्तुंचे दर वाढवावे लागतील हे गोषवा-यामध्ये लिहिले आहे.

--१८--

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-या प्रस्तावाबाबत प्रशासनास सहकार्य देण्यास आम्ही तयार आहेत. कारण त्यामुळे कर्मचा-यांचे पगार वेळच्यावेळी देता येईल. पाणी पुरवठयाचे बिल, थकबाकी रक्कमेचे हप्ते वेळच्यावेळी देता येवू शकतील. ठेकेदारास बिले देता येवू शकतील काही वस्तुच्या, जकात कर दरात वाढ करून देण्यास आम्ही तयार आहेत परंतु काळे साहेब, जे बोलतात त्याबाबत स्पष्टीकरण करा. मोनार्च कंपनीला ठेका दयावा लागेल की, जकात वसुली आपणास आपल्या हाती घ्यावी लागेल?

श्री. ढाकरे (उपआयुक्त) :-काही वस्तुंचे दर वाढवावे लागतील हे गोषवा-यामध्ये लिहिले आहे.मोनार्च कंपनीचाच ठेका राहील.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- गोषवा-यामध्ये लिहिले आहे. मागील देकार, व आताचा देकार, म्हणजे आताचा देकार वाढलेला आहे.
श्री. ढाकरे (उपआयुक्त) :-व देकार का वाढला आहे ते सुध्दा लिहिले आहे.

श्री. काळे ( मुख्य लेखा परिक्षक):-मागच्या वर्षीच्या देकारामध्ये १० टक्के वाढ अधिक दर वाढविल्यामुळे वाढणा-या वसुलीपैकी दयावयाची रक्कम, अशी देकार रक्कम यावयास पाहिजे.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- १० टक्के सुध्दा थोडे आहे. त्याच कंपनीला आपण पुन्हा ठेका देत आहोत.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- १० टक्के वाढ केली जाईल असे मागच्यावेळी सांगितले नाही.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- ४६ कोटी २६ लाख रूपयामध्ये त्यांना आपण मुदत वाढ देत आहोत.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- आयुक्तांनी हा प्रस्ताव आमच्यासमोर आणला आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- कायदयात बसणारा नाही तर तो प्रस्ताव आमच्या समोर ठेवला कसा?

__श्री. काळे (मुख्य लेखापरिक्षक)__ :-काही वस्तुच्या जकात दरामध्ये वाढ केल्यामुळे जे वाढीव उत्पन्न मिळणार आहे. त्यातुन ते ५० लाख रूपये देणार नसुन जकात चुकविणा-यां विरूध्द खटला भरण्याची परवानगी त्यांना दिल्यास वाढणा-या उत्पन्नामधुन दिले जाणार आहेत. त्यांना अशी शक्ती प्रदान करता येणार नाही.

__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-__ काही वस्तुचे जकात दर वाढवुन दिले तर तोच ठेकेदार राहील ना? महासभेच्या मंजुरीच्या अधीन राहुन स्थायी समिती ठराव पारीत करून देण्यास तयार आहे.

__मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :-__ जी वसुली वाढेल, ती किती वाढेल? हे कोण सांगु शकेल की अमुक एवढीच वसुली झाली म्हणुन? ही आपली जबाबदारी राहील कारण की, महापालिकेकडे अदयाप याबाबतचे रेकार्ड उपलब्ध नाही.

__श्री. ढाकरे (उपआयुक्त)__ :-काही वस्तुच्या जकात कराचे दर वाढविल्याने वसुलीत किती रक्कमेची वाढ होईल त्याच्यावर हे अवलंबुन राहिल.

--१९--

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी हे सायंकाळी ५. ४० वाजता स्थायी समिती सभागृहातुन बाहेर पडले.

__मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-__ काळे साहेब, म्हणतात की, काही वस्तुच्या जकात कराचे दर वाढविण्याचा स्थायी समितीला काही अधिकार नाही, जकात कराचे दर वाढविले तर पुन्हा निविदा मागवाव्या लागतील यामध्ये काही अडचण निर्माण होवू नये. म्हणुन सर्व पक्षीय नेत्त्यांची एक बैठक ही घेण्यांत आली होती.

या प्रस्तावावर सभेत चर्चा चालु असताना...

__मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-__ यांनी ठाणे येथे आयुक्तांना टेलिफोन करून या प्रस्तावावर चर्चा केली.

__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी__ :- आयुक्त साहेबांनी काय सांगितले? सर्व कायदेशिर बाबी पाहुनच मी गोषवा-यावर स्वाक्षरी केलेली आहे असेच ना?

__मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-__ मी आयुक्त साहेबांशी या प्रस्तावाबाबत बोलले की, श्री. काळे साहेब म्हणतात की पुन्हा निविदा मागवाव्या लागतील म्हणुन.. आयुक्त साहेब म्हणतात, पुन्हा निविदा मागविण्याची आवश्यकता नाही. आपण निविदेस एक वर्षाची मुदत वाढ देत आहोत. यामध्ये कोणतीही कायदेशिर अडचण येणार नाही.

एक गोष्ट आणखी आहे, काही वस्तुचे जकात कर दरामध्ये वाढ करण्याचा जो प्रस्ताव आला आहे. त्याबाबत सर्वपक्षीय नेत्त्यांच्या बैठकीत चर्चा झाली होती.

__मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :-__ खटला भरण्याची जी परवानगी मागीतली आहे तीचे काय?

__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी__ :- ती परवानगी आपण त्यांना दयायची नाही.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- खटला भरण्यासाठी परवानगी दयायची नाही, तसेच दुधावर सुध्दा जकात कर आकारू दयायचा नाही.

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :- पापड वगैरेवर?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- काही वस्तुच्या जकात करामध्ये खालील प्रमाणे वाढ करण्याचा प्रस्ताव आहे.

| बाब क्रमांक | सद्याचे प्रचलित दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|
| १३ | १.६५ टक्के | २.५० टक्के |
| ३८ (अ) | २.०० टक्के | ४.०० टक्के |
| ४० (ब) | ३.०० टक्के | ४.०० टक्के |
| ४६ | ३.०० टक्के | ४.०० टक्के |
| ५१ | ३.०० टक्के | ४.०० टक्के |
| ५३ (क) | २.०० टक्के | ३.५० टक्के |
| ६१ | १.६० टक्के | १.८५ टक्के |
| ७१ | २ .५०टक्के | ४.०० टक्के |
| ७४ | ३.१० टक्के | ४.०० टक्के |
| ७७ | १.२० टक्के | २.०० टक्के |



बाब क्र. ७९ मध्ये जकात कर दर वाढ वगळयात आली आहे.

मा.सचिव :- हा प्रस्ताव समंत झाल्याचे समजायचे? सर्वानुमते?

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी / श्री. प्रमोद टाले :- मंजुर. मंजुर.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- आम्ही, आयुक्त साहेबांशी टेलिफोन वरून बोलले आहेत त्यांनी सांगितले की, सर्व कायदेशिर बाबी पडताळुन त्यांचा विचार करूनच मी गोषवा-यावर स्वाक्षरी केली आहे.

मा.सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :- आमचे गटनेते श्री. रामचंद पारवानी आहेत. ते जसे म्हणतील तसे परंतु ते सभेतुन बाहेर पडलेले आहेत.

मा.सभापती. श्रीमती. ज्योती कालानी :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

आयत्यावेळचाविषय :-

विषय :-सन २००१-२००२ या आर्थिक वर्षासाठी जकात

वसुली अभिकर्त्यांची नियुक्ती करणे व काही
<u>वस्तुंवर वाढीव जकात कर दर निश्चित करणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर महानगरपालिका सन २००१-२००२ या कालावधीसाठी जकात वसुली कामी (किमान उददीष्ठ रू. ४६ कोटी) खाजगी अभिकर्त्यांची नेमणुक करणे साठी टाईम्स ऑफ इंडीया, मुंबई इंडियन एक्सप्रेस मुंबई, लोकसत्ता मुंबई, फि प्रेस जर्नल मुंबई, सामना मुंबई, धनुषधारी उल्हासनगर, हिंदु सिंधी,अहमदाबा उल्हास विकास, उल्हासनगर, देशभगत, उल्हासनगर इत्त्यादी वर्तमानपत्रामध्ये दि. ७.३.२००१ रोजी जाहिर निविदा प्रसिध्दीस देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्त्या. सदर निविदा सुचनेत दि. १६.३.२००१ रोजी दुपारी ३. ०० वाजेपर्यंत निविदा फॉम विक्रीची अंतिम वेळ ठेवण्यांत आली होती. या निर्धारित वेळेपर्यंत एकुण दहा निविदा फॉम विविध संस्थांकडुन खरेदी करण्यांत आल्या होत्त्या. सदर निविदा सुचनेत दि.१७.३.२००१ रोजी सायंकाळी ४. ०० वाजेपर्यंत निविदा स्विकारण्याची वेळ निर्धारित केलेली होती. सदर निर्धारित केलेल्या मुदतीत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या होत्त्या. मुदतीत प्रात्प झालेल्या निविदा त्याच दिवशी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास आयुक्तांच्या दालनात आयुक्त यांनी उपायुक्त जकात, उपायुक्त मुख्यालय, मुख्यलेखा अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक व विधी अधिकारी या अधिका-यांची गठीत केलेल्या समितीपुढे निविदा धारक व त्त्यांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत
उघडण्यांत आल्या. सदर उघडण्यांत आलेल्या निविदेमध्ये निविदा धारकांनी उल्हासनगर महानगरपालिका जकात वसुली कामी सन २००१-२००२ या कालावधीसाठी खालील प्रमाणे देयका रक्कम दिलेली आहे.



| | |
|---|---|
| १. मेसर्स जयहिंद कॉन्ट्रक्टरर्स लिमिटेड, नवी मुंबई. | ४१,५२,००,०००/- |
| २. महादेवराव रा. महाडिक , कोल्हापुर | ४१,४४,४४,४४४/- |
| ३.मे. मोनार्च इंफास्ट्रक्चर प्रा.लि. उल्हासनगर | ४१,६७,००,०००/- |

उपरोक्त निविदा धारकांनी जकात वसुलीची देयका रक्कम ही महापालिकेने किमान निर्दिष्ठ केलेल्या रक्कम रू. ४६ कोटी पेक्षा कमी असल्याने उक्त समितीने छाननी करून आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे सविस्तर अहवाल सादर केला असता सदर प्रस्ताव स्विकार्य नसल्याचे आयुक्त यांनी नियमानुसार निविदाधारकांशी वाटाघाटी करणे बाबत उक्त समितीस निर्देशित केले. त्यानुसार निविदाधारकास दि.१९.३.२००१ रोजी सायंकाळी ६. ०० वाजता आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका व उक्त समितीच्या समक्ष वाटाघाटीसाठी निविदाधारकांना पाचारण करण्यात आले. निविदाधारकाने महापालिकेने निर्दिष्ठ केलेल्या किमान देयका रक्कम रू. ४६ कोटी इतकी देयका रक्कम वाढविण्याची तयारी न दर्शविल्याने आयुक्तांनी अंतिमरित्त्या सर्व निविदाधारकांना दि. २२.३.२००१ रोजीच्या पत्रांन्वये सिलबंद लखोटयात जकात वसुलीची अंतिम देयका रक्कम दि. २७.३.२००१ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत सादर करणे बाबत लेखी स्वरूपात कळविले. त्यानुसार दिनांक २७.३.२००१ रोजी उपरोक्त ३ निविदाधारकांपैकी मे. जयहिंद कॉंट्रक्टर्स, लि. नवी मुंबई यांनी फॅक्सव्दारे जादा मुदत मिळणेबाबत विनंती करून सिलबंद लखोटयात

अंतिम देकार रक्कम सादर करणेस असमर्थता दर्शाविली व मुदतवाढ मागितली त्यांनी मागितलेली मुदतवाढीचा प्रस्ताव नामंजुर करण्यात आला. उर्वरित २ निविदाधारकांनी खालीलप्रमाणे सुधारीत अंतिम देकार रक्कम सिलबंद लखोटयात आयुक्तांच्या दालनात उक्त समितीच्या उपस्थितीत व निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधीच्या उपस्थितीत सादर केली.

| | |
|---|---|
| १. महादेवराव रामचंद्र महाडीक, कोल्हापुर | रू.४१,८०,००,०००/- |
| २. मे. मोनार्च इं.प्रा.लि. उल्हासनगर | रू.४२,०३,००,०००/- |

वरील अंतिम सुधारीत देकार रक्कम देखिल महापालिकेने निर्दिष्ट केलेल्या किमान देकार रक्कम रू. ४६ कोटीपेक्षा कमी असल्याने देकार रक्कम स्विकारता येणे शक्य नसल्याबाबतचा अहवाल उक्त समितीने आयुक्तांना सादर केला सदर अहवालानुसार महापालिकेच्या हिताच्या दृष्टीने निविदाधारकाने सादर केलेली किमान देकार रक्कम रू. ४६ कोटीपेक्षा कमी असल्याने महापालिकेचे आर्थिक हित जोपासण्याच्या दृष्टीने किमान देकार रक्कम रू. ४६ कोटीपेक्षा जास्त रक्कमेची देकार मिळणेसाठी अल्प कालावधीचा विचार करता शेवटचा प्रयत्न म्हणुन निविदाधारकांस आयुक्तांनी त्यांच्या ठाणे येथील कार्यालयात पाचारण करणेबाबत निर्देशित केले. त्यानसुार मे. मोनार्च इं.प्रा.लि. यांचे पदाधिकारी श्री. जयराज कल्याणी यांना दि. ३०.३.२००१ रोजी उपायुक्त
जकात व उपायुक्त मुख्यालय यांच्या उपस्थितीत मा. आयुक्त यांच्या दालनांत ठाणे येथे पाचारण केले त्यावेळी उपस्थित उपायुक्त व आयुक्त यांच्या समक्ष निविदाधारकांशी चर्चा करून त्यांनी दिलेली वरील देकार रक्कम रू. ४२ कोटी व ०३ लाख किमान देकारापेखा कमी असल्याने देकार स्विकारता येत नसल्याचे त्यांना सांगुन किमान देकार रू. ४६ कोटी पेक्षा जास्त रकमेचा देकार देणेबाबत महापालिकेच्या हितासाठी सुचित केले. परंतु त्यांनी सादर केलेल्या देकार रक्कमेत वाढ करणेबाबत असमर्थता दर्शाविल्याने नाईलाजास्तव आयुक्त यांनी सन २००१-२००२ करिता जकात वसुली अभिकर्त्याची नियुक्ती करणेबाबतच्या सर्व निविदा रदद करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीकडे सादर केला , व त्याचवेळी मे. मोनार्च इं.प्रा. लि. यांच्या प्रतिनिधीने जकातीच्या काही आयटममध्ये दरवाढ करून व गोठवलेले आणि परिक्षित दुध, होल मिल्क किंवा



टोन्ड मिल्क किंवा स्किम मिल्क पावडर यावर जकात आकरणीस व जकात चुकणा-यांविरूध्द खटला भरण्याची परवानगी दिल्याने जादा मिळणा-या जकात वसुलीच्या रक्कमेपोटी रू. ५० लाख या दराने म्हणजेच ४६ कोटी २६ लाख त्याच अटी व शर्तीनुसार मुदतवाढीचा (सन २००१-२००२ या मुदतीकरीता) प्रस्ताव सादर केला. त्याचवेळी आयुक्त यांनी सदरच्या सुधारीत प्रस्तावास दुरध्वनीवरूनच मा.महापौर, उमपा व मा. सभापती स्थायी समिती उमपा यांची संमती घेतली.

त्यानुसार मोनार्च इं. प्रा. लि. यांनी सादर केलेल्या सुधारीत प्रस्ताव त्यांच्या दि. ३१.३.२००१ रोजी संपणा-या मुदतीनंतर सन २००१-२००२करीता पुर्वीच्याच दराने म्हणजेचे रू. ४५ कोटी ७६ लाख अधिक जकात वाढीच्या काही आयटममध्ये दर वाढ करून व गोठवलेले आणि परिक्षित दुध, होल मिल्क किंवा टोन्ड मिल्क किंवा स्किम मिल्क पावडर यावर जकात आकरणीस व जकात चुकणा-यांविरूध्द खटला भरण्याची परवानगी दिल्याने जादा मिळणा-या जकात वसुलीच्या रकमेपाटी रू. ५०लाख या दराने म्हणजेच ४६ कोटी २६ लाख १२ महिन्यांकरिता पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार काही आयटममध्ये दरवाढ करून, गोठवलेले आणि परिक्षित दुध, होल मिल्क किंवा टोन्ड मिल्क किंवा स्किम मिल्क पावडर यावर जकात आकारणीस व जकात चुकविणा-याविरूध्द खटला भरण्याची परवानगी देण्याचा प्रस्ताव मान्य करण्यास हरकत नसल्याने मे. मोनार्च इं. प्रा. लि. यांना सन २००१-२००२ या कालावधीसाठी जकात वसुली अभिकर्ता म्हणुन नेमणुकीस मान्यता देणेत यावी, असे वाटते. तरी, उल्हासनगर महानगरपालिका जकात वसुली अभिकर्ता नियुक्ती बाबत मोनार्च इं.प्रा. लि. यांना १ वर्षाची म्हणजेच दि. १ एप्रिल २००१ ते ३१ मार्च २००२ पर्यंत मुदतवाढ द्यावी किंवा कसे? प्रस्तावरूपी निर्णयासाठी मा. स्थायी समिती समोर सादर.

महासभेच्या पुर्ननिश्चितीस अधिन राहुन काही वस्तुंना पुढीलप्रमाणे जकात कराचे वाढीव दर प्रस्तावित करीत आहे.

| अनुसुचीतील बाब.क्र. | मालाचे नाव | सध्याचे दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १३ | खाद्य पदार्थ बेकन व हॅम, टेबल बटर मार्गारिन, ताजी फळे व सुपारी वगळुन सुकवलेली किंवा जतन केलेली फळे व कवच फळे, डबाबंद मासळी, चीझ, मिठाई, मुरंबा व जेली, गोठवलेली व जन केलेले दुध, आईस्क्रीम, सर्व प्रकारचे पिठुळ अन्न, लोणची, कोको, कोकोचे बी व चॉकलेटस बिस्किटे व केक, डुकराची पातळ चरबी, (लॉर्ड)किंवा प्राण्यांची खाद्य चरबी, मावा, दुधाची मलई, चक्का व दही, फहांचे रस सरबते व सर्व पेये, ग्लुकोज, डेक्सट्रोज किंवा कोणतीही फलशर्करा (फुट शुगर) खाद्य तेलाव्यतिरिक्त तेल्याच्या दुकानातील माल जतन केलेला किराणा माल, बेकिंग किंवा करी पावडर, सॅकरीन, सर्व प्रकारचे खाद्य रंग व अर्क, इतर सर्व प्रकारचे ग्लुकोज, सातुचे वाळलेले सत्त्व (माल्ट एक्ट्रॅक्ट) मध, कापड बटाट्याचे वेफर्स, कोणत्त्याही वापरासाठी जतन केलेले मांस आणि होल मिल्क किंवा टोन्ड मिल्क किंवा स्किम मिल्क पावडर किंवा निरा यांच्या व्यतिरिक्त विशेषरित्त्या तरतुद न करण्यात आलेले सर्व प्रकारचे अन्न किंवा पेय. | १.६५% | २.५०% |



| अनुसुचीतील बाब.क्र. | मालाचे नाव | सध्याचे दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| ३८ अ | सर्व प्रकारची खनिज तेल, डिझेल तेल, पेट्रोल, विमान चालक स्पिरिट, सर्व प्रकारची वंगणे, व्हाईट ऑईल, तुर्क तेल (स्पिन्डल ऑईल)फर्नस ऑईल, पेट्रोलियम पदार्थ, माक्याचे तेल, शेवसाल | २.०० % | ४.०० % |

| | | | |
|---|---|---|---|
| | ऑईल, साल्व्हंट ऑईल, द किटकनाशके म्हणुन वापरली जाणारी इतर इंधन तेले, नैसर्गिक गॅसोलीन, रंग (नोंद ४८ खाली येत असतील त्याव्यतिरिक्त इतर) सोल्युशन्स व कम्पोजिशन्स, टर्की रेड ऑईल व खनिज तेलाचे उप पदार्थ , परंतु यात यामध्ये या आधी अंतर्भूत केलेल्या वस्तुंमध्ये या पोट-नोंदीखाली घासलेटचा अंतर्भाव होणार नाही. | | |
| ४० ब | सर्व प्रकारची रसायने, सोडियम सल्फेट सायसिंग साल्टोआर्यन सल्फेट ,कॉपर सल्फेट(मोरचुद)ॲल्युमिनियम सल्फेट सोडा सिलीकेट, कॉस्टिक सोडा आणि अन्यथा विनिर्दिष्ट केलेले नसतील असे इतर क्षार असे इतर क्षार, सल्फर पोटेशचे क्लोराईड स्ट्रॉन्टिया, झिंक क्लोराईड, मॅग्नेशियम क्लोराईड, सोरा (सॉल्ट पिटर) सर्व प्रकारची आम्ले सॅलेमोनिॲक बोरेक्स, पांजणीचे पीठ. | ३.०० % | ४.०० % |
| ४६ | चकाकी दिलेल्या विटा, टाईल्स, संगमरवरी दगड, भट्टीच्या विटा, विटा, सर्व प्रकारची छप्परी कौले, फरसबंदीच्या टाईल्स, फरशीच्या लादया, इत्त्यादी चायना मोझइक चिप्स, मोझाइकचा संगमरवरी दगड, मोझाइकची किंवा टॅरेझोची कौले, मातीचे नळ, चिनीमातीचे नळ, सिमेंटचे नळ, आणि ॲसबेसटॉस सिमेंटचे पत्रे. | ३.०० % | ४.०० % |



| अनुसुचीतील बाब क्र. | मालाचे नाव | सध्याचे दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| ५१ | इमारती लाकुड ,वल्या , बांबु , | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | वेत व यापासुन तयार केलेल्या वस्तु, दरवाजे व खिडक्या, चौकटी, खुंटया, जिने, चंदनाचे लाकुड व अशा लाकडापासुन तयार केलेल्या वस्तु. | ३.०० % | ४.०० % |
| ५३क | लेसेस, टेप्स, लाकडी व धातूच्या रिंग्ज, भरतकामाच्या वस्तु, सेल्युलाईड, व सेल्युलाईडच्या वस्तु, सर्व प्रकारचे मणी, कृत्रिम मोती, प्लास्टीक व प्लास्टीकचा माल, प्लास्टिक पावडर, बेकेलाईट व बेकेलाईटचा माल, हस्तीदंत व हाडे यापासुन बनविलेल्या वस्तु व सर्व प्रकारची बटने आणि किरकोळ जिन्नस, (इंबरड्रेशरी) | २.०० % | ३.५० % |
| ६१ | लोकरी, रेशमी, लिनन, ताग, कापुस, कृत्रिम व सिंन्थेटीक वस्तुंचे कापड व वरील वस्तुंपैकी कोणत्त्याही एकाच्या किंवा अंशतः अशा वस्तुच्या व अन्यथा निर्दिष्ट करण्यात आल्या नसतील अशा वस्तु आणि वरील वस्तुंपासुन बनविण्यात आलेल्या तयार वस्तु. | १.६० % | १.८५ % |
| ७१ | लोखंड व पोलाद | २.५० % | ४.०० % |
| ७४ | यंत्र सामुग्री व त्यांचे घटक व सुटे भाग | ३.१० % | ४.०० % |
| ७७ | अलोह धातु म्हणजेच पितळ, तांबे, टीन,ॲल्युमिनियम, शिसे, जस्त, जर्मन, सिल्वर, स्टेनलेस स्टील व त्यांचे मिश्र धातु, तारा सामान व पत्रे इन्गॉटस व सर्कलस इत्त्यादी. | १.२० % | २.०० % |

काही वस्तुंवरील जकात करांचे वाढीव दराचे प्रस्ताव विचारात घेऊन सध्या कार्यरत असलेले जकात अभिकर्ता मे. मोनार्क इं.प्रा.लि. यांना पुढील एक वर्षासाठी किमान देकार रक्कम रू. ४६,२६,००,०००/- या दराने पुर्वीच्या

संविदेतील अटी व शर्तीवर मुदतवाढ देणेस व त्यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करण्यास प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. २२६ दिनांक :- ३१.३.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. प्रमोद टाले.

श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. कुमार आयलानी.

श्री. राजेंद्र चौधरी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार आणि उपरोक्त कारणांमुळे जकात नियमांतर्गत जकातपात्र मालावर आकारणी योग्य कमाल व किमान दर दर्शविणा-या अनुसुचीतील काही वस्तुंवर वर प्रस्तावित केलेले जकात कराचे वाढीव दर पुर्ननिश्चित करणे कामी महासभेच्या मंजुरीच्या अधिन राहुन, जकात अभिकर्त्ता म्हणुन मागील आर्थिक वर्षापासुन कार्यरत असलेल्या मे. मोनार्च इंफास्ट्रक्चर प्रा.लि. यांना सन २००१-२००२ या सरकारी वर्षासाठी मुदत वाढ देवून रू. ४६,२६,००,०००/- या किमान देकार रक्कमेस पुर्वीच्या निविदेतील अटी व शर्तीवर त्यांना जकात अभिकर्त्ता म्हणुन नेमणेस व त्यांच्याशी निविदेशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ६.१० मिनिटांनी सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-४.४.२००१.

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा बुधवार दिनांक ४.४.२००१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सदस्या श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

मा. सभापती :- श्रीमती. कालानी ज्योती.

| | |
|---|---|
| २. श्री. आयलानी कुमार | सदस्य |
| ३. श्रीमती.कुंदनानी लविना | सदस्या |
| ४. श्री.पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ५. श्री.चव्हाण रमेश | सदस्य |
| ६. श्री.ब्रहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ७. श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| ८. श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ९. श्री.तेजी कैलास | सदस्य |
| १० श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| ११ श्री. वनवारी किशोर | सदस्य |
| १२ श्रीमती.पदमा वलेचा | सदस्या |
| १३ श्रीमती. वेलकर सुरेखा | सदस्या |
| १४ श्रीमती. सोनावणे यमुना | सदस्या |
| १५ श्रीमती. राधवानी आशा | सदस्या |
| १६ श्री.केणी जयकुमार | सदस्य |

मा.सचिव:- विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

विषय :-स्थायी समिती सभापतींची नेमणुक करणेबाबत.
या निवडणुकीसाठी २ उमेदवार आहेत.
१) श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु)
२) श्री. पारवानी रामचंद कुटूमल

या दोन्ही उमेदवारां पैकी कुणी उमेदवार आपली उमेदवारी मागे घेवू इच्छित असेल तर त्यासाठी ५ मिनिटाची वेळ दिली जात आहे.

मा.सदस्य श्री. पारवानी रामचंद :- उमेदवारी मागे घेण्यासाठी ५ मिनिटाच्या वेळेची काही आवश्यकता नाही, मी आताच माझी उमेदवारी मागे घेत आहे. भाभी, श्रीमती. कालानी ज्योती यांचीच स्थायी समिती सभापती पदी निवड व्हावी असे मला वाटते.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी / मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- श्री. पारवानी यांनी उमेदवारी मागे घेतली त्याबददल त्यांनी धन्यवाद देतो.

__मा.पिठासिन अधिकारी श्रीमती. ज्योती कालानी__ :- स्थायी समिती सभापती नेमणुकीबाबत खालील प्रमाणे ठराव समंत करण्यांत येत आहे.



__विषय :-__ __स्थायी समिती सभापती नेमणुक करणे बाबत.__

__प्रस्तावना :-__

सन २००१-२००२ करीता स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणुकीसाठी दिनांक ३०.३.२००१ रोजी श्रीमती. कालानी ज्योती सुरेश व श्री.पारवानी रामचंद्र कुटूमल यांनी विहीत नमुन्यात नामनिर्देशन पत्रे महापालिका सचिवांकडे दाखल केले. दि.३१.३.२००१ रोजी या दोन्ही उमेदवारांचे छाननी अंती नामनिर्देशन पत्रे वैद्य घोषित करण्यात आली. तसेच दि. ३.४.२००१ रोजी सायंकाळी ५.०० वाजता निवडणुक लढविणा-या या दोन्ही उमेदवाराची अंतिम यादी प्रसिध्द करण्यांत आली.

आज दि. ४.४.२००१ रोजी स्थायी समिती सभेत, सभापती पदाकरीता उभे असलेल्या दोन उमेदवारांपैकी निवडणुक प्रक्रिया सुरू होण्यापुर्वी श्री. पारवानी रामचंद्र कुटूमल या उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतलेली आहे. त्यामुळे श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु) केवळ एक उमेदवार रिंगणात उभे असुन, त्यांना स्थायी सभापती पदी बिनविरोध निवड झाल्याचे घोषणा करणेसाठी प्रस्तावित आहे.

__स्थायी समिती ठराव क्र. १__ __दि:-४.४.२००१.__

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन २००१-२००२ करिता श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु) यांची स्थायी समिती सभापती म्हणुन बिनविरोध निवड आणि नेमणुक झाल्याचे जाहिर करीत आहे.

__मंजुर__

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ४.४० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)

महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-१९.४.२००१.

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक १९.४.२००१ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सदस्या श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

मा. सभापती :- श्रीमती. कालानी ज्योती.

| | |
|---|---|
| २. श्री. आयलानी कुमार | सदस्य |
| ३. श्री.पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ४. श्री.चव्हाण रमेश | सदस्य |
| ५. श्री.बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ६. श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| ७. श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ८. श्री.तेजी कैलास | सदस्य |
| ९ श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| १० श्री. वनवारी किशोर | सदस्य |
| ११ श्रीमती.पदमा वलेचा | सदस्या |
| १२ श्रीमती. वेलकर सुरेखा | सदस्या |
| १३ श्रीमती. सोनावणे यमुना | सदस्या |
| १४ श्रीमती. राधवानी आशा | सदस्या |
| १५ श्री.केणी जयकुमार | सदस्य |

तर

मा. सदस्या श्रीमती.कुंदनानी लविना हया सभेस अनुपस्थितीत होत्त्या.

सभेची सुरूवात ४.३० वाजता करण्यांत आली.

मा.श्री.कमलेश सोनाळे (उप आयुक्त) हे आयुक्त स्थानी आसनस्थ झाले.

मा.सचिव:- विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

विषय :- मागील सभेचे दिनांक ३१/३/२००१ चे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी / श्री. प्रमोद टाले :-तुम्ही इतिवृतात मंजुर मंजुर असे आमच्या नावापुढे लिहिले आहे. आम्ही कधी असे म्हणालो?

मा.सचिव :- कोणत्त्या पानावर?

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-पान नं. २३ वर. ते इतिवृतातुन काढुन टाकण्यांत यावे. दुसरे असे की, पान नं. ११ वर....

मा.सचिव :- तुम्ही बोलला असाल म्हणुन लिहिले आहे.



मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- प्रस्ताव तर सर्व संमतीने पास झाला आहे.

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :- पण आम्ही मंजुर मंजुर नाही बोललो आम्ही चौधरीशी अशीच चर्चा करत होतो.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- जर सदस्य नाही म्हणतात तर काढुन टाका.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :- तुम्ही कशाला सांगता आहात? जो सदस्य आहे तो सांगेल.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:- दुसरे असे की, पान नं. ११ वर दुषित पाण्यांची तक्रार दुर करण्यासाठी सर्व प्रभागातील कामांची प्राकलने मंजुरीस आणावी असे आम्ही म्हंटले आहे. तसे स्टेटमेंट ठाकुर बेहरानी यांचे देखिल आहे.

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी:-मी असे म्हंटलो होतो की, दुषित पाण्याची तक्रार दुर करण्यासाठी माझ्या प्रभागात करावयाच्या कामांचे प्राकलन पुढील स्थायी समिती सभेत आणले जावे. परंतु अजुन आणले नाही.

मा.सचिव :- हे इतिवृत कायम होणे बाबत विषय आहे आधी इतिवृत मंजुर होऊ दया मग चर्चा करा.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदर इतिवृत सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- मागील सभेत ज्या महापालिकेच्या जागेवर ट्रॅन्सफार्मर बसविणे बाबत ठराव झाला होता.त्याजागी आधीच एक ट्रान्सफार्मर बसविला आहे. आधीच्या ट्रॅन्सफार्मरच्या बाजुला दुसरा ट्रान्सफार्मर लावणेस आपण परवाना दिला आहे. परंतु मागील सभेत जो ठराव होता त्यात प्रस्तावनेत असे निवेदन आहे की, कधीही ट्रान्सफॉर्मर हटवावा लागला तर एम.एस.इ.बी. स्वखर्चाने काढेल जर असे आहे तर आधीचा ट्रान्सफॉर्मर जर एम.एस.इ.बी. स्वखर्चाने काढत आहे तर आताच आपण ट्रान्सफॉर्मर काढण्याची गरज भासली तर त्याच्या खर्च पण एम.एस.इ.बी करेल.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- मागच्या स्थायी समितीत दुषित पाण्याच्या तक्रारी दुर करण्यासाठी म्हणुन प्राकलने या सभेत आणणार होते. परंतु प्राकलने तर आणलीच नाहीत, आणि काही उपाययोजना देखिल केली गेली नाही. अजुन शहरात कॉलराची समस्या वाढेल. कॉलरा येईस्तोपर्यंत वाट पहात आहात का?

*श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-* प्राकलन पाठवले होते. लेखाविभागाकडुन परत पाठवले.

*मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-* कॉलरा परत वाढला तर?

*मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी* :- लेखाविभागात फक्त आमचेच अकाऊंट बघतात का? दुस-यांचे कसे मंजुर होते?

*मा.सदस्य श्री. प्रमोद टाले* :-स्थायी समिती सभापतींना आमची विनंती आहे की, दुस-या सभेत दुषित पाण्याचा विषय आणला जावा.

--३--

*मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी* :- असे कसे लेखाविभागाकडुन क्लीअर होत नाही. ४२ नं प्रभागाचे प्राकलन त्यांनी परत पाठवले.

*मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा* :- जे ठाकुर बेहरानी म्हणाले त्याच्याशी आम्ही सहमत आहोत. आमच्या मा. स्थायी समिती सभापतींनी ९.३.२००१ ला पत्र पाठवले की, आमचा निधी शिल्लक आहे. ते काम ३१ मार्चच्या आधी करण्यांत यावे.परंतु ते पत्र दि. १०.४. २००१ ला पोहोचले आहे. आता जर नगरसेवक निधी लॅप्स झाला तर याला जवाबदार कोण?

*श्री. शेंडे (मुख्य लेखाअधिकारी):-*निधी हि वेगळी बाब आहे. व कागदावर तरतुद करणे ही वेगळी बाब आहे. निधी म्हणजे महापालिका तिजोरीत जमा असलेला पैसा तरतुद म्हणजे महापालिकेच्या अर्थसंकल्पात कागदोपत्री केलेली तरतुद. स्थायी समिती सभापती संदर्भित जे काम आले ते ३१ मार्च पर्यंत माझ्या पुढे आले नाही. ३१ मार्चला बजेट संपले व आमचे अकाऊंट बंद झाले. १ एप्रिल पासुन नविन वित्तिय वर्ष सुरू होते. माझ्याकडे जे पत्र आले ते १०.४.२००१ ला आले. मागील वर्षाची तरतुद लॅप्स झाली. नविन वर्षाचा सन २००१-२००२च्या तरतुदीमधुन हा खर्च दाखवावा लागेल.मागची शिल्लक तरतुद जर सन २००१-२००२या आर्थिक वर्षात वापरली तर ऑडीट ऑबजेक्शन येईल.

*मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा* :- आम्ही याबाबतीत आयुक्तांना विचारतो, जर आम्ही पत्र ९.३.२००१ ला दिले आहे. म्हणजेच ३१ मार्चच्या आत दिले आहे. ते जर लेखाविभागात १०.४.२००१ला पोहोचते तर यामध्ये पडणा-या कालावधी वाया गेला. याला जवाबदार कोण? हे म्हणतात ३१ मार्चला अकाऊंट बंद केले जाते. बजेटमधील तरतुद संपते.

*मा.सदस्य श्री. किशोर वनवारी* :- शेंडे साहेब, म्हणतात तिजोरीत असेल तर करू. याला काय अर्थ आहे? आमचा तर निधी लॅप्स झाला ना?एम.एल.ए. कडुन येणारा फंड शिल्लक राहिला तर ३१ मार्चनंतर सुध्दा तो वापरता येतो मग यामध्ये असे का नाही?

*श्री. शेंडे (मुख्य लेखाअधिकारी):-* निधी आणि तरतुद मध्ये अंतर आहे. तरतुद ही बजेट अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात केली जाते. येणा-या उत्त्पन्नातुन हा खर्च केला जातो पण आपले अजुन ऐवढे उत्त्पन्न झाले नाही. निधी हा शासनाकडुन एम.एल.ए.खात्त्यात येणारा निधी थेट बॅंकेत जातो. कागदोपत्री नसतो निधी थेट उपलब्ध असतो.

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- यांचे म्हणणे आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती खराब आहे. तिजोरीत काहीच नाही. प्रशासनाच्या चुकीमुळे नगरसेवक निधी लॅप्स झाला. मा.स्थायी समिती सभापती यांनी ९.३.२००१ला पत्र देऊन सुध्दा ते काम झाले नाही. त्यांनी याच करिता पत्र दिले होते की, नगरसेवक निधी लॅप्स होऊ नये म्हणुन. त्यांनी वेळेवर पत्र दिले होते. नगरसेवकांचा यात काहीही दोष नाही. प्रशासनाच्या चुकीमुळे ते विभागात उशीरा गेले. ही प्रशासनाची चुक आहे, नगरसेवकाची नाही. जेव्हा चंद्रशेखर साहेब होते तेव्हा ते म्हणाले होते की, जर ३१ मार्च पर्यंत नाही करू शकलो तर पुढच्या वर्षी त्याची आम्ही तरतुद राखुन ठेऊ.*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखाअधिकारी)</u>:- आपण प्रस्ताव नाही पास करत आहात. आम्ही पुढच्या बजेटमध्ये पास करू असे नाही म्हणु शकत. ३१ मार्च नंतर आम्ही अकाऊंट रिओपन नाही करू शकत.*



*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> तुम्ही पुढच्यावर्षी तरतुद करा.*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखाअधिकारी):-</u> आता अकाऊंट बंद झाले आहे. माझ्याकडे बुक असते त्यात ५ वर्षापर्यंतचा रेकॉर्ड आहे. कोणाचे किती खर्च झाले शिल्लक आहे याची नोंद आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :-आपण पुढच्यावर्षी ज्या नगरसेवकांचा निधी शिल्लक राहीला आहे. समजा एक लाख राहिला आहे तर त्यांना १० लाखाच्या ऐवजी ११ लाख दयायचे.*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखाअधिकारी)</u>:-आम्ही नियमाच्या बाहेर नाही जाऊ शकत?*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- स्थायी समिती असा निर्णय घेते की, जितका निधी राहिला आहे. तो पुढच्या वर्षात ॲडजेस्ट करा. प्रशासनाच्या चुकीमुळे हे सर्व घडले आहे.*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखाअधिकारी):-</u>हे प्रकरण शासनाकडे पाठवा. त्यांनी जर मान्य केले तर आम्ही करू.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:-</u>तुम्ही दहा लाखाऐवजी जेवढा निधी लॅप्स होत आहे. तेवढा वाढवुन दया.*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखाअधिकारी):-</u>महासभेत तसा ठराव करावा लागेल. अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात सुधारणा करावी लागेल. महापालिकेच्या २००१-२००२चे अर्थसंकल्प महासभेने पारीत केले आहे. त्यामुळे महापालिकेची मागील वर्षाची शिल्लक असलेली तरतुद लॅप्स झाल्याने येत्त्या आर्थिक वर्षात म्हणजेच २००१-२००२मध्ये तो वापरता येत नाही.*

*<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा</u> :- मी आयुक्तांना विचारतो ही कुणाची चुकी आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- ज्यांनी विलंब केला आहे त्यांना निलंबित करा.*

*<u>मा.सदस्य श्री. कुमार आयलानी</u>* :- निधी कॅरी फॉरवर्ड करा.

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u>* :- बरोबर आहे. कॅरी फॉरवर्ड करा.

*<u>श्री. सोनाळे (उपआयुक्त):-</u>*चिजवानी साहेब, जरा प्रकाश टाका उशीर का झाला ते?

*<u>काही सदस्य :-</u>* सर्वांचे कॅरीफॉरवर्ड म्हणुन ठेवा.

श्री. चिजवानी यांनी कागदपत्र दाखवले.

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u>* :-या कागदपत्रानुसार २८.३.२००१ला अकाऊंटमध्ये लेखाविभागाकडे गेले होते. म्हणजे ३१ मार्चच्या आधी पोहोचले होते.

*<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u>* शेंडे साहेब आपला त्यावर रिमार्क आहे.



*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखाआधिकारी):-</u>*हे जर आधी स्थायी समितीत पास झाले असते तर ठिक झाले असते.

*<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा</u>* :- तुम्ही ठेकेदारांना देता का ३१ मार्चच्या आधी पेमेंट?

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखाआधिकारी):-</u>*निधी आणि तरतुदमध्ये फरक आहे. १३३ कोटीचे उत्त्पन्न मिळविण्याचे आपले ध्येय आहे. कागदोपत्री ते असते प्रत्त्यक्षात तेवढे मिळत नाही तर आपण काही करू शकत नाही.

*<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा</u>* :- तुम्ही काय रिमार्क मारला आहे.

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखाआधिकारी):-</u>*शहर अभियंता यांनी सर्व परिने निट पहाणी करून पाठवावे. त्यानंतर आमच्याकडे ३१ मार्च नंतर आले आहे. आम्ही अकाऊंट क्लोज केले आहे.

*<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा</u>* :- तुम्ही तसे सक्युलर काढले का?

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखाआधिकारी)</u>*:-शासनाची अशी कित्त्येक परिपत्रक आहेत.

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u>* :- तुम्ही ठेकेदारांना पेमेंट दिले का? दहा-दहा लाख शिल्लक आहेत. कुठल्या पध्दतीने दिले. सेवाजेष्ठतेनुसार दिले का?

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखाआधिकारी):-</u>*मी खुप जणांना पेमेंट दिले आहे.

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u>* :- किती जणांना दिले आहे?

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखाआधिकारी):-</u>*सगळयांना दिले आहे.

<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :-</u> आपण याबाबतीत धोरण निश्चित केले होते की, ठेकेदारांना पेमेंट दिले जाईल. श्री. आर.डी. शिंदे साहेब असताना असा निर्णय झाला की, आधी ५० लाख देऊ नंतर ३५-३५ लाख असे देऊ.

<u>श्री. शेंडे (मुख्य लेखाअधिकारी):-</u> प्रथम ५० लाख मार्च-फेब्रुवारी मध्ये ३५-३५लाख असे एकुण दोन महिन्यात ७० लाख दयायचे ठरले होते. त्याप्रमाणे ठरलेल्या अशा एकंदर १२० लाखापेक्षा सर्वच ठेकेदारांना अधिक रक्कमेचे पेमेंट करण्यांत आले. म्हणजेच मा.आयुक्त श्री. शिंदे साहेबांच्या आश्वासनाची पुर्तता करण्यांत आली. ३५-३५ लाखापेक्षा जास्त पेमेंट ठेकेदारांनी दले आहे. कुणीही असे नाही म्हणु शकत की, पेमेंट दिले नाही.

<u>श्री. सोनाळे (उप आयुक्त)</u> :- शेंडे साहेब, जे म्हणत आहेत ते बरोबर बोलत आहेत. जर स्थायी समितीत असा आता ठराव केला तर पोस्ट ऑडीटच्यावेळी ऑबजेक्शन घेतले जाईल. ३१ मार्च नंतर तरतुद लॅप्स होते निधी तसाच राहतो. बाकी आपले म्हणणे आहे. ९.३.२००१ला पत्र दिले. ते २८.३.२००१ पर्यंत प्रवास करत राहीले.



<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा</u> :- नगरसेवकांचा यात काहीएक दोष नाही. प्रशासनाची चुकी आहे.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण</u> :- चिजवानी साहेब तुम्ही सांगा ९ ते २८ तारखेपर्यंतच्या मधल्या कालावधीत ते कुठे होते?

<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी</u> :- अकाऊंटला का नाही पोहचले?

<u>मा.सदस्य श्री. कुमार आयलानी</u> :- ज्याची चुकी आहे त्याला निलंबित करा.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण</u> :- चिजवानींना विचारा १९ दिवस ते पत्र कुठे होते?

<u>श्री. सोनाळे (उप आयुक्त)</u> :- इतके दिवस का लागले?

<u>मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :-</u> बिगर टक्याचे काम होते का?

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले</u> :- जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करा.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- निधी कॅरिफॉरवर्ड करून दिला पाहिजे.

<u>श्री. सोनाळे (उप आयुक्त)</u>:-तरतुद संपली आहे.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- जर नगरसेवकांनी पत्र दिले नाही तर निधी लॅप्स झाला तर ठिक होते. हि तर प्रशासनाची चुकी आहे. स्थायी समितीमधील मान्यवर व्यक्तींचा देखिल यांनी मान ठेवला नाही तर साध्या जनतेचे काय हाल होतील?

*<u>श्री. सोनाळे (उप आयुक्त):-</u> मी अशा विभागात काम केले आहे की, ३१ मार्चच्या आधी शासनाकडुन आलेला निधी वापरला न गेल्याने परत केला गेला.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-</u>कुणीतरी जाणुन बुजुन केले आहे. जेणेकरून नगरसेवकाचा निधी लॅप्स होईल.*

*<u>श्री. सोनाळे (उप आयुक्त)</u> :- तुम्ही जो प्रश्न विचारला तुम्हालाच त्याचे उत्तर माहीत आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-मागच्या वर्षी जेव्हा चंद्रशेखर साहेब होते त्यांनी लॅप्स झालेला निधी नगरसेवकांना दयायचे असे ठरवले होते.*

*<u>श्री. सोनाळे (उप आयुक्त):-</u> महासभेत तसा ठराव करा. शासनाकडुन मंजुरी घेऊ. जेस राम पारवानी म्हणाले कुणाचे दोन लाख लॅप्स होत असतील तर १० अधिक २ असे मिळुन बारा लाख करू. पण शासनाची मंजुरी मिळाली तरच.*

*<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी</u> :- आपले असे म्हणणे आहे की, चंद्रशेखरना हि प्रोसिजर माहित नव्हती.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- संबंधित अधिकारीना निलंबित करा.*



*<u>श्री. सोनाळे (उप आयुक्त)</u>:-मी असे कुठे म्हणालो की, चंद्रशेखर साहेबांना काही माहित नव्हते. शेंडे साहेब, जे म्हणतात ते बरोबर आहे. महासभेची मंजुरी जरूरी आवश्यक आहे. चंद्रशेखर साहेब असे तर नाही म्हणाले की, शासनाची मंजुरी घेऊ नका.*

*<u>मा.सदस्य श्री.ठाकुर बेहरानी</u> :- ते म्हणाले की, ज्यांचा निधी राहीला आहे तो पुर्ण देऊन टाका.*

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :- आपण यावर अभ्यास करावा.*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखाअधिकारी)</u>:-तुम्हाला जर मागची शिल्लक असलेली तरतुद नविन वर्षात वापरायची असेल तर तसा ठराव महापालिका स्थायी समितीत व महासभेत आणावा. व तशी अर्थसंकल्पात सुधारणा करावी लागेल. तुम्ही स्थायी समितीत नव्याने आणा.*

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :- आम्ही नव्याने नाही करणार, आमची काय चुकी आहे प्रशासनाची चुकी आहे.*

*<u>काही सदस्य</u> :- ज्यांनी विलंब लावला आहे त्यांना निलंबित करा.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> कॅरी फॉरवर्ड करून पुढच्यावर्षी काम करा.*

*<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण</u> :- चिजवानी साहेब उशीर का झाला?*

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :- ९ तारखेला माझ्याकडे पत्र आले. १२ तारखेला पाणीपुरवठा विभागात पाठवले. पाणीपुरवठा विभागाने प्राकलने तयार करून माझ्याकडे पाठवले. ते मी १६ तारखेला सही करून पाणी पुरवठा विभागात लेखा विभागाला देण्यासाठी पाठवले.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- इतका वेळ लागतो. १६ ते २८ कुठे होते?

श्री. चिजवानी (शहर अभियंता) :-पाणीपुरवठा विभागात होते.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- ९ ते २८ काय करत होतात. हे गंभीर प्रकरण आहे.

मा.सदस्य श्री. कैलास तेजी:-शेवटी धुत साहेबांकडे आले.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- नगरसवेकांचे हे हाल आहेत तर जनतेचे काय हाल होतील?

श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):- १२.३.२००१ला आमच्याकडे प्रस्ताव आला आम्ही अकाऊंटमध्ये २८.३.२००१ला पाठवले.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- पाणीपुरवठा विभाग आणि लेखाविभाग यामध्ये ते पत्र प्रवास करत होते.



मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- बारा दिवस लागले.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- कुणावर कार्यवाही करणार?

श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-रिमार्कनुसार पुर्ण माहिती देण्यासाठी सात दिवस लागले.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :- याबाबत चौकशी केली जावी.

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :- धुत साहेब तुम्ही माझ्याप्रभागातील दुषित पाण्याच्या प्राकलनाचे काय केले ते स्थायी समितीत का नाही आणत?

श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-चौकशी करून स्थायी समितीत आणतो.

मा.सदस्य श्री. कैलास तेजी :- इथल्या इथे पत्र पाहोचायला १२ दिवस लागले का?

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- लेखाविभागात २८ तारखेला पोहोचले म्हणजे ३१ मार्चच्या आधी पाहेचले म्हणजे बरोबर पोहोचले.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा:- लेखा विभागवाले शेरा तर मारतातच.

*मा.सदस्य श्री. किशोर वनवारी* :- त्यांच्याकडुन पहिल्यांदा कधीच पास होऊन येत नाही.

*मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :-* त्यांच्याकडे परत पाठवण्याची प्रथा आहे का? माझ्या प्रभाग क्र. ४२ च्या प्राकलनावर त्यांनी रिमार्क दिला आहे. माणुस मेल्यावर पाणी पोहोचवणार का?कमीत कमी दुषित पाण्याचे प्राकलन तरी परत पाठवु नका त्याला तरी प्राधान्य दया.

*मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी* :- काय केले जावे.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते हे समजत नव्हते.

*मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :-* दुषित पाण्याचे आधी काय ते बघा.

*मा.सदस्य श्री. किशोर वनवारी* :- आयुक्त साहेब, चौकशी करून सात दिवसाच्या आत स्थायी समितीला माहिती दयावी.

*श्री. सोनाळे (उप आयुक्त):-* ढाकरे साहेब, याची चौकशी करून अहवाल दयावा.

*मा.सदस्य श्री. कुमार आयलानी* :- ज्यांचे पण राहिले आहे त्यांचे कॅरीफॉरवर्ड करून पुढच्यावर्षी काम केले जावे.



*मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-* संबंधित अधिकारींवर उचित कार्यवाही करावी.

*मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-* आमची मा.स्थायी समिति सभापतींना विनंती आहे की, दुषित पाण्याचे प्राकलन लवकरात लवकर स्थायी समितीत आणले जावे.

*मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी* :- आमचे जितके पण नगरसेवक आहेत. ज्यांच्या प्रभागात दुषित पाण्याची तक्रार आहे ते काम लवकरात लवकर स्थायी समितीसमोर आणावे. शहरात कॉलराची साथ पसरत आहे. याकामाकडे दुर्लक्ष केले जाऊ नये.

*मा.सदस्य श्री. कुमार आयलानी* :- आमच्या प्रभागात टॅंकर येत नाही. टॅंकरवाल्यांचे बिल दिले का?

*श्री. शेंडे (मुख्य लेखाअधिकारी)*:-सर्वांना बिले दिली आहेत माझ्याकडे थकबाकी कुणाचीही नाही. आताच नुसते एक बिल आले आहे.

*मा.सदस्य श्री. कुमार आयलानी* :- मागच्यावेळेस महापौर म्हणाले होते की, ठेकेदारांना पेमेंट देऊ ते केले का?

*श्री. शेंडे (मुख्य लेखाअधिकारी)*:-टॅंकरच्या बिलाबाबत बोलत आहे. त्यासाठी सध्या आमच्याकडे निधी उपलब्ध नाही. ऑक्ट्रॉयचा निधी येणार आहे तो अजुन आला नाही.

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :- तो कधी येणार?

श्री. शेंडे (मुख्य लेखाअधिकारी):-२३ तारखेला मिळणार आहे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- जर बिल दिले आहे तर मग त्यांनी संप का केला आहे?

श्री. शेंडे (मुख्य लेखाअधिकारी):-आताचे पेमेंट राहिले आहे. तिजोरीत पैसा नाही तर कसे पेमेंट करणार?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-मला वाटते टॅकरर्स पेमेंटमध्ये दुजाभाव केला जातो. संबंधित अधिकारीशी त्यांचे संगनमत झाले आहे.

श्री. शेंडे (मुख्य लेखाअधिकारी):नगरसेवक आम्हाला विनंती करतात त्यामुळे कधी कधी त्यांचा मान राखावा म्हणुन त्यांनी सांगितलेल्या ठेकेदारांना तिजोरीत असलेल्या निधीच्या प्रमाणात पेमेंट दिले गेले. माझ्याकडे मी रजिस्टर मेंटेन केले आहे. तारखेनुसार त्यांना पेमेंट दिले जात आहे. नगरसेवक येतात आणि ठेकेदारांना आधी पेमेंट दयायला सांगतात. माझी विनंती आहे त्यांनी मला असे करायला सांगु नये.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- नगरसेवकांना अतिआवश्यकता असते म्हणुन ते ठेकेदारांना पेमेंट देण्याची विनंती करतात. त्यांना तुम्ही दोन दोन वर्ष पेमेंट देत नाहीत ते कसे काम करणार?



मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- पुर्वी जेव्हा ठेकेदार उपोषणाला बसले होते तेव्हा त्यांना आयुक्तांनी प्रॉमिस केले होते की, त्यांना लवकरात लवकर पेमेंट दिले जाईल.

श्री. शेंडे (मुख्य लेखाअधिकारी):-त्यानुसार त्यांना पेमेंट देण्यात आले आहेत. ३५-३५ लाखाची बीले त्यांना दिली गेली आहेत.

इकडे सदस्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत होते ते समजत नव्हते.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- आयुक्त साहेब, टॅकर बंद केले आहेत आधीच प्रभागात पाणी येत नाही. पाण्याचा प्रश्न आहे.

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :- त्यांना पेमेंट देत नाही म्हणुन ते काम करायला तयार होत नाही.

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :- हे म्हणतात पेमेंट दिले आहे तर टॅकर्रस का बंद आहेत.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- आयुक्त साहेब दुषित पाणी व टॅकरविषयी आपण बोला.

श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):- त्यांना पैसे नाही दिले म्हणुन त्यांनी टॅकरर्स पुरविणे बंद केले आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-शेंडे साहेब म्हणतात सर्व पैसे दिले आहेत तर ते स्ट्राईकवर का आहेत?

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :- आयुक्त साहेब पाणी नाही आणि आपण हसत आहात.

श्री. सोनाळे (उप आयुक्त):-मला माहित नव्हते. मी आताच इथे बसलो आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- आधी ठेकेदारांना पेमेंट दयायला सांगा आणि टँकर चालु करा.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:- लवकर करा नाहीतर सत्ताधारी पक्ष अडचणीत येईल.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- आयुक्त साहेब, उल्हासनगर टँकर मुक्त करायचे ठरवले होते.

श्री. सोनाळे (उप आयुक्त):-तुम्हीच सांगता चिमुरडी मेली म्हणुन टँकर नको.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- नळ दया ना.

श्री. सोनाळे (उप आयुक्त):-धुत साहेब टँकरचा काय प्रॉब्लेम आहे?

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :- काय करायचे ठरवले आहे?

--११--

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-आयुक्त साहेब तुम्ही निर्देश दया की, ठेकेदारांना पेमेंट लवकर दिले जावे. माझ्या प्रभागात पाण्याची समस्या नसली तरी माझ्या आजुबाजुच्या प्रभागात पाण्याची भरपुर समस्या आहे.

मा.सदस्या श्रीमती. आशा राधवानी :- आयुक्त साहेब, तुम्ही बोला ना की, आम्ही पेमेंट देतो.

श्री. सोनाळे (उप आयुक्त):-मी इथे हो नाही करायला काय बाहुला होऊन बसलो नाही? मग मला इथे बसायची गरज नाही, एखादया बाहुल्याला बसवा तो तुम्ही सांगाल ते करेल.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- आम्ही शहरातील अडचणी सांगत आहोत आमच्या भावनांचा विचार करा.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- जर पाणी नाही आले तर मी येणा-या स्थायी समिती सभेत उपोषणाला बसेन.

मा.सचिव :- विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

__मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-__सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

__विषय :-__ ड्रेनेज पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे कामी सध्या कार्यरत असलेल्या ठेकेदार मेसर्स. ओम इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग सर्विसेस यांनी आयुक्तांच्या थेट कार्यादेशान्वये दि. १.११.२००० ते ३०.११.२०००पर्यंत केलेल्या कामी निविदाशिवाय थेट __संविदेस कार्योत्तर मंजुरी देणे बाबत.__

__प्रस्तावना :-__

ड्रेनेज पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्तीकरणे कामी मेसर्स. ओम इंडस्ट्रीअल इंजिनिअरींग सर्व्हिसेस, डोंबिवली यांना कार्यादेश क्र. यु.एम.सी./डब्लु.एस.एस. डी/मेक/१५६८, दिनांक १.६.९८ नुसार देण्यांत आले होते. याकामाचा बारा महिन्याचा कालावधी पुर्ण झाल्यावर कामाची आवश्यकता लक्षात घेता ठेकेदारास दि. ३०.११.९९ अखेर पर्यंतची मुदत वाढ स्थायी समिती ठराव क्र. ६७ दि.५.११.९९ नुसार मंजुर करण्यांत आली होती. पुढील ठेकेदार नियुक्त करण्यास अंदाजपत्रक तयार करून निविदा अंतिम करणे व प्रत्यक्ष कार्यादेश देणे यासाठी दि. ३१.१०.२००० पर्यंतचा कालावधी गृहित धरण्यांत आला होता व त्यानुसार दि. ३१.१०.२००० पर्यंतच्या प्रस्तावित मुदतवाढीस स्थायी समिती ठराव क्र. १४१, दि. २५.१०.२००० रोजी मंजुरी मिळाली या मंजुरी नंतर पुढील कार्यवाही पुर्ण करून न्युनतम ठेकेदारास दि. १.१२.२००० पासुन नविन निविदे नुसार काम करण्याबाबत कार्यादेश देण्यांत आलेला आहे.

दरम्यानच्या कालावधीत निविदेतील अटी नुसार ठेकेदाराने काम सुरू ठेवलेले असल्याने दि. १.११.२००० ते ३०.११.२००० या एक महिन्याच्या कालवधीची मुदतवाढ प्रस्तावित आहे. या कामाचा मंजुर दर रू. ४८,९०२/- मात्र प्रति महिना इतका आहे.



सदर प्रस्तावास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांची शिफारस असुन मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार मेसर्स ओम. इंडस्ट्रीअल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, डोंबिवली यांना दि. १.११.२००० ते ३०.११.२००० या कालावधीची मुदतवाढ व त्याकरिता येणारा खर्च रू. ४८,९०२/- मात्र यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळण्यासाठी सदर प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्यांत येत आहे.

त्यास मंजुरी मिळावी हि विनंती.

__स्थायी समिती ठराव क्र. २__ __दि:-१९.४.२००१.__

सुचकाचे नाव :- श्री. रमेश चव्हाण.

अनुमोदकाचे नाव :- श्री. जयकुमार केणी.

हि स्थायी समिती वरील कारणा आणि प्रस्तावनेनुसार आयुक्तांच्या थेट कार्यादेशान्वये सध्या कार्यरत असलेले ठेकेदार मेसर्स ओम. इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांनी दि. १.११.२००० ते ३०.११.२००० या कालावधीत पुर्वीच्या संविदेतील अटी व शर्तीवर ड्रेनेज पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्तीकामी केलेल्या संविदेस कार्योत्तर मान्यता व अंर्तभुत खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- आम्हाला कळु दया काय आहे ते? फक्त एका प्रभागासाठी मर्यादित आहे का? नगरसेवक निधी आहे का?

श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):- बुस्टरसाठी तरतुद आहे त्यामधुन घेतले आहे.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- एका प्रभागासाठी मर्यादीत आहे का?

श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-नाही. चार-पाच प्रभागासाठी.

काही सदस्य :- पास. पास.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--१३--

विषय :- प्रभाग क्र. ५८ करिता पंपिंग मशिनरी पुरविणे बसविणे व कार्यान्वित करणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

प्रभाग क्र. ५८ मधील बॅरेक क्र. ८५० पर्यंत पंपिंग व्दारे पाणीपुरवठा करण्याबाबत उपअभियंता (उत्तर क्षेत्र)यांनी मागणी केल्यानुसार १७ सेक्शन येथील डर्बी हॉटेल पासुन येणा-या जलवाहिनीवर पंपिंग मशिनरी बसविणे बाबतचा रू. १,३७,७८३/- मात्र अंदाजित खर्चाचा प्रस्ताव तयार करण्यांत आलेला आहे. सदर भाग उंचावर वसलेला असुन याठिकाणी पाणीपुरवठा करण्याकरिता दहा अश्वशक्ती क्षमतेचा पंप प्रस्तावित केला आहे.

प्र. क्र. ५८ मधील पाणी पुरवठा सुरळीत होण्याच्या दृष्टीने तयार केलेल्या सदर प्रस्तावास मुख्य लेखाअधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांची शिफारस असुन मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव प्रशासकीय व वित्तिय मंजुरी करिता स्थायी समिती समोर सादर करण्यांत येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३ दि:-१९.४.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. पदमा वलेचा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्र. क्र. ५८ मधील बॅरेक क्र. ८५० पर्यंत पंपींग व्दारे पाणीपुरवठा करणेकामी पंपिंग मशिनरी पुरविणे बसविणे व कार्यान्वित करणे कामी रू. १,३७,७८३/-च्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्त्यंत तातडीचे व आवश्यक असुन आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- कोणकोणते प्रभाग आहेत?

मा.सचिव :-गोषवा-यात दिले आहे.



मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- हे काम ५(२)(२)मध्ये करा अतिआवश्यक आहेत.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मा. आमदार निधितून सार्वजनिक बांधकाम अंतर्गत करावयाच्या १० कामी आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस

प्राधिकृत करणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. ४ दिनांक :- १९.४.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती आमदार स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत उपलब्ध निधीतुन सार्वजनिक बांधकामांतर्गत करावयाच्या पुढील अत्यंत तातडीचे व आवश्यक दहा कामी आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदा करणेस प्राधीकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | बॅरेक क्र. १०९२ प्र.क्र.१२ येथील कृष्णा पॅलेस येथे २५० मि.सी.सी. रस्ता बांधणे. | रू.१,८४,०००/- |
| २. | बॅरेक क्र. १०६४ प्र.क्र.१२ जवळ २५० मि.सी.सी. रस्ता बांधणे. | रू.१,८४,०००/- |
| ३. | बॅरेक क्र. ५८७ प्र.क्र.६ छबरिया यांचे घराजवळ ३५० मि.सी.सी. रस्ता बांधणे. | रू.१,८४,०००/- |
| ४. | बॅरेक क्र. ५८८ प्र.क्र.६ छबरिया यांचे घरापासुन ते प्रेमचंद जालीवाला येथे ३५०मि.सी.सी रस्ता बांधणे. | रू.१,८४,०००/- |
| ५. | बॅरेक क्र. २१०० ते २०९७ पर्यंत (प्र.क्र.१९) येथे २५० मि.सी.सी. रस्ता बांधणे. | रू.७८,०००/- |
| ६. | बॅरेक क्र. ६४८ते ६५२पर्यंत (प्र.क्र.२२)येथे २५० मि.सी.सी. रस्ता बांधणे. | रू.७४,०००/- |
| ७. | प्र.क्र.२३ वीर सावरकर नगर येथे २५० मि.सी.सी. रस्ता बांधणे. | रू.७४,०००/- |
| ८. | बॅरेक क्र. १६१८ प्र.क्र.२४ आणि डिसेंट टेलर येथे २५० मि.सी.सी. रस्ता बांधणे. | रू.७४,०००/- |



| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| ९. | प्र.क्र.३४ भिमनगर येथे २५० मि.सी.सी. रस्ता बांधणे. | रू.१,४९,०००/- |

१०. प्र.क्र.३४ हरिजनपाडा येथे
२५० मि.सी.सी. रस्ता बांधणे. रू.७४,०००/-

---

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :-</u> सोनावणे साहेब, नगरसेवकांचे पत्र आहे का?

<u>श्री. सोनावणे (नगररचनाकार)</u> :- महापौरांच्या प्रभागाचे काम आहे.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> अपंग अर्जदार श्री. बिरजु दानसिंग फुलसुंगे व श्री. सुनिल बसंतानी यांना सोबत जोडलेल्या गोषवा-यात नमुद केलेल्या महानगरपालिकेच्या जागेवर तात्पुरत्त्या स्वरुपात एस.टी.डी. बुथ बांधणे कामी <u>परवाना देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना:-</u>

श्री. बिरजु दानसिंग फुलसुंगे हया अपंग व्यक्तीने टेलिफोन बुथ चालण्यासाठी उल्हासनगर शहरातील झुणका भाकर केंद्राचे बाजुला आणि कॅम्ब्रीज शोरूमच्या बाजुला उल्हासनगर-२ मधील "४ x ४" ची जागा मागीतली आहे.

श्री. सुनिल डो. बसंतानी या अपंग व्यक्तीने टेलिफोन बुथ चालविण्यासाठी उल्हासनगर शहरातील बॅरेक नं. ४५५ कृष्णा मार्केटच्या समोर बाबा राधेश्याम दरबार उल्हासनगर-२ मधील "४ x ४" ची जागा मागीतली आहे.

अर्जदार श्री. बिरजु फुलसुंगे व श्री. सुनील बसंतानी या दोन्ही व्यक्तीस अपंग असल्यामुळे अत्यंत तात्पुरत्त्या स्वरूपात "४ x ४" ची लाकडी कॅबीन मध्ये टेलिफोन बुथसाठी खालील अटींवर परवानगी बाबत स्थायी समितीची संमती घेणे आवश्यक आहे.

१) महानगरपालिका सांगेल त्यावेळी लाकडी कॅबीन (बुथ)हटवून जागा खाली करावी लागेल.
२) सदर जागेचा वापर केवळ तात्पुरत्त्या स्वरूपात असून जागेबाबत मालकी हक्क पुर्णतः महानगरपालिकेचा असेल.
३) फक्त आपणच तेथे काम करावे. जागेचा वापर केवळ अर्जदार यांनाच करता येईल. भाडेकरू ठेवता येणार नाही.
४) एस.डी.ओ ऑफीसचा नाहरकत दाखला या कार्यालयात सादर करावा लागेल.
५) कोर्टातून कोणत्त्याही प्रकारचा स्टे आणता येणार नाही.
६) वरील बाबी अर्जदारास मान्य असल्याबाबत २०/-स्टॅम्प पेपर वर ॲफिडेव्हीड करावे लागेल.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ५ <u>दिनांक</u> :- १९.४.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. राम पारवानी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. पदमा वलेचा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अपंग अर्जदार श्री. बिरजु फुलसुंगे व श्री. सुनील बसंतानी यांस वर नमुद केलेल्या महापालिकेच्या जागेवर आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्ती वर तात्पुरत्त्या स्वरूपात एस.टी.डी. बुथ बांधणे व चालविणे कामी एक वर्षाच्या कालावधीसाठी परवाना देणेस मान्यता देत आहे.

तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधिन राहून सदरचा परवाना वेळोवेळी एका वर्षापेक्षा अधिक नसेल ऐवढया कालावधीसाठी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :- पुढे ढकला.

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :- १ ते ५ कॅम्पाचे सर्वांचे आणा.



मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- कुर्ला कॅम्पमध्ये रस्त्यावर खड्डे पडले आहेत. साडेतीन लाखाचे काम आहे. अजुन केले नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-माझे असे म्हणणे आहे की, साठ लाखाची तरतुद यासाठी आहे. रिक्षावाल्यांनी संप केल्यामुळे १ ते ५ कॅम्पामधील मेन मेन रस्त्यावरचे खड्डे भरण्याचा प्रस्ताव आहे. जसे पवई, नेताजी रोड असे मेनरोड घेतले आहे. अजुन ४० लाख आहेत.

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :-सर्वांचे एकत्र आणा.

मा.सदस्या श्रीमती. आशा राधवानी :-सगळयांचे एकत्र आणा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- ठिक आहे. डिफर करून साठ लाखाचे काम एकत्र आणा.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- लवकर करा पावसाळा सुरू होणार आहे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यात उयेत आहे.

विषय :- उल्हासनगर १ ते ५ मधील रस्त्यामधील खड्डे बी. एम.ए.सी.व्दारे भरणे कामी १० प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

सायंकाळी ५. १५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-२६.४.२००१.

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक २६.४.२००१ रोजी सायंकाळी ५.०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सदस्या श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

<u>मा. सभापती</u> :- श्रीमती. कालानी ज्योती.

| | |
|---|---|
| २.श्रीमती.कुंदनानी लविना | सदस्या |
| ३.श्री.पारवानी रामचंद | सदस्य |
| ४. श्री.चव्हाण रमेश | सदस्य |
| ५.श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| ६.श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ७.श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| ८.श्री.वनवारी किशोर | सदस्य |
| ९.श्रीमती. वेलकर सुरेखा | सदस्या |
| १० श्रीमती. सोनावणे यमुना | सदस्या |
| ११ श्रीमती. राधवानी आशा | सदस्या |
| १२ श्री.केणी जयकुमार | सदस्य |

तर

मा. श्री. कुमार आयलानी, श्री.बहरानी ठाकुरदास, श्री.तेजी कैलास,श्रीमती.पदमा वलेचा हे सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

सभेची सुरूवात ५.२० वाजता करण्यांत आली.

मा.श्री. जे. एम. ढाकरे प्रभारी आयुक्त हे आयुक्त स्थानी आसनस्थ झाले.

<u>मा.सचिव:-</u> विषय क्र.१ वाचुन दाखवितात.

<u>विषय :-</u> मागील सभेचे दिनांक ४.४.२००१ व १९.४.२००१चे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले</u> :-पान नं. ११ वर मी असे म्हणालो होतो की, जर दुषित पाण्याचे प्राकलन पुढच्या सभेत नाही आणले तर मी येणा-या स्थायी समिती सभेत उपोषणाला बसेन. आणि मी आता उपोषणाला बसलो आहे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी</u> :- १४ नं. पानावर ५(२)(२)अन्वये करण्यात आले. एवढी काय आवश्यकता आहे. यावर माझा विरोध आहे.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> हे इतिवृत आहे यात विरोध नाही केला जात.

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :-का नाही? इतिवृतास माझा विरोध आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः</u>- प्रमोद टाले उपोषणाला बसले आहेत.*

*<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले</u> :- मागच्या सभेत मी दुषित पाण्याविषयी बोललो आहे. कॉलरा वाढला तर त्याला जबाबदार कोण? मी कित्येकदा तक्रार दिली आहे. शहरात कॉलरा वाढला तर याला जबाबदार स्थायी समिती राहिल. मी आता उपोषणाला बसलो आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-जेवण करून उपोषणाला नाही बसले जात.*

*<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टालेः</u>-याची जबाबदारी आयुक्तांवर राहील.*

७००

*<u>मा.सचिवः-</u>प्राकलने तयार आहेत.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :-सदस्य उपोषणाला बसले आहेत. धुत साहेब, काय झाले?*

*<u>श्री. धुत (कार्यकारी अभियंता):-</u>प्राकलने तयार आहेत. माझ्याकडे कर्मचारी वर्ग अपुरा आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :-८ दिवस झाले . आपणास वेळ नाही मिळाला.*

*<u>श्री. धुत (कार्यकारी अभियंता):-</u>माझ्याकडे फक्त एकच जण आहे. श्री.मंड्रा आहेत ते किती काम करणार? तीन चार जणांचे दुषित पाण्याचे काम आहे ते एकटेच करतात.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :-तुम्हाला अजुन २ कर्मचारी हवे. तसे तुम्ही आयुक्तांना सांगा. सदस्यांना उत्तर द्या. ते उपोषणाला बसलेत.*

*<u>श्री. धुत (कार्यकारी अभियंता):-</u>त्यांचे २ ,७७ ,३००/-चे प्राकलन तयार आहे. अजुन ३ ,४ प्राकलन तयार करून स्थायी समिती समोर आणतो.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u>:-टालेजी, ते आणायला नाही म्हणाले नाही. पुढच्या सभेत आणणार आहेत.*

*<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टालेः-</u>या सभेत आयत्त्यावेळी घ्या. ८ दिवस झाले मी स्वतः जाऊन दुपारी त्यांच्याकडुन प्राकलन तयार करून घेतले आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा</u> :-त्यांना एक आठवडा द्या. ते पुढच्या सभेत आणतील.*

*<u>श्री. धुत (कार्यकारी अभियंता):-</u>मी तुमच्या समोर तयार केले.*

*<u>मा. श्री. जे.एम.ढाकरे(प्रभारी आयुक्त)</u> :-चिजवानी, दुषित पाण्याचा जेथे जेथे प्रश्न आहे ते येणा-या स्थायी समितीत ठेवा.*

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-यावेळेला हा विषय घ्या. आयत्त्यावेळी मध्ये आणा नाही तर मी उपोषणाला बसलो आहे. लोक मेल्यानंतर पाणी देणार का?

मा.श्री. जे.एम. ढाकरे (प्रभारी आयुक्त):-चव्हाण साहेब, उपोषण सोडायला सांगा. पाणी घ्या.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-माझ्याकडे येतील मोर्चा घेऊन.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-आमच्या प्रभागातील बरेच लोक आजारी पडले, दुषित पाण्यामुळे. पुढच्या सभेत नाही आणले तर मी पुन्हा उपोषणाला बसेन.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-आता ते उपोषण सोडत आहेत. त्यांना ढाकरे साहेब आश्वासन द्या.

मा.श्री. जे.एम. ढाकरे (प्रभारी आयुक्त):-दिले ना.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-सदर इतिवृत्त वरील सुधारणेसह सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

मा.सचिव :- विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-धुत साहेब, सांगा.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :-कुणाच्या सांगण्यावरून आणले आहे.

श्री. धुत (कार्यकारी अभियंता):-मागच्या वर्षी टॅकर स्वत:चे घेण्यासाठी तरतुद होती. तरी आणले नाही. आता मागच्या प्रस्तावासारखा आता पण प्रस्ताव मांडत आहे.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:-बजेटमध्ये तरतुद आहे का?

श्री. धुत (कार्यकारी अभियंता):-नाही आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-आधी किती तरतुद होती? आताचे प्रपोझल कितीचे आहे?

श्री. धुत (कार्यकारी अभियंता):-५० लाखाचे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-तरतुद किती लाखाची आहे. कितीला टेंडर मिळेल?

श्री. धुत (कार्यकारी अभियंता):-मागील वर्षी ६० लाख होते.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-आता तरतुद नाही तर कुठून आणणार?

<u>श्री. धुत (कार्यकारी अभियंता):-</u>रि एप्रोप्रियेशन करा. टॅकरला पण तेवढाच खर्च करतो.



<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-यांचे म्हणणे आहे. रिएप्रोप्रियेट करा. तुम्ही मार्च मध्ये तरी आणायला पाहिजे होते ना आता कसे आणले?

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानीः-</u>आम्ही जर पास केले तर तुम्ही कसे घेणार?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-जर नविन टॅकर विकत घेतले तर ड्रायव्हर क्लीनर गॅरेजचा खर्च वाढेल. तरतुद नाहीतर कसे आणता?

<u>श्री. धुत (कार्यकारी अभियंता):-</u>लहान लहान नगरपालिकेत स्वतःचे टॅकर आहे. बी.एम. सी. ना स्वतःचा टॅकर आहे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानीः-</u>आयुक्तांना विचारा.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-तरतुद १ रू. ची नाही. ५० लाखाचा टॅकर कसे मागविणार. रिएप्रोप्रियेशन मध्ये ॲडजेस्ट करा असे यांचे म्हणणे आहे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः-</u>तुम्ही जाणुन बुजून तर नाही आणले की, स्थायी समिती नाही म्हणाली, नगरसेवक नाही म्हणाले.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> जर तुम्ही हे तरतुद नसताना पास केले तर, बी.एम. ए.सी चे पण करा. ते काम दिड करोडचे आहे. त्यासाठी तरतुद फक्त ६० लाखाची आहे. ते पण रिएप्रोप्रियेशन मध्ये करा.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :-धुत साहेबांना शाबासकी दया. चांगली गोष्ट आहे. तुमच्यामुळे बी.एम.ए.सीची पण तरतुद वाढली जाईल.

<u>मा.श्री. जे.एम. ढाकरे (प्रभारी आयुक्त):</u>-'क' वर्गाच्या नगरपालिकेत देखिल स्वतःचा टॅकर आहे. टॅकरची गरज लागते. कुठेतरी काहीतरी ॲडजेस्ट करावे लागेल. मागच्या वर्षाचा प्रस्ताव आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती. लविना कुंदनानीः-</u>काय म्हणालात?

<u>मा.श्री. जे.एम. ढाकरे (प्रभारी आयुक्त):</u>-मागच्यावर्षी श्री. आर.डी. शिंदे साहेबांनी प्रस्ताव आणला होता. कुठेही विनापैसे पाणी देत नाही.

<u>मा.सदस्या श्रीमती. लविना कुंदनानी</u> :-बिल तर घेता ना?

<u>मा.श्री. जे.एम. ढाकरे (प्रभारी आयुक्त):</u>-अंबरनाथ मधुन जेव्हा टॅकर मागविले होते तेव्हा चिजवानींनी स्वतःच्या खिशातुन ४०० रू. देऊन टॅकर मागविला होता. हा प्रस्ताव आणला आहे. याचा विचार केला तर चांगले होईल.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-उल्हासनगर मध्ये जिथे पाणी येत नाही त्यांच्याकडुन देखिल बिल वुसल करतात.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:-ज्यांच्याकडे पाणी जाते त्यांच्याकडुन बिल घेत नाही.



मा.श्री. जे.एम. ढाकरे (प्रभारी आयुक्त):-तरतुद नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-मग आणले कशाला?

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:-आम्ही पास करतो. आयुक्तांकडुन तुम्ही मंजुर करून आणा.

श्री. धुत (कार्यकारी अभियंता):-मी चांगल्या हेतुने आणले.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:-चिजवानींची भावना चांगली होती. १.१० करोडचे काम आणले आहे.

मा.सदस्या श्रीमती. आशा राधवानी :-टॅकरचे आणले आहे पण हे नाही पाहिले की, तरतुद आहे की नाही?

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदर प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

विषय :- पाण्याचे टॅकर्स खरेदी करणे करिता अंदाजित रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

मा.सचिव:- विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-मी हे विचारू इच्छितो, मागच्या वेळेस रामचंद्र पारवानी म्हणाले की सर्वांचे आणा तेव्हा करू. तरी आता दहा प्राकलनेच आणली आहेत. मागच्या वेळेस हा विषय म्हणुन डिफर केला.

श्री.भिवापुरकर(कार्यकारी अभियंता सा.बां.वि.):-कार्यसुचीवर जो विषय आणला आहे, हा मला महित नाही तो पुन्हा कसा आला आहे. हे खड्डे भरणे कामी हा जो प्रस्ताव आहे, तो २२ लाखाचा आहे. तो मुख्य रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठीचा आहे. सन २००१-२००२ मध्ये खड्डे भरण्याचे कामी ६० लाखाची जी तरतुद करणेत आली आहे, त्यापैकी २२ लाखाचे काम तुमच्या समोर आहे. आयुक्तांच्या आदेशावरून हिराघाट ते ओटी पर्यंत ३ लाखाचे काम सुरू करण्यात आले आहे. तसेच ७ लाखाची जी तरतुद आणीबाणीच्या परिस्थितीसाठी ठेवण्यांत येत आहे. आणि १० लाखाची तरतुद येणा-या गणपती उत्त्सव आधी खड्डे भरणे कामी ठेवण्यात येत आहे. आता ६० लाख पैकी केवळ २० लाख शिल्लक रहतील. आता आपण सांगा की, या २० लाखातुन कोणकोणत्त्या रस्त्यातील खड्डे भरणे कामी प्राधान्य दयायचे, जर प्रत्त्येक नगरसेवकांची मागणी प्रमाणे आपण छोटे-मोठे रस्त्यातील खड्डे भरणे कामी ,

प्राकलन तयार करतील तर १.२० कोटीचा खर्च येणार आहे. आणि आपणाकडे निधी आणि तरतुद दोन्ही उपलब्ध नाही.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानीः-मग तुम्ही आणले कसे?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-तुम्ही कधी गणपती येतात म्हणुन रोडवर ५ लाख खर्च दाखवतात तर कधी पावसाळयापुर्वी ३ लाखाचे काम सुरू करतात. जोपर्यंत तुम्ही रोडची यादी नाही आणत तोपर्यंत डिफर होत राहणार. तुम्ही ऐवढेच काम आणले सर्व रस्त्त्यावर खड्डे पडले आहेत. सर्व सदस्यांच्या प्रभागातील काम झाले पाहिजे. जिथे २ लाखाचे काम आहे तिथे १ लाखाचे करा.



३ लाखाचे असतील तर २ लाख करा. अशी तडजोड करून खड्डे भरा सर्वांचे आणा. नाहीतर डिफर करू. यास प्रशासन जबाबदार राहिल स्थायी समिती नाही.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-तुम्ही सर्व रस्त्त्यांचे का नाही आणले? हे रोड तुम्ही कुणाला टाकायला सांगितले? तुम्ही ऐवढेच रोड का घेतले?

मा सदस्य श्री. रमेश चव्हाणः-मागे जेव्हा रिक्षा चालकांनी संप केला होता तेव्हा त्यांनी सांगितले होते की, आम्ही खड्डे भरू. १०-१५ लाखात रोड बनणार आहे का?

श्री. चिजवानी(शहर अभियंता):-जितक्या मुख्य रस्त्त्यांवर खड्डे आहेत. सहा मेन रोडचे काम आधी करणार आहोत. नतंर छोटे खड्डे भरणार.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-रस्ते पण निवडणार का? कोणते आधी, कोणते नंतर. हे पण पाहणार का कोणता खड्डा मोठा आहे, कोणता छोटा त्याचे माप होणार का?

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः-एवढया पैशांमध्ये पुर्ण शहराचे खड्डे भराल का?

श्री. चिजवानी(शहर अभियंता):-जेवढे शक्य होईल तेवढे आम्ही करू.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-पुढच्या सभेत कसे आणाल? रिक्षावाल्यांना तुम्ही कबुल केले आहे. हे रिप्रोप्रियेशन मध्ये आणणार आहे. २२ लाखांमध्ये रस्त्त्यांचे खड्डे भरणार का?

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः-२२ लाखात होणार का?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-कुठेतरी तीन-चार लाखाचे काम कमी करावे लागेल.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः-म्हणजे काय कामाची क्वालिटी चांगली नसणार? तर रस्ते खराब होतील.

श्री. चिजवानी(शहर अभियंता):-कुठे बी.एम ने करू तर कुठे ए.सी. ने नाही करणार.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः-पावसाळयात रस्ते खराब होतील.

*<u>श्री. चिजवानी(शहर अभियंता):-</u>*तरतुद नाही तर काय करणार?

*<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>*आम्ही लिमिटेड साठी करणार.

*<u>श्री. चिजवानी(शहर अभियंता):-</u>*कमिटी बनवा आम्हाला मार्गदर्शन करा.

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u>*:-तुम्ही असे अर्धवट का आणता. आम्ही म्हणणार का यु. पी.पीचे नका करू. आर.पी.आयचे नका करू. शिवसेनेचेच करा. आम्ही सदस्यांनी भांडत बसायचे का आपसात.

--७--

*<u>श्री. चिजवानी(शहर अभियंता):-</u>*कमिटी (समिती) बनवा.

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u>*:- ती आपली जबाबदारी आहे.

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>*आधीच तुम्ही हिराघाट पवई पर्यंतचे काम केले. ते स्थायी समितीत पास न करता असेच काम सुरू केले.

*<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण</u>*:-५ तारखे पर्यंत तुम्ही नाही केले तर रिक्षावाले मोर्चा आणतील याला स्थायी समिती नाही प्रशासन जबाबदार राहील.

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>*आधी तुम्ही चर्चा करा, कितीचे काम आहे? किती करायचे आहे?

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>*आता आपण सर्व मिळुन आणा. काही पण करा.

*<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>*हे वगळा.

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u>*:-सर्व कितीत आणणार?

*<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>*सर्वांचेच रोड खराब आहेत.

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u>*:-आता त्यांनी ज्यांची अत्यावश्यकता आहे ते आता आणले आहे.

*<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>*अत्यावश्यकतेत नाही आणले.

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u>*:-कमी करून आणा.

*<u>मा.सदस्य श्री. जयकुमार केणी:-</u>*विशेष सभा बोलवा.

*<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:- </u>*विशेष सभा बोलवा आणि मंजुर करा. नाहीतर आम्ही जबाबदार राहणार नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-दोन दिवसात काम सुरू होईल. सोमवारी सभा ठेऊ.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-सदर प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर १ ते ५ मधील रस्त्यामधील खड्डे बी.एम.ए.सी. व्दारे भरणे कामी ---- प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

मा.श्री. जे.एम. ढाकरे (प्रभारी आयुक्त):-एक आयत्त्यावेळचा विषय आहे. आपण दरवर्षी पावसाळयात २० कामगार ठेवतो. नाला सफाई साठी.



मा.सदस्य श्री. जयकुमार केणीः- किती तारखेपासुन ठेवणार?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-५ मे ते १५ जुलै पर्यंत आहे ना?

मा.श्री. जे.एम. ढाकरे (प्रभारी आयुक्त):-साठ दिवसासाठी आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-नाही तुम्ही ७० दिवस करा, नंतर तुम्ही १५ दिवस वाढवता साफ-सफाई व्हावी म्हणुन?

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः-नगरसेवक पण ठेऊ शकतील. पाच मजुर नेहमीच असेच करता ना?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- असे नेहमीच करता. पाच लेबर युनियनचे असतात प्रशासनातर्फे पाच नगरसेवक आपल्या मर्जीने ठेवतात. ५ मे ते १५ जुलै करा नंतर नाहीतर परत आणणार त्यापेक्षा आधीच तुम्ही तसा ठराव करा.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

आयत्त्यावेळचा विषय

विषय :- सन २००१-२००२ पावसाळयापूर्वी शहरातील लहान मोठे नाले सफाई कामाकरीता ७० दिवसासाठी कामगारांची नेमणुक करणे बाबत.

प्रस्तावना :-

पावसाळयात, अतिवृष्टीमुळे, पुराचे पाणी, शहरातील खोलगट भागात साचू नये, महापुरामुळे शहरातील नागरीकांची वित्तहानी व प्राणहानी होऊ नये , तसेच पावसाळयात शहरात रोगराई होऊ नये म्हणुन महापालिकेला दरवर्षी पावसाळयापूर्वी शहरातील लहान मोठे नाले सफाईचे कामे सफाई कामगाराकडुन चांगल्या प्रकारे करुन घेणे अशक्य असल्यामुळे महापालिका जादा कामगार नेमणुक करुन अथवा मजुर कामगार सहकारी संस्था यांना कामाचे वाटप करुन नाला सफाईचे कामे करुन घ्यावी लागतात. मागील दोन सालात कामगारांची नेमणुक करुन नाला सफाई कामे चांगल्या प्रकारे करुन घेण्यात आली आहे.

तरी वरील परिस्थिती पहाता चालू सालात सन २००१-२००२ मध्ये शहरातील लहान-मोठे नाले सफाई कामे करुन घेण्यास प्रभागनिहाय १० पुरुष कामगार, ७० दिवस तसेच अशोक सम्राट नगर ते शांतीनगर या मोठया नाल्यासाठी १० पुरुष कामगार ७० दिवसाकरीता तात्पुरते स्वरुपी रोजंदारीवर १००/- दराने (९०/- मजूरी व १०/- सफाई कामासाठी लागणारे साहित्य, फावडे, घमेले, टीकम, कुदळ इत्त्यादी कामगारांनी स्वतःची अथवा भाडयांची उपलब्ध करुन घेण्यासाठी) नेमणुक करण्याच्या कामी होणा-या संभाव्य खर्चास स्थायी समितीची वित्तीय व प्रशासकीय मंजूरीस प्रस्तावित आहे.

--९--

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६</u>                    <u>दि:-२६. ४.२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. प्रमोद टाले.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील लहान-मोठे नाले सफाई कामी प्रभागनिहाय १० पुरुष कामगार तसेच सम्राट अशोक नगर ते शांतीनगर या मोठया नाल्यासाठी १० पुरुष कामगार ७० दिवसाच्या कालावधी साठी तात्पुरते स्वरुपी रोजंदारीवर रुपये १००/- दराने (९०/- मजूरी व रुपये १०/- सफाई कामासाठी लागणारे साहित्य फावडे, घमेले, टिकाव व कुदळ इत्त्यादी कामगारांची स्वतःची अथवा भाडयानी उपलब्ध करुन घेण्यासाठी) नेमणुक करण्यास मंजूरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ६. ०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-४ ५.२००१.

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक ४ ५. २००१ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सदस्य श्री. किशोर वनवारी हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. तसेच खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

| | |
|---|---|
| १. श्रीमती.कुंदनानी लविना | सदस्या |
| २. श्री. आयलानी कुमार | सदस्य |
| ३. श्री. टाले प्रमोद | सदस्य |
| ४. श्री.चव्हाण रमेश | सदस्य |
| ५. श्री.पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ६. श्री. तलरेजा विनोद | सदस्य |
| ७. श्री.ब्रहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ८. श्री. तेजी कैलास | सदस्य |
| ९. श्रीमती वलेचा पदमा | सदस्य |
| १०. श्रीमती. वेलकर सुरेखा | सदस्य |
| ११. श्रीमती. सोनावणे यमुना | सदस्या |
| १२. श्रीमती राधवानी आशा | सदस्या |
| १३. श्री. केणी जयकुमार | सदस्य |

तर

श्रीमती. ज्योती कालानी, श्रीमती.राजानी भारती हया सन्माननिय सदस्या सभेस अनुपस्थितीत होत्या.

<u>श्री. जे. एम. ढाकरे (उपायुक्त मुख्यालय) :-</u> हे आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ होते.

<u>मा.सचिवः-</u> कृपया लक्ष दया. आजच्या या सभेत मा.सभापती महोदया उपस्थित नाहीत. त्यांच्या अनुपस्थितीत सभेचे कामकाज चालविण्यासाठी आपणामधील एका सदस्याची

पिठासिन अधिकारी म्हणुन निवड करणे आवश्यक असल्याने त्यासाठी आपणामधील कुणा एका सदस्याचे नाव सुचविले जावे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः-</u> श्री. किशोर वनवारी यांची पिठासिन अधिकारी म्हणुन निवड करावी.

श्री. किशोर वनवारी यांची सर्वानुमते पिठासिन अधिकारी म्हणुन निवड झाल्यानंतर ते पिठासिन अधिका-यांच्या आसनावर आसनस्थ झाले.

<u>मा.सचिव</u> :-विषय क्र. १ वाचून दाखवितात.

मागील सभेचे दिनांक २६.४.२००१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

--२--

<u>मा.सचिव</u> :-मागच्या सभेत मा. प्रभारी आयुक्ताकडुन नाला सफाई कामगार नेमणे बाबत, एक आयत्त्यावेळचा विषय आणला होता. आता असे निदर्शनास आले आहे की, मा. आयुक्त श्री. बक्शी साहेबांनी त्या विषयी गोषवा-यावर ''चर्चा करा'' असा शेरा लावला होता. ज्याअर्थी शेरा लावला, त्याअर्थी ठराव पारीत करता कामा नये, हे आता आपल्यावर अवलंबून आहे. मागील सभेचे इतिवृत्त त्या आयत्त्यावेळच्या विषयासंबंधी ठरावासह कायम करायचे किंवा कसे?

<u>मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारीः-</u> दि.२६.४.२००१ रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वांनुमते कायम करण्यांत येत आहे.

<u>मा.सचिव</u> :-विषय क्र. २ वाचून दाखवितात.

<u>मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारीः-</u> सदरचा प्रस्ताव पुढील प्रमाणे सर्वांनुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> प्रभाग क्र. १८ मध्ये पाच विविध ठिकाणांच्या विंधन विहीरीवर जेट पंप बसविणे कामीचे प्राकलनास <u>प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

उपरोक्त विषयातील कामासाठी संबधीत प्रभागाचे नगरसेवक श्री. सेवल ठाकुर यांचा अर्ज या कार्यालयात आला. तेव्हा या कार्यालयाने संबंधीत विविध ठिकाणच्या विंधन विहिरींना भेट दिली व या विहिरींना जेटपंप बसविण्या इतपत पुरेसे पाणी उपलब्ध आहे. सबब या कार्यालयाने या कामाचे रू.२,९२,८४५/- या रक्कमेचे अंदाजित प्राकलन तयार केलेले असुन त्याला आणि सदर कामास मुख्य लेखा परिक्षक आणि मुख्य लेखा अधिकारी यांनी मान्यता दिली असुन मा. आयुक्त यांनी सदर बाब प्रशासकीय आणि वित्तिय मान्यतेस स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यास सांगितलेले आहे. म्हणुन सदर प्रकरण या सभेत मंजुरी मिळण्यासाठी सविनय सदर करीत आहोत.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ७</u> <u>दिः-४.५.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. ठाकुर बेहरानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्रमांक १८ मध्ये ५ विविध ठिकाणांच्या विंधन विहिरीवर जेटपंप बसविणे कामीचे प्राकलनस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत नाही.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

पिठासिन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

--३--

<u>मा.सचिव</u> :- विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

<u>मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारी:-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> प्रभाग क्र. ४७ करिता पंपिंग मशिनरी पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता <u>देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर शहराच्या कॅम्प ५ विभागात येणा-या वॉर्ड क्र. ४७ मध्ये अपुरा पाणी पुरवठा होत असल्याची तक्रार संबंधित वॉर्डच्या नगरसेविका यांनी केली होती. या भागातील पाणी पुरवठा सुरक्षित होण्याच्या दृष्टीने प्रभागात येणा-या जलवाहिनीवर बुस्टर बसविण्याचे मा. आयुक्तांनी मान्य केलेले आहे. त्यानुसार सदर कामाचे प्राकलन तयार करण्यांत आलेले असुन त्यासाठी पंप हाऊस बांधकाम खर्च रू. ८८,०००/-, पंपिंग मशिनरी खर्च रू. ४८,६८५/- व विद्युत जोडणी खर्च रू. १०,०००/- मात्र असा एकुण अंदाजित खर्च रक्कम रू. १,४६,६८५/- मात्र इतका आहे. यापैकी बांधकामाचे काम मजुर सहकारी संस्थेकडुन व पंपिंग मशिनरीचे काम विद्युत परवानाधारक ठेकेदारांकडुन दरपत्रके मागवुन, करून घेण्याचे प्रस्तावित आहे.

सदर प्रस्तावास मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा अधिकारी व शहर अभियंता यांची शिफारस असुन मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळण्यासाठी तसेच बांधकामाचे काम मजुर सहकारी संस्थेकडुन व पंपिंग मशिनरीचे काम विद्युत ठेकेदारांकडुन दरपत्रके मागवून करून घेण्यास मान्यता मिळण्यासाठी स्थायी समिती समोर सदर प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे. त्यास मंजुरी मिळण्याची विनंती आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ८</u> <u>दि:-४.५.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. राम पारवानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्रमांक ४७ करिता पंपिंग मशिनरी पुरविणे,बसविणे व कार्यान्वित करणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असुन आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी आणि पंपिंग मशिनरीचे ठेकेदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

पिठासिन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

--४--

मा.सचिव :- विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारी:- सदरचा प्रस्ताव सर्वांनुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर-५ प्रभाग क्र. २१ मध्ये गार्डन चौक ते ओम नगर पर्यंत जलवाहिनी टाकणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त विषयांकित ठिकाणी जलवाहिनी टाकण्याचे प्राकलन रक्कम रू. १,९७,०००/- करिता जिल्हा दरसुचीच्या अधिन राहुन तयार करण्यात आले आहे. सदर प्राकलनाचा खर्च सर्वसाधारण लेखा शिर्षकातुन करण्यात येणार आहे.

त्याप्रमाणे लेखा व लेखा परिक्षण विभागाने यास मान्यता दिली आहे, तसेच मा. आयुक्त यांनी स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यता दिली आहे.

तरी सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी करिता, तसेच काम मजुर कामगार सहकारी संस्था यांचे तर्फे करून घेण्यास मजूरीस्तव स्थायी समितीपुढे सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. ९** **दि:-४.५.२००१.**

सुचकाचे नाव :-श्री. राम पारवानी.
अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर -५ मधील प्रभाग क्र. २१ मध्ये गार्डन चौक ते ओम नगर पर्यंत १०० मी.मी. व्यासाची व ८० मी. मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्त्यंत तातडीचे व आवश्यक असुन आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

पिठासिन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :- विषय क्र. ५ वाचून दाखवितात.

श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):-पावसाळयापूर्वी रस्त्त्यातील खड्डे भरणे अत्त्यंत तातडीचे आणि आवश्यक आहे.

मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर १ ते ५ मधील रस्त्त्यामधील खड्डे बी.एम.ए.सी. व्दारे भरणे कामी ५४ प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

--५--

प्रस्तावना :-

उल्हासनगर शहरातील कॅम्प नं. १ ते कॅम्प नं. ५ मधील रस्त्त्यांमध्ये पडलेले खड्डे डांबरीकरणाने आगामी सुरू होणा-या पावसाळयापुर्वी भरणे करिता रस्त्त्यात पडलेले खड्डे बी.एम. व ए. सी व्दारे पावसाळयापुर्वी भरणे आवश्यक आहे. सदर काम लवकरात लवकर पावसाळयापुर्वी करणेसाठी मा. महापौर साहेब यांनी दि. ४.४.२००१ च्या पत्रानुसार सुचविलेले आहे. मा.महापौर साहेब यांचे कार्यालयाचे पत्रानुसार शहरातील ३३ रस्त्त्याच्या विकासा व्यतिरिक्त रस्त्त्यांमध्ये पडलेले खड्डे आगामी पावसाळया अगोदर बी.एम व ए.सी व्दारे भरणे व दुरूस्ती करणे आवश्यक आहे. तत्त्पुर्वी मा. आयुक्त यांचेकडुन सादर मंजुर करतांना यानंतरही आणखी कामांचे प्राकलने तयार करण्याचे काम सुरू आहे. असे नमुद केले होते. त्यानुसार शिल्लक असलेले कामाचे प्राकलन तयार करण्यांत आलेली आहे. उल्हासनगर कॅम्प नं. १ ते कॅम्प नं. ५ मधील रस्त्त्यांचे खड्डे पावसाळयापुर्वी बी.एम.ए.सी ने भरण्यासाठी एकुण रू. १,१३,००,०००/-एवढया रक्कमेचे एकूण ६४ प्राकलने तयार करण्यात आलेली होती.

महानगरपालिकेची आर्थिक तरतुद सन् २००१-२००२ मध्ये एकुण रू. ६०,००,०००/-तरतुद उपलब्ध आहे. महानगरपालिकेची अर्थसंकल्पात तरतुद कमी प्रमाणात मंजुर असल्याने आर्थिक तरतुदीनुसार खड्डे भरण्याचे प्राकलनीय किंमत कमी करून मर्यादित ठेवणेसाठी स्थायी समिती बैठकित सर्व संमतीने निर्णय घेण्यात आलेला आहे.

त्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागातील संबंधित कार्यक्षेत्रातील उप-अभियंता / कनिष्ठ अभियंता यांनी उपरोक्त रस्त्त्याची पूर्नपहाणी केली असुन त्याप्रमाणे फक्त बी.एम.ने खड्डे भरण्यासाठी प्राकलन तयार केलेले असुन

पावसाळयापुर्वी खड्डे भरले नाही तर पावसाळयात ते वाढुन वाहतुक व्यवस्था कोलमडेल याकरिता या प्राकनांची किंमत रू. ३८ ,२४ ,०७०/- इतकी होत आहे. सदर रस्त्यावर वाहतुक करण्यास अतिशय त्रास होत आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक तरतुदीनुसार व आवश्यकतेनुसार स्थायी समितीत सुचना झाल्याप्रमाणे कमीत कमी खर्चात काम करण्यासाठी प्राकलन तयार करण्यांत आलेले आहे. तरी सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे ५४ कामांच्या प्राकलनीय किंमत रू. ३८ ,२४ ,०७०/- किंमतीस प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणे साठी स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यासाठी प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. १०** **दिः-४. ५. २००१.**

सुचकाचे नाव :- श्री. रमेश चव्हाण.

अनुमोदकाचे नाव :- श्री. लविना कुंदनानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सोबत जोडलेल्या यादीत नमुद केलेल्या उल्हासनगर शहरातील कॅम्प नं . १ ते कॅम्प नं. ५ मधील रस्त्यामध्ये पडलेले खड्डे डांबरीकरणाने पावसाळयापुर्वी भरणे कामी ५४ प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असुन आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**एकमताने मंजुर**

पिठासिन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

--१०--

**मा.सचिव** :- विषय क्र. ६ वाचून दाखवितात.

**मा.पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारीः-** सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

**विषय :-** उल्हासनगर १ ते ५ मधील रस्त्यामधील खड्डे बी.एम.ए.सी. व्दारे भरणे कामी १० प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

**प्रस्तावना :-**

उपरोक्त विषयांकित पत्रान्वये मा. महापौर साहेब, यांचे कार्यालयाचे पत्रानुसार शहरातील ३३ रस्त्याच्या विकासा व्यतिरिक्त रस्त्यांमध्ये पडलेले खड्डे आगामी पावसाळया अगोदर बी.एम.ए.सी. ने भरणे व दुरूस्ती करणे आवश्यक आहे व ऑटो रिक्षा चालक मालक युनियन उल्हासनगर-४, दि.३०.३.२००१च्या अनुषंगाने दि. १५ एप्रिल २००१ पर्यंत रस्त्याची दुरूस्ती युध्द पातळीवर न झाल्यास दि. १६ एप्रिल २००१ पासुन रिक्षा बंद व इतर आंदोलनाचे मार्ग पत्तकरण्याचा इशारा दिलेला आहे व उपरोक्त पत्रात नमुद केलेल्या रस्त्याची दुरूस्ती तातडीने न केल्यास आंदोलनामुळे होणा-या दुर्घटनांस उल्हासनगर महानगरपालिका जबाबदार राहणार आहे. दुरूस्ती करावयाचे रस्ते खालील प्रमाणे आहेत.

१. हिराघाट ते ओटी चौक उल्हासनगर ४.
२. विनस चौक ते मठमंदिर कॅम्प नं. ५ (गांधी रोड मार्गे)
३. भाठीया चौक ते दुधनाका कॅम्प नं. ५
४. दहाचाळ ते गुरूनानक स्कुल कॅम्प नं. ४

त्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागातील संबंधित कार्यक्षेत्रातील उप अभियंता / कनिष्ठ अभियंता यांनी उपरोक्त ४ रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. व सदर रस्त्यावर अतिजास्त वाहतुक वर्दळीमुळे मोठे खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे सदर रस्त्यावर वाहतुक करण्यास अतिशय त्रास होत आहे. त्यामुळे सदर रस्त्याची दुरूस्ती व खड्डे भरण्यासाठी खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

१ ओ. उल्हासनगर-३ येथे पवई ब्रीज ते हिराघाट पर्यंतच्या रस्त्यात पडलेले खड्डे बी.एम.ए.सी. ने भरणे. ३,१७,७४०/-

बी. उल्हासनगर-४ येथे वाको जेक्शन ते पवई ब्रीज पर्यंत रस्त्यात पडलेले खड्डे बी.एम.ए.सी. ने भरणे. २,५४,६००/-

सी. उल्हासनगर-४ येथे ओटी सेक्शन ते पेट्रोलपंप पर्यंतच्या रस्त्यात पडलेले खड्डे बी.एम.ए.सी. ने भरणे. १,९९,८५०/-

२.ओ. उल्हासनगर-४ येथे विनस चौक ते नेताजी चौक पर्यंतच्या रस्त्यात पडलेले खड्डे बी.एम.ए.सी. ने भरणे. १,९९,७००/-

बी. उल्हासनगर-५ येथे देना बॅंक ते निजधाम आश्रम गांधीरोड मार्गे रस्त्यात पडलेले खड्डे बी.एम.ए.सी. ने भरणे. १,९९,८५०/-

सी. उल्हासनगर-५ येथे अब्बु हॉटेलमागेपासुन ते देवीदास यांच्या पिठाच्या गिरणीजवळ पर्यंतच्या रस्त्यात पडलेले खड्डे बी.एम.ए.सी. ने भरणे.
१,९९,६००/-



डी. उल्हासनगर-५ येथे तहसिलदार ऑफिस ते मठमंदीर पर्यंतच्या रस्त्यात पडलेले खड्डे बी.एम.ए.सी. ने भरणे. १,९९,९५०/-

३. उल्हासनगर-५ येथे भाटीया चौक ते दुधनाका पर्यंतच्या रस्त्यात पडलेले खड्डे बी.एम.ए.सी. ने भरणे. १,९९,२००/-

४ ओ. उल्हासनगर-४ येथे भिम चौक ते आंबेडकर चौक पर्यंतच्या रस्त्यात पडलेले खड्डे बी.एम.ए.सी. ने भरणे. १,९९,६००/-

बी. उल्हासनगर-४ येथे दसचाळ ते गुरूनानिक स्कुल पर्यंतच्या रस्त्यात पडलेले खड्डे बी.एम.ए.सी. ने भरणे. १,९९,६००/-

उपरोक्त काम तातडीने सुरू करण्याच्या दृष्टीने उपरोक्त चार रस्त्यांचे दहा अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असुन त्या प्राकलनांची अंदाजित किंमत रू.

२१ ,६९ ,६९०/- इतकी होत आहे. या नंतरही आणखी कामांचे प्राकलने तयार करण्याचे काम चालु आहे. सदर काम महानगरपालिका अंदाजपत्रकातील भाग क्र. लेखाशिर्ष c-4(ii) p-1मधुन करावयाचे आहे. सदर काम करण्यासाठी सन् २००१-२००२ च्या अंदाजपत्रकात तरतुद उपलब्ध आहे. सदर काम लवकरात लवकर करून घेणेसाठी व सदर प्राकलनीय किमत रू. २१ ,६९ ,६९०/- यांस प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळण्यासाठी स्थायी समिती सभेपुढे ठेवणेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ११ दि:-४ . ५ . २००१ .

सुचकाचे नाव :- श्री. ठाकुर बेहरानी.
अनुमोदकाचे नाव :- श्री. रामचंद पारवानी.

हि स्थायी समिती वरील कारणा व प्रस्तावनेनुसार वर नमुद केलेल्या उल्हासनगर शहरातील कॅम्प नं. १ ते ५ मधील रस्त्यांमध्ये पडलेले खड्डे बी.
एम. ए.सी. व्दारे भरणे कामीचे दहा प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असुन आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

श्री. जे.एम. ढाकरे(प्रभारी आयुक्त):- आपली अनूमती असेल तर आजच्या सभेत एक आयत्त्यावेळचा विषय आणु इच्छितो.

पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारी:- उपआयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयाअन्वये चर्चेस आणलेला प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असून तो सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--१२--

आयत्त्यावेळचा विषय:-

विषय :- प्रभाग क्र. ४२ ,१४ आणि ४२ मध्ये जलवाहिनी टाकणे कामीचे तीन प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १२ दिनांक :- ४ . ५ .२००१ .

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.
अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधीकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर-४ येथील प्रभाग क्र. १४मध्ये भारत नगर, सुभाष टेकडी मध्ये १५० मी.मी. व ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत. (लुंबिनी ग्राऊंड ते खैरे यांचे घरापर्यंत) | २,७७,३००/- |
| २. | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र. ४२मध्ये, पंपु भाजीवाला ते बॅरेक क्र. १०३५ मदालसा अपार्टमेंट जवळ ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत. | १,२२,९००/- |
| ३. | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र. ४२ मध्ये, पाणी टंचाई व दुषित पाण्याचा प्रश्न सोडवण्याकरिता अशोक टॉकीज ते क्रिशनानी चौक, रामायण नगर करिता ५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत. | ५६,५००/- |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर.

पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५.०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. पिठासीन अधिकारी श्री. किशोर वनवारी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-१७.५.२००१.

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक १७.५. २००१ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

**मा. सभापती** :- श्रीमती. कालानी ज्योती.

| | |
|---|---|
| २. श्री. आयलानी कुमार | सदस्य |
| ३. श्रीमती.कुंदनानी लविना | सदस्या |
| ४. श्री.पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ५.श्री. बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ६. श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| ७.श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ८.श्री. तेजी कैलास | सदस्य |
| ९. श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| १० श्री.वनवारी किशोर | सदस्य |
| ११ श्रीमती. वेलकर सुरेखा | सदस्या |
| १२ श्रीमती. सोनावणे यमुना | सदस्या |
| १३ श्रीमती. राधवानी आशा | सदस्या |
| १४ श्री.केणी जयकुमार | सदस्य |

तर

मा. श्री. रमेश चव्हाण , श्रीमती.पदमा वलेचा हे सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

मा.श्री. जे. एम. ढाकरे, प्रभारी आयुक्त हे आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ होते.

सायंकाळी ५. ०० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-** मा.सचिव (श्री. प्रकाश कुकरेजा साहेब) हे रजेवर असल्याने श्री. अ.न. काळे मुख्य लेखापरिक्षक यांना मी निर्देश देते की, त्यांनी सचिव म्हणुन या सभेचे कामकाज पहावे.

मा.सभापतींच्या निर्देशानंतर श्री. अ.न.काळे, मुख्यलेखापरिक्षक हे महापालिका सचिवांच्या आसनावर आसनस्थ झाले.

**मा. प्रभारी सचिव (श्री.अ.न. काळे):-** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक ४. ५.२००१ चे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :-इतिवृत्त आहेच कुठे?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- इतिवृत्त लिहिणारे कर्मचारी त्यादिवशी रजेवर होते त्यामुळे सविस्तर इतिवृत्त देता आले नसले तरीही संक्षिप्त का होईना इतिवृत्त तयार करून पुरविले आहे ते कायम करण्यास काही हरकत नसावी.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u> मागील सभेचे दि. ४.५.२००१ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

<u>मा. प्रभारी सचिव (श्री.अ.न. काळे):-</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :-श्री. धुत साहेब, ही कामे कोणत्त्या निधीतुन करावयाची आहेत?

<u>श्री. धुत (कार्यकारी अभियंता पा.पु.वि.)</u>:-सर्व साधारण निधीतुन ही कामे दोन ठिकाणी करायची आहेत. पाईप लाईन तुटली असल्याने नविन पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे. कालच मध्य रेल्वेच्या मुख्य अभियंत्या बरोबर त्याठिकाणी त्यांच्याबरोबर पहाणी केली असता या परिसरातील पाणी पुरवठ्यासाठी ब्रिजच्या वरून पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :- एकाच प्रभागाचे काम आपणास दिसते काय? इतर प्रभागातील काम दिसत नाही का? मागच्यावेळी श्री. सेवलदास ठाकुर यांच्या प्रभागातील कामास मंजुरी देण्याचे आम्ही नाकारले होते, सर्वसाधारण निधीतुन ही कामे करत असाल तर ती सर्वांच्या प्रभागात झाली पाहिजेत.

<u>मा.सदस्य श्री. जयकुमार केणी</u> :-तेथे आर.ओ.बी. चे काम चालु आहे. पाईप लाईन टाकण्यांच्या दोन कामांऐवजी एका कामास मंजुरी दिली जावी.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले</u>:-दोन्ही कामास मंजुरी देऊ या परंतु इतरांची आणखी काही कामे असतील ती पुढच्या सभेत मंजुरीस आणली जावीत.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>श्रीमती. वसीटा यांच्या प्रभागातील या दोन कामांपैकी एक काम सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गतच्या निधीतुन व एक काम सर्वसाधारण निधीतुन केले जावे. ४ लाख ९५ हजाराचे काम सर्वसाधारण निधीतुन केले जावे. त्यांच्या प्रभागात नळाव्दारे पाणी येत नसल्याने तेथे टॅकरने पाणी पुरवठा केला जातो. त्याकामी प्रतीमहा अंदाजे एक लाख रू. टॅकरवाल्यांना बिलापोटी दयावे लागत आहेत. श्रीमती. वसीटा यांच्या प्रभागात ही पाईप लाईन टाकली तर त्यांच्या प्रभागात टॅकरने पाणी पुरवठा करण्याची जरूरत पडणार नाही त्यामुळे टॅकरवाल्यांना प्रतिमहा दयावे लागणारे एक लाख रूपये महानगरपालिकेचे वाचतिल.

<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी</u> :-श्री. रामचंद पारवानी, महापालिकेच्या फायदयाच्या विचार करत नाहीत काय?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-श्रीमती. वसीटा यांच्या प्रभागात पाईप लाईन टाकण्याचे दुसरे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निधीतुन केले जावे असे सुचवू या.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-श्रीमती. वसीटा यांच्या प्रभागात पाईप लाईन टाकण्याकामीचे दोन प्रस्तावांपैकी रू. ४ ,९५ ,५००/- खर्चाचे काम सर्वसाधारण निधीतुन करण्यास सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- प्रभाग क्र. २६ मध्ये जलवाहिनी टाकणे कामीचे दोन प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. १३ दिनांक :- १७. ५.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती उल्हासनगर-४ , प्रभाग क्र. २६ मध्ये रेल्वाब्रिज (आर.ओ.बी)ते पोलिस वसाहत विठ्ठलवाडी येथे १५० मी.मी. व्यासाची एम.एस. जलवाहिनी टाकणे कामीचे रू. ४ ,९५ ,५००/- चे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधीकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती /पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. प्रभारी सचिव (श्री.अ.न. काळे):- विषय क्र.३ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-याबाबत मी असे सांगु इच्छितो की, खिचन धर्मीय लोकांनी मा. उच्च न्यायालयात जी याचिका दाखल केली होती. ती निर्णयीत निघाली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार खिचन धर्मीय लोकांना स्मशान भुमीसाठी

जागा दयायची आहे. त्यांना जागा दिल्यानंतर त्या भुखंडावर जी जागा शिल्लक राहिल ती जागा हिंदु धर्मीयांच्या स्मशान भुमीसाठीची असुन



या जागेच्या चतुःसिमा निश्चित करून दिल्या जाव्यात व त्याप्रमाणे पत्र दिले जावे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :-अशा आशयाचे आपण पत्र देऊ शकता का?

<u>प्रभारी आयुक्त (श्री. ढाकरे):-</u> स्मशान भुमी महापालिकेची असल्याने महानगरपालिकेने महानगरपालिकेस पत्र देण्याची आवश्यकता वाटत नाही.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u>:-तर मग ख्रिचन धर्मीयांना उच्च न्यायालयात दाद मागण्याची जरूरतच नव्हती? स्मशानभुमीचे व्यवस्थापन कोण पहाते? लाकडे कोण आणते? शव दहन कोण करते? शव दहन केल्याचा दाखला कोण देते? महापालिका तर हे करत नाही ना? म्हणुन ख्रिचन धर्मीय व हिंदु धर्मीय यांच्यात भविष्यामध्ये या जागेबाबत काही अडचणी वाद उदभवु नयेत म्हणुन या भुखंडावर हिंदु स्मशानभुमी व ख्रिचनांची दफन भुमी यांच्यामध्ये चतुःसिमा निश्चित करणे आवश्यक आहे, १२ वर्षा पेक्षा कमी वय असलेल्या लहान मुलांचे निधन झाले तर हिंदु धर्मिय परंपरेनुसार त्यास दफन केले जाते. त्यांचे दफनासाठी ही जागेची आवश्यकता आहे. त्याकामी ही जागा वापरण्यासाठी महानगरपालिकेने स्वर्गधाम स्मशानभुमी या ट्रस्टला तसे पत्र दिले पाहिजे.

<u>प्रभारी आयुक्त (श्री. ढाकरे):-</u>मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आम्ही कार्यवाही करु.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u>:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर-५ येथील स्मशानभुमीचे मागील प्रेत दफन करणेच्या जागेला भिंत बांधणे, रस्ता बनविणे व द्वार बांधणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व <u>वित्तिय मान्यता देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर-५ येथील स्मशानभुमीच्या मागे प्रेत दफन करणेच्या जागेला भिंत बांधणे, रस्ता तयार करणे व फाटक इत्त्यादी बांधण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले असुन त्यानुसार सदरचे काम दिनांक ३०.९.२००१ पर्यंत पुर्ण करावयाचे आहेत. सदरचे काम पुर्ण करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन् २००१-२००२ च्या आर्थिक वर्षात तरतुद नसल्यामुळे सदर काम करण्यासाठी लेखा शिर्ष विकास अधिभार शुल्क निधितुन प्रस्तावित केली होती. त्यानुसार मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी परवानगी प्रदान केली आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या संदर्भाकिंत पत्र. क्र.Ref. Civil Application No. 5727/2000, in writ petition No. 21/4/2000 नुसार दिलेल्या आदेशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने संबंधित कनिष्ठ अभियंता / उप-अभियंता यांनी सदर जागेची प्रत्यक्ष पहाणी करून सदर कामाचे अंदाजित रू. ७,५८,९००/- इतक्या रक्कमेचे प्राकलन तयार केले आहे. तसेच सदर काम करणेसाठी मा. सचिव, उल्हासनगर महानगरपालिका यांनी उच्च न्यायालयाची एक प्रत No. UMC/LD/481 नुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविलेली आहे. तरी उच्च न्यायलयाने दिलेल्या आदेशानुसार सदर काम लवकरात लवकर पुर्ण करणे गरजेचे आहे. सदरचे काम लेखा शिर्ष C-4(xiv)P-11 मधुन करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यानुसार सदर कामाच्या

प्राकलनीय किंमत रू. ७,५८,९००/-यांस प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेसाठी स्थायी समिती सभेपुढे मंजुरीसाठी सविनय सादर.

--५--

<u>स्थायी समिती ठराव क्र. १४</u>                    <u>दि:-१७.५.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर -५ येथील स्मशानभुमीचे मागील प्रेत दफन करणेच्या जागेला भिंत बांधणे, रस्ता बनविणे व व्दार बांधणे कामीचे अंदाजित रू. ७,५८,९००/- खर्चाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. प्रभारी सचिव (श्री.अ.न. काळे):-</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. कुमार आयलानी:-</u>हा प्रस्ताव समंत केला जावा.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :-कोणत्त्या निधीतील काम आहे? हे असे कसे?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :</u>-या कामासाठी सुधारित अर्थसंकल्पात तरतुद केलेली आहे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :- आमच्या एका रस्त्त्याचे कामाबाबत आम्ही पत्र दीलेले असुन तो प्रस्ताव सुध्दा मंजुरीस आणला जावा, तो प्रस्ताव मंजुरीस न आणता आपण फक्त एकच प्रस्ताव मंजुरीस आणला हे चुकीचे आहे, असे होता कामा नये, आमच्या प्रस्तावासह दोन्ही प्रस्ताव एकाच वेळी मंजुरीस आणले जावेत.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:</u>-हा प्रस्ताव मंजुर झाला? दुसरा कोणता प्रस्ताव असेल तर तो आपण मंजुरीस आणा, तुमच्या त्त्या प्रस्तावावर/ प्राकलनावर स्वाक्षरी झाली नाही तर आम्ही काय करणार?

श्री. पारवानी यांचे म्हणणे आहे की, ३० सेक्शनचा श्री. नरेंद राजानी यांच्या प्रभागातील रस्त्याचा प्रस्ताव सुध्दा मंजुरीस आणला जावा.

आजच्या अजेंड्यावर जो प्रस्ताव मंजुरीस आणला आहे. त्यास मंजुरी देण्यांत येत आहे.

--६--

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानीः</u>-नाही, नाही, हा प्रस्ताव समंत होता कामा नये. आपण हा प्रस्ताव कसा समंत करता ते आम्ही पहातो? आपण चुकीची प्रथा चालु करत आहात? एका रस्त्याचा प्रस्ताव आपण मंजुरीस आणता. दुस-या रस्त्याचा प्रस्ताव मंजुरीस का आणत नाहीत?

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>प्रभारी आयुक्त साहेब म्हणतात ना, की, तो प्रस्ताव सुध्दा मंजुरीस आणा म्हणुन...

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानीः</u>-दोन्ही रस्त्याचा प्रस्ताव एकाच वेळी एकत्रितपणे मंजुरीस आणला जावा.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>आजच्या सभेच्या विषयसुचीवर हा जो प्रस्ताव चर्चेस आला आहे. त्यास मंजुरी देऊ या. व दुस-या रस्त्याचा प्रस्ताव नंतरच्या सभेत मंजुरीस आणला जावा.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः</u>-विषय सुचीवरील प्रस्ताव आजच मंजुर करू या, मा. सभापती महोदया, आपण त्याबाबत आपण निर्णय जाहिर करा. हे काम ५ (२)(२) नुसार करण्यास आयुक्तांना प्राधिकृत करू या.

<u>मा.सभापती श्रीमती.ज्योती कालानी :-</u> श्री. पारवानी, दुस-या रस्त्याचा आपला प्रस्ताव पुढच्या सभेत मंजुरीस आणा आपण मंजुर करू..

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>श्री.पारवानी, जेव्हा मी आपणास म्हणतो की, आपल्या रस्त्याचा प्रस्ताव जेव्हा मंजुरीस येईल तेव्हा तो मंजुर केला जाईल म्हणुन, आम्ही त्यास मंजुरी दिली नाही तर प्रश्न वेगळा होता. काही तांत्रिक कारणामुळे आपला प्रस्ताव मंजुरीस येऊ शकला नाही त्यास आम्ही काय कारणार?

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानीः-</u> आपण अधिका-यांना याबाबत विचारणा करा की, त्या रस्त्याचा प्रस्ताव मंजुरीस का आला नाही? पुढच्या स्थायी समिती सभेत श्री. नरेंद्र राजानी यांच्या प्रभागातील रस्त्याचे काम मंजुरीस आणू असे आश्वासन देत असाल तर त्या अटीवर या प्रस्तावास मंजुरी देण्यास आम्ही तयार आहोत.

<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी</u> :-सभापती महोदया, या प्रस्तावाबाबत आपण आपला निर्णय दिला आहात ना?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>मुख्य लेखाधिकारी श्री. शेंडे साहेब म्हणतात की, त्या रस्त्याच्या प्रस्तावा बाबतची फाईल आजच माझ्या कडे आली आहे, याकामी तरतुद उपलब्ध आहे किंवा नाही हे मला माहित नाही.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- ५० लाखाचा माझा निधी असताना ही माझ्या प्रभागातील एका कामाचे प्राकलन ३ महिन्यापर्यंत मंजुरीस का येऊ शकले नाही हे पण मला विचारावे लागेल?

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-३० सेक्शनच्या रस्त्याचा प्रस्ताव या प्रस्तावामध्ये मंजुरीस का आणला नाही.

श्री. शेंडे (मुख्य लेखाधिकारी):-कार्यकारी अभियंता यांना याबाबतीत विचारावे.



श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):-हा रस्ता व त्यांचा काही संबंध नाही. तोच ठेकेदार येथे काम करतो बाकी काही नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- सपना गार्डनच्या रस्त्त्यासाठी सुधारीत अर्थसंकल्पात ॲडजेस्टमेंट केलेली आहे, आपण ज्या रस्त्त्याबाबत बोलत आहात तो सचिव साहेबांच्या विभागातील रस्ता आहे. तो विषय या नंतरचा आहे. हा प्रस्ताव श्री. नरेंद कुमार ठाकुर यांच्या विभागातील रस्त्याचा आहे.

सचिव साहेबांच्या विभागातील रस्ता आय.आर.डी.पी. एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमा अंतर्गतचा आहे व सपना गार्डनचा रस्ता सुधारित अर्थसंकल्पात ॲडजेस्टमेंट करून करावयाचा आहे.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :- फर्नीचर बाजारवाला तो रस्ता आहे ना?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- आपण म्हणता तो रस्ता सुध्दा सुधारित अर्थ संकल्पात ॲडजेस्टमेंट करून करू शकतो?

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- काळे साहेब, पाहिजे तर या प्रस्तावाबाबत मतदान घ्या. परंतु या प्रस्तावास आमचा विरोध आहे त्याची इतिवृतांत नोंद घ्या.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :- या प्रस्तावाबाबत मतदान घ्यावयास लावत असाल तर, पुढे जेव्हा आपला प्रस्ताव येईल तेव्हा आम्ही सुध्दा त्यास विरोध करू.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- श्री. प्रमोद टाले यांच्या प्रभागातील उद्यानातील कामांचा प्रस्ताव मंजुरीस आणला नाहीत?

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- माझ्या प्रभागातील कामाचे प्राकलनावर स्वाक्षरी झालेली आहे. तसेच श्री. राजेंद चौधरी यांच्या प्रभागातील कामाचे प्राकलनावर सुध्दा स्वाक्षरी झालेली आहे.

मा. प्रभारी सचिव (श्री.अ.न. काळे):- या प्रस्तावाच्या विरोधात जे सदस्य आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

१. श्री. पारवानी रामचंद
२. श्री. तेजी कैलास
३. श्रीमती. रजानी भारती
४. श्रीमती. वेलकर सुरेखा

५. श्रीमती. सोनावणे यमुना
६. श्रीमती. राधवानी आशा

या प्रस्तावाच्या बाजुने जे सदस्य आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

१. श्रीमती. कालानी ज्योती
२. श्री. आयलानी कुमार
३. श्रीमती.कुंदनानी लविना
४. श्री.बहरानी ठाकुर
५. श्री.टाले प्रमोद
६. श्री.तलरेजा विनोद
७. श्री.बनवारी किशोर
८. श्री. केणी जयकुमार



__मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी__ :- सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यांत येत आहे.

__विषय :-__ उल्हासनगर-३ येथील लायन बगीच्यामधुन जाणा-या रस्त्त्यांचे व प्रेमचंद स्टिल ते हरीद्वार अपार्टमेंट या रस्त्त्याचे सिमेंट कॉक्रिटीकरण कामीचे प्राकलनास प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता व सदयाचे ठेकेदार मेसर्स शंकर महादेव कंपनी यांच्याशी पूर्वीच्या दराने तसेच अटी व शर्तीवर निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत __करणे बाबत.__

__प्रस्तावना :-__

उपरोक्त विषयानुसार महानगरपालिकेच्या स्थायी समितीने वर्ष २०००-२००१ चे सुधारीत अंदाजपत्रक मंजुर करते वेळी लायन (सपना)उद्यान दरम्यानच्या रू. १२.०० लक्ष व लिंक रोड प्रेमचंद स्टील ते हरव्दार अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्त्यासाठी रूपये. ८.०० इतकी तरतुद केली आहे. उपरोक्त दोन्ही रस्ते एकात्मिक रस्ते योजना टप्पा- १ मधील रस्ता क्र. ३२ नेहरू चौक ते शिवाजी चौक या सिमेंट कॉक्रिटकरणाने करण्यात येत असलेल्या रस्त्त्याचे जोड रस्ते असुन या रस्त्त्याचे बाकीचे जोड रस्ते सिमेंट कॉक्रिटीकरणाने बांधलेले असुन उपरोक्त रस्त्त्यांचे बांधकाम काही भागापुरते सिमेंट कॉक्रिटीकरणाने यापुर्वीच झालेले आहे. या रस्त्त्यावरील नाल्यांचे व रस्त्त्याची पातळी कमी स्तरावर असल्यामुळे पावसाळयात पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नसल्यामुळे दरवर्षी पावसाळयात रस्ता दुरूस्ती करावे लागते. त्यामुळे सदरचा रस्त्ता सिमेंट कॉक्रिटीकरण केल्याने दरवर्षी या रस्त्त्याच्या डागडूजीसाठी होणारा खर्च टाळता येईल.

स्थायी समितीने महानगरपालिकेच्या सुधारीत अंदाजपत्रकात सदरचे दोन्ही रस्त्त्याचे बांधकाम करण्यासाठी तरतुद केली आहे. महानगरपालिकेच्या सुधारीत अंदाजपत्रकात तरतुद झालेली असल्याने सदर काम नेहरू चौक ते शिवाजी चौक या रस्त्त्याचे कामाचे कंत्राटदार मे. शंकर महादेव कंपनी यांचे कडुन त्यांच्या दराने

करण्यास प्रस्तावित करण्यांत आले होते. व तसे मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक व मा. आयुक्त मंजुरी प्रदान केली होती.

महानगरपालिकेच्या सुधारित अंदाजपत्रकात केलेल्या तरतुदीनुसार उपरोक्त दोन रस्त्याचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. त्यांची प्राकलनीय किंमत खालील प्रमाणे आहे.

१. उल्हासनगर-३ येथील लायन बगीच्या मधुन जाणारा रस्ता
(सिमेंट कॉक्रिटीकरण) १२,००,०००/-

२. प्रेमचंद स्टील ते हरिव्दार अपार्टमेंट पर्यंतचा रस्ता
(सिमेंट कॉक्रिटीकरण) ८,००,०००/-

उपरोक्त दोन्ही कामांची प्राकलनिय किंमत रू. २०,००,०००/- एवढी होत आहे. व त्यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता स्थायी समितीकडुन मिळणे आवश्यक आहे.

--९--

तरी उपरोक्त दोन्ही प्राकलनास प्रशासकीय मान्यता व वित्तिय मंजुरी मिळणेसाठी व स्थायी समितीपुढे मंजुरी मिळणेसाठी तसेच यापुर्वी मा.आयुक्त यांनी सदर मंजुर केल्यानुसार सदरचे दोन्ही कामे नेहरू चौक ते शिवाजी चौक या रस्त्याचे कंत्राटदार मे. शंकर महादेव कंपनी यांचेकडुन त्यांच्या दराने व निविदाचे अटी व शर्ती नुसार करून घेण्यासाठी स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी ठेवण्याकरीता मा. प्रभारी आयुक्तांनी दिलेल्या निर्देशानुसार स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १५</u> <u>दि:-१७.५.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे. तसेच सद्या कार्यरत असलेले ठेकेदार मे. शंकर महादेव कंपनी यांच्याशी पूर्वीच्या निविदेतील दराने व अटी व शर्तींवर निविदेशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर-३ येथील लायन बगीच्या मधुन जाणारा रस्ता (सिमेंट कॉक्रिटीकरण) | १२,००,०००/- |
| २. | प्रेमचंद स्टील ते हरिव्दार अपार्टमेंट पर्यंतचा रस्ता (सिमेंट कॉक्रिटीकरण) | ८,००,०००/- |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>बहुमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. प्रभारी सचिव (श्री.अ.न. काळे):-</u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :-</u> हा प्रस्ताव समंत केला जावा.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :-</u> मी सांगितलेले २ लाखाचे काम या प्रस्तावामध्ये आलेले नाही, त्या कामाचे लोकेशन मी आपणास लिहुन दिले होते ना? तर मग ते काम यामध्ये का आले नाही.



<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> शिवसेना, भाजपा, कॉंग्रेस व अपक्ष या चारही पक्षांच्या सदस्यांच्या प्रभागातील कामे आहेत.

<u>मा.सदस्या श्रीमती. आशा राधवानी :-</u> अधिका-यांना बोलु दया, आपण का बोलत आहात?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>सदस्य-सदस्यांचे प्रश्नास उत्तर देऊ शकत नाही.

<u>मा.सदस्य श्री. आशा राधवानी :-</u> मी, मा. सभापती महोदयांना विचारत आहे.

<u>श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):-</u> ४ कामे घेण्याबाबत निर्णय झालेला होता, त्यानंतर २-२ लाखाची कामे समाविष्ट करण्याबाबत आपण सांगितले होते परंतु त्यामुळे रक्कम अधिक होत असल्याने ही कामे समाविष्ट करता आली नाहीत.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- सर्वांनीच सांगितले होते, भाऊ ठाकुर बेहरानी यांनी सुध्दा काही लोकेशन सांगितली होती.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील कॅम्प १ ते ५ मधील
रस्त्यात पडलेले खड्डे डांबरीकरणाने भरणे कामीचे
४ प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता
<u>देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

दिनांक ४. ५.२००१ रोजी स्थायी समितीची सभा झाली त्या सभेत स्थायी समिती सदस्यांनी खालील चार रस्त्यावरील पडलेले खड्डे पावसाळयापुर्वी बी.एम.एसी ने भरण्याबाबत सुचना दिलेल्या होत्त्या. त्याप्रमाणे सदर रस्त्याची कनिष्ठ अभियंता व उप-अभियंता यांनी पाहणी करून अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्र. क्र. ५४ मध्ये हरनाम अपार्टमेंट मागे पाटेकर यांच्या घराजवळ रस्त्यात पडलेले खड्डे बी.एम.एसी ने भरणे. | ७००००/- |
| २. | प्र. क्र. ६१ मध्ये धीरज अपार्टमेंट ते हिरा मॅरेज हॉल पर्यंतच्या रस्त्यात पडलेले खड्डे डांबरिकरणाने भरणे. | ७००००/- |
| ३. | प्र.क्र. २० मध्ये गेस्ट हाऊस ते नाथा जोशी यांचे घरापर्यंतच्या रस्त्यात पडलेले खड्डे बी. एम. एसी ने भरणे. | ७००००/- |
| ४. | प्र.क्र. ५९ मध्ये सिल्वर अपार्टमेंट जवळ आणि समोरचे रस्त्यात पडलेले खड्डे बी.एम.एसी ने भरणे. | ७००००/- |
| | | ---------- |
| | | एकुण रू. २ ,८० ,०००/- |

--११--

सदरचे काम पुर्ण करण्यासाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात तरतुद नाही. मुख्य लेखा अधिकारी यांचे शे-यानुसार सन २००१-२००२ मध्ये तरतुद शिल्लक नसल्याचे शहर अभियंता यांना नमुद केले आहे. अंदाजपत्रकावर Watch करणे कस्थायी समितीचे काम आहे तेव्हा स्थायी समितीने समितीच्या स्तरावर निर्णय घेणे आवश्यक आहे. तरी स्थायी समितीने धोरणात्त्मक निर्णय घेऊन पुढील कार्यवाहीसाठी प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. १६</u> <u>दि:-१७. ५. २००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात समायोजनेच्या अधिन राहुन उल्हासनगर शहरातील कॅम्प नं. १ ते ५ मधील वर नमुद केलेल्या रस्त्यामध्ये पडलेले खड्डे बी.एम.एसी ने भरणे कामीचे चार प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्त्यंत तातडीचे व आवश्यक असुन आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. प्रभारी सचिव (श्री.अ.न. काळे):-</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :- हा प्रस्ताव आपण कसा आणलात ते सांगा?

<u>श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):-</u> याकामी बजेट तरतुद उपलब्ध्य नाही. धारेणात्त्मक निर्णय घेण्यासाठी स्थायी समितीपुढे हा प्रस्ताव ठेवला आहे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :- बजेटमध्ये याकामी तरतुद उपलब्ध नसताना श्री. शेंडे साहेब, या प्रस्तावास आपण मंजुरी कशी दिलीत? या प्रस्तावास मंजुरी देता तर मग ३० सेक्शनच्या आमच्या रस्त्याचे काम सुध्दा मंजुरीस घेतले जावे.

<u>मा.सदस्या श्रीमती. आशा राधवानी</u> :-श्री. पारवानी, आपण सभापतींना सांगा...



<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u>कोणता प्रस्ताव चर्चेस / मंजुरीस आणायचा हे पहाणे आयुक्तांचे काम आहे. आमचे नाही, जे काम प्रस्तावित केले आहे त्याकामी बजेटमध्ये तरतुद उपलब्ध आहे किंवा नाही हे पहाणे एवढेच आमचे काम आहे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :-</u> प्रभारी आयुक्त साहेब, या कामी बजेटमध्ये तरतुद नाही ना? हया कामास मंजुरी देऊ नका असे आम्ही म्हणत नाही तर या कामाबरोबर आमच्या रस्त्याचे ही काम घ्यावे असे आमचे म्हणणे आहे.

<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u>बजेट स्थायी समिती तयार करते, व मंजुर ही स्थायी समिती करते. बजेटचे नियंत्रण ही स्थायी समिती करते, शहर अभियंत्त्यांनी लिहिले आहे हे काम अत्यंत जरूरीचे आहे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :-आम्ही सुचविलेल्या रस्त्त्याच्या कामाचा प्रस्ताव तयार आहे. तो मंजुरीस आणला जावा ते काम सुध्दा आवश्यक आहे.
<u>मा.सदस्य श्री. कुमार आयलानी</u> :-प्रभार आयुक्त साहेब, त्यांना त्यांच्या प्रस्तावावर स्वाक्षरी करून दया ना.

<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u>त्या प्रस्तावाचे मी एक अक्षर सुध्दा पाहिले नाही. बजेटमध्ये तरतुद आहे किंवा नाही हे मला माहित नाही.

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- ३ नंबर ओ.टी.च्या रस्त्याचा प्रस्ताव आजच्या सभेच्या कामकाज पत्रिकेवर आहे, लेखाविभागाकडुन या प्रस्तावास मंजुरी मिळालेली आहे, अशा प्रकारचा दुसरा एखादा प्रस्ताव तयार असेल तर तो स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी आला पाहिजे. त्यास कुणाचा विरोध नाही.*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u>या प्रस्तावास तांत्रिक मंजुरी नाही. शहर अभियंता सुध्दा आज नाहीत, तांत्रिक मंजुरी विना प्रस्ताव मंजुर करता येणार नाही.*
*<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-</u> या रस्त्यासाठी बजेटमध्ये तरतुद नसतानाही आपण म्हणता की या कामी मंजुरी दयायची किंवा नाही याचा स्थायी समितीने निर्णय घ्यावा हे कसे?*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-आताच श्री. शेंडे साहेबांनी सांगितले की, आपण सुचविलेल्या रस्त्याच्या कामाच्या प्राकलनास तांत्रिक मंजुरी घेतलेली नाही, तांत्रिक मंजुरी नसेल तर हया कामाचा प्रस्ताव मंजुर करता येणार नाही. परंतु तो मंजुर करण्यासाठी आम्ही आपणास मदत करू.*

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> आयत्त्यावेळच्या विषयान्वये कोणते विषय येतात? जे आवश्यक व तातडीचे आहेत व ज्याची सर्व प्रक्रिया पूर्ण झाली आहे, असेच ना?*
*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> हा प्रस्ताव संमत केला जावा. या रस्त्याची सद्य स्थिती लक्षात घेता या रस्त्याचे काम पावसाळयापुर्वी करून घेण्यासाठी मजुर कामगार सहकारी संस्था किंवा महापालिकेच्या हितासंबंधी फायदेशिर अशा ठेकेदाराशी किंवा चर्चेमध्ये सुचविलेल्या मेसर्स ए.एस.कंन्स्ट्रक्शन यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करण्यात यावे.*

*<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u> हा प्रस्ताव संमत केलेला नाही, आयुक्त साहेबांनी सांगावे, आमच्या रस्त्याच्या कामाचे काय झाले?*



*<u>मा. सदस्य श्री किशोर वनवारी:-</u> आयत्त्यावेळचे विषय अजेंडयावरील विषय संपल्यानंतर चर्चेस येतात, आधी नाही.....३० सेक्शनच्या रस्त्याचे काम २६ लाखाचे आहे. (आय. आर.डी.पी.)एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत आम्ही रस्त्याच्या नावाची तरतूद केली आहे काय? श्री. भिवापूरकर साहेब, असे आहे काय? श्री. पारवानी आपणांस माहित नसेल तर मी सांगु इच्छितो की, आय.आर.डी. पी. अतंर्गत कोणत्त्याही रस्त्याच्या नावाची तरतुद केली जात नाही.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u>आयत्त्यावेळच्या विषयान्वयेच्या ३० सेक्शनच्या रस्त्याचे काय करता? हया रस्त्याचा ही प्रस्ताव मंजुरीस आणला जावा.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> श्री. नरेंद्र राजानी, यांच्या ३० सेक्शनच्या रस्त्याचे काम मंजुरीस आणत असाल तर त्याच बरोबर.*
*१)श्रीमती. लवीना कुंदनानी यांच्या प्रभागातील नागेश्वर मंदिर ते स्टेशन पर्यंतचा रस्ता.*
*२)अशोर टॉकीज ते आयोध्या नगर व्हाया मनिष नगरचा रस्ता.*
*३)शिवाजी चौक ते संतु बिल्डींग पर्यंतवर रस्ता.*

४)श्री. प्रमोद टाले यांच्या प्रभागातील पंचशिल नगर,सानिध्य अपार्टमेंट ते साईबाबा नगर व श्री. बी.बी. मोरे यांच्या कार्यालया समोरील पुर्नवसन साईटच्या रस्त्याचे काम सुध्दा मंजुरीस आणले जावे. अजेंडयावर चर्चा चालु असताना मध्येच आयत्त्यावेळच्या विषयावर आपण कशी चर्चा करता?

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :-</u>या प्रस्तावास आमचा विरोध आहे, प्रभारी सचिव साहेब, आपण याची इतिवृतांतात नोंद घेतली काय?

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>सदरचा प्रस्ताव बहुमताने समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर ३ येथिल नवजिवन शाळेच्या चौकापासून श्याम सुंदर सोसायटी पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रिटीकरण करण्याकामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता <u>देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर-३ येथील नवजीवन शाळेच्या चौकापासुन शामसुंदर सोसायटी पर्यंत सदया अस्तित्त्वात असलेल्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रिटीकरण करणेसाठी मा. महापौर साहेब यांनी महानगरपालिकेच्या फंडातुन खर्च करून सदरचा रस्ता त्वरीत सिमेंट कॉक्रिटीकरण करण्यात यावा अशया सुचना दिनांक १७४.२००१ च्या पत्रान्वये दिलेल्या त्यांचे सुचनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेचे उप-अभियंता / कनिष्ठ अभियंता यांनी सदर रस्त्याची पाहणी केली आहे. सदर कामाचे प्राकलन तयार केले असुन प्राकलनीय किंमत रूपये १३ ,७२ ,३००/- एवढी होते. सदरचा खर्च महानगरपालिका अंदाजपत्रकात लेखा शिर्ष क्र. सी. ४ (२)पी-२ अंतर्गत असलेल्या तरतुदीतुन करावे लागणार आहे व सदर काम करणे आवशयक आहे. मुख्य लेखा अधिकारी यांनी आर्थिक तरतुद लक्षात घेऊन स्थायी समितीने निर्णय घेणे रास्त राहील असा शेरा दिलेला आहे. त्यानुसार स्थायी समितीने धोरणात्त्मक निर्णय घेण्यासाठी सदर कामाच्या रूपये १३ ,७२ ,३००/- खर्चाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित आहे.



<u>स्थायी समिती ठराव क्र. १७</u> <u>दि:-१७. ५. २००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिकेच्या सर्व साधारण निधीतुन उल्हासनगर-३ येथील नवजीवन शाळेच्या चौकापासुन शामसुंदर सोसायटी पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रिटीकरण करण्या कामीचे रू. १३ ,७२ ,३००/- च्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच या रस्त्याची सध्याची परिस्थिती विचारात घेता सदरचे काम अत्त्यंत तातडीचे व पावसाळयापुर्वी करणे आवशयक असुन आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी किंवा महापालिकेच्या हितासंबंधी फायदेशिर अशा अन्य ठेकेदाराशी किंवा चर्चेमध्ये सुचविलेल्या मेसर्स ए.एस. कंन्स्ट्रक्शन यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>बहुमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. प्रभारी सचिव (श्री.अ.न. काळे):-</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>ही कामे ५(२)(२)अन्वये करण्यास आयुक्तांना प्राधिकृत केले जावे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-</u>या प्रस्तावामध्ये सर्व नगरसेवकांची दोन-दोन लाखाची कामे आहेत. परंतु मा.महापौर उपमहापौर व स्थायी समिती सभापतींची किती किती लाखाची कामे आहेत? त्याची सुध्दा दोन-दोन लाखाचीच कामे झाली पाहिजेत.

<u>मा. सदस्य किशोर वनवारी:-</u> मा.महापौर, उपमहापौर व स्थायी समिती सभापती हे लोक कुण्या एका प्रभागाचे नसतात, ते संपुर्ण शहराचे प्रतिनिधित्त्व करत असतात त्यामुळे ते इतर प्रभागांमध्येही आपल्या निधीतुन कामे करवुन घेऊ शकतात.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u>मा.महापौर,उपमहापौर व स्थायी समिती सभापती यांचा निधी जास्त असावा अशा प्रकारचे काही पत्र शासनाकडुन आले आहे काय?

<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी)</u> :-शासनाकडुन जे पत्र आले आहे ते नगरसेवक निधीबाबतचे आहे, त्या व्यतिरिक्तच्या इतर निधी बाबतचे नाही, आपल्या बजेटमध्ये महापौर, उपमहापौर व स्थायी समिती सभापती निधीची तरतुद केलेली आहे व याबाबत आपणच निर्णय घ्यावा, मला काय विचारता?



<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>श्री. बक्शी साहेबांनी सांगितले आहे की, पाणी पुरवठयाबाबत करावयाचे कामाचे १० लाखाचे काम असले तरी ते सर्वसाधारण निधीतुन केले जावे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-</u> आमचा विरोध आहे, मा.महापौर, उपमहापौर स्थायी समिती सभापती यांचा निधी २ लाखा पेक्षा अधिक असता कामा नये. त्यांची सुध्दा दोन-दोन लाखाचीच कामे झाली पाहिजेत.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव बहुमताने समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> नगरसेवक निधितून सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत करावयाच्या ८६ कामीचे प्राकलनास

प्रशासकिय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेच्या विविध नगरसेवकांनी अंदाजपत्रकीय तरतुद ठेवलेल्या नगरसेवक स्वेच्छा निधीतुन त्यांचे प्रभागात विविध विकासाची कामे हाती घेण्याबाबत मागणी पत्रे येत आहेत. या पार्श्वभुमीवर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने याबाबत विचार विनिमय होऊन मा. आयुक्त यांनी प्रत्येक प्रभागाकरिता २ लक्ष किंमतीची कामे तुर्त हाती घेण्याकरिता सुचना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे नगरसेवकांशी विचार विनिमय करून संबंधित नगरसेवकांनी सुचविलेली कामे सार्वजनिक बांधकाम खात्यातील कनिष्ठ अभियंता व उप-अभियंता यांनी कामे प्रस्तावित केलेली आहे. ती खालील प्रमाणे नमुद आहेत.

त्याप्रमाणे उल्हासनगर शहरातील विविध प्रभागातील कामे करण्यासाठी नगरसेवक/नगरसेविका श्री/ श्रीमती. यांनी त्यांच्या नगरसेवक स्वेच्छ निधीतुन करणेसाठी त्यांनी पत्रे देऊन विनंती केलेली आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने हे काम करण्यासाठी जागेची पहाणी करून एकुण ८६ प्राकलने तयार केलेले असुन त्यांची एकंदर किंमत रू. १,३७,४२,८५६/- इतकी होत आहे. या कामाच्या खर्चासाठी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात ए बजेट इस्टिमेंट च्या भाग -२ मधील लेखा शिर्ष क-४, iv/v मधुन काम करावयाचे आहे. त्यानुसार सदर रू. १,३७,४२,८५६/- किंमतीचे प्रभाग क्रमांक १ ते ६९ मधील सदर काम करून घेणेसाठी मा. प्रभारी आयुक्त साहेबांच्या शे-यानुसार प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळण्यास स्थायी समिती सभेपुढे ठेवणेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. १८ दि:-१७.५.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार नगरसेवक निधीतुन सार्वजनिका बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या सोबत जोडलेल्या यादीत नमुद केलेल्या ८६ कामांचे रू.१,३७,४२,८५६/-चे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असुन आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

बहुमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

--१०--

मा.प्रभारी सचिव (श्री.अ.न.काळे):-विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- अपंग अर्जदार श्री. हिरो जी. मन्सारामानी यांना बॅ.क्र. ६३१ च्या बाजूला वॉटर सप्लाय ऑफिसच्या समोर , खेमानी, उल्हासनगर-२ येथे महापालिकेच्या जागेवर तात्पुरत्त्या स्वरुपात एस.टी.डी. बुथ बांधणे कामी परवाना देणे बाबत.

प्रस्तावना:-

श्री. हिरो जी. मन्सारामानी हया अपंग व्यक्तीने टेलिफोन बुथ चालविणेसाठी उल्हासनगर शहरातील बॅरेक नं. ६३१ च्या बाजुला, वॉटर सप्लाय ऑफीसच्या समोर, खेमाणी, उल्हासनगर. २ मधील "४ x ४" ची जागा मागीतली आहे.

अर्जदार व्यक्तीस अपंग असल्यामुळे अत्त्यंत तात्त्पुरत्त्या स्वरूपात"४ x ४" ची लाकडी कॅबीन मध्ये टेलिफोन बुथसाठी खालील अटींवर परवानगी बाबत स्थायी समितीची संमती घेणे आवश्यक आहे.

१) महानगरपालिका सांगेल त्यावेळी लाकडी कॅबीन (बुथ)हटवून जागा खाली करावी लागेल.

२) सदर जागेचा वापर केवळ तात्त्पुरत्त्या स्वरूपात असून जागेबाबत मालकी हक्क पुर्णत: महानगरपालिकेचा असेल.

३) फक्त आपणच तेथे काम करावे. जागेचा वापर केवळ अर्जदार यांनाच करता येईल. भाडेकरू ठेवता येणार नाही.

४) एस.डी.ओ ऑफीसचा नाहरकत दाखला या कार्यालयात सादर करावा लागेल.

५) कोर्टातून कोणत्त्याही प्रकारचा स्टे आणता येणार नाही.

६) वरील बाबी अर्जदारास मान्य असल्याबाबत २०/-स्टॅम्प पेपर वर ॲफिडेव्हीड करावे लागेल.



स्थायी समिती ठराव क्र. १९ दिनांक :- १७.५.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अपंग अर्जदार श्री. हिरो जी. मन्सारामानी ह्या अपंग व्यक्तीस वर नमुद केलेल्या महापालिकेच्या जागेवर आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्ती वर तात्पुरत्त्या स्वरूपात टेलिफोन बुथ बांधणे व चालविणे कामी एक वर्षाच्या कालावधीसाठी परवाना देणेस मान्यता देत आहे.

तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधिन राहून सदरचा परवाना वेळोवेळी एका वर्षापेक्षा अधिक नसेल ऐवढया कालावधीसाठी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तानां प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.प्रभारी आयुक्त (श्री. जे. एम. ढाकरे):-व आपणा सर्वांची संमती असेल तर आयत्त्यावेळच्या विषयान्वये काही प्रस्ताव चर्चेच आणु इच्छितो. त्यातील पहिला विषय आहे.

पावसाळयापुर्वी शहरातील सर्व मोठ्या नाल्यातील गाळ काढणे व प्रत्त्येक प्रभागातील लहान मोठे नाले व गटारे साफ करणे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-पावसाळयापुर्वी शहरातील सर्व लहान मोठी गटारे-नाले साफ झाले पाहिजेत. या कामाची अत्त्यंत तातडीने आवश्यकता असल्याने आम्ही (स्थायी समिती) आपणास (प्रभारी आयुक्तांना) अधिकार देत आहेत. ५(२)(२) नुसार आपण हे काम सध्या कार्यरत असलेले सफाई ठेकेदार मेसर्स व्ही. आर. पनवेलर यांचेकडुन करवुन घ्या.

मा.प्रभारी आयुक्त (श्री. जे. एम. ढाकरे):-स्थायी समिती सर्वानुमते असा अधिकारी देत आहे ना? इतिवृतांतात तशी नोंद घेतली जावी.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :- प्रभारी आयुक्त साहेब, प्रभागातील नाले व गटारे सफाई करिता प्रभाग निहाय १० पुरूष कामगारांची ६० दिवसाकरिता नेमणुक करण्यांत येणार असल्याचे या प्रस्तावाच्या गोषवा-यात लिहिले आहे. परंतु हे कामगार ७० दिवसासाठी नेमले जावेत असे आम्ही म्हंटले होते.

*मा.प्रभारी आयुक्त (श्री. जे. एम. ढाकरे):-* हे कामगार ६०-७०दिवस जेवढे दिवस लागतील तेवढे दिवस कामावर ठेऊ.

*मा.सदस्या श्रीमती. लविना कुंदनानी* :- नविन कामगार घेणार की जुने, कुणी नविन कामगार लावला तर?

*डॉ. लांजेवार (सहाय्यक आरोग्य अधिकारी):-* मागच्यावेळी ज्या कामगारांनी काम केले त्यांची आमच्याकडे यादी आहे, त्याच कामगारांना आम्ही या कामासाठी घेऊ.

*मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी* :-प्रभारी आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेला प्रोकलेन मशिन याबाबतचा हा प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करून तो सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

*आयत्त्यावेळचा विषय*

*विषय :-* पावसाळयापुर्वी शहरातील सर्व मोठया नाल्यातील गाळ काढणे व प्रत्येक प्रभागातील लहान मोठे नाले व *गटार साफ करणे बाबत.*

*प्रस्तावना :-*

पावसाळयात अतिवृष्टीमुळे पावसाचे पाणी शहरातील खोलगट भागात साचल्यामुळे पुर परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे शहरातील नागरिकांचे वित्तहानी व प्राणहानी होण्याची शक्यता असते. तसेच साथीच्या रोगांच्या प्रादुर्भाव होतो.

शहरात पावसाळयामध्ये अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण होऊ नये तसेच अतिवृष्टीमुळे वित्तहानी व प्राणहानी टाळण्यासाठी महानगरपालिका दर वर्षी शहरातील सर्व मोठे नाले, लहान गटा-यांचे सफाई करून घेणे आवश्यक असते. मोठया नाल्यातील साचलेला गाळ काढणे व सर्व नाल्याची सफाई करून घेणे, महानगरपालिकेच्या आरक्षणावर असलेल्या सफाई कामगारांकडुन रोजच्या सफाईच्या कामा व्यतिरिक्त ते काम करून घेणे शक्य नसल्यामुळे या कामाकरिता रोजंदारीवर जादा कामगारांची नेमणुक करून नाला सफाईचे कामे करून घेणे आवश्यक आहे.

सन २००१-२००२ हया आर्थिक वर्षात पावसाळयापुर्वी मोठयानाल्यातील गाळ काढणे व सर्व प्रभागातील सफाई करण्याकरीता आवश्यक प्रोकलेन मशीन व रोजंदारीवर नेमणुक करावयाच्या आस्थायी कामगार बाबत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यास येत आहे.

३. शहरातील मोठ्या नाल्यातील गाळ काढणे व डंम्पींग ग्राऊंडवर काढलेल्या गाळाची वाहतुक करणे.

उपअभियंता मल:निसारण विभाग यांचे कडून मोठया नाल्यातील गाळ काढण्यासाठी प्रोकलेन मशीन व गाळाची वाहतुक करण्यासाठी आवश्यक डंम्पर साठी लागणा-या खर्चाचे प्रोकलेन खालील आहे.

| | |
|---|---|
| अ. प्रोकलेन मशीन प्राकलन रूपये | ५,७६,०००.०० |
| ब. गाळ वाहतुक प्राकलन रूपये | ७,५६,०००.०० |
| | ---------------- |
| एकुण प्राकलन रूपये | १३,३२,०००.०० |

५. प्रभागातील नाले व गटारे सफाई करीता प्रभाग निहाय अस्थायी कामगारांची नेमणुक प्रभाग निहाय १० पुरूष कामगार व अतिरिक्त १० कामगार एकुण ७०० कामगार ६० दिवसाकरीता अस्थायी स्वरूपी प्रतिदिन १००/- रूपये दराने (९०/- रूपये मजुरी १०/-रूपये) सफाईकामासाठी लागणारे साहित्य फावडे, घमेले, टिकाऊ, कुदळ, इत्त्यादी कामगाने स्वत: अथवा भाडयाचे उपलब्ध घेण्यासाठी.

दिनांक ५ मे ते ५ जुलै या ६० दिवसाचा कालावधीत रोजंदारीवरील कामगारांचा एकुण अपेक्षीत खर्च ७०० x १०० x ६० =४२ लक्ष.

नाले सफाईकरीता आवश्यक प्रोकलेन मशीन गाळ वाहतुकीकरीता आवश्यक डंम्पर्स व ६० दिवसाकरीता रोजंदारीवरील कामगारांचा एकुण रू. ५५ लक्ष. अपेक्षित खर्चास वित्तिय व प्रशासकीय मंजुरीस मा. स्थायी समितीसमोर मंजुरीस दिनांक २६.४.२००१ रोजी सादर करण्यात आले होते. परंतु मा.स्थायी समितीने ठराव क्र. ६ दि. २६.४.२००१ अन्वये अनुक्रमांक २ च्या बाबीस मंजुरी प्रदान केलेली आहे. तरी मोठया नाल्यातील गाळ प्रोकलेन मशीन व्दारे करावयाच्या रूपये १३ लाख ३२ हजार रक्कमेच्या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरीसाठी स्थायी समिती समोर सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. २०</u> <u>दि:-१७.५.२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पावसाळयापुर्वी प्रोकलेन मशिनने शहरातील मोठया नाल्यातील गाळ काढणे कामीचे रुपये ५,७६,०००/- व काढलेला गाळ डम्परने डम्पींग ग्राउंड पर्यंत वाहून नेण्याकामीचे रुपये ७,५६,०००/- खर्चाचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व पावसाळयापुर्वी करणे आवश्यक असल्याने आयुक्तांना मेसर्स व्ही. आर. पनवेलकर यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारी</u> :- प्रभारी आयुक्त साहेब,आयत्त्यावेळच्या विषयान्वये आणखी २-३ प्रस्ताव आलेले आहेत, ते कोण कोणते आहेत ते सांगा?

मा.प्रभारी आयुक्त (श्री. जे. एम. ढाकरे):-आपणा सर्वांची संमती असेल तर आयत्त्यावेळच्या विषयान्वये दुसरा प्रस्ताव चर्चेच आणु इच्छितो, तो प्रस्ताव असा आहे. प्रभाग क्र. ४९ मध्ये ५० मी. मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबतचा.

--२४--

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-प्रभारी आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेला दुसरा प्रस्ताव, प्रभाग क्र. ४९ मध्ये जलवाहिनी टाकणे कामीचा प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करून तो सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

आयत्त्यावेळचा विषय

विषय :- उल्हासनगर-५ वार्ड क्र. ४९ मध्ये बॅ. नं. २०७० ते बॅ. नं. १९९३ पर्यंत ५० मी.मी. व्यासाची जलवाहीनी टाकणे बाबत.

प्रस्तावना :-

उपरोक्त विषयांकित ठिकाणी जलवाहिनी टाकणे गरजेचे आहे. त्याकरिता रक्कम रू. १,४९,७००/- चे प्राकलन तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च पाणी पुरवठा जनरल लेखा शिर्षक CB-1(भाग-२)यातुन करण्यांत येणार आहे.

सदर प्रस्तावास स्थायी समितीपुढे ठेवण्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी करिता स्थायी समितीपुढे सादर.

स्थायी समिती ठराव क्र. २१ दि:-१७.५.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पाणी पुरवठा सर्वसाधारण लेखा शिर्षातुन उल्हासनगर-५ येथिल प्र.क्र. ४९ मध्ये बॅरेक क्र. २०७० मं १९९३ पर्यंत ५० मि. मि. व्यासाची जलवाहिनी टाकणे कामीचे रुपये १,४९,७००/- चे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्त्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजदूर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

--२५--

मा.प्रभारी आयुक्त (श्री. जे. एम. ढाकरे):-आपणा सर्वांची संमती असेल तर आयत्त्यावेळच्या विषयान्वये तिसरा प्रस्ताव मी चर्चेच आणु इच्छितो, तो प्रस्ताव असा आहे. नगरसेवक निधीतुन प्रभाग १४ मध्ये दोन विविध ठिकाणी नविन विधन विहिरी खोदुन त्यांना हातपंप बसविणे बाबतचा.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-प्रभारी आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेला तिसरा प्रस्ताव, प्रभाग क्र. १४ मध्ये नविन विंधन विहिरी खोदुन त्यांना हातपंप बसविणे बाबतचा प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करून तो सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

आयत्त्यावेळचा विषयः-

विषय :- नगरसेवक निधीतुन प्रभाग १४ मध्ये दोन विविध ठिकाणी नविन विंधन विहीरी खोदुन त्यांना हातपंप बसविणे.

प्रस्तावना :-

_ उपरोक्त विषयातील कामासाठी सदर प्रभागाचे नगरसेवक यांचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष साईटवर जाऊन पाहणी केली असता सदर काम आवश्यक वाटले म्हणुन या कामाचे रू. ८३ ,६६८/- रक्कमेचे अंदाजित प्राकलन तयार केलेले आहे.

सदर काम आणि त्याचे प्राकलन यांना लेखा विभागाकडुन तसेच मा. आयुक्त यांची शिफारस प्राप्त झालेली आहे.

सदर कामास त्या प्रभागाच्या नगरसवेकाच्या निधीतुन रक्कम उपलब्ध असुन तातडीने हाती घेणे आवश्यक आहे. कारण तया भागात पाणी टंचाई जाणवत आहे. म्हणुन सदर काम आणि त्याचे प्राकलन स्थायी समिती सभेपुढे प्रशासकीय आणि वित्तिय मान्यतेसाठी आणि योग्य एजंसी कडुन सदर काम सुरू करण्याची अनुमती मिळण्यास समिती पुढे सविनय सादर करीत आहोत.

स्थायी समिती ठराव क्र. २२ दिनांक :- १७.५.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार नगरसेवक निधितुन प्रभाग क्र. १४ मध्ये दोन वेगवेगळया ठिकाणी नविन विंधन विहिरी खोदुन त्यावर हातपंप बसविण्याकामीचे रुपये ८३,६६८/-खर्चाचे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

--२६--

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजदूर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर.

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ६. ०६ मिनिटांनी सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(अ. न. काळे)
प्रभारी सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-२५.५.२००१.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २५ ५. २००१ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

मा. सभापती :- श्रीमती. कालानी ज्योती.

| | |
|---|---|
| २. श्री. आयलानी कुमार | सदस्य |
| ३. श्री.पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ४. श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ५. श्री. बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ६. श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ७. श्री. तेजी कैलास | सदस्य |
| ८. श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| ९ श्री.वनवारी किशोर | सदस्य |
| १० श्रीमती.वलेचा पद्मा | सदस्या |
| ११ श्रीमती. वेलकर सुरेखा | सदस्या |
| १२ श्रीमती. सोनावणे यमुना | सदस्या |
| १३ श्रीमती. राधवानी आशा | सदस्या |
| १४ श्री.केणी जयकुमार | सदस्य |

तर

मा. श्रीमती.कुंदनानी लविना , श्री.टाले प्रमोद हे सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

मा. आयुक्तांच्या अनुपस्थितीत मा सभापतींच्या निर्देशानुसार श्री. जे. एम. ढाकरे, उपायुक्त हे आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ होते.

सायंकाळी ५. ०० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. सचिव :- विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक १७. ५.२००१ चे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-प्रभारी आयुक्त साहेब आपण हे सांगा की, ३० सेक्शनच्या रस्त्याचे प्राकलन १७ ५.२००१ रोजीच्या सभेत आयत्त्यावेळच्या विषयामध्ये आणले होते किंवा नाही?

<u>मा.प्रभारी आयुक्त (श्री. जे. एम. ढाकरे):-</u>परंतु ते आयत्त्यावेळच्या विषयान्वये सभेच्या कामकाजात सामावुन घेतले नाही.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:</u>-त्यबाबत सभेच्या शेवटी शेवटी आपण जे म्हणाला होतात त्याची इतिवृतांतात नोंद आलेली नाही. आपण त्या कामाचे प्राकलन आयत्त्यावेळच्या विषयान्वये सभेपुढे आणले होते किंवा नाही?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-त्या रस्त्याचे प्राकलन आयत्त्यावेळच्या विषयांमध्ये सामावुन घेणे बाबत सभेत चर्चा झाली होती परंतु ते प्राकलन अर्धवट असल्याने, शहर अभियंता यांची त्यावर स्वाक्षरी नसल्याने ते आयत्त्यावेळच्या विषयान्वये त्या सभेच्या कामकाजात सामावुन घेतले नाही.

<u>मा. सदस्य श्री. पारवानी रामचंद्र :-</u> शहर अभियंता यांनी या प्राकलनावर स्वाक्षरी केली तर या कामाचा ठराव पारीत करू असे आपण म्हणाला होतात की नाही?

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u> श्री. शेंडे साहेबांनी म्हंटले होते की, बजेटमध्ये याकामी तरतुद उपलब्ध नाही म्हणुन मुख्य लेखाधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या स्वाक्ष-या नसल्याने ते प्राकलन आयत्त्यावेळच्या विषयामध्ये घेतले जाऊ शकत नव्हते.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी</u> :-त्या सभेच्या शेवटी शेवटी प्रभारी आयुक्तांनी असे म्हंटले होते की, जर शहर अभियंत्यांनी या प्राकलनावर स्वाक्षरी केली तर याकामाचा ठराव पारीत समजला जाईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u> त्या कामाचे प्राकलन यासाठी आयत्त्यावेळच्या विषयामध्ये घेण्यात आले नाही कारण की ते प्राकलन अर्धवट होते त्यावर शहर अभियंत्यांची स्वाक्षरी नव्हती.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u> सभेच्या शेवटी शेवटी प्रभारी आयुक्तांनी म्हंटले होते, त्याची इतिवृत्तात नोंद आलेली नाही.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-आपणांस काय सहकार्य करायचे? प्रत्येक विषयावर त्यादिवशी आपण मतदान घ्यावयास लावले. जे चुकीचे होते ते इतिवृतात आले नाही, जे बरोबर होते ते सर्व इतिवृतात आलेले आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> येथे जो जो सदस्य जे जे बोलते त्याची इतिवृतांतात नोंद आली पाहिजे ना?

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u> प्रभारी आयुक्त साहेब, आपण बोलला होतात, त्याची इतिवृतात नोंद यावयास पाहिजे होती.

<u>मा. उपआयुक्त (श्री. जे. एम. ढाकरे):-</u>सभेत जे जे बोलले गेले त्यांची इतिवृतांतात नोंद आली नसेल तर नोंद न आलेली वाक्ये समाविष्ट करून घ्या, इतिवृतांतात नोंद आलेली नसेल तर त्यास आयुक्त काय करतील?

*__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी__ :- याची सुध्दा नोंद घ्या की, ते प्राकलन अर्धवट होते. त्यावर शहर अभियंत्त्याची स्वाक्षरी नव्हती, आयुक्तांची सुध्दा स्वाक्षरी नव्हती. लेखा विभागाकडुन त्यास संमती नव्हती. बजेटमध्ये सुध्दा त्याकामी तरतुद नव्हती.*



*__मा. सदस्या श्रीमती.भारती राजानीः-__ ज्या वाक्यांची इतिवृत्तांतात नोंद आलेली नाही, ती वाक्ये समाविष्ट केली जावीत.*

*__मा. सचिवः-__जर शहर अभियंत्यांनी प्राकलनावर स्वाक्षरी केली तर ठराव पारित केला जाईल. ऐवढेच इतिवृतांतात समाविष्ट करायचे आहे ना?*

*__मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः__-इतिवृतांत तयार करताना सभेत झालेल्या चर्चेतील काही भाग वगळला जातो काय?*

*__मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-__ सभेत झालेल्या सर्व चर्चेची इतिवृतांतात नोंद आली पाहिजे. त्यावेळी श्री. शेंडे साहेबांनी हे प्राकलन लेखा विभागाकडुन अकांऊंट क्लीअर होऊन आलेले नाही असे म्हंटले होते.*

*__मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-__ आयत्त्यावेळचा विषय सभेत चर्चेस आणणे हे आयुक्तांचे काम होते त्यावेळी त्यांनी सांगितले की, हे प्राकलन अर्धवट आहे, त्या प्राकलनाबाबत सभेत फक्त चर्चा झाली होती. आम्ही म्हंटले होते की, या कामाचा प्रस्ताव सभेच्या नियमित सभा सुचनेवर आणा त्यावर आपण चर्चा करू. श्री. ढाकरे साहेबांनी हमी घेतली होती की, काय शहर अभियंत्यांची स्वाक्षरी नाही? ती मी करून घेतो. काय आयुक्तांची स्वाक्षरी नाही. ती ही मी करून घेतो. श्री. बक्शी साहेबांची स्वाक्षरी करून घेण्याची त्यांनी हमी घेतली होती.*

*तसेच इतिवृतांताच्या पृष्ठ क्र. २१ वर प्रोकलेन मशीनच्या प्रस्तावाची चर्चा आलेली आहे. हे काम ५ (२)(२)अन्वये सध्याचे सफाई ठेकेदार व्ही. आर. पनवेलकर यांचे कडुन करून घ्या असे मी म्हंटल्याची इतिवृतांतात नोंद आलेली आहे. परंतु या प्रस्तावाच्या ठराव क्र. २० मध्ये या कामी आयुक्तांना निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करण्यांत येत आहे अशी नोंद करावयास हवी होती परंतु ती नोंद आलेली नाही. ती नोंद घेतली जावी. तसेच ठराव क्र. १७ मध्ये उल्लेख केलेल्या रस्त्त्याची सद्यस्थिती विचारात घेता. सदर रस्त्याचे काम पावसाळयापुर्वी करण्यासाठी मजुर कामगार सहकारी संस्था किंवा महापालिकेच्या हितासंबंधी फायदेशिर अशा ठेकेदाराबरोबर किंवा चर्चेमध्ये सुचविलेल्या मेसर्स ए.एस. कंन्स्ट्रक्शन यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदा करण्यास आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे. अशी नोंद त्या ठरावात करण्यांत यावी.*

*__श्री.अ. न. काळे(मुख्य लेखा परिक्षक)__ :-इट शुड बी ब्रीफ. मोजक्या शब्दात ठरावाची मांडणी केली जाते.*
*__मा. सचिवः-__ इतिवृत्त कायम समजायचे?*
*__मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-__ प्रारूप इतिवृत्तांतील ठराव क्र. १७ व २० संबंधी जी वाक्य सुटल्याचे सन्माननिय सदस्य श्री. किशोर वनवारी यांनी निर्देशनास आणुन दिले आहे. ती वाक्ये समाविष्ट करून दि. १७.५.२००१ रोजीचे इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.*
*__मा.सचिवः__-विषय क्र. २ वाचुन दाखवितात.*
*__मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-__ कोण स्पष्टीकरण करेल?*

*<u>श्री.भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):-</u>* प्रभाग क्र. २१ मध्ये मोकळया जागेला लोखंडी जाळीचे गेट बसविण्याचे आहे. या जागेवर अतिक्रमण होऊ नये म्हणुन लोखंडी जाळीचे गेट बसवायचे आहे.

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u>* :-महापालिकेच्या अर्थसंकल्पात याकामी एकुण २५ लाख रू.ची तरतुद असुन प्रभाग क्र. २१ या एका प्रभागामधील २लाखाचे काम मंजुरीस आणले आहे. एखादया नगरसेवकाने सांगितल्यानुसार किंवा पत्र दिल्यानुसार त्या त्या प्रभागातील अशी कामे मंजुरीस आणणार काय? किवा



कॅम्प १ ते ५ मधील सर्व प्रभागातील अशी कामे एकाचवेळी मंजुरीस आणाल? फक्त प्रभाग क्र. २१ मधीलच काम मंजुरीस का आणले? आणायची असतील तर सर्व प्रभागातील कामे एकाचवेळी मंजुरीस आणली जावीत.

*<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-</u>* याकामास मंजुरी देऊन नंतर सर्व प्रभागातील अशी कामे एकत्रितपणे एकाचवेळी मंजुरीस आणली जावीत.

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण / श्री. कैलास तेजीः-</u>* या कामात मंजुरी दिली जावी.

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u>* :-जर कुणी नगरसेवक पत्र देऊन अशा कामांची मागणी करेल तर काम केले जाईल ना?

*<u>मा. सदस्य श्री. बहरानी ठाकुरदास :-</u>* अशा कांमाची जेथे जेथे आवश्यकता आहे तेथे ही कामे केली पाहिजेत.

*<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>* सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

*<u>विषय :-</u>* प्रभाग क्र. २१मध्ये खुल्या जमीनिला लोखंडी जाळीचे गेट
बसविणे व विकास करणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय
<u>व वित्तिय मान्यता देणे बाबत.</u>

*<u>प्रस्तावना :-</u>*

उल्हासनगर येथील प्रभाग क्र. २१ मध्ये ब्लॉक सी-१ ते सी-६ जवळील ओपन प्लॉटला लोखंडी जाळीचे गेट बसवुन विकास करणे आवश्यक आहे. कारण सदर प्लॉट उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचा आहे. त्या प्लॉटवर अतिक्रमण होऊ नये याकरिता सदर प्रभागातील संबंधित नगरसेविका श्रीमती. भगवंती बच्चाराम रूपचंदानी यांनी त्यांच्या दिनांक ११.४.२००१ च्या पत्रानुसार विनंती केलेली आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित उप-अभियंता / कनिष्ठ अभियंता यांनी सदर प्लॉट विकासाचे प्राकलन तयार केले असून त्या प्राकलनाची अंदाजित किंमत रू. १,९९,४००/- इतकी होत आहे. या कामाच्या खर्चासाठी महानगरपालिका अंदाजपत्रकात भाग क्रमांक लेखा शिर्ष C-4(ix)P-11 मधुन काम करावयाचे आहे. त्यानुसार सदर १,९९,४००/- किंमतीचे प्रभाग क्रमांक २१ मधील काम करून घेणेसाठी प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणेसाठी स्थायी समिती सभेपुढे प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. २३ दि:-२५. ५. २००१.

सुचकाचे नाव :-श्री. रमेश चव्हाण.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. राधवानी आशा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर येथील प्रभाग क्र.२१ मध्ये ब्लॉक सी-१ ते सी-६ पर्यंत खुल्या जमिनीला लोखंडी गेट बसवुन विकास करणे कामी रू. १ ,९९ ,४००/- रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देत आहे.

--५--

तसेच सदरचे काम अत्त्यंत तातडीचे व आवश्यक असुन आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-कोणत्त्या स्वरूपाचे काम आहे? नगरसेवक निधीतील आहे काय?

श्री. भिवापुरकर(कार्यकारी अभियंता सा.बा.वि):- एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत या रस्त्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. मेसर्स जयहिंद कंन्स्ट्रक्शन यांना हे काम देण्यात आलेले होते. परंतु सदर काम चालु असताना मा. आयुक्त साहेबांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट दिल्यानंतर रस्त्यावर प्रत्यक्ष उपलब्ध रूंदीप्रमाणे काम करण्याचे आदेश दिले.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-प्राकलनिय किंमत कितीने वाढत आहे? ३८ लाखाने?

मा. सदस्य श्री. पारवानी रामचंद:- श्री. चंद्रशेखर साहेबांच्या कालावधीत या कामाचे जे प्राकलन आले होते ते कमी रक्कमेचे होते. आता ही प्राकलनिय रक्कम वाढली कशी?श्री. चिजवानी साहेब प्रथम आपणांस माहित नव्हते का? काम वाढत कसे आहे? प्राकलनिय किंमत २५-२५ लाखाने वाढत आहे हे कसे?

*श्री. भिवापुरकर(कार्यकारी अभियंता सा.बा.वि):-*विकास आराखड्यामध्ये या रस्त्याची रूंदी ६० ते १०० फुट होती. ६० फुटाचे जागी प्रत्यक्षात ६५-८५ फुट व १०० फुटाचे जागी प्रत्यक्षात १२० फुट रूंदी उपलब्ध झाल्याने व सदर उपलब्ध रूंदीप्रमाणे काम करण्याबाबत आयुक्तांनी आदेश दिल्याने याकामी प्राकलनिय किंमत वाढली आहे. जी कामे प्राकलनिय किंमतीच्या आत आहेत ती कामे चालु आहेत.

*मा. सचिवः-* हा विषय पारीत समजायचा?

*मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी* :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

*विषय :-*उल्हासनगर-५ येथील नेताजी चौक ते शिवमंदीर पी.डब्लु. डी. ऑफिस मार्गे रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याकामी सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

--६--

*प्रस्तावना :-*

उपरोक्त विषयांकित काम मे. जयहिंद कन्स्ट्रक्शन लि. नवी मुंबई यांना दि. १८/१/२००० च्या आदेशान्वये देण्यात आलेले होते. सदर कामाची अंदाजित प्राकलनिय किंमत रू. २२५. ६८ लक्ष इतकी होती. परंतु सदर काम चालु असतांना मा. आयुक्त साहेबांनी प्रत्यक्ष कामाच्या स्थळी भेट दिली आणि रस्त्यावर उपलब्ध रूंदीप्रमाणे सदर काम करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सदर रस्त्याची रूंदी ६० ते १२० फुट उपलब्ध होती. व त्याप्रमाणे काम करण्यात आले आहे. सदर रस्त्यात शिवमंदिर चौक येथील जंक्शन डेव्हलपमेंट करण्याचे आदेश मा. आयुक्त साहेबांनी दिलेल्या भेटीत देण्यात आले होते. त्यानुसार शहर अभियंता यांनी मे. उत्तम इंजिनिअरींग प्रा. लि. यांना याबाबत दिनांक ९/११/२००० नुसार रस्त्याबाबतचे प्राकलन तयार करण्यास सुचविलेले होते. त्यानुसार सदर मे. उत्तम इंजिनिअरिंग प्रा. लि. यांनी त्यांचे पत्र दिनांक २५/४/२००१ नुसार सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू. २६४. २० लक्ष तयार करून या कार्यालयास कळविले आहे.

| अ. क्र. | चैनेज नं. | डिपी प्रमाणे रूंदी | उपलब्ध रूंदीप्रमाणे |
|---|---|---|---|
| १. | ० ते १५० | ६० फुट | ६० ते ६५ फुट |
| २. | १५० ते १००० | ६० फुट | ८० ते ८५ फुट |
| ३. | १००० ते १२०० | ६० फुट | १०० फुट |
| ४. | १२०० ते १४०० | १०० फुट | १०० फुट |
| ५. | १४०० ते १५०० | १०० फुट | १२० फुट |
| ६. | १५०० ते १६०० | १०० फुट | १०० फुट |

वरील दिलेल्या माहितीप्रमाणे सदर रस्त्याच्या वाढलेल्या रूंदी व लांबीप्रमाणे सुधारित अंदाजपत्रकाची किंमत रक्कम रू. २६४. २० लक्ष इतकी होत आहे. सदर प्राकलनाची मुळ किंमत २२५. ६८ लक्ष इतकी होती व सुधारित अंदाजपत्रकीय किंमत २६४.२० लक्ष इतकी होत आहे. अर्थात ३८ □ ५२ लक्ष इतकी वाढ होत आहे. तरी रस्त्याचे काम करणे अत्यंत आवश्यक असुन व पावसाळयापुर्वी सदर उर्वरित डांबरिकरणाचे काम पुर्ण होणे आवश्यक आहे. वरील कामाची निकड लक्षात घेता सदर

काम लवकरात लवकर पुर्ण करून घेणेसाठी स्थायी समिती कडून वाढलेल्या सुधारित प्राकलनीय किंमतीस प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणेसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. २४</u> <u>दि:-२५. ५. २००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. रमेश चव्हाण.
अनुमोदकाचे नाव :- श्री. जयकुमार केणी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-५ येथील नेताजी चौक ते शिवमंदीर, पी. डब्लु. डी. ऑफिस मार्गे रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करणे कामी रू. २६४. २० लाख रक्कमेच्या सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--७--

<u>मा. सचिव :-</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> कोण स्पष्टीकरण करेल?

<u>श्री. भिवापुरकर(कार्यकारी अभियंता सा.बां.वि):-</u>सोनेसर अपार्टमेंट ते सी ब्लॉक पर्यंतच्या या रस्त्याचे कामाबाबत स्थायी समितीत यापुर्वी ठराव पारीत झालेला आहे. वित्त आयोगाकडुन मिळणा-या अनुदानातुन हे काम करावयाचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> वित्त आयोगाकडुन मिळणा-या अनुदानातुन या रस्त्यांचे काम करण्यास स्थायी समितीने यापुर्वी मंजुरी दिलेली आहे.

<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी</u> :-या रस्त्यांची ऐवढी काय निकड आहे? दुस-या रस्त्यांची निकड नाही काय? संतु बिल्डींग ते शिवाजी चौक या रस्त्याची निकड नाही काय? विकास आराखडयामध्ये हा रस्ता नाही काय?

<u>श्री. भिवापुरकर(कार्यकारी अभियंता सा.बां.वि):-</u>त्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध नाही.

<u>मा. सदस्य श्री. जयकुमार केणी / श्री. ठाकुर बेहरानी :-</u> या रस्त्याची ऐवढी काही निकड नाही. हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u> हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.

<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी</u> :-भले ही या प्रस्तावावर मतदान घ्या. हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा. ऐवढेच नव्हे तर तो रददच केला जावा.

मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः- पारीत? पारीत?

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-माझ्यामते हा प्रस्ताव सर्वानुमते पारीत केला पाहिजे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः- पुर्नवसीतांसाठीच्या रस्त्त्यांचे काम आहे. यासाठी हा प्रस्ताव सर्वानुमते पारीत केला जावा.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः- या प्रस्तावावर मतदान घ्यायचे असेल तर मतदान घेतले जावे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-मी विनंती करते की, पुर्नवसीतांच्या रस्त्त्याचा हा प्रस्त्ताव असुन तो पारीत केला जावा.

मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः- सर्वांच्या प्रभागातील रस्त्त्यांची कामे एकत्रितपणे स्थायी समितीपुढे मंजुरीस आणली जावीत.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानी- दुसरे काही असे प्रस्ताव असतील ते सुध्दा मंजुरीस आणले जावेत.



मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-भाऊ श्री. ठाकुर बेहरानी म्हणतात की, ३० सेक्शनच्या रस्त्त्याचे काम सुध्दा मंजुरीस आणले जावे. इतिवृतांतात याची नोंद घ्या?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढे ढकलण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर-३ येथील सोनेसर अपार्टमेंट ते सी ब्लॉकचा ४० फुट रूंदीचा रस्ता विकसित करण्याकामीच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

मा. सचिवः- विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-कोणत्त्या निधीतुन? प्रभारी आयुक्त साहेब, आम्हा नगरसेवकांच्या प्रभागात फक्त दोन-दोन लाखाची कामे करत आहात. या लोकांची ऐवढी कामे............

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- मागच्या स्थायी समिती सभेत यावर चर्चा झालेली आहे. मा.महापौर निधी, उपमहापौर निधी, स्थायी समिती सभापती निधी इतर कोणत्त्याही महापालिकेत नाही फक्त या महापालिकेत तो निधी आहे. त्त्या निधीतुन करावयाच्या कामांना मर्यादा नाहीत.

मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी- मा.सभागृहनेता आपणांस माहित नाही का? शहर अभियंता साहेब या पदाधिका-यांच्या निधीबाबत परवानगी आणली आहे का?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-मा. आयुक्त श्री. बक्षी साहेबांशी चर्चा झाली होती त्यांनी सांगितले होते की, नगरसेवक निधी दहा लाखाचा असेल तर तेथे २० टक्के रक्कमेची कामे केली जावीत. त्यानुसार दोन-दोन लाखांची सर्वांच्या प्रभागातील कामे केली जावीत.

मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी :- तर मग यांची (पदाधिका-यांची)किती रक्कमेची कामे होतात.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):- त्या हिशोबाने स्थायी समिती सभापतीच्या निधीतुन पाच लाखाचे काम करत आहोत.

प्रत्येक नगरसेवकाच्या निधीतुन --- २ लाखाचे
मा.महापौर निधीतुन --- १० लाखाचे
मा.उपमहापौर निधीतुन -- ५ लाखाचे
मा.स्थायी समिती निधीतुन -- ५ लाखाचे

माहे जुन पर्यंत ही कामे करण्याचे श्री. बक्षी साहेबांनी सांगितले आहे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :- ५ लाखाच्या वरची जी कामे असतील ती सर्व रदद केली जावीत.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :- श्री. बक्शी साहेबांना विनंती करु या की, आमच्या निधितून आणखी दोन-दोन लाखाची कामे करण्यांस संमती दिली जावी.



मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः- या प्रस्तावास आमचा विरोध आहे, भले ही या प्रस्तावावर मतदान घ्या.
मा.सचिव :-२० टक्के च्या हिशोबाने स्थायी समिती सभापती व उपमहापौर यांची ५-५ लाखाची कामे होतात.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः- प्रभारी आयुक्त साहेब, आम्हा नगरसेवकांच्या निधितून आणखी २-२ लाखाची कामे करण्यासाठी आमच्यावतीने आयुक्तांना विनंती केली जावी.

श्री. ढाकरे (उपआयुक्त):- आपल्या सर्वांच्या सूचना मी मा. आयुक्तांच्या निर्देशनास आणून देईन.
मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :- आता या पदाधिका-यांची जी कामे आपण येथे मंजुरीस आणली आहेत व यापुर्वी सुध्दा त्यांच्या स्वइच्छा निधीतुन जी कामे झाली आहेत. आताची व यापुर्वी मिळुन जर २० टक्के पेक्षा अधिक रक्कमेची कामे होत असतील तर आमच्या प्रभागात सुध्दा याप्रमाणे कामे झाली पाहिजेत. अन्यथा यांच्या स्वइच्छा निधीतील आताची किंवा पुर्वीची यापैकी काही कामे रदद केली जावी.
मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-कायदा जेव्हा तयार होतो, तेव्हा पासूनच तो अंमलात येत असतो.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः- आयुक्त साहेबांनी सांगितले आहे, ५-५ लाखाची कामे करु म्हणून?

मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः- व स्थायी समिती सभापतींचे १० लाखाचे?
मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-अर्थसंकल्पात तरतुद शिल्लक आहे का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः- २५ लाखाची तरतुद कमी आहे, असे वाटते की उपमहापौरांसाठी हे लोक बोलत आहेत?

मा. सदस्य श्री.रामचंद्र पारवानीः- एकाचे काम होते, दुस-यावर अन्याय, असे कसे?
श्री. चिजवानी (शहर अभियंता) :-आयुक्त साहेबांनी, दुसरे असे सांगितले की, पाणी पुरवठयासाठी जेवढया काही रक्कमेचे प्राकलन असेल त्यास संमती दिली जावी.
मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः- मा. महापौर, उपमहापौर व स्थायी समिती सभापती हे त्यांच्या निधितूल पाहिजे तेवढया रक्कमेची कामे करु शकतात.

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :- बहुमत नसताना उगाच कशाला ओरडत बसता?
मा. सदस्य श्री. रामचंद पारवानीः-बहूमत नसतानाही उगाच कशाला ओरडता असे ते म्हणाले, त्यांची इतिवृत्तांतात नोंद घेतली जावी.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-१९.५.२००१ च्या महासभेत श्री. नरेंद राजानी साहेबांनी म्हटले होते की,आताची युती बहुमतावर निर्णय घेत आहे. नैतिक जबाबदारी वर नाही त्यावर आम्ही त्यांना सांगितले की, आपण ३५-३४ अशा अल्पबहुमतावर कामकाज चालविले आहे, आता तर आमच्याकडे ४०-२९ असे भरिव बहुमत असतांना आम्ही का नाही कामकाज चालवु शकणार?

मा. सभापती श्रीमती ज्योती कालानीः- या प्रस्तावावर मतदान घ्यायचे काय?



मा.सचिव :-या प्रस्तावास ज्या ज्या सदस्यांचा विरोध असेल त्यांनी आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या विरुध्दः-

१) श्री. रामचंद्र पारवानी
२) श्रीमती आशा राधवानी
३) श्रीमती भारती राजानी
४) श्रीमती यमुना सोनावाणे
५) श्रीमती सुरेखा वेलकर
६) श्री. कैलाश तेजी
७) श्री. रमेश चव्हाण

प्रस्तावाच्या बाजूनेः-

१) श्रीमती ज्योती कालानी
२) श्री. किशोर वनवारी
३) श्री. कुमार आयलानी
४) श्री. विनोद तलरेजा

५) श्री. ठाकूर बेहरानी
६) श्री. केणी जयकुमार
७) श्रीमती पदमा वलेचा

मा.सचिव :- प्रस्तावाच्या बाजुने व विरोधात समसमान मते असल्याने मा. पिठासिन अधिका-यांना जे निर्णायक मत आहे त्याचा त्यांनी वापर करणे आवश्यक आहे. म्हणुन त्यांनी आपले निर्णायक मत दयावे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- मी माझे निर्णायक मत प्रस्तावाच्या बाजुने देत आहे.

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी :-ठराव पारित करत आहात?

मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी :- कशा प्रकारे सभेचे कामकाज चालवत आहात, समजून येत नाही?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:- सभापतींना (कास्टिंग वोट) निर्णायक मत आहे, त्यानुसार ठरावाच्या बाजूने ८ मते होतात.

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :-सदरचा प्रस्ताव बहुमताने संमत करण्यांत येत आहे.

विषय :- प्रभाग क्र. ६८ मध्ये मा. महापौर व स्थायी समिती सभापती निधीतुन सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत करावयाच्या ७ कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर शहरातील विविध प्रभागातील कामे मा. स्थायी समिती सभापती / मा. महापौर निधीतुन करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने एकुण ७ कामीची प्राकलने तयार केलेली असुन त्यांची अंदाजित किंमत रूपये ११,०१,५२०/-इतकी होत आहे. सदर प्राकलने खालील प्रमाणे आहे.

१. उल्हासनगर- येथील प्रभाग क्र. ६८मध्ये बॅ. नं५०४-५११ येथे सिमेंट पायवाटा व नाल्या बनविणे. — १,००,५६०/-

२. उल्हासनगर-येथील सपना बागेमध्ये लोखंडी जाळया व अन्य कामा बाबत.(मा.स्थायी समिती सभापती निधी) — १,९९,९९०/-



३. उल्हासनगर- येथील सपना गार्डन मध्ये संरक्षक भिंत व अन्य कामे करणे.(मा.स्थायी समिती सभापती निधी) — १,९९,२००/-

४. उल्हासनगर-येथील सपना बागेमध्ये सुंदरीकरणे करणेसाठी विकास करणेसाठी.(मा.स्थायी समिती सभापती निधी) — १,०१,९८०/-

५. उल्हासनगर-३ येथील प्र. क्र६८ मध्ये गुरखा झोपडपट्टी बाजुस सी सी एम-२५० ने रस्ता बनविणे. (मा.महापौर निधी) — १,९९,९७०/-

६. उल्हासनगर-३ येथील प्र. क्र. ६८ मध्ये लायन्स गार्डन (समपा गार्डन) मध्ये सी सी एम-२५० ने बनविणे. (मा.महापौर निधी) — १,९९,९९०/-

७. उल्हासनगर-३ येथील प्र. क्र६८ मध्ये सपना गार्डनचे नुतनीकरण व सुशोभिकरण करणे. (लायन्स गार्डन) (मा.महापौर निधी) — ९९,८५०/-

सदर एकुण ७ प्राकलनांच्या अंदाजित रक्कम रू. ११,०१,५२०/- यांस प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणेसाठी स्थायी समिती सभेपुढे ठेवणेसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र</u>. २५ <u>दिनांक</u> :- २५. ५.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. पदमा वलेचा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्र. ६८ मध्ये मा. महापौर व सभापती स्थायी समिती यांच्या निधीतुन वर नमुद केलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत करावयाच्या ७ कामांचे एकुण रूपये ११,०१,५२०/- रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे तातडीची व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधीकृत करीत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>बहुमताने मंजुर.</u>

सभापती / पिठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u> विषय क्र. ६ वाचून दाखवितात.



<u>मा. सदस्य श्री. रामचंद पारवानीः-</u>याबाबत कोण सांगेल? एक महिन्यासाठी का देत आहात?

<u>श्री. दशोरे(उप विभागीय अभियंता)</u> :-निविदा मागविण्याची प्रक्रिया चालु आहे सर्व प्रक्रिया पूर्ण होण्यामध्ये एक महिन्याचा कालावधी लागेल पूढील १० महिन्याच्या कालावधीसाठी निविदा मागविण्यांत आलेल्या आहेत.

मा. सदस्य श्री.रामचंद्र पारवानी :- यानंतर निविदाकाराकडून काम करुन घेतले जाईल ना?

मा. सदस्य श्री. ठाकूर बेहरानी:- दुषित पाण्याची तक्रार दूर करण्यासाठी करावयाचे काम कितीही रक्कमेचे असो ते मंजूरीस आणले जाईल असे आपण म्हणाला होतात. त्याचे काय झाले?

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर १ ते ५ मध्ये पाईप लाईन, व चेम्बरचे
चोकअप काढणे व साफ करणे कामी वार्षिक देखभाल
दुरूस्तीचे अंदाजित रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय
मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर भुयार गटार योजने अंतर्गत कॅम्प नं. १ ते ५ मधील पाईप लाईन व चेंम्बर्स मधील चोकअप काढणे व साफ करणेचे काम एकुण पाच ठेकेदारांना देण्यांत आलेले आहे. या कामाची मुदत दि. ३१.५.२००१ रोजी संपत आहे.

हे काम पुढील दहा महिन्याच्या कालावधीत करून घेण्यासाठी निविदा काढण्यासाठी बराच वेळ जाईल तरी पुढील एक महिन्यासाठी देखभाल व दुरूस्तीसाठी अंदाजे २.५ लाख रू. खर्च येईल. अंदाजपत्रकांची अंदाजित रक्कम कॅम्प प्रमाणे खालील प्रमाणे आहे.

कॅम्प १ - रू.३,४१,४१२/-
कॅम्प २ - रू.३,६५,६२४/-
कॅम्प ३ - रू.४,७२,९०१/-
कॅम्प ४ - रू.४,६७,७८१/-
कॅम्प ५ - रू.४,०१,४६९/-

एकुण रू. २०,४९,१८७/-

तरी वरील सर्व बाबींचा विचार करून पुढील एक महिन्याच्या कालावधीकरिता देखभाल व दुरूस्तीसाठी अंदाजे २.५ लाख रू. च्या खर्चाला मान्यता देण्यात यावी हि विनंती. तसेच वरील अंदाजपत्रकाच्या एकुण २०,४९,१८७/-ला प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळावी हि विनंती.

स्थायी समिती ठराव क्र. २६ दि:-२५.५.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. जयकुमार केणी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. ठाकुर बेहरानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने व कारणांनुसार माहे जुन २००१ पर्यंत उल्हासनगर १ ते ५ मध्ये पाईप लाईन चेंम्बर्सचे चोकअप काढणे व साफ करणे कामी एकुण रक्कम रू. २० ,४९ ,१८७/-चे अंदाजित रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच या संबंधातील सध्याचे कार्यरत असलेल्या ठेकेदारांशी आयुक्तांना पुर्वीच्या संविदेतील अटीशर्ती व दराने माहे जुन २००१ करिता निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ७ वाचून दाखवितात.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः-</u> काय आहे?

<u>मा.सचिव</u> :-शाखा क्र. ५ येथिल कामासाठी लावलेल्या मजुरांबाबतचा प्रस्ताव आहे.

<u>मा. सदस्य श्री. ठाकूर बेहरानीः-</u> दुषित पाण्याच्या कामाबाबत मी जी विचारणा केली त्यांचे त्यांनी उत्तर दिले नसतांना आपण पूढचा विषय कसा पूकारलांत?माझ्या प्रभागातील दुषित पाण्याचे प्राकलन आपण ब-याच दिवसापासुन मंजुरीस आणत नाही आहात.

<u>श्री. दशोरे(उप विभागीय अभियंता):-</u> या कामासाठी निधी शिल्लक नाही. नविन जलवाहिनी टाकण्याकामीचे शिर्षात फक्त रुपये १ ,१० ,०००/- एवढीच रक्कम शिल्लक आहे, त्या रक्कमेत काम होण्यासारखे नसल्याने मंजूरीस आणले नाही. तरतूद उपलब्ध झाल्यावर हे काम मंजूरीस आणले जाईल.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :- जलवाहिनी टाकणे कामीचे शिर्षात तरतुद शिल्लक असो अगर नसो, दुषित पाण्याची तक्रार दूर करण्यासाठी करावयाच्या कामाचे कोणत्त्याही सदस्याच्या प्रभागातील काम असो ते मंजूरीस आणले जावे, आम्ही त्यास मंजूरी देवू.

कुण्या सदस्याच्या प्रभागात गटार-नाले- इत्त्यादीचे दुषित पाणी नळाद्वारे येत असेल तर अशा ठिकाणची पाईप लाईन बदली करणे आवश्यक आहे. अशा प्रस्तावाबाबत आपण असे लिहा की, स्थायी समिती मध्ये अशा प्रकारचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार हे काम करायचे आहे.

मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

--१४--

विषय :-आयुक्तांच्या थेट कार्य आदेशान्वये मे. शारदा मजुर कामगार सहकारी संस्था यांनी पाणी पुरवठा विभागा अंतर्गत असलेल्या शाखा क्र. ५ मधील कामाकरिता पुरविलेल्या मजुरांबाबत थेट संविदेस कार्योत्तर मंजुरी देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर शाखा क्र. ५ येथील देखभाल व दुरूस्तीकरिता रक्कम रू. १,५१,२००/-चे प्राकलन (कालावधी १.४.९९ ते ३०.९.९९)जिल्हा दरसुची ९६-९७च्या अधिन राहुन तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च C/B/iv (भाग -१) या शिर्षकातुन करण्यांत येणार आहे.

सदर काम १.४.९९ ते ३०.९.९९ या कालावधीमध्ये शारदा मजुर कामगार सहकारी संस्था यांचेकडुन करून घेण्यांत आले आहे. पाणी पुरवठा हा विभाग अत्त्यावश्यक सेवेत मोडत असल्याने काम चालु ठेवण्यात आले होते. सदर प्रस्तावास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

त्याकरिता सदर प्राकलन कार्योत्तर प्रशासकीय व वित्तिय मंजुरी करिता स्थायी समितीपुढे सादर.

स्थायी समिती ठराव क्र. २७ दि:-२५.५.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार दि. १.४.९९ ते ३०.९.९९ पर्यंत मा. आयुक्तांच्या थेट कार्यादेशान्वये शारदा मजुर कामगार सहकारी संस्था यांनी पाणीपुरवठा विभागा अंतर्गत असलेल्या शाखा क्र. ५ मधील कामांकरिता पुरविलेल्या मजुरां कामी थेट संविदेस मान्यता व अंतर्भुत खर्च रू. १,५१,२००/- यास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र. ८ वाचून दाखवितात.

__मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-__ कोणत्त्या निधितून?

__मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी:-__ माझ्या प्रभागातील काम आहे.

__मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी__ :-आम्ही हा प्रस्ताव संमत करतो?

__मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-__ आपला २५ लाखाचा निधी आहे, त्यातून या कामी निधि उपलब्ध करून दिला जावा.

--१५--

__मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी:-__ सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

__विषय :-__ __प्रभाग क्र६ मध्ये जलवाहिनी टाकणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.__

__प्रस्तावना :-__

उपरोक्त विषयांकित ठिकाणी जलवाहिनी टाकणे करिता रू. ७०,९५०/-चे प्राकलन जिल्हा दरसुची २०००-२००१च्या अधिन राहुन तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाच्या सर्व साधारण निधीतुन करण्यांत येणार आहे.

सदर कामास मा. आयुक्त यांनी स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यता दिली आहे.

तरी सदर प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी करिता स्थायी समिती पुढे सादर.

__स्थायी समिती ठराव क्र. २८__ __दि:-२५.५.२००१.__

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्र. ६ मध्ये ८० मी.मी. आणि ५० मी.मी. व्यासाची जीआय जलवाहिनी टाकणे कामी रू.७०,९५०/-च्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्त्यंत तातडीचे व आवश्यक असुन आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

__एकमताने मंजुर__

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सांयकाळी ५.३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>दिनांक</u>:-४.६.२००१.

### <u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक ४.६. २००१ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

<u>मा. सभापती</u> :- श्रीमती. कालानी ज्योती.

| | |
|---|---|
| २. श्रीमती.कुंदनानी लविना | सदस्या |
| ३. श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ४. श्री. बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ५. श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| ६. श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ७. श्री. तेजी कैलास | सदस्य |
| ८. श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| ९ श्री.वनवारी किशोर | सदस्य |
| १० श्रीमती.वलेचा पदमा | सदस्या |
| ११ श्रीमती. वेलकर सुरेखा | सदस्या |
| १२ श्रीमती. सोनावणे यमुना | सदस्या |
| १३ श्रीमती. राधवानी आशा | सदस्या |
| १४ श्री.केणी जयकुमार | सदस्य |

तर

मा. श्री. आयलानी कुमार, श्री.पारवानी रामचंद हे सदस्य सभेस अनुपस्थितीत होते.

सायंकाळी ५. ०० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>मा. सचिव :-</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक २५. ५.२००१ चे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :-दि.२५.५.२००१ रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

<u>मा. सचिव :-</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>सविस्तर माहिती दिली जावी, कसले काम आहे?

--२--

<u>श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u>४२ विंधन विहिरींना जेटपंप बसवुन यापुर्वीच कार्यान्वित केलेले आहेत, व आता हे ६-७ असे मिळुन ४८-४९ जेटपंपाच्या वार्षिक देखभालदुरूस्तीसाठी रू. १,९०,०००/-चे प्राकलन तयार केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>ज्या ७८ विंधन विहिरींना जेटपंप बसवायचे आहेत, मग ते वेगळे आहेत का?

<u>श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u>ते ७८ जेटपंप वेगळे आहेत, आता जेवढया विंधन विहीरींना जेटपंप बसविले आहेत त्यांच्या वार्षिक देखभालीच्या खर्चाचे हे प्राकलन आहे.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u>हे काम नगरसेवक निधीतील आहे काय?

<u>श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u>सर्व साधारण निधीतील आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>जेट पंपाच्या देखभाल दुरूस्तीचे काम आहे काय?

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>हे काम कोण करेल?

<u>श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u> ऐजन्सी मार्फत करून घेतले जाईल.

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>कोणत्त्या ऐजन्सी मार्फत?

<u>श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u>निविदा मागवु, जी ऐजन्सी निवडली जाईल त्या ऐजन्सी मार्फत हे काम करून घेतले जाईल.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- . महापालिकेच्या हद्दीतील जेटपंप यांची देखभाल दुरूस्तीकामी प्राकलनीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

महानगरपालिकेच्या या कार्यालयाने शहरात व परिसरात सुमारे ४९ विंधन विहीरींना जेटपंप बसवून कार्यान्वीत केलेले आहेत तसेच मागील वर्षी ७८ जेटपंप बसविणे प्राकलन पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने मंजूर होवून देखील कार्यान्वीत झालेले नव्हते ते आता परत आवश्यक निधीचे सुधारित अंदाजपत्रकात समायोजन अपेक्षित धरून कार्यवाहित आणलेले आहे. सदर परिस्थिती लक्षात घेवून या कार्यालयाने रुपये ३ ,०७ ,२८९/- या रक्कमेचे अंदाजीत प्राकलन तयार केलेले होते. व लेखा शाखेस अभिप्रायासाठी अग्रेसित केलेले होते.

लेखा शाखेने सदर प्राकलन रक्कमात कमी करुन रुपये १ ,९० ,०००/- यास मान्यता दिली व त्यास मा. आयुक्त यांनी पुढील कार्यवाहीसाठी आदेश दिले सबब सदर प्रकरण प्रशासकिय व वित्तीय मान्यतेसाठी स्थायी समिती सभेपूढे ठेवणे आणि तदनंतर त्वरीत जाहिर निविदा सुचना काढुन सदर काम योग्य ठेकेदारामार्फत सुरु करणेची परवानगी मिळण्यासाठी सदर बाब सादर करीत आहोत.



स्थायी समिती ठराव क्र. २९ दि:-४ . ६ . २००१ .

सुचकाचे नाव :-श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. पदमा वलेचा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार महानगरपालिकेच्या हद्दीतील जेटपंपाची देखभाल दुरूस्ती कामी रू. १ ,९० ,०००/-च्या प्राकलनिय रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर
सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-हा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- नगरसेवक निधीतुन प्रभाग क्र. १०/ ६६ मध्ये जेट पंप आणि प्रभाग क्र. ६ व ३६ मध्ये विंधन विहिरी खोदुन त्यावर हातपंप बसविणे कामी प्राकलनीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत तसेच आयुक्तांस मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना :-

महानगरपालिकेच्या विविध नगरसेवकांनी पाणी टंचाईच्या ठिकाणी आपले प्रभागात खाली नमुद केलेली कामे स्वत:चे नगरसेवक निधितून करुण



देणे बाबत या कार्यालयात अर्ज सादर केलेले आहेत. सबब त्या कामांची प्राकलने तयार केलेली आहेत त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे सविस्तर वर्णन | प्रभाग क्र. | अंदाजित प्राकलन रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १) | विविध ठिकाणच्या पुरेसे पाणी असलेल्या विंधन विहिरींना तीन ठिकाणी जेटपंप बसविणे आणि कार्यान्वीत करणे. | १० | रु. १ ,७५ ,७०७/- |
| २) | विविध ठिकाणीच्या पुरेसे पाणी असलेल्या विंधन विहिरींना दोन ठिकाणी जेटपंप बसविणे | ६६ | रु. १ ,१७ ,१३८/- |
| ३) | दोन विविध ठिकाणी नविन विंधन विहिरी खोदुन त्यांना हातपंप बसवून कार्यान्वीत करणे. | ०६ | रु. ८३ ,६६७/- |
| ४) | एका ठिकाणी नविन विंधन विहिरी खोदून त्यावर हातपंप बसवून कार्यान्वीत करणे. | ३६ | रु. ४१ ,८३४/- |

उपरोक्त सर्व कामाची आणि त्यांच्या अंदाजित प्राकलनाची मा. मुख्य लेखा अधिकारी व मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेली असून मा. आयुक्त यांनी पुढील कार्यवाहीस मान्यता दिलेली आहे. सबब सदर बाबी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळण्यास आणि सदर कामे संबंधीत योग्य ठेकेदार किंवा मजूर कामगार

सोसायटी मार्फत त्वरीत सुरु करण्यास परवानगी मिळण्यासाठी स्थायी समिती सभेपूढे ठेवण्यास सादर करीत आहोत.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ३०</u> <u>दि:-४.६.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.
अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. लविना कुंदनानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार नगरसेवक स्वेच्छा निधीतुन वर नमुद केलेल्या जागी प्रभाग क्र. १० व ६६ मध्ये विंधन विहिंरींना एकुण पाच जेटपंप बसविणेकामी आणि प्रभाग क्र६ व ३६ मध्ये एकुण तीन विंधन विहिरी खोदुन त्यांना हातपंप बसविणे कामीच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच पाणी टंचाईमुळे सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--५--

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u>हा प्रस्ताव समंत केला जावा.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-यामध्ये एक छोटीशी दुरूस्ती करावयाची आहे. गोषवा-यामध्ये बॅरेक क्र. २०८५ अशी नोंद आलेली आहे. त्याऐवजी बॅरेक क्र. २०५८ अशी नोंद हवी आहे.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत बॅरेक क्र. २०५८ ते संतोषी माता मंदीर मार्गे गायकवाड पाडा उल्हासनगर-५ येथे दिवाबत्ती बसविणे कामी मेसर्स जाधव ॲण्ड सन्स, कल्याण सर्वात लघुत्तम दराच्या निविदाकाराशी आयुक्तांनी केलेल्या संविदेच्या माहितीची <u>कार्यवृतात नोंद करणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना :-</u>

सादर करण्यात येत आहे की, महानगरपालिकेने जे एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्रमांक १ अंतर्गत बॅरेक नं. २०५८ ते महापालिका हद्दीपर्यंत व्हाया गायकवाड पाडा जे रस्ता हाती घेतलेला आहे, त्या रस्त्याचे बॅरेक नं. २०५८ ते संतोषी माता मंदिर पर्यंत रस्त्याचे काम संपूर्ण होत आलेले असून त्या रस्त्याची पहाणी करुन तिथे दिवाबत्ती बसविण्याचे प्राकलन रुपये ३,००,३२०.५ तैयार करुन वर्तमान पत्रात निविदा सूचना देउन शिलबंद निविदा मागविलेल्या आहे.

तीन निविदा धारकांनी वेळेवर इशारा रक्कमेसह निविदा भरलेल्या आहे त्यांचा तुलनात्त्मक तक्ता खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

मे. जाधव ॲण्ड सन्स कल्याण १०.०१ टक्के प्राकलन रक्कमपेक्षा कमी, मे. बी. जे. इलेक्ट्रीक कंपनी नासिक ६ टक्के प्राकलन रक्कमेपेक्षा कमी आणि मे. जयेश इंजिनिअरींग कार्पोरेशन मुंबई ८ टक्के प्राकलन रक्कमेपेक्षा कमी असे दर दिलेले आहे.

वरील तुलनात्त्मक तक्ते अनुसार मे. जाधव ॲण्ड सन्स कल्याण यांचे दर सर्वात कमी असून त्यांच्या निविदेस मंजूरी देवून लागणा-या खर्चास मा. आयुक्तांनी दिनांक २५.५.०१ रोजी दिलेल्या मंजूरीची माहिती स्थायी समितीपूढे सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ३१</u> <u>दिः-४.६.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशार वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. लविना कुंदनानी.

--६--

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत बॅरेक क्र. २०५८ ते संतोषी माता मंदीर मार्गे गायकवाड पाडा, उल्हासनगर-५ येथे दिवाबत्ती बसविणे कामी मेसर्स जाधव ॲण्ड सन्स, कल्याण या सर्वात लघुत्त्तम दराच्या निविदाकाराशी आयुक्तांनी केलेल्या संविदेच्या माहितीची आजच्या सभेच्या कार्यवृतांतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-नगरसेवक निधीतील आहे काय?

श्री आयलानी. (कार्यकारी अभियंता विद्युत):-गोषवा-यात दिले आहे.

मा.सचिव :-प्रशासकीय व वित्तियच मान्यता दयायची आहे ना?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-या प्रस्तावात प्रशासकीय व वित्तिय मान्यता व्यतिरिक्त याकामी आयुक्तांना मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे. याबाबीचा या ठरावात समावेश करण्यांत यावा कारण हे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असे आहे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-मा. सदस्य श्री. किशोर वनवारी यांनी सुचविलेल्या दुरूस्त्यांसह सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- नगरसेवक निधीतुन प्रभाग क्र. ३९ व प्रभाग क्र. ४१
मध्ये रस्त्यावरील दिवा बसविणे कामी दोन
प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. ३२ दि:-४.६.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. जयकुमार केणी.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. पदमा वलेचा.

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.



तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र.३९ मध्ये घोषित गलिच्छ वस्ती, गौतम नगर, बुध्द नगर, गुरूतेगबहादुर नगर येथे रस्त्यावरील दिवाबत्ती बसविणे. (नगरसेवक निधीतुन) | रू.९३,५००/- |
| २. | उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र.४१ मध्ये घोषित गलिच्छ वस्ती,फॉलवर लाईन येथे रस्त्यावरील दिवाबत्ती बसविणे. (नगरसेवक निधीतुन) | रू.२,००,०००/- |

-------------------------------------------------------------

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा/ श्री. किशोर वनवारी:-हा प्रस्ताव समंत केला जावा.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-माणसे मिळत नाहीत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-एखादया प्रभागात पाईप लाईन चोकअप असेल तर ते काढण्यासाठी माणसे दिली जातात.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मा. आयुक्तांच्या थेट कार्य आदेशान्वये मेसर्स. बजरंगबली मजुर कामगार सहकारी संस्था यांनी पाणी पुरवठा विभागा अंतर्गत असलेल्या शाखा क्र. ५ मधील कामाकरिता दि. १.४.२००१ ते दि. ३१.७.२००१ च्या कालावधीसाठी मजदुर पुरविणेकामी थेट संविदेस कार्योत्तर मंजुरी देणे बाबत.



प्रस्तावना:-

उल्हासनगर शाखा क्र. ५ येथिल देखभाल व दुरुस्ती करित रक्कम रुपये ६४,४१६/- चे प्राकलन (कालावधी १.४.२००१ ते ३१.७.२००१) जिल्हा दरसूची ९८-९९ च्या आधिन राहून तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च c /B/iv (भाग-१) या लेखा शिर्षाकातून करण्यात येणार आहे.

सदर काम १.४.२००१ ते ३१.७.२००१ या कालावधीमधील आहे व सध्या ते काम बजरंगबली मजूर कामगार संस्था यांचेतर्फे राबवण्यात मजूर कामगार सहकारी संस्था यांचेतर्फे राबवण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्तावास स्थायी समितीपूढे ठेवण्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी सदर प्रस्तावास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी करीता स्थायी समिती पुढे सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ३३</u> <u>दिः-४.६.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. ठाकुर वेहरानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार आयुक्तांच्या थेट कार्यादेशान्वये मेसर्स बजरंगबली मजदुर कामगार सहकारी संस्था यांनी पाणी पुरवठा विभागाअंतर्गत शाखा क्र. ५ मधील कामाकरिता दिनांक १.४.२००१ ते ३१.७.२००१ या कालावधीसाठी मजुर पुरविणे कामी थेट संविदेस मान्यता व अंर्तभुत खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>सदरचा प्रस्ताव समंत केला जावा.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--९--

<u>विषय :-</u> नगरसेवक निधीतुन प्रभाग क्र. १८ आणि ४१, ४२ मध्ये जेट पंप बसविणेकामी प्राकलनिय रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत तसेच मा. आयुक्तांस मजदुर कामगार सहकारी संस्थेशी निविदा शिवाय थेट संविदेस <u>प्राधिकृत करणे बाबत.</u>

प्रस्तावना:-

महानगरपालिकेच्या विविध नगरसेवकांनी पाणी टंचाईच्या ठिकाणी आपले प्रभागात खाली नमुद केलेली कामे स्वत:चे नगरसेवक निधितून करुण देणे बाबत या कार्यालयात अर्ज सादर केलेले आहेत. सबब त्या कामांची प्राकलने तयार केलेली आहेत त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे सविस्तर वर्णन | प्रभाग क्र. | अंदाजित प्राकलन रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १) | विविध ठिकाणी पुरेसे पाणी असलेल्या विंधन विहिरींना दोन ठिकाणी जेटपंप बसविणे आणि एक ठिकाणी नविन विंधन विहिरी खोदुन तीला जेटपंप बसविणे. | १८ | रु. १,९८,०००/- |
| २) | विविध ठिकाणी पुरेसे पाणी असलेल्या विंधन विहिरींना जेटपंप बसवुन ते कार्यान्वित करणे.<br>१)समाज मंदिर जवळ- ४१<br>२)शिवाजी नगर - ४२ | ४१<br>४२ | रु. १,१७,१४०/- |

उपरोक्त सर्व कामाची आणि त्यांच्या अंदाजित प्राकलनाची मा. मुख्य लेखा अधिकारी व मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेली असून मा. आयुक्त यांनी पुढील कार्यवाहीस मान्यता दिलेली आहे. सबब सदर बाबी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळण्यास आणि सदर कामे संबंधीत योग्य ठेकेदार किंवा मजूर कामगार सोसायटी मार्फत त्वरीत सुरु करण्यास परवानगी मिळण्यासाठी स्थायी समिती सभेपूढे ठेवण्यास सविनय सादर करीत आहोत.

स्थायी समिती ठराव क्र. ३४ दि:-४.६.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. जयकुमार केणी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार नगरसेवक निधीतुन प्रभाग क्र. १८ आणि ४१ व ४२ मध्ये वर नमुद केलेल्या जागी विंधन विहिरी खोदणे आणि विविध ठिकाणी जेटपंप बसविणे कामीच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच पाणी टंचाईमुळे सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयुक्तांना मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>या प्रस्तावाबाबत मी बोलेन, मागच्या वेळी हा प्रस्ताव आयत्यावेळच्या विषयान्वये आणण्याचा प्रयत्न केला गेला होता. परंतु त्या प्राकलनावर शहर अभियंत्त्यांची स्वाक्षरी नव्हती, आयुक्तांची सुध्दा स्वाक्षरी नव्हती, त्यावेळी अशी चर्चा झाली होती की, या रस्त्त्याचा प्रस्ताव जर मंजुरीस आणत असाल तर त्याच बरोबर श्रीमती. लविना कुंदनानी यांच्या प्रभागातील नागेश्वर मंदिर ते स्टेशन पर्यंतचा रस्ता, अशोक टॉकीज ते आयोध्या नगर व्हाया मनीष नगरचा रस्त्ता शिवाजी चौक ते संतु बिल्डींग पर्यंतचा रस्ता व श्री. प्रमोद टाले यांच्या प्रभागातील पंचशिल नगर, सानिध्य अपार्टमेंन्ट ते साईबाबा नगर व श्री. बी.बी.मोरे यांच्या कार्यालया समोरील पूर्नवसन साईटच्या रस्त्त्याचे काम सुध्दा मंजुरीस आणले जावे, हया सर्व रस्त्त्यांची कामे एकाचवेळी मंजुरीस आणली जातील.

३० सेक्शनच्या रस्त्त्याचे काम मंजुर होण्या अगोदरच या रस्त्त्यात बाधीत होणारी बांधकामे तोडली जात आहेत हे कसे?

<u>मा.सदस्या श्रीमती. आशा राधवानी / श्रीमती भारती रजानी :-</u>मागच्या वेळी असे म्हंटले होते की, शहर अभियंत्त्यांनी जर या प्राकलनावर स्वाक्षरी केल्यानंतर हा ठराव पारीत केला जाईल.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>शहर अभियंत्त्यांच्या स्वाक्षरी विना?

<u>मा.सदस्या श्रीमती. भारती रजानी:-</u>त्यावेळी याबाबत जी चर्चा झाली होती त्याची इतिवृतांतात सुध्दा नोंद घेतली नव्हती. परंतु ते इतिवृत्त कायम करण्याच्यावेळी याबाबीकडे आम्ही लक्ष वेधले होते त्याची इतिवृतांतात नोंद आलेली आहे.

<u>मा.सदस्या श्रीमती. आशा राधवानी:-</u>सभापती महोदया, आपणच म्हंटला होतात की, आपण हा प्रस्ताव आणा आम्ही मंजुर करू म्हणुन.

<u>मा.सदस्या श्रीमती. भारती रजानी :-</u>ओटी सेक्शन ते विनस पर्यंतचा जो मुख्य रस्ता तयार केला आहे. त्यास जोडुन गटार बांधणे आवश्यक आहे. त्यासाठी ३० सेक्शन ते व्ही.टी.सी. स्पोर्टस कॉम्प्लेक्स पर्यंत गटार जोडावे लागेल म्हणुन याकामी वाढीव खर्चाची गोष्ट नाही. कारण त्याचा मुख्य रस्त्त्याच्या प्राकलनामध्ये समावेश होतो.

<u>*मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-*</u>*हा प्रस्ताव रद्द केला पाहिजे.*

<u>*मा.सदस्य श्री. भारती राजानी :-*</u>*प्रस्ताव रद्द करण्याचे कारण तर सांगा?*

<u>*मा.सदस्या श्रीमती. आशा राधवानी :-*</u>*स्थायी समितीच्या मागच्या सभेत आपण काय म्हंटले होते?*

<u>*मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-*</u>*हा प्रस्ताव रद्द केला जावा.*

<u>*मा.सदस्य श्री. कैलास तेजीः-*</u>*श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांच्या प्रभागातील रस्त्त्याचे काम कसे मंजुर केले?*

<u>*मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-*</u>*सुधारित अर्थ संकल्पात या कामी रक्कम समायोजित करून हे काम पुढच्या वर्षी करण्यांत येणार आहे.*

<u>*मा.सदस्या श्रीमती. राधवानी आशाः-*</u>*इतर रस्त्त्यांच्या कामांची प्राकलने तयार करून मंजुरीस आणली जावीत त्याबाबत आम्ही आपणांस विरोध करत नाहीत.*

<u>*मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-*</u>*हया प्रस्तावाबाबत मतदान घेतले जावे, जकनुश कंन्स्ट्रक्शन कंपनीला ब्लॅक लिस्टमध्ये टाकले आहे. त्यांनाच हे काम देण्याबाबत आपण म्हणत आहात. कॅम्प-४ येथील रस्ता तयार करण्यासाठी त्यांनी ३ वर्षे लावली,त्या रस्त्त्यामध्ये खड्डे पडले असल्याने ते इनजेक्शन मारून खड्डे भरून काढत आहेत.*

<u>*मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-*</u>*जकनुश कंन्स्ट्रक्शन कंपनीवाला ब्लॅक लिस्टमध्ये आहे तर त्यास काम दिले कसे?*
<u>*मा.सदस्य श्री. कैलास तेजी :-*</u>*माझ्या विभागातील नगरसेवक निधीतील काम त्यांना देऊ नये असे मी शहर अभियंत्त्यास सांगितले होते तरीही त्यांनी त्यांना ते काम कसे दिले?*

<u>*मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-*</u>*ते प्रशासनास विचारा?*

<u>*मा.सदस्या श्रीमती. आशा राधवानीः-*</u>*मी सभापतींना विचारते की, हा प्रस्ताव का रद्द करत आहात? प्रस्ताव रद्द करण्यास कारणे काय आहेत?*

<u>*मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-*</u>*३० सेक्शनच्या या रस्त्त्याबाबत श्री. महेश मिराणी यांची ही तक्रार आहे, त्यांनी फोटोसुध्दा दिलेले आहेत. रस्त्त्यामध्ये गैर बाधीत होणा-या बांधकामांचे फोटो दिलेले आहेत.*

<u>*मा.सदस्या श्रीमती. भारती राजानीः-*</u>*अशा प्रकारच्या कित्त्येक तक्रारी आम्ही सुध्दा आणु शकतो.*

<u>*मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-*</u>*रस्त्त्याचे काम मंजुर झाले नाही त्या अगोदरच बांधकामे तोडण्यास सुरूवात केलीत?*

मा.सदस्या श्रीमती. भारती रजानीः-ओटी सेक्शन ते विनस पर्यंतचा जो मुख्य रस्ता आहे. त्याच्या (फेनिंगसाठी)वळणावर बाधीत होणारी बांधकामे प्रशासनामार्फत तोडण्यात आलेली आहेत. आता तुम्ही जे म्हणतात तो तुमचा गैरसमज आहे. जर आम्ही ३० सेक्शन ते व्ही.टी.सी स्पोर्टस कॉम्प्लेक्स पर्यंतच्या रस्त्त्यास मंजुरी दिली तर केवळ १२ लाखाचे खर्चाचे ओझे पडेल



त्यापेक्षा जास्त काही नाही. रूपये १० लाखाचा निधी मी माझ्या स्वेच्छा निधीतुन देत आहेत.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः-आता हया कामास मंजुरी दया, यानंतर सर्वांची कामे एक साथ आणली जावीत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-श्रीमती. लविना कुंदनानी कॅम्प-४ च्या नगरसेविका आहेत त्यांच्या प्रभागातील रस्त्त्याचे काम सुध्दा मंजुरीस आणले जावे, त्याच बरोबर भाऊ श्री. ठाकुर बेहरानी, श्री. प्रमोद टाले यांच्या प्रभागातील रस्त्त्याचे काम सुध्दा मंजुरीस आणले जावे तसेच पुर्नवास साईटच्या रस्त्त्याचे काम सुध्दा मंजुरीस आणले जावे हया सर्वांची कामे एकत्रितपणे मंजुरीस आणली जावीत असे सभागृहाचे मत आहे.

मा.सदस्या श्रीमती. भारती रजानीः-आपल्या प्रभागाचे उद्यानांतील कामास पुरेसा निधी उपलब्ध नसतानाही आम्ही सर्व संमतीने मंजुरी दिली, आमच्या प्रभागाचे उद्यानातील कामे नव्हती का?

मा.सदस्या श्रीमती. आशा राधवानीः-आपणास ९ सदस्य आहेत, बहुमत आहे म्हणुन आपण असे करत आहात?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-आज सभागृहात आमचे नऊ सदस्य नाहीत.

मा.सदस्या श्रीमती. भारती रजानीः-रस्त्त्याचे हे काम काय आमच्या घरचे काम आहे?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-तर काय आमच्या घरचे काम आहे?

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :- तर आपल्या प्रभागातील रस्त्त्याची कामे हे लोक कधी मंजुरीस आणतील?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-प्रमोद टाले यांच्या प्रभागातील सुध्दा रस्त्त्याचे काम आहे ते सुध्दा मंजुरीस आणले जावे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः-ज्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकले होते त्यांना हे काम का देत आहात?

मा.सदस्या श्रीमती. राधवानी आशा :-हा प्रस्ताव रदद करण्याची आपण कारणे सांगा?

मा.सदस्या श्रीमती. भारती रजानीः-प्रस्ताव रदद करण्यास काहीही कारणे नाहीत.

मा.सदस्य श्री. प्रमोद टालेः-इतर प्रभागातील प्राकलने कधी मंजुरीस आणणार?

श्री.चिजवानी (शहर अभियंता सा.बा.वि):-त्यास थोडा वेळे लागेल.

मा. सदस्या श्रीमती. लविना कुंदनानी:-माझ्या प्रभागातील रस्त्त्याचे काम कधी मंजुरीस आणणार? मी कितीतरी वेळेपासुन आपणांस वारंवार बोलत आहे.



मा.सदस्या श्रीमती. भारती राजानी:-आपण म्हणाला होतात सर्वांची कामे मंजुर केली जातील तर आता या कामास का हरकत घेता?

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा:-आपण आता ज्याचे नाव सुचविले आहे ते ब्लॅक लिस्टमध्ये आहेत. पूढच्या आठवडयात आपण आणखी काही रस्त्त्याच्या कामाची प्राकलने मंजुरीस आणा व चांगल्या ठेकेदारांची नावे सुचवा.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- ब्लॅक लिस्ट वाल्यांना काम का देता? प्रदिप रामचंदानी यांना काम कसे देता?

मा.सदस्य श्री. कैलास तेजी:-हा प्रस्ताव रदद का करता? त्याऐवजी सर्वांच्या प्रभागातील कामे एकत्रितपणे मंजुरीस आणा.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-रस्त्त्यांचे काम मंजुर होण्या अगोदर त्यावरील बांधकामे तोडावयास नको होती.

मा.सदस्या श्रीमती. भारती राजानी:-रस्त्त्याच्या वळणास बाधीत होणारी बांधकामे पुर्वीच तोडली आहेत. आता कोणतीही बांधकामे तोडली नाहीत.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-एखादया पक्षाच्या नगरसेवकाच्या प्रभागातील कामाकडे जाणीव पुर्वक दुर्लक्ष करून कामे केली नाही पाहिजेत. कामे करायची झाली तर सर्वांच्या प्रभागातील झाली पाहिजेत.

मा.सदस्या श्रीमती. भारती राजानी:-या कामास अगोदरच उशीर झालेला आहे.

श्री. चिजवानी (शहर अभियंता सा.बा.वि):-इतर रस्त्त्याची प्राकलने तयार करण्यास वेळ लागेल.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-दीड वर्षामध्ये आपणास वेळ मिळाला नाही?

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-हया कामास मंजुरी दया, इतर कामे नंतर आणली जावीत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-श्रीमती. लविना कुंदनानी यांच्या प्रभागातील रस्त्त्याचे काम का होत नाही? ओटी सेक्शन ते वीनस पर्यंतच्या रस्त्त्याचे काम तीन वर्षापुर्वीच संपलेले आहे. त्या तीन वर्षाच्या अखेरीस खर्च न होता जी रक्कम तशीच राहीली असेल तर ती पुढील दोन वर्षपैकी कोणत्त्याही वर्षाच्या अर्थसंकल्पात नमुद केलेल्या

यथार्थ स्थिती महापालिका निधीच्या प्रारंभिक शिल्लकेत घेतली पाहिजे होती. आताच्या ह्या रस्त्यासाठी तीचा वापर करता कामा नये.

<u>मा.सदस्या श्रीमती. भारती राजानी:-</u>ते तुमच्या प्रशासनाच्या माहितीप्रमाणे मुख्य रस्त्याच्या सुधारित प्राकलनास मागील शिल्लक राहिलेला निधी विनिर्दिष्ट केलेला आहे. आणि प्रशासनाने तो निधी यासाठी उपलब्ध करण्याची शक्यता दर्शविली आहे. तर ती त्यांची जबाबदारी आहे.

<u>मा.सचिव :-</u>या प्रस्तावावर मतदान घेऊ इच्छिता काय?

हा प्रस्ताव पारीत करत आहात कि रद्द? की, पुढे ढकलत आहात.



<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>प्रस्तावाच्या बाजुने जे सदस्य आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

१. श्रीमती. ज्योती कालानी
२. श्रीमती. लविना कुंदनानी.
३. श्री. ठाकुर बेहरानी
४. श्री. टाले प्रमोद
५. श्री. तलरेजा विनोद
६. श्री. वनवारी किशोर
७. श्रीमती. वलेचा पद्मा
८. श्री. केणी जयकुमार

प्रस्तावाच्या विरोधात जे सदस्य आहेत त्यांनी आपले हात वर करावेत.

१. श्री. रमेश चव्हाण
२. श्री. तेजी कैलास
३. श्रीमती. राजानी भारती
४. श्रीमती. वेलकर सुरेखा
५. श्रीमती. सोनावणे यमुना
६. श्रीमती. राधवानी आशा

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>ब्लॅक लिस्ट वाल्यांना कुणी काम दिले?

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>त्या रस्त्यावर ऐवढा मोठा खड्डा आहे की, एखादी स्कुटर तेथुन जाऊ शकत नाही.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>नोव्हेंबर १९९९च्या स्थायी समिती सभेने या तीन-चार लोकांना ब्लॅक लिस्ट मध्ये टाकले होते. त्यात जकनुश कन्स्ट्रक्शन कंपनी, प्रदीप रामचंदानी व इंदु वरलीयानी यांची नावे होती. आता त्यांना कामे कशी दिलीत?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-मागच्या वर्षी स्थायी समितीच्या सभेत श्रीमती. सुनिता राजवानी यांनी म्हंटले होते की, या लोकांना ब्लॅक लिस्ट मध्ये टाका. व त्यानंतर या लोकांना ही कामे देण्यांत आली आहेत, ती कुणी दिली?

श्री. चिजवानी (शहर अभियंता सा.बा.वि):-आता कामे दिली कुठे आहेत? काम देण्यासाठी शिफारस केली आहे, त्यालोकांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकले गेले नव्हते, आमच्याकडे त्यांची संस्था नोंदणी नाही. जेथे संस्था नोंदणी केली जाते. तेच लोक त्या संस्थेस ब्लॅक लिस्ट मध्ये टाकु शकतात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-जेथे संस्थेची नोंदणी केली जाते, तेथे आपण असे लिहुन पाठवा की, अमुक अमुक हया संस्थाना उल्हासनगर महानगरपालिकेने ब्लॅक लिस्टमध्ये टाकले आहे आपण सुध्दा त्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाका.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-त्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्याबाबत स्थायी समितीने सर्व संमतीने असा ठराव पारीत केला होता,त्यानुसार आपण त्यांना (जिल्हा उपनिर्बंधकांना)पत्र लिहिले होते का?

श्री. चिजवानी (शहर अभियंता सा.बा.वि):-तसे पत्र पाठवु.

--१५--

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-जो ठराव आम्ही १९९९ मध्ये सर्व संमतीने पारीत केला तो कार्यवाहीसाठी अदयाप तुम्ही पाठविला नाही?

मा.सदस्या श्रीमती. भारती राजानी:-हे अतिशय घाणेरडे राजकारण आहे. शहरात रस्ते तयार होवोत अगर न होवोत? मी या सभागृहातुन सभा त्याग करत आहे.

सायंकाळी ५.२४ वाजता श्रीमती. भारती राजानी या सभागृहातुन बाहेर पडल्या.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्तावाबाबत बहुमताने पुढील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर-४ येथील बॅरेक क्र. १४९० ते व्ही.टी.सी. स्पोर्टस कॉम्पलेक्स पर्यंतच्या उर्वरित रस्त्त्यांचे सिमेंटी क्रॉक्रिटीकरण करणे व फुटपाथ व गटारे बांधणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे व कार्यरत ठेकेदार मेसर्स जकनुश कंन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना:-

उपरोक्त विषयानुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने ठराव क्र. १११ दिनांक ९/९/१९९८ अन्वये उल्हासनगर-४ येथील ओ टी.सेक्शन पर्यंतच्या टोकापर्यंत सिमेंट कॉक्रेटनाल्या, फुटपाथ व मो-या बांधण्याचे काम अंदाजे १७९,०८,२००/-इतकी प्राकलनिय किंमत आहे. त्याप्रमाणे तरतुद केली आहे. सदर कामाची निविदा किंमत ११८,३८,६८०/-इतकी आहे. सदर रस्ता एकात्मिक रस्ते विकास योजना अंतर्गत टप्पा १ मधील असुन सदर रस्त्त्यांचे सिमेंट कॉक्रीटीकरण करण्यात येत असल्याने या रस्त्त्यावरील नाल्याचे व रस्त्त्याची पातळी कमी करावी

लागल्यामुळे पावसाळयात पाण्याचा निचरा न झाल्यामुळे दरवर्षी नादुरूस्ती होत असतात त्यामुळे सदर रस्ते सिमेंट कॉक्रिटीकरण करणाने बांधले असता दरवर्षी या रस्त्याचे डागडुजीसाठी होणारा खर्च टाळता येईल याकामी एकात्मिक रस्ते विकास कार्यूमांतील उल्हासनगर-४ येथील ओटी सेक्शन चौक ते विनस सिनेमा जवळील २५ सेक्शनच्या टोकापर्यंत रस्त्याचे कामात काही प्रमाणात शिल्लक रक्कम रहात आहे तसेच सदर रस्त्याच्या कामासाठी संबंधित प्रभागाची नगरसेविका श्रीमती. भारती नरेंद राजानी यांनी त्यांच्या नगरसेवक स्वेच्छा निधीतुन १०,००,०००/-रू. देखिल दिलेले आहे. नगरसेकव स्वच्छा निधीतील काम प्रगती पथावर आहे परंतु सदर नगरसेकव निधीतुन रस्त्याचे काम पुर्ण होत नसल्यामुळे संबंधित नगरसेविका यांनी सुचविल्यानुसार मुख्य रस्त्याच्या शिल्लक रक्कमेतुन निधी उपलब्ध करून उर्वरित शिल्लक काम पुर्ण करण्यासाठी प्रस्तावित आहे. सदर काम उल्हासनगर ४येथील ओटी सेक्शन चौक ते विनस सिनेमा जवळील २५ सेक्शनच्या टोकापर्यंतच्या रस्त्याचे कामाचे कंत्राटदार मेसर्स जकनुश कंट्रक्शन यांचे कडुन त्यांचे निविदेच्या दराने व निविदेच्या अटी व शर्तीनुसार करण्यासा प्रस्तावित करण्यात येत आहे. जेणेकरून काम तातडीने हाती घेऊन पुर्ण करण्यात येईल. तरी उपरोक्त उल्हासनगर -४ येथील बॅरेक नं. १४९० ते व्ही.टी. स्पोर्टस कॉम्प्लेक्स चौका पर्यंतच्या रस्त्याचे उर्वरित कॉक्रिटीकरण करणे व फुटपाथ व गटारे बांधणे रू. २६,९५,०००/-खर्चाची उर्वरित कामे मेसर्स जकनुश कंन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याकडुन करून घेण्यास स्थायी समितीपुढे मान्यता मिळण्यासाठी प्रस्तावित येत आहे.



तरी पुढील आदेशार्थ स्थायी समितीपुढे ठेवण्यास प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ३५</u> <u>दि:-४.६.२००१.</u>

सुचकाचे नाव :-१)श्री. प्रमोद टाले.

२)श्रीमती. लविना कुंदनानी.

अनुमोदकाचे नाव :-१)श्री. किशोर वनवारी.

२)श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर-४ येथील बॅरेक नं. १४९० ते व्ही.टी.सी. स्पोर्टस कॉम्प्लेक्स पर्यंतच्या उर्वरित रस्त्याचे सिमेंटी, कॉक्रीटीकरण करणे, फुटपाथ व गटारे बांधणे कामी रू. २६,९५,०००/-च्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत नाही.

तसेच निविदा न मागविता सध्या कार्यरत ठेकेदार मेसर्स जकनुश कंन्स्ट्रक्शन कंपनी यांच्याशी पुर्वीच्या निविदेतील अटी व शर्तीवर थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करीत नाही.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

**बहुमताने मंजुर**

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५.२५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

**उल्हासनगर महानगरपालिका**

**दिनांक**:-२२.६.२००१.

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २२.६.२००१ रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

**मा. सभापती** :- श्रीमती. कालानी ज्योती.

| | |
|---|---|
| २. श्रीमती.कुंदनानी लविना | सदस्या |
| ३. श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ४. श्री. बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ५. श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| ६. श्री.तलरेजा विनोद | सदस्य |

| | |
|---|---|
| ७. श्रीमती.रजनी भारती | सदस्या |
| ८. श्री.वनवारी किशोर | सदस्य |
| ९. श्रीमती. वेलकर सुरेखा | सदस्या |
| १० श्रीमती. सोनावणे यमुना | सदस्या |
| ११ श्रीमती. राधवानी आशा | सदस्या |
| १२ श्री.केणी जयकुमार | सदस्य |

तर

मा. श्री. आयलानी कुमार, श्री.पारवानी रामचंद, श्री. तेजी कैलास, श्रीमती. वलेचा पदमा हे सदस्य/ सदस्या सभेस अनुपस्थितीत होते/ होत्त्या.

श्री.सोनाळे (उपआयुक्त शहर) हे आयुक्तांच्या अनुपस्थित मा.सभापतींच्या निर्देशानुसार आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ होते.

सायंकाळी ५. २५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>मा. सचिव :-</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक ४. ६.२००१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा.सदस्य रमेश चव्हाण:-</u>किती वाजले? सभेची वेळ कितीची होती?

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>आम्ही ४. ३० वाजे पासुन बाहेर ताटकळत उभे आहोत.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>शहराच्या प्रारूप विकास आराखडयाबाबतची सभा चालु होती त्यामुळे या सभेस उशीर झाला.

--२--

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :-दि.४.६.२००१ रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

<u>मा. सचिव :-</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u>या प्रस्तावामध्ये महापौर निधी किती आहे? व नगरसेवक निधी किती आहे?

<u>श्री.चिजवानी (शहर अभियंता):-</u>मा.महापौर निधीतील दोन कामे असुन त्यातील एक काम रू.१,९९,८००/- व दुसरे रू. २,९९,८५०/- चे असुन नगरसेवक निधीतुन रू. २,९९,९००/- चे काम करावयाचे आहे.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u> त्या प्राकलनावर आयुक्त साहेबांनी स्वाक्षरी केली आहे काय? शहर अभियंता श्री. चिजवानी साहेबांची स्वाक्षरी आहे काय?

*श्री.चिजवानी (शहर अभियंता)*:-या कामीचे प्राकलनावर यापुर्वीचे आयुक्तांनी समंती दिलेली असून श्री. पोखरकर साहेबांनी या कामांचे प्राकलनावर स्वाक्षरी केली आहे.

*मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः*-श्री. पोखरकर साहेबांनी स्वाक्षरी केली आहे तर मग आमची नगरसेवक निधीतील कामे का होत नाहीत?

*मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः*-जेव्हा पासुन श्री. पोखरकर साहेब आले आहेत ते म्हणतात नगरसेवक निधीतुन फक्त दोन-दोन लाखाचीच कामे केली जातील.

*मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः*-नगरसेवक निधीतील दोन-दोन लाखाची कामे अशीच पडुन आहेत, आता पूढे निवडणुका येत आहेत.

*मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :*-निवडणुका येत आहेत म्हणुन नाही तर पावसाळा सुरू झालेला आहे. कुठे पूर येऊ नये म्हणुन काही ठिकाणी गटारे नाले बांधणे आवश्यक आहे तर कुठे सी. सी. पॅसेज तयार करण्याची छोटी मोठी कामे आहेत ती झाली पाहिजेत.

*मा.सदस्य श्री.रमेश चव्हाणः*-सर्वांची कामे झाली पाहिजेत, प्राधान्य कोणत्त्या कामांना देत आहात?

*मा.सदस्य श्री. प्रमोद टालेः*-आयुक्त साहेब, पक्षपातीपणा करतात काय? जर प्रत्त्येक नगरसेवकांचे नगरसेवक निधीतुन २-२ लाखाचेच काम करायचे असे ठरले असताना काहींच्या प्रभागात त्यापेक्षा जास्त रक्कमेची कामे कशी होत आहेत?

*श्री. सोनाळे (उप आयुक्त)*:- यापूर्वीचे आयुक्त श्री. बक्शी साहेब यांनी या कामास समंती / मंजुरी दिलेली आहे.

*मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :*-मग आमच्या प्रभागात कमी रक्कमेची कामे व इतरांच्या प्रभागात जास्त रक्कमेची कामे असे का? आमच्या प्रभागात सुध्दा कामांची आवश्यकता आहे.



*मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः*-एकीकडे आयुक्त साहेब म्हणतात नगरसेवक निधीतुन फक्त दोन-दोन लाखाचीच कामे केली जातील म्हणुन, व दुसरीकडे २ लाखापेक्षा अधिक रक्कमेच्या कामांना समंती देतात तर आयुक्त साहेब स्वतः काय बोलतात ते त्यांच्या लक्षात रहात नाही काय?

शहरात कॉलराची साथ येत आहे अशा परिस्थितीत आवश्यक ती कामे झाली पाहिजेत.

*मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः*-काही दिवसापुर्वीच्या स्थायी समिती सभेत असे ठरले होते की दुषीत पाण्याबाबतची जी काही कामे असतील ती स्थायी समितीपुढे मंजुरीस आणली जावीत.

*श्री. सोनाळे(उपआयुक्त)*:-उप आयुक्त (आरोग्य) कॉलरा साथीबाबत माहिती दया.

श्री. पाणपट्टे (उपआयुक्त आरोग्य विभाग):- कॉलराची लागण झाल्याच्या ४ केसेस आढळुन आल्या आहेत.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा:-कोण कोणत्त्या विभागातुन कॉलराचे रूग्ण आढळुन आले आहेत?

श्री.पाणपट्टे(उपआयुक्त आरोग्य विभाग):-त्याची सविस्तर माहिती सद्या माझ्याकडे येथे उपलब्ध नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :- डॉ. लांजेवार कुठे आहेत?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:- शनिवार-रविवार हया दोन दिवस महापालिका कार्यालयास सुट्टी आहे. कॉलराची साथ आणखी पसरू नये म्हणुन उपाययोजना करावयास हवी आहे तसेच नगरसेवक निधीतुन सर्वांची कामे केली जातील असे आश्वासन दिले जावे.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :-मागच्यावेळी आपल्या समोर निर्णय झाला होता की, दुषीत पाण्याबाबतची कामे लवकरात लवकर झाली पाहिजेत. परंतु ३ महिने झाले तरी ती कामे झाली नाहीत.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-मागच्या वेळी जेव्हा कॉलराची साथ आली होती तेव्हा त्याबाबत करावयाच्या प्रतिबंधक उपाययोजनांचे कामासाठी खासदार प्रकाश परांजपे यांनी आपल्या खासदार निधीतुन निधी दिला होता. परंतु त्याची प्राकलने अदयाप तयार केली गेली नाहीत.

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी:-स्थायी समितीच्या सभा कशासाठी बोलावल्या जातात?
श्री. सोनाळे (उप आयुक्त):- निर्णय घेण्यासाठी.

मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानी:- त्यावर कार्यवाही तर होत नाही. मग फायदा काय?

मा.सदस्य श्री. टाले प्रमोद:-सम्राट अशोक नगर मधील कामासाठी मा.प्रधान सचिव श्री. रामानंद तिवारी साहेब, यांनी शासन स्तरावर वीस लाखा पर्यंतचा निधी देण्याचे आश्वासन दिले होते. त्याचे काय झाले?शासन निधी जाहिर करते



परंतु आपल्या महानगरपालिकेला तो घेता येत नाही. उदया कॉलराची साथ वाढली तर त्यास जबाबदार कोण?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:'-प्रत्येक कामास प्रशासनच जबाबदार असते.

मा.सचिव:- हा प्रस्ताव समंत झाल्याचे समजायचे का?

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-असे करे.

मा.सचिव:-आपल्या भावना ते आयुक्तांच्या निर्दशनास आणुन देतील.

मा.सदस्या श्रीमती. सुरेखा वेलकरः-आयुक्त सारखे बदलत असतात.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः- ही जी काही कामे आहेत ती ५ (२)(२) अन्वये झाली पाहिजेत, आपण आयुक्तांच्या आसनावर बसला आहात, आयुक्त पदाचे अधिकार वापरा, आयुक्तांनी कोणत्याही कामास नाही म्हंटले नाही परंतु ते उशिर लावत आहेत, लेखाधिका-यांकडुन समंती येऊ दया, लेखा परिक्षकांकडुन समंती येऊ दया. त्यानंतर पहातो असे ते म्हणतात, येणा-या स्थायी समिती सभेत नगरसेवक निधीतील २-२ लाखाची कामे मंजुरीस आणली जावीत.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः- सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मा. महापौर निधीतुन व नगरसेवक निधीतुन प्रभाग क्र. ४७ मध्ये सार्वजनिक बांधकामांतर्गत करावयाच्या तीन कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. ३६ दिः-२२. ६. २००१.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. जयकुमार केणी.

हि स्थायी समिती खाली नमुद केलेल्या कामांचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरची कामे अत्यंत तातडीची व आवश्यक असल्याने मजुर कामगार सहकारी संस्थेशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधीकृत करीत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र.४७ मध्ये कुर्ला कॅम्प येथील लालसाई बंगल्या, समोरील गार्डनच्या प्लाटचा विकास करणे. (मा.महापौर निधीतुन) | रू.१,९९८००/- |



| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| २. | उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र.४७ मध्ये ब्लॉक सी-७८ ते शिवशंकर किराणा पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रू.२,९९,८५०/- |

(मा.महापौर निधीतुन)

| | | |
|---|---|---|
| ३. | उल्हासनगर-४ येथील प्रभाग क्र.४७ मध्ये कुर्ला कॅम्प येथे लालसाई बिल्डींग मटेरियल हाऊस समोर ब्लॉक बी-६६ जवळ संरक्षण भिंत बांधणे. (नगरसेवक निधीतुन) | रू.२,९९,९००/- |

---

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:-</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> हया कामास मंजुरी देवू या. व हे काम सुध्दा ५ (२) (२)नुसार झाले पाहिजे.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> प्रत्येक सनमाननिय महापालिका सदस्यांना उल्हासनगर महापालिका क्षेत्रासाठी प्रारूप शहर विकास आराखडयाची तसेच विकास नियमावलीची छायांकित प्रत उपलब्ध करणे करिता आयुक्तांना निविदाशिवाय <u>थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत</u>.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर महानगरपालिका ''क्षेत्रासाठी प्रारूप शहर विकास आराखडा'' व ''विकास नियंत्रण नियमावली'' नुकतीच प्रसिध्द झाली असुन सदर प्रारूप शहर विकास आराखडयाची प्रत व विकास नियंत्रण नियमावली प्रत सर्व नगरसेवकांना उपलब्ध करून देणे बाबत दिनांक १९.५.२००१ रोजी झालेल्या उल्हासनगर महानगरपालिका महासभेत मा. महापौर यांनी निर्देशित केलेले आहे.



त्यानुसार उपरोक्त '' प्रारूप शहर विकास आराखडयाची'' प्रत व विकास नियंत्रण नियमावलीची प्रत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण'' यांच्याकडुन

उल्हासनगर महानगरपालिकेस उपलब्ध झालेली आहे. त्याप्रमाणे सर्व नगरसेवकांना देखील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडुन उपलब्ध करून देण्यासाठी किमान दहा दिवसांचा कालावधी लागणार आहे.

तरी वरील प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेकडे '' प्रारूप शहर विकास आराखडयाची'' प्रत उपलब्ध असुन त्यावरून रंगीत छायांकित प्रती काढुन व विकास नियंत्रण नियमावलीची पुस्तिका मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडुन विकत घेवून प्रत्येक नगरसेवकास उपलब्ध करून दयावे किंवा कसे? याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन प्रस्तारूपी आदेश होणेस्तव सादर, तसेच वरील प्रमाणे छायांकित प्रती उपलब्ध करून दयावयाचे झाल्यास या कामी अंदाजे रू. १५०० x ७४ =१११००० रूपये इतक्या खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२)अन्वये निविदा न मागविता कार्यवाही करण्यासाठी सदरचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवणे आवश्यक आहे. त्यानंतर स्थायी समितीने मा. आयुक्त यांना वरील कार्यवाही करणेस प्राधिकृत केल्यास सदरचा खर्च भागविता येईल त्याकरिता प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवणेस प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ३७</u> <u>दि:-२२.६.२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.
नुमोदकाचे नाव :-श्री. प्रमोद टाले.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रासाठीच्या प्रारूप विकास आराखडयाची रंगीत छायांकित प्रत तसेच विकास नियंत्रण नियमावलीची आणि विकास आराखडा अहवाल पुस्तीकेची प्रत महापालिकेच्या प्रत्येक सदस्यास <u>दि.९/७/२००१</u> पूर्वी पुरविणे कामी एकुण ७४ प्रतींसाठी अंदाजित खर्च रू. १,११,०००/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे व आवश्यक असल्याने आयुक्तांना या कामीचे पूर्ततेसाठी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५ . ३५ वाजता सभेचे कामकाज संपलयाचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-१२.७.२००१.

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक १२.७.२००१ रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

मा. सभापती :- श्रीमती. कालानी ज्योती.

| | |
|---|---|
| २. श्रीमती.कुंदनानी लविना | सदस्या |
| ३. श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ४. श्री. बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ५. श्री.ढाले प्रमोद | सदस्य |
| ६. श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ७. श्री. कैलास तेजी | सदस्य |
| ८. श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| ८. श्री.बनवारी किशोर | सदस्य |
| ९. श्रीमती. वलेचा पदमा | सदस्या |
| १० श्रीमती. वेलकर सुरेखा | सदस्या |
| ११ श्रीमती. सोनावणे यमुना | सदस्या |
| १२ श्रीमती. राधवानी आशा | सदस्या |
| १३ श्री.केणी जयकुमार | सदस्य |

तर

मा. श्री. आयलानी कुमार, श्री.पारवानी रामचंद्र, हे सदस्य सभेस अनुपस्थितीत होते/ होत्त्या.

श्री.सोनाळे (उपआयुक्त शहर) हे आयुक्तांच्या अनुपस्थित मा.सभापतींच्या निर्देशानुसार आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ होते.

सायंकाळी ५.०८ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. सचिव :- विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक २२.६.२००१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा.सदस्य श्री. प्रमोद ढाले:-मागच्या स्थायी समितीचे सभेत मी प्रश्न उपस्थित केला होता की, शहरात जेव्हा कॉलराची साथ आली होती. तेव्हा सम्राट अशोक नगर मधील काही कामांसाठी मा. प्रधान सचिव श्री. रामानंद तिवारी यांनी जो निधी देण्याचे जाहिर केले होते. त्याचे काय झाले? त्याबाबत आपण पूढच्या सभेत उत्त्तर देवू असे आपण म्हणाला होतात त्याचे काय झाले? त्या निधीची स्थिती निश्चित काय आहे? तसेच

मागील सभेच्या इतिवृतांतातील पृष्ट क्र३ वर सम्राट अशोक नगरमध्ये कामासाठी मा. खासदार निधीतुन निधी जाहिर केला होता. अशी नोंद आलेली आहे त्याऐवजी तेथे मा. प्रधान सचिव श्री. रामानंद तिवारी साहेब, यांनी शासन स्तरावर वीस लाखा पर्यंत निधी देण्याचे आश्वासन दिले होते. अशी नोंद करणे आवश्यक आहे.

--२--

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः- शहरात कॉलराच्या साथीची स्थिती निश्चित काय आहे? कुणी रूग्ण या आजाराने दगावला आहे का?

श्री. म्हात्रे (मुख्य स्वच्छता निरिक्षक):-माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही.

श्री. सोनाळे (उपआयुक्त-शहर):-गॅस्टो अतिसार याचे एकूण १७१ रूग्ण रूग्णालयात दाखल झाले होते. त्यातील १४५ रूग्ण उपचार घेवून घरी गेले. २६ रूग्णांवर उपचार चालु आहेत. त्यात काल ७ रूग्ण आणखी दाखल झाले त्यापैकी ५ रूग्ण उल्हासनगर शहरातील असून बाकी २ रूग्ण बाहेरचे आहेत.

मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः- हे २६ रूग्ण कोण कोणत्त्या विभागातील आहेत?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-ते सर्व रूग्ण उल्हासनगर शहरातील आहेत?

श्री. म्हात्रे (मुख्य स्वच्छता निरिक्षक):-उल्हासनगर तालुका क्षेत्रातील आहेत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः- ते कोण कोणत्त्या रूग्णालयात दाखल आहेत.

श्री. सोनाळे (उपआयुक्त-शहर):-मध्यवर्ती शासकीय रूग्णालयात ते रूग्ण दाखल केलेले आहेत.

मा.सदस्य श्री. प्रमोद टालेः-मागच्यावेळी म्हारळ गाव येथुन कॉलराच्या साथीची लागण सुरू झाली होती, आपल्या महानगरपालिकेने वेळीच योग्य ती प्रतिबंधात्त्मक उपाययोजना न केल्यामुळे शहरात ही साथ जोमाने फैलावली होती.

श्री. सोनाळे (उपआयुक्त-शहर):-याची सविस्तर माहिती आपणाकडे जी कालच आपण मला सांगितलीत....

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः- शहरात कॉलराचे किती रूग्ण आहेत ते सांगा?

श्री. सोनाळे (उपआयुक्त-शहर):-श्री. म्हात्रे कॉलरा रूग्णाची माहिती दया, माझ्याकडे हे जे विवरण दिले आहे, ते फक्त गॅस्टो अतिसाराच्या रूग्णा बाबतचे आहे,कॉलराचे किती रूग्ण रूग्णालयामध्ये दाखल झालेले आहेत?

मा.सदस्या श्रीमती. सुरेखा वेलकरः- सविस्तर माहिती दिली जावी.

श्री. म्हात्रे (मुख्य स्वच्छता निरिक्षक):-कॉलराची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-महापालिकेच्या मुख्य स्वच्छता निरिक्षकास हे माहित नाही?

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः- मला माहित नाही म्हणता, किती बेजबाबदारपणे उत्तर देत आहात?

मा.सदस्या श्रीमती. सुरेखा वेलकरः- कॉलराचे किती रूग्ण रूग्णालयात दाखल आहेत ते त्यांना माहित नाही?



मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-उल्हासनगर शहरात कॉलरा गॅस्टोची साथ सुरू आहे हे तरी माहित आहे ना?

श्री. म्हात्रे (मुख्य स्वच्छता निरिक्षक):-माझ्याकडे माहिती नाही, श्री. जनार्दन यांच्याकडे काही देण्यांत आली आहे का? याबाबत श्री. जनार्दन यांच्याकडुन माहिती घेतो, त्यांना बोलावून आणतो.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-आरोग्य विभागाचे उपायुक्त कुठे आहेत? बाकीचे अधिकारी कुठे आहेत? स्थायी समितीच्या सभेत विभाग प्रमुख कधी कधी येत नाहीत. हे बरोबर नाही. सर्व विभाग प्रमुखांनी स्थायी समितीच्या सभेत उपस्थित राहिले पाहिजे याबाबत आयुक्तांनी त्यांना सुचना दिल्या पाहिजेत.

श्री. सोनाळे (उपआयुक्त शहर):-स्थायी समितीच्या सभेत सर्व अधिकारी येतात, या सभेत मला बसायचे आहे हे मला सभा सुरू होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर सांगण्यांत आले. त्यामुळे शहर अभियंता व इतर उपायुक्त किंवा कार्यकारी अभियंता हे कुठे आहेत ते मी कसे सांगु शकणार?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः- जेवढे पण अधिकारी आजच्या या स्थायी समिती सभेमध्ये उपस्थित नाहीत त्या सर्वांवर कारवाई केली जावी असे आम्ही म्हणायचे काय? त्यांचेवर कारणे दाखवा नोटीसा बजावायच्या काय?

मा.सदस्य श्री. प्रमोद टालेः-मा.खासदारांनी जाहिर केलेला व मा. प्रधानसचिव रामानंद तिवारी यांनी जाहिर केलेला निधी वापरला नाही. त्याबाबत उत्तर कोण देणार? २० लाखाचा निधी त्यांनी जाहिर केला होता. सचिवांनी आपल्या निधीतुन निधी जाहिर केला होता.

मा.सचिवः-प्रधान सचिवांना निधी उपलबध करून दिलेला नसतो. शासन स्तरावर निधी उपलब्ध करून देण्याचे त्यांनी आश्वासन दिलेले असेल.

श्री. सोनाळे (उपआयुक्त शहर):-सम्राट अशोक नगरमध्ये (ड्रेनेज) गटारे सार्व-शौचालय-इत्त्यादी कामासाठी शासन स्तरावरून निधी उपलब्ध करून दिला जाईल. असे सांगण्यात आले होते.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः- ६ डिसेंबरला बाबरी मशिद बाबत लफडे झाले होते आपणास असे वाटते का की, सम्राट अशोक नगर बाबत सुध्दा लफडे व्हावे म्हणुन?

श्री. जनार्दन (लिपिक-आरोग्य विभाग):-गॅस्टो अतिसार यांचे ७ रूग्ण रूग्णालयात दाखल झालेले आहेत.
मा.सचिवः-कॉलराचे नाहीत ना?

श्री. जनार्दन (लिपिक-आरोग्य विभाग):-कॉलराचा एक सुध्दा रूग्ण रूग्णालयात दाखल झालेला आढळून आलेला नाही, यापूर्वी जे दाखल झालेले होते ते उपचार घेवून घरी गेले आहेत. सद्या एक सुध्दा कॉलराचा रूग्ण नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-आला सुध्दा नाही पाहिजे.
मा.सचिव :-इतिवृतांत ठिक आहे?
मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-स्थायी समितीच्या पूढील सभेत प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभागातील २-२ लाखाची कामे मंजुरीस आणली जातील असे मागच्या स्थायी समितीत ठरले होते. त्याप्रमाणे २-२ लाखाची कामे मंजुरीस का आणली नाहीत?



मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-आपण सदस्यांच्या भावना आयुक्तांच्या कानावर घालणार होतात, त्याचे काय झाले? त्या सभेच्या इतिवृतांताच्या पृष्ठांना कागदी ध्वज लावून इतिवृत आयुक्तांना दाखविले त्यावर आयुक्त काय म्हणाले?

श्री. सोनाळे (उपआयुक्त शहर):-स्थायी समितीच्या सन्माननिय सदस्यांच्या भावना मी आयुक्तांना कळविल्या त्यानंतर आयुक्त साहेब जेव्हा येथे (उल्हासनगर महानगरपालिकेत) आल्यानंतर सुध्दा मी आपल्या भावना आयुक्तांच्या कानी घातल्या आहेत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:- त्यावर त्यांच्या भावना काय आहेत?

श्री. सोनाळे (उपआयुक्त शहर):-त्यांनी काही सांगितले नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-२-२ लाखाची प्राकलने पूढच्या सभेत मंजुरीसाठी आणली जातील असे सांगितले होते ती प्राकलने आली का?

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:- सोनाळे साहेब, तुम्ही आयुक्त साहेबांना सदस्यांच्या भावना कळविल्या होत्त्या ना?

श्री. सोनाळे (उपआयुक्त शहर):-त्यांनी त्या सभेचे इतिवृत सूचनेसह सविस्तरपणे वाचले त्यात त्यांना जे शब्द चूकीचे वाटले त्यात त्यांनी सुधारणा केली.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:- आयुक्त इतिवृतांतात दुरूस्ती करू शकतात काय?

श्री. सोनाळे (उपआयुक्त शहर):-इतिवृतांतात नाही, गोषवा-यामधील काही शब्दात त्यांनी सुधारणा केली.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-दि. २२.६.२००१ रोजीचे इतिवृतांतात मा.सदस्य श्री. प्रमोद टाले यांनी सुचविलेली दुरूस्ती करून इतिवृत सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिव:-विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत ाहे.

विषय :- प्रभाग क्र. ५८ करिता पंपीग मशीन पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करणे कामी मे. ओम इंडस्ट्रीअल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असुन सविंदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना:-

प्रभाग क्र५८ मध्ये, डर्बी हॉटेलपासून बॅरेक क्र. ८५० पर्यंत टाकण्यांत येणा-या जलवाहिनीवर हिराघाट येथे पंपिंग मशिनरी बसविण्याचा रू. १,३७,७८३/- मात्र अंदाजित खर्चाचा प्रस्ताव पाणी पुरवठा विभागातर्फे सादर

--५--

करण्यांत आला आहे. यापैकी रू. १,०२,७८३/- मात्र पंपिंग मशिनरी साठी व रू. ३५,०००/- मात्र विद्युत जोडणीसाठी प्रस्तावित केलेले आहेत. या प्रस्तावास स्थायी समिती ठराव क्र३ दिनांक १९.४.२००१ नुसार प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळालेली सिन बाब क्र. ५९९ दि. ३.५.२००१ नुसार तांत्रिक मान्यता मिळाली आहे.

या कामाकरिता रू. १,०२,७८३/-या अंदाजित किंमतीला जाहीर निविदा मागविण्यांत आल्या. दि. १४.५.२००१ रोजी दैनिक लोकमत दै. तरूण भारत, दै. फ्री प्रेस जर्नल व दै.उल्हास विकास या वृतपत्रांतुन निविदा सूचना प्रसिध्द झाली. त्याप्रमाणे दि. २३.५.२००१ रोजी एकूण तीन ठेकेदारांनी आपल्या निविदा महानगरपालिकेस सादर केल्या. या निविदा त्याच दिवशी उघडण्यांत आल्या, त्याचा तपशिल येणेप्रमाणे.

१) मे.ओम. इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, डोंबिवली. - अंदाजित किंमतीपेक्षा १.२ टक्के कमी (रू.१,०१,५५०/-)
२) मे.अलाईड इलेक्ट्रो मेकॅनिकल्स प्रा.लि. पुणे - अंदाजित किंमतीपेक्षा ०.९ टक्के कमी (रू.१,०१,८५८/-)
३) मे. महाबला एन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा. लि. मुंबई - अंदाजित किंमतीपेक्षा ६.५ टक्के जास्त. (रू.१,०९,४६४/-)

उपरोक्त निविदांपैकी मे.ओम.इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस, डोंबिवली यांची निविदा तुलनात्मकरित्त्या न्युनतम असुन वाजवी दराची असल्याने स्वीकारण्यास प्रस्तावित करण्यांत आली आहे. सदर प्रस्तावास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांची शिफारस असून मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार, प्रभाग क्र. ५८ करिता पंपिंग मशिनरी पुरविणे , बसविणे व कार्यान्वित करणे या कामासाठीची मे.ओम इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग, सर्व्हिसेस, डोंबिवली यांची निविदा व त्यासाठी येणारा खर्च रू. १,०१,५५०/- मात्र यांस प्रशासकीय व वित्तिय मानयता मिळण्यासाठी सदर प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करण्यांत येत आहे. त्यास मंजुरी मिळावी.

स्थायी समिती ठराव क्र. ३८ दि:-१२. ७. २००१.

सुचकाचे नाव :-श्री. ठाकुर वेहरानी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रमेश चव्हाण.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्र. क्र. ५८ करिता पंपिंग मशिनरी पुरविणे, बसविणे व कार्यान्वित करणे कामी मे.ओम इंडस्ट्रियल इंजिनियरींग सर्व्हिसेस यांची रू. १,०१,५५०/- या अंतर्भुत खर्चाची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--६--

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>सविस्तर माहिती दिली जावी.

<u>श्री. सोनाळे (उपआयुक्त शहर):-</u>पाणी पुरवठयाच्या वितरण व्यवस्थेतील झडपांची दुरूस्ती करण्यासाठी गनमेटल स्पींडल व नट पुरवायचे आहेत.

<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी:-</u> जुन्या झडपा बंद पडतात?

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> वितरण व्यवस्थेतील झडपांची दुरूस्ती करण्यासाठी गनमेटल स्पिंडल व नट पुरविणे कामी मे. डि. के. इंजिनिअरिंग वर्क्स यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असुन संविदेस मान्यता देणे <u>बाबत.</u>

<u>प्रस्तावना:-</u>

वितरण व्यवस्थेतील झडपांची दुरूस्ती (sluice valves) दुरूस्ती करण्यासाठी गनमेटल स्पिंडल व नट पुरविण्याबाबत उप विभागीय कार्यालयांकडुन मागणी करण्यांत आली होती. या मागणीच्या पूर्ततेसाठी रू.१०,५८,२८८/- मात्र अंदाजित खर्चाचा प्रस्ताव पाणी पुरवठा विभागातर्फे सादर करण्यांत आला होता. सदर प्रस्तावास स्थायी समिती ठराव क्र. २१८ दि. ३१.३.२००१ नुसार प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळाली असून बाब क्र. ५९२ दि. ३.४.२००१ अन्वये तांत्रिक मंजुरी मिळाली आहे.

सदर कामाकरिता दि. १४.५.२००१ रोजी दैनिक लोकमत, दै. तरूण भारत, दै. फि. प्रेस जर्नर व दै. उल्हास विकास या वृतपत्रांतून निविदा सुचना प्रसिध्द झाली. दि. २३.

५.२००१ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत तीन निविदा महानगरपालिकेस सादर करण्यांत आल्या. त्या निविदा त्याच दिवशी दुपारी ४. ०० वाजता उघडण्यांत आल्या. त्यामध्ये पुढीलप्रमाणे दर नमुद केलेले आहेत.

१) मे.सरस्वती इलेक्ट्रीकल ॲण्ड इंजि. सर्व्हिसेस, ठाणे. - अंदाजित किंमतीच्या १७. ५ टक्के कमी (रू.८,७३,०८७ = ६०/-)

२) मे. के. ए. पाटील, ठाणे - अंदाजित किंमतीच्या १. ४ टक्के कमी (रू.१०,४३,४७१ = ९७)

३) मे. डी. के. इंजिनिअरिंग वर्क्स उल्हासनगर. - अंदाजित किंमतीच्या ३२ टक्के कमी. (रू.७,१९,६३५=८४)

उपरोक्त निविदांपैकी मे. डी. के. इंजिनिअरिंग वर्क्स, उल्हासनगर यांची निविदा तुलनात्त्मकरित्त्या न्युनतम असल्याने स्वीकारण्यास प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांची शिफारस असून मा. आयुक्त यांनी मंजुरी दिल्यानुसार सदर ठेकेदार मे. डी. के. इंजिनिअरिंग वर्क्स, उल्हासनगर यांची निविदा व त्याकरिता येणारा खर्च रू. ७,१९,६३५=८४ मात्र यांस प्रशासकीय व वित्तिय मानयता मिळण्याकरिता स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

त्यास मंजुरी मिळण्याची विनंती आहे.

-७--

<u>स्थायी समिती ठराव क्र. ३९</u> <u>दि:-१२. ७. २००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. जयकुमार केणी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वितरण व्यवस्थेतील झडपांची दुरूस्ती करण्यासाठी गनमेटल, स्पीडल व नट पुरविणे कामी मे. डी. के. इंजिनियरींग वर्क्स यांची रू. ७,१९,६३५=८४ या अंतर्भुत खर्चाची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिवः-</u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

सदस्य श्री. किशोर वनवारीः- या प्रस्तावाबाबत आपण बोलु या.

श्री. सोनाळे (उपआयुक्त शहर):-या प्रस्तावामध्ये अधिभार आकार वसुल या शब्दां ऐवजी वहातुक खर्च व प्रशासकीय आकार हे शब्द वापरले जावेत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी घालायची होती परंतु त्याबाबत जनतेला माहिती देण्यासाठी ध्वनीक्षेपणावरून उदघोषणा केली नाही, केली किंवा नाही विचारले जावे.

श्री. जनार्दन (लिपिक-आरोग्य विभाग):-ध्वनीक्षेपणावरून उदघोषणा केली नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-हॅण्ड बिल काढण्याबाबत सांगण्यांत आले होते. श्री. आर.डी. शिंदे साहेब उल्हासनगर-५ येथे मायक्रॉन मोजण्याची एक मशिन घेवून बसले होते. प्लास्टिक पिशव्याचे नमुने दाखवत सांगायचे की, ही कमी मायक्रॉनची आहे, ही जास्त मायक्रॉनची आहे, पांढ-या रंगाच्या प्लास्टीक पिशव्या चालतील म्हणून बोलले होते. नगरसेवक व संबंधित सर्व अधिका-यांना मायक्रॉन मोजण्याच्या मशिनस् देऊ म्हंटले होते. आपण आपापल्या प्रभागातील लोकांना समजावून सांगा असे त्यांनी आम्हा नगरसेवकांना सांगितले होते परंतु आज पर्यंत त्याची कार्यवाही केली नाहीत. प्रत्त्येक प्रभागात कचरा टाकण्यासाठी पुरेसे खत्ते नाहीत, प्रत्त्येक विभागात कचरा टाकण्याची ठिकाणे निश्चित करून दिली पाहिजेत. जर आपण ती निश्चित करून दिली नाहीत तर लोक रस्त्यावर कचरा फेकु लागतील.



श्री. सोनाळे (उपआयुक्त शहर):-शहरात जे ५४० खत्ते आहेत ते पुरेसे आहेत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः- जोपर्यंत गल्लीबोळामध्ये कचराकुंड्या ठेवत नाहीत. तो पर्यंत हया प्रस्तावाची कार्यवाही करणे उचीत नाही.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः-आम्ही सर्व नगरसेवक एकत्र बसुन निर्णय घेवू. त्यानंतर या प्रस्तावाबाबत विचार करू.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः- जोपर्यंत कचराकुंड्याची सोय करत नाहीत तोपर्यंत हा प्रस्ताव पूढे ढकलला जावा. किंवा रद्द केला जावा.

मा.सदस्या श्रीमती. आशा राधवानीः-पूढे ढकलण्याऐवजी हा प्रस्ताव रद्द केला जावा.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे सर्वानुमते नामंजुर करण्यांत येत आहे.

विषय :- शहराची स्वच्छता राखण्याच्या कार्यक्रमात बाधा
आणणा-या व्यक्तीकडून अधिभारआकार वसुल
करण्यास मान्यता देणे बाबत.

स्थायी समिती ठराव क्र. ४० दि:-१२.७.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. जयकुमार केणी.

हि स्थायी समिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९च्या अनूसूची १४ मधील, प्रकरणाचे नियम ५ (२) प्रमाणे, स्वच्छ व सुंदर उल्हासनगर प्रकल्प राबविण्यासाठी शहराची स्वच्छता कार्यक्रम बाधा आणणा-या व्यक्तींकडुन पुढील प्रसंगासमोर सुचविल्याप्रमाणे वाहतुक खर्च व प्रशासकीय आकार निश्चितीस मान्यता देत नाही.

| अ.क्र | प्रकार | वाहतुक खर्च व प्रशासकीय आकार रूपये |
|---|---|---|
| १. | उघडयावर प्रातर्निधी करणे | २०० |
| २. | रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे | ५० ते ५०० |
| ३. | रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी बिडी, सिगारेट फेकणे इ. | ५० ते १०० |
| ४. | थुंकणे, मावा खाऊन थुंकणे, पान खाऊन थुंकणे | ५० ते ५०० |
| ५. | सार्वजनिक ठिकाणी लघवी करणे | ५० |
| ६. | लॉटरी विक्रेते रस्त्यावर कचरा फेकणे | ५० ते १००० |
| ७. | दुकानदार झाडलोट करून रस्त्यावर कचरा फेकणे | १०० ते १००० |
| ८. | पानटपरी-रस्त्यावर कचरा टाकणे | ५० ते ५०० |
| ९. | केळीच्या वखारी निर्माण होणारा कचरा रस्त्यावर फेकणे | १०० ते १००० |
| १०. | भंगारवाले-भंगार रस्त्यावर फेकणे | १०० ते ५००० |
| ११. | शहाळी विक्रेते शहाळी रस्यावर फेकणे | १०० ते १००० |
| १२. | मांस विक्रेते नाशवंत मांस रस्त्यावर फेकणे | १०० ते १००० |

--९--

| | | |
|---|---|---|
| १३. | टायरवाले- टायर टयुब रस्त्यावर फेकणे | ५० ते १००० |
| १४. | रस्त्यांवर बांधकाम साहित्त्य ठेवणे, रॅबिट टाकणे | ५०० ते ५००० |
| १५. | कंपनी/कारखाने टाकाऊ माल रस्त्यांवर फेकणे / टाकणे | १०००ते १०००० |
| १६. | गोठे / तबेले / शेण, लिद टाकणे | ५०० ते ५००० |
| १७. | पाणीपुरी, भेळपुरी, पावभाजी, फहविक्रेते, भाजीपाला विक्रेते, हातगाडया. | १०० ते ५०० |

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

**<u>एकमताने मंजुर</u>**

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सचिव :-** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

श्री. ठणेकर (उपअभियंता):-२० सुरक्षा रक्षकांची सुरक्षा सेवा पुरविण्यासाठीचे प्राकलन आहे. याकामी निविदा काढावयाची आहे.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:- मागच्याच ठेकेदाराला देणार आहात काय?

श्री. ठणेकर (उपअभियंता):-नाही, दुसरे ही ठेकेदार आहेत.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:- मागील ठेकेदार त्याच दराने या सेवा देण्यास तयार आहेत का? मागच्या वेळी किती निविदा आल्या होत्त्या?

श्री. ठणेकर (उपअभियंता):-मागील वेळी १२ निविदा आल्या होत्त्या, यावेळी सुध्दा निविदा काढावयाच्या आहेत. होवू शकते ७-८ निविदा येवू शकतील.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-प्राकलनिय रक्कमेपेक्षा कमी दरात निविदा गेल्या होत्त्या की, जास्त दरात?

श्री. ठणेकर (उपअभियंता):-प्राकलनिय रक्कमेपेक्षा कमी दरात निविदा गेल्या होत्त्या.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-यावेळी कमी दरात जातील की जास्त?

श्री. ठणेकर (उपअभियंता):-ते निविदा भरणा-यांवर निर्भर/ अवलंबुन आहे.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--१०--

विषय :- २० बंदुकधारी रक्षकांची सुरक्षा सेवा पुरविणे कामी अंदाजित रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना:-

उपरोक्त विषयातील प्रकरणी या कार्यालयाने सन २००१-२००२ या वर्षासाठी (कालावधी १२ महिने ) पुर्वीच्या मंजुर निविदा दरान्वये रू. १०,७४,३२२/- अंदाजित प्राकलन तयार केलेले आहे.

महानगरपालिकेच्या अखत्त्यारीतील महत्त्वाची ठिकाणे आणि पाणी पुरवठा विभाग अंतर्गत पाण्याच्या साठवण टाक्या (जलकुंभ)जलरेटा उदंचन केंद्रे, इत्त्यादीच्या रक्षणासाठी सदर सुरक्षा सेवा कार्यरत असणे अत्त्यंत आवश्यक आहे.

गतवर्षीच्या या कामाच्या निविदेची मुदत आता संपत आलेली असून नविन निविदा सुचना काढून नविन ठेकेदार निश्चित करणे आवश्यक आहे या बाबीसाठी मा. मुख्य

लेखा अधिकारी, मुख्य लेखा परीक्षक यांची तसेच मा. आयुक्त यांची मान्यता मिळालेली असून सदर प्रकरण स्थायी समिती सभेत ठेवण्यास सांगितलेले आहे. सबब सदर काम आणि त्याचे अंदाजित प्राकलन रक्कम, नवीन निविदा काढणेची परवानगी यांना प्रशासकीय आणि वित्तिय मान्यता मिळणेसाठी सदर बाब सादर करीत आहोत.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ४१</u> <u>दि:-१२. ७. २००१.</u>

सुचकाचे नाव :-श्रीमती. पदमा वलेचा.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. लविना कुंदनानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन २००१-२००२ करीता, बंदुकधारी रक्षकांची सुरक्षा सेवा कामी अंदाजित रक्कम रू. १०,७४,३२२/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५ . ३० वाजता सभेचे कामकाज संपलयाचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>दिनांक:</u>-१०.८.२००१.

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १०.८. २००१ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या

मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

<u>मा. सभापती</u> :- श्रीमती. कालानी ज्योती.

| | | |
|---|---|---|
| २. | श्री. आयलानी कुमार | सदस्य |
| ३. | श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| ४. | श्री. बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ५. | श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| ६. | श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ७. | श्री. कैलास तेजी | सदस्य |
| ८. | श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| ९. | श्री.वनवारी किशोर | सदस्य |
| १०. | श्रीमती. वलेचा पदमा | सदस्या |
| ११. | श्रीमती. सोनावणे यमुना | सदस्या |
| १२. | श्रीमती. राधवानी आशा | सदस्या |
| १३. | श्री.केणी जयकुमार | सदस्य |

तर

१)श्री. पारवानी रामचंद, २)श्री. रमेश चव्हाण, व ३) श्रीमती वेलकर सुरेखा हे सदस्य /सदस्या सभेस अनुपस्थितीत होते/ होत्त्या.

सायंकाळी ४.५२ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

यावेळी आयुक्तांच्या अनुपस्थितीत स्थायी समिती सभागृहातील त्यांच्या आसनावर श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त, मुख्यालय)हे मा. सभापती महोदय यांच्या निर्देशानुसार आसनस्थ होते.

<u>मा. सचिव :-</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक १२.७.२००१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u> इतिवृत्त या हरकतीसह कायम करण्यांत यावे की, आम्हाला मराठी येत नसतांनाही मराठीतुनच इतिवृत्त पुरविले जात आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टालेः-</u> मा. खासदारांनी निधी जाहिर केल्याची इतिवृत्तांतातील पृष्ठ क्र. १ वर नोंद आली आहे. त्या निधी बाबत आपण त्या सभेत ही काही आश्वासन दिल नव्हत, या सभेत तरी देणार आहात काय?

--२--

त्या निधीची नेमकी स्थिती काय आहे?तो निधी आता काय ? तो मिळणार आहे काय? त्याबाबत खुलासा केला जावा.

<u>श्री. दत्ता भडकवाड(उप-आयुक्त, मुख्यालय):-</u> जिल्हा नियांजन व विकास समितीकडुन निधी आपल्याकडे यावयास पाहिजे होता तो अदयाप आलेला नाही.

*<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u> प्राकलने तयार करण्यास दिली होती. ती प्राकलने तयार करुन त्यांच्याकडे पाठविण्यांत आली आहेत का?*

*<u>मा.आयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-</u> निधी आल्यानंतरच प्राकलने तयार केली जातील, निधी आला नाही म्हणून प्राकलने तयार केली नाही, प्राकलने तयार केली व निधी आलाच नाही तर काय करायचे?*

*<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :-दिनांक १२.७.२००१ रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.*

*<u>मा. सचिव</u> :-विषय क्र. २ वाचून दाखवितात.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी</u>:-हा प्रस्ताव संमत केला जावा.*

*<u>मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी</u>:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.*

*<u>विषय :-</u> गलिच्छ वस्ती विकास कार्यक्रमांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, उल्हासनगर-३ येथे हायमास्ट लाईट बसविणेकामी मे. बजाज इलेक्ट्रीक लिमिटेड न्युनत्तम <u>निविदाकारांशी केलेल्या संविदेची माहिती बाबत.</u>*

*<u>प्रस्तावना:-</u>*

*मा.सभापती गलिच्छ वस्ती निर्मुलन समितीने प्रभाग क्र. ३१च्या नगरसेवकांच्या विनंती वरून गलिच्छ वस्ती विकास कार्यक्रमांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, उल्हासनगर-३ येथे हायमास्ट लाईट बसविणे बाबत केलेली शिफारस लक्षात घेऊन सदर जागेची पहाणी कार्यकारी अभियंता (विद्युत)यांनी कार्यकारी अभियंता (सा.बा. वि)नगररचनाकार यांच्या बरोबर करून हायमास्टसाठी जागा निश्चित करण्यात आली. त्यानंतर मेसर्स बजाज इलेक्ट्रकल लिमिटेड यांना बोलवुन त्याचा आराखडा पण बनविण्यात आला. त्या आराखडयानुसार रूपये ४,७२,०००.००/- इतक्या किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले व त्या अंदाजपत्रकाला मुख्य लेखा अधिकारी आणि मुख्य लेखा परिक्षक यांनी पण मंजुरीसाठी शिफारस केली असुन सदर जागेची स्वत: पहाणी करून निविदा मागविण्याची परवानगी १६.६.२००१ रोजी देण्यांत आली.*

*दिलेल्या निविदा सुचनेच्या प्रतिसादात सहा एजंसीने कोरे निविदाचे अर्ज खरेदी केले. त्यापैकी दोन निविदा धारकांनी इशारा रक्कमेसह वेळेवर म्हणजे दिनांक २.७. २००१ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत सिलबंद निविदा सादर केल्या. ते निविदा त्याच दिवशी संध्याकाळी ४.०० वाजता उघडण्यांत आली. त्याचा तुलनात्तमक तक्ता खालील प्रमाणे आहे.*



*१) मेसर्स जे.डी. इलेक्ट्रीक वर्कस कल्याण अंदाजपत्रकीय रक्कम रू. ४,७१,९७१/- पेक्षा ११.३६ टक्के कमी म्हणजे एकुण कार्याचे रू. ४,००,६२७/- असे दिले आहे.*

२)मेसर्स बजाज इलेक्ट्रीक लिमिटेड यांनी अंदाजपत्रकीय रक्कम रू. ४,५१,९७१/- पेक्षा १०.७० टक्के कमी म्हणजे एकुण कार्यासाठी रू. ४,०३,६१०/- असे दिलेले आहे. आणि जर त्यांना देयक सादर केल्यानंतर ९० दिवसात पेमेंट केले तर अंदाजपत्रकीय रक्कमेवर ४ टक्के अतिरिक्त सुट देणार आहेत. म्हणजे सर्व कार्याचे एकुण खर्च रू. ३,८५,५३१/- असा येईल.

वरील तुलनात्त्मक तक्त्यानुसार मेसर्स बजाज इलेक्ट्रीकल्स लिमिटेड, मुंबई यांची निविदा ९० दिवसात पेमेंट करण्याच्या अटीसह स्विकार करणे योग्य वाटले कारण (१)महानगरपालिकेला १५,०००/- पेक्षा जास्त रक्कमेचा वित्तिय फायदा होत आहे. २) मेसर्स बजाज इलेक्ट्रीकल लिमिटेड हे हायमास्टची उत्त्पादक कंपनी आहे. तसेच त्यांनी महानगरपालिकेच्या हददीत चार हायमास्ट पुर्वी पण लावलेले असुन ते व्यवस्थित कार्य करत आहेत. आणि ३) मुख्य लेखा अधिकारी आणि मुख्य लेखा परिक्षक यांनी पण सदर निविदा मान्य करणेस शिफारस केली.

वरील सर्व बाबी लक्षात घेता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३ (ड)नुसार मेसर्स बजाज इलेक्ट्रीकल्स लिमिटेड यांची निविदा स्विकृत करून सदर कामास लागणारा खर्च रू. ३,८५,५३१/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देऊन मेसर्स बजाज इलेक्ट्रीकल लिमिटेड यांच्याशी दि. २१.७.२००१ रोजी करार करण्यांत आलेला आहे. हि माहिती स्थायी समितीच्या अवलोकनासाठी सादर करण्यांत येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ४२</u> <u>दि:-१०. ८. २००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी
अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार गलिच्छ वस्ती विकास कार्यक्रमांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, चोपडा कोर्ट उल्हासनगर -३ येथे हायमास्ट लाईट बसविणे कामी मागविलेल्या निविदांपैकी मेसर्स बजाज इलेक्ट्रीक लिमिटेड या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी आयुक्तांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(ड) च्या तरतुदी अन्वये स्थायी समितीच्या पुर्व मान्यते शिवाय केलेल्या संविदेच्या माहितीची आजच्या सभेच्या कार्यवृत्तात नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका



<u>मा. सचिव</u> :-विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-हा प्रस्ताव संमत केला जावा.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात येत आहे.

विषय :- एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमा अंतर्गत गोल मैदान, अल्फामेडिकल ते निरंकारी हॉल मार्गे खेमचंद अपार्टमेंट येथे दिवाबत्तीचे नुतनीकरण करणे कामी मेसर्स बी. जे इलेक्ट्रीक कंपनी, नाशिक या न्युनत्तम निविदाकाराशी केलेल्या माहिती बाबत.

प्रस्तावना:-

महानगरपालिकेचे एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत गोल मैदानच्या चारही बाजुला सिमेंट कॉक्रिटचे रस्ता रूंदीकरण करून बांधण्याचे काम चालु आहे. त्या रस्त्यावर २५ वर्षापुर्वी दिवाबत्तीचे खांब लावण्यांत आले होते. रस्ता रूंदीकरण केल्यामुळे काही खांब मागे पुढे झालेले आहे. तसेच काही ठिकाणी केबल पण खराब झालेली आहे व तेथील जंक्शन बॉक्स इत्त्यादी २५ वर्षापुर्वीचे असुन तुटले व खराब झाले आहे. शिवाय तेथे लावलेल्या दिवाबत्त्या पण फारच जुन्या झालेल्या आहेत तसेच काही खांब पण गंजुन खराब झालेले आहे. विद्युत विभागाने जागेची पहाणी करून दिवाबत्तीचे काम तेथे व्यवस्थित करण्यासाठी रू.३ ,७० ,५००/- चे अंदाजपत्रक तयार केले. व त्या अंदाजपत्रकाला मुख्य लेखाअधिकारी आणि मुख्य लेखा परिक्षक यांनी पण मंजुरीसाठी शिफारस केलेली आहे. त्यानंतर सदर जागेची स्वत: पहाणी करून निविदा सुचना मागविण्याची परवानगी दि. १६.६.२००१ रोजी देण्यांत आली.

त्या निविदा सुचनेच्या प्रतिसाघात पाच एजंसीने कोरे निविदाचे अर्ज खरेदी केले आणि त्यापैकी चार निविदा धारकांनी वेळेवर म्हणजे दिनांक २.७.२००१ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत सिलबंद निविदा सादर केल्या व त्यासर्व निविदा त्याच दिवशी संध्याकाळी ४. १५ मि. उघडण्यांत आल्या. त्यांचा तुलनात्त्मक तक्ता खालील प्रमाणे देण्यांत येत आहे.

१)मेसर्स बजाज इलेक्ट्रीकल्स लिमिटेड, ७. ५ टक्के अंदाजपत्रकीय रक्कम रू. ३ ,७० ,४३९/- पेक्षा कमी म्हणजे एकुण कार्याचे खर्च रू. ३ ,४२ ,६५६/- असे दिलेले आहे.

२)मेसर्स बी.जे. इलेक्ट्रीक कंपनी नाशिक ११. ०९टक्के अंदाजपत्रकीय रक्कम रू. ३ ,७० ,४३९/- पेक्षा कमी म्हणजे एकुण कार्याचे खर्च रू. ३ ,२९ ,३५७/- असे दिलेले आहे.

३) मेसर्स जाधव ॲण्ड सन्स कल्याण, ८ टक्के अंदाज पत्रकीय रक्कम रूपये ३ ,७० ,४३९/- पेक्षा कमी म्हणजे एकुण कार्याचे खचे रू. ३ ,४० ,८०४/-असे दिलेले आहे.

४)मे. जयेश इंजीनीअरींग कोपरेशन मुंबई ५ टक्के अंदाज पत्रकीय रक्कम रूपये ३ ,७० ,४३९/- पेक्षा कमी म्हणजे एकुण कार्याचे खर्च रू.३ ,५९ ,९९७/- असे दिलेले आहे.

वरील तुलनात्त्मक तक्ते अनुसार मे. बी. जे. इलेक्ट्रीक कं. नासिक यांनी दिलेले दर सर्वात कमी व वाजवी असल्याने मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्या शिफारिशी चा आढावा घेऊन त्यांची न्युनत्तम

दराची निविदा स्वीकृत करून लागणारा खर्च रू. ३,२९,३५७/- यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड)अन्वये प्रशासकीय व वित्तिय मान्यता देऊन त्यांच्याशी १७.७.२००१ रोजी करार करण्यांत आलेला आहे ही माहिती मा. स्थायी समितीच्या अवलोकनासाठी सादर करण्यांत येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ४३</u> <u>दि:-१०.८.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गत गोल मैदान, अल्फा मेडीकल ते निरंकारी हॉल व्हाया खेमचंद अपार्टमेंट येथे दिवाबत्तीच्या नुतनीकरण करणे काम मागविलेल्या निविदांपैकी मेसर्स. बी. जे इलेक्ट्रीक कंपनी, नासिक या न्यूनतम दराच्या निविदाकाराशी आयुक्तांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड)च्या तरतुदी अन्वये स्थायी समितीच्या पुर्व मान्यतेशिवाय केलेल्या संविदेच्या माहितीची आजच्या सभेच्या कार्यवृतांतात नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-बुलचंद सोनेसर ते सी.ब्लॉक पर्यंतच्या ,विस्थापितांना पुर्नवसित केलेल्या ठिकाणच्या रस्त्याचे कामाचा प्रस्ताव आयत्त्यावेळच्या विषयामध्ये मंजूरीस घेतला जावा असे आयुक्त साहेबांनी सांगितले होते. त्याचे काय झाले? तो प्रस्ताव आणला आहे का?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त, मुख्यालय)</u> :-तो प्रस्ताव सभेच्या नियमित सभा सूचनेवर आणला जावा असे आयुक्त साहेबांनी सुचित केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-हया रस्त्याची निकड पहाता या प्रस्तावाबाबत सोमवारी दिनांक १३.८.२००१ रोजी सकाळी सभा बोलावली असे मा. सभापती महोदयांना मी विनंती करतो.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी</u> :-या प्रस्तावाबाबत सोमवार दिनांक १३.८.२००१ रोजी सकाळी १०.३० वाजता सभा बोलावली जाईल.

सांयकाळी ४. ५५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>दिनांक</u>:-१३.८.२००१.

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक १३.८.२००१ रोजी सकाळी १०. ३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

<u>मा. सभापती</u> :- श्रीमती. कालानी ज्योती.

| | |
|---|---|
| २.श्री. आयलानी कुमार | सदस्य |
| ३.श्री. पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ४.श्री. रमेश चव्हाण | सदस्य |
| ५. श्री. बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ६. श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| ७. श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ८.श्री. कैलास तेजी | सदस्य |
| ९. श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| १०. श्री.बनवारी किशोर | सदस्य |
| ११. श्रीमती. वलेचा पदमा | सदस्या |
| १२. श्रीमती वेलकर सुरेखा | सदस्या |
| १३. श्रीमती. सोनावणे यमुना | सदस्या |
| १४. श्रीमती. राधवानी आशा | सदस्या |
| १५. श्री.केणी जयकुमार | सदस्य |

तर

मा.सदस्या श्रीमती. कुंदनानी लविना या सभेस अनुपस्थित होत्त्या.

<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी:-</u> कृपया क्षमा करा, सकाळी १०.३० वाजता स्थायी समिती सभेची वेळ होती. परंतु आता ११.०० वाजता याच ठिकाणी प्रभाग समिती क्र. १ ची सभा आयोजित करण्यात आली असल्याने या सभेचे कामकाज संपे तोपर्यंत म्हणजे आज सकाळी ११.३० वाजेपर्यंत (स्थायी समितीची) सभा पूढे ढकलण्यांत येत आहे.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>दिनांक</u>:-१३.८.२००१.

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक १३.८.२००१ रोजी सकाळी १०.३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात आयोजित करण्यांत आली होती सदरची सभा पूढे ढकलून सकाळी ११.३० वाजता घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

<u>मा. सभापती</u> :- श्रीमती. कालानी ज्योती.

| | |
|---|---|
| २ श्री. आयलानी कुमार | सदस्य |
| ३ श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| ४ श्री. पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ५. श्री. रमेश चव्हाण | सदस्य |
| ६ श्री. बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ६. श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| ७. श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ८. श्री. कैलास तेजी | सदस्य |
| ९. श्रीमती.राजानी भारती | सदस्या |
| १०. श्री.वनवारी किशोर | सदस्य |
| १२. श्रीमती. वलेचा पदमा | सदस्या |
| १३. श्रीमती वेलकर सुरेखा | सदस्या |
| १४. श्रीमती. सोनावणे यमुना | सदस्या |
| १५. श्रीमती. राधवानी आशा | सदस्या |

१६. श्री.केणी जयकुमार सदस्य

पूढे ढकलण्यांत आलेल्या (स्थायी समिती)सभेचे कामकाज सकाळी ११.४० वाजता सुरु करण्यांत आले.

यावेळी आयुक्तांच्या अनुपस्थितीत स्थायी समिती सभेतील त्यांच्या आसनावर श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त,मुख्यालय) हे मा.सभापती महोदयांच्या निर्देशानुसार आसनस्थ होते.

<u>मा. सचिव</u> :-विषय क्र. १ वाचून दाखवितात.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी</u> :-हा प्रस्ताव संमत केला जावा.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण</u> :-असा कसा संमत केला जावा.?

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी</u>:-आजच्या या सभेची वेळ सकाळी १०.३० वाजेची होती. त्यानंतर ती ११.३० वाजताची करण्यात आली. आता सभेचे कामकाज सुरु करता करता सकाळचे ११.४० होत आहे. याचे कारण काय?

--२--

<u>मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी</u> :-प्रभाग समिती क्र. १ ची सभा याच ठिकाणी आज सकाळी ११.०० वाजतर आयोजित करण्यात आली होती. सदरच्या सभेचे कामकाज संपेतोपर्यंत म्हणजे १.३० वाजेपर्यंत आजच्या या स्थायी समितीची सभा पूढे ढकलण्यात आली होती. याबद्दल कृपया क्षमा करा असें मी अगोदरच म्हटले आहे.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी</u>:-सभापती महोदयांच्या या निवेदनाची कृपया इतिवृत्तांतात नोंद घेतली जावी.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण /श्री. रामचंद्र पारवानी</u>:-तसेच या रस्त्याच्या कामाची एवढी काय निकड आहे? त्यासाठी खास ही सभा बोलवावी लागली.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी</u>:-दोन-तीन महिन्यापूर्वी हा प्रस्ताव स्थायी समिती पूढे चर्चेस आला होता. त्यावेळी तो पूढे ढकलण्यांत आला होता.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण</u>:-(वनवारी)तुम्ही आयुक्त आहात काय?

<u>मा. उप-आयुक्त (श्री. दत्ता भडकवाड)</u>:-दिनांक २५.५.२००१ रोजीच्या स्थायी समिती सभेत हा प्रस्ताव चर्चेस / मंजूरीस आणला होता, त्यावेळी तो पूढे ढकलण्यांत आला होता. आपणास जो पहिला गोषवारा दिला होता त्यामध्ये सदरचा प्रस्त्ताव नामंजुर केलेला आहे असे लिहिलेले होते. दुस-या गोषवा-यामध्ये हि चुक सुधारून सदरचा प्रस्ताव पुढे ढकलण्यांत आला आहे असे लिहिले आहे.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी</u>:-या प्रस्तावाची फाईल / गोषवारा दाखवा, मला वाटते यापेक्षा वेगळे कारण होते.

*<u>मा. सदस्या श्रीमती. भारती रजानी</u>:-या कामाचा प्रस्ताव पुढे ढकलला नव्हता तर नाकारण्यांत आला होता?*

*<u>मा. उप-आयुक्त (श्री. दत्ता भडकवाड)</u>:-सभेच्या नियमित सभा सूचनेवर हा प्रस्ताव चर्चेस / मंजूरीस आणला जावा असे आयुक्तांनी सुचित केले होते.*

*<u>मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी</u>:-आपल्या फाईलमध्ये काय नोंद आहे? तीच नोंद आहे काय ?*

*<u>मा. उप-आयुक्त (श्री. दत्ता भडकवाड)</u>:-आपणास जो गोषवारा देण्यांत आलेला आहे त्यामध्ये एक वाक्य लिहायचे राहून गेले होते.*

*<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी</u>:-कोणते वाक्य लिहायचे राहून गेले होते, ते दाखवा. आपणाकडे हा जो गोषवारा आहे, तो आमच्याकडे नाही आहे.*

*<u>मा. उप आयुक्त (श्री. दत्ता भडकवाड)</u> :-प्रथम आपणास जो गोषवारा देण्यांत आला आहे, त्यामध्ये वरील चुकी व्यतिरिक्त एक वाक्य लिहायचे राहून गेले आहे. ते असे आहे की, रस्त्यांचे सिमांकन पुर्ण करून बाधीत बांधकामाची संख्या कायम करण्यात यावी व जसा फंड उपलब्ध होईल. त्याप्रमाणे नंतर काम हाती घेण्यांत यावे.*

*<u>मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी</u>:-जसा जसा फंड उपलब्ध होईल त्याप्रमाणे नंतर काम हाती घेण्यांत येईल, असे आपण गोषवा-यामध्ये लिहिले आहे.*

--३--

*<u>मा.उप-आयुक्त (श्री. दत्ता भडकवाड)</u> :-या कामास वेळ लागणार आहे म्हणून मागच्यावेळी या कामाचा प्रस्ताव चर्चेस / मंजूरीस आणला होता व तो त्यावेळी पूढे ढकलण्यांत आला होता.*

*<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण</u>:-या रस्त्याचे काम जुन्या विकास आराखडयात दर्शविलेल्या रुंदीप्रमाणे करणार की, नविन विकास आराखडयात दर्शविलेल्या रुंदीप्रमाणे घेणार?*

*<u>श्री. सूर्यकांत शिंदे (नगररचनाकार)</u>:-नविन प्रारुप विकास आराखडयाप्रमाणे तसेच तेथे दोन आरक्षणे दाखविली आहेत. एक गार्डन व दुसरे प्राथमिक शाळा , गार्डन व प्राथमिक शाळेपर्यंतचा रस्ता ४० फुट रुंद व त्यापूढे ६० फुट रुंदीचा रस्ता फेरतपासणी प्रारूप विकास आराखडयात दर्शाविलेला आहे.*

*<u>मा. उप-आयुक्त(श्री. दत्ता भडकवाड)</u> :- हया रस्त्याची रुंदी काही ठिकाणी ६० फुट तर काही ठिकाणी ४० फुट रुंद उपलब्ध आहे, गोषवा-यामध्ये लिहिले आहे की, विकास आराखडयात दर्शाविल्याप्रमाणे ४० फुट रुंदीचा रस्ता विकसित करण्याकरीता प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना तत्कालीन आयुक्तांनी दिल्या होत्त्या. मंजुर विकास आराखडयाप्रमाणे पूर्ण रुंदी उपलब्ध होत नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण</u>:-हया रस्त्याचे काम नविन विकास आराखडयाप्रमाणे हाती घेणार काय?*

*<u>श्री.सूर्यकांत शिंदे(नगररचनाकार)</u> :-नविन विकास आराखडयाप्रमाणे........*

*मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी* :-नविन विकास आराखडा लागु झाला आहे काय? नविन विकास आराखडा लागु झालाच नाही.

*श्री.सूर्यकांत शिंदे (नगररचनाकार)*:-पुर्वीचा मंजूर विकास आराखडा व आताचा प्रारुप विकास आराखडा पहाता, त्यातील सार्वजनिक हिताप्रमाणे तरतुदीला प्राधान्य देता येईल.

*म. सदस्य श्री. रमेश चव्हाण* :-नविन विकास आराखडयाप्रमाणे आपण बांधकाम मंजूरीचे प्लान मंजूर करणार काय?

*मा. सदस्य श्री.रामचंद्र पारवानी*:-प्रारुप विकास आराखडयाप्रमाणे जेथिल आरक्षण उठले गेले आहे तेथिल बांधकामाचे प्लान आपण मंजूर कराल? मी आपणास प्लान देतो , त्या बाबत आपण काय करु शकता ते मला सांगा, आपण तेथिल प्लान मंजूर करु शकता?

*श्री. सूर्यकांत शिंदे (नगररचनाकार)* :-सार्वजनिक हित आहे अशी कामे .... त्याचा निर्णय आपण घ्यायचा आहे, इमारत तोडुन रस्ता तयार करायचा की, रस्ताच तयार करायचा नाही याचा निर्णय आपण घ्यायचा आहे .

*मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी* :-नगररचनाकारांनी आता जे सांगितले आहे, त्यावर आपण काय निर्णय घेत आहात?

*मा. सदस्य श्री. ठाकूर बेहरानी*:-नविन विकास आराखडा आला तर काय रस्त्याची कामे मंजूर करायची नाहीत काय?

--४--

*मा. सदस्य श्री. किशोर वनवारी*:-नविन विकास आराखडा येत असतो, जुना विकास आराखडा जात असतो. या रस्त्याचा प्रस्ताव मागच्यावेळी पूढे ढकलण्यांत आला होता, या रस्त्याच्या कामाच्या प्रस्तावावर आयुक्तांची स्वाक्षरी झालेली आहे. या रस्त्याच्या कामाची निकड पहाता या प्रस्तावास मंजूरी दिली जावी.

यावेळी श्री. रामचंद्र पारवानी, श्री. रमेश चव्हाण , श्री. कैलाश तेजी, श्रीमती वेलकर सुरेखा इत्यादी सन्माननिय सदस्य जोरजोरात बोलत होते, त्यांच्या एकत्रित आवाजात कोण काय बोलत आहे, हे नेमके कळून येत नव्हते.

*मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण* :-एम.आय.डी.सी.ला पाणी पुरवठयाचे पैसे देण्यास महापालिकेकडे पैसे नाहीत? व ७० लाखाचा हा रस्ता तयार करण्यास आपणाकडे पैसे आहेत?

*मा. सदस्य श्री. ठाकूर बेहरानी*:-या प्रस्तावाबाबत मतदान घेतले जावे.

*मा. उप-आयुक्त (श्री. दत्ता भडकवाड)*:-हे काम करण्यासारखी जेव्हा महापालिकेची आर्थिक स्थिती होईल तेव्हा हे काम हाती घेण्यांत येईल तोपर्यंत या कामाचा कार्यआदेश दिला जाणार नाही.

*मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी*:-एम.आय.डी.सी. चे पैसे नियीमत दिले जात नाहीत म्हणून शहरात पिण्याच्या पाण्याची कपात होत आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-या प्रस्तावावर चर्चा बरीच झाली आहे, आता आम्ही पिठासीन अधिका-यांचा निर्णय घेत आहोत.

यावेळी सकाळी ११.५५ वाजता मा.सदस्या श्रीमती लविना कुंदनानी या स्थायी समिती सभागृहात उपस्थित झाल्या.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-आम्हाला या प्रस्तावावर चर्चा करायची आहे.

मा. सभापती श्रीमती . ज्योती कालानी :-जेव्हा महापालिकेची स्थिती ठिकठाक होईल, तेव्हा या प्रस्तावातील रस्त्याचे काम केले जाईल.

यावेळी सत्ताधारी व विरोधी पक्षीय , काही सदस्य पुन्हा जोर जोरात बोलत होते, त्यांच्या एकत्रित आवाजात कोण नेमके काय बोलत आहे. हे सम जून येत नव्हते.

यावेळी सत्ताधारी पक्षाचे सदस्य उभे राहुन हात वर करून प्रस्तावाच्या बाजुने आपले मत दर्शविण्याकरिता पास पास असे म्हणत होते.

१ श्री. कुमार आयलानी
२ . श्रीमती. लविना कुंदनानी
३ . श्री. ठाकुरदास बेहरानी
४ . श्री. प्रमोद टाले
५ . श्री. विनोद तलरेजा
६ . श्री. किशोर वनवारी
७ . श्रीमती. वलेचा पदमा
८ . श्री. केणी जयकुमार
९ . श्रीमती. ज्योती कालानी

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-सत्ताधारी पक्षाचे या सदस्यांनी प्रस्तावाच्या बाजूने आपले हात वर केले आहेत.

--५--

मा.सभापती श्रीमती ज्योती कालानी :-सध्या सभेत उपस्थित असलेल्या सत्ताधारी पक्षाच्या वरील सदस्यांनी उभे राहुन प्रस्तावाच्या बाजुने हात वर करून मत प्रकट केल्यामुळे सदरचा प्रस्ताव बहुमताने पारीत झाल्याचे घोषित करीत आहे.

सत्ताधारी पक्षाचे नऊ सदस्य उभे राहून पास-पास असे म्हणत होते.

विषय :- उल्हासनगर-३ येथील सोनेसर अपार्टमेंट ते सी ब्लॉकचा ४० फुट रूंदीचा रस्ता विकसित करण्याकामीच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेने एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-१ ची कामे हाती घेताना जी बांधकामे बाधीत होणार आहे. त्यांचे पुर्नवसन करण्यात आलेल्या आरक्षित जागेला सद्या जोडरस्ता नाही. या जागेशेजारून विकास आराखडयात ४० फुट रूंदीचा रस्ता दाखविलेला आहे. सदर रस्ता डी. पी. प्रमाणे विकासित करण्याकरिता प्रस्ताव तयार करण्याची सुचना तत्त्कालीन मा. आयुक्त यांनी दिलेल्या होत्त्या. त्या अनुषंगाने या जागेवर प्लेन टेबल सर्वे मे. उत्तम इंजिनिअरिंग तर्फे करण्यात आला होता. या प्लेन टेबलवर प्रस्तावित रस्ता दाखविण्याच्या कामीची कार्यवाही नगररचना

विभागाकडे प्रलंबित आहे. याबाबत नगररचना विभागाकडे सार्वजनिक बांधकाम खात्त्यातर्फे तसेच मे. उत्तम इंजिनिअरिंग तर्फे वेळोवेळी संपर्क करूनही रस्त्त्याचे सिमांकन प्लेन टेबलवर तसेच जागेवर करून मिळालेले नाही. त्यामुळे सदर कामास विलंब होत होता. या करीता सदर रस्त्त्याचे डि.पी. प्रमाणे लांबी रूंदी ग्राहय धरून जागेवर सद्या स्थितीप्रमाणे बाबी ग्राहय धरून अंदाजपमाणे मे. उत्तम इंजिनिअरिंग तर्फे प्राकलन तयार करण्यात आलेले आहे. या प्राकलनाची किंमत रू. ६९ ,५७ ,००६/- इतकी होत आहे. उपरोक्त संदर्भांकित दर्शाविलेले काम उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीने दिनांक २५. ५. २००१ रोजी पूढे ढकलण्यात आले आहे, परंतू सदर कामाची अत्त्यंत निकड असल्याकारणाने सदरचे काम लवकरात लवकर सुरु करणे अत्त्यंत जरुरीचे आहे. तसेच रस्त्त्याचे सिमांकन पूर्ण करुन बाधित बांधकामाची संख्या कायम करण्यात यावी व जसा जसा फंड उपलब्ध होईल त्याप्रमाणे नंतर काम घेण्यात यावे. नगररचनाकार विभागाकडुन या रस्त्त्याचे सिमांकन उपलब्ध झाल्यानंतर सदर प्रस्तावित खर्चात फरक होऊ शकतो. सध्या कामाची असलेली निकड पहाता उपरोक्तपणे तयार केलेले रुपये ६९ ,५७ ,००६/- खर्चाच्या प्राकलनाला स्थायी समिती कडून प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळण्यासाठी प्रस्तावित आहे. नगररचनाकार विभागाकडुन या रस्त्त्याचे सिमांकन उपलब्ध झाल्यानंतर सदर प्रस्तावित खर्चात फरक होऊ शकतो. सद्या कामाची असलेले निकड पहाता उपरोक्त पणे तयार केलेले रू. ६९ ,५७ ,००६/- खर्चाच्या प्राकलनाला स्थायी समिती कडुन मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ४४</u>  <u>दि:-१३. ८. २००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :-श्री. ठाकूर बेहरानी

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-३ येथील सोनेसर अपार्टमेंट ते सी ब्लॉक पर्यंतचा ४० फुट रूंदीच्या डी. पी. रस्ता विकसित



करणे कामी रू. ६९ ,५७ ,००६/- रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>बहूमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी</u>:-असा कसा ठराव पारित करणार? ठराव पारित झाल्याची इतिवृत्तांत नोंद घेवू नका................

१. श्री. रामचंद्र पारवानी
२. श्री. रमेश चव्हाण
३. श्री. कैलास तेजी

४. श्रीमती. राजानी भारती
५. श्रीमती. वेलकर सुरेखा
६. श्रीमती. सोनावणे यमुना
७. श्रीमती. राधवानी आशा

हे विरोधी पक्षाचे सात सदस्य उभे राहुन घोषणा देत होते.

मा. सदस्य श्री. पारवानी यांनी इतिवृत्त लिहिणारे श्री. पतंगराव, लिपिक हे इतिवृत्तांताचे टिप्पण घेत होते. मा. सदस्य श्री. पारवानी यांनी श्री. पतंगराव यांच्या हातातीत इतिवृत्त टिप्पणाचे कागद त्यांच्या हातातून हिसकावून घेतले व आपल्या आसनाजवळ जाऊन ते कागद फाडण्याचा प्रयत्न करु लागले असता ते कागद टेबलावर पडले. मा. सचिव यांनी हे कागद आपल्या ताब्यात घेऊन श्री. पतंगराव यांच्याकडे दिले.

तसेच इतिवृत्तांताचे टिप्पण घेणा-या दुस-या कर्मचारी श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी यांच्या हातातील इतिवृत्तांत टिप्पणांचे कागद मा. सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर या हिसकावून घेत होत्त्या. त्यास श्रीमती कुलकर्णी यांनी विरोध करुन त्यांना सांगितले की, तुम्ही इतिवृत्त हिसकावून घेऊ नका, तुमचे जे काही म्हणणे आहे, ते तुम्ही सचिव व पिठासीन अधिकारी यांना सांगा. इतिवृत्त हिसकावुन घेण्याचा तुम्हाला काही अधिकार नाही. त्यावर श्रीमती वेलकर म्हणाल्या की, मी स्थायी समितीची सदस्या आहे. मी काहीही करु शकते. सभा संपल्यानंतर तु बाहेर ये, उपमहापौरांच्या दालनात ये , तेथे तुला सांगते, मला काय अधिकार आहेत ते. त्यावर श्रीमती कुलकर्णी म्हणाल्या की, मी प्रशासनाची नोकर आहे, तुम्हाला मला बोलण्याचा काही अधिकार नाही. जे काही बोलायचे आहे ते पिठासीन अधिकारी व सचिव साहेब यांना सांगा. यावेळी दोघींमध्ये जोरदार शाब्दिक चकमक झाली असतांना श्रीमती कूलकर्णी हया देत नसतांना देखील मा. सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर हयांनी श्रीमती प्राजक्ता कूलकर्णी यांच्या हातातील इतिवृत्तांताचे कागद हिसकावून घेतले, आणि इतिवृत्त टिप्पण कागदाचे तुकडे तुकडे करुन सभागृहात फेकून दिले.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>हे कर्मचा-यांवर जुलूम करत आहेत.



सभागृहात सभापतींच्या आसनाशेजारी टेबलावर असलेला टेलिफोन श्री. रमेश चव्हाण यांनी उचलला आणि आपला विरोध व्यक्त करण्यासाठी ते तो टेलिफोन टेबलावर जोर-जोरात आपटू लागले.

यावेळी विरोधी पक्षीय काही सदस्य जोर जोरात बोलत होते. त्यांचा आवाज ऐकून सभागृहाबाहेर असलेले शिवसेना-भाजपाचे काही सदस्य व इतर मंडळी सभागृहात शिरले.

सभागृहातील विरोधी पक्षीय सदस्य आणि सभागृहाबाहेरुन सभागृहात आलेले शिवसेना-भाजपाचे सदस्य व इतर मंडळीनी जोरदार आरडा-ओरड सुरु केली.

या गडबड गोंधळाच्या वातावरणातच मा. सभापती श्रीमती ज्योती कालानी यांनी सभेचे कामकाज संपल्याचे दुपारी १२.०० वाजता जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>दिनांकः</u>-१.९.२००१.

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शनिवार दिनांक १.९.२००१ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सदस्य श्री. किशोर वनवारी हे पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. तसेच खाली दर्शाविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्या.

| | |
|---|---|
| १. श्री. किशोर वनवारी | सदस्य |
| २. श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| ३. श्री. पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ४. श्री. बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ५. श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| ६. श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ७. श्री. कैलास तेजी | सदस्य |
| ८. श्रीमती. वलेचा पदमा | सदस्या |
| ९ श्रीमती. सोनावणे यमुना | सदस्या |
| १० श्रीमती. राधवानी आशा | सदस्या |
| ११ श्री.केणी जयकुमार | सदस्य |

तर

१)मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी, मा. सदस्य २ श्री. आयलानी कुमार , ३. श्री. रमेश चव्हाण,४. श्रीमती.राजानी भारती,५. श्रीमती वेलकर सुरेखा या सभेस अनुपस्थित होत्या.

<u>मा. सचिव :</u>-आजच्या या सभेस मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी या उपस्थित नसल्याने आजच्या या सभेचे कामकाज चालविण्यासाठी आपणामधील एका सदस्याची पिठासिन अधिकारी म्हणुन आपण निवड करावी अशी मी आपणांस विनंती करतो.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा / श्री. रामचंद्र पारवानीः-</u>श्री. किशोर वनवारी यांची पिठासिन अधिकारी म्हणुन निवड करण्यात यावी.

श्री. किशोर वनवारी यांची सर्व संमतीने पिठासिन अधिकारी म्हणुन निवड केल्यानंतर ते पिठासिन अधिकारी स्थानी आसनस्थ झाले.

मा.सचिव :-विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. १०.८.२००१ व १३.८.२००१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.



मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:-दि. १३.८.२००१ रोजीच्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ६ वर ठराव पारित झाल्याची नोंद आहे त्यानंतर जी नोंद आलेली आहे ती चुकीची आहे त्यास आमचा विरोध आहे. जे लिहिले आहे ते खरे नाही.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले:-त्यादिवसाच्या स्थायी समितीत जे जे घडले त्याची खरीखुरी नोंद इतिवृत्तांतात आलेली आहे.

मा. पिठासिन अधिकारी( श्री. किशोर वनवारी) :- मागील सभेचे दि. १०.८.२००१ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे. तसेच दि. १३.८.२००१ रोजीच्या इतिवृत्तांतातील पृष्ठ क्र. ६ वरील नोंदीस मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी यांच्या सह श्री. कैलास तेजी , श्रीमती आशा राधवानी व श्रीमती यमुना सोनावणे यांची हरकत असल्याने दि. १३.८.२००१ रोजीचे इतिवृत्त बहुमताने कायम करण्यांत येत आहे.

मा. सचिव:-विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:-कोण स्पष्टीकरण करेल?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु):-शहरातील १९ पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्तीसाठी १२ महिन्याच्या कालावधीसाठी निविदा मागविण्यांत आलेल्या आहेत.

मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी:-निविदा प्राकलनिय दरापेक्षा जास्त दराच्या आहेत की कमी दराच्या?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-मे ओम इंडस्ट्रीयल इंजिनिअरिंग सर्व्हीसेस यांनी प्रथम निविदेत भरलेले दर हे प्राकलनिय रक्कमेपक्षा १. ७ टक्के कमी होते त्यांना वाटाघाटीत बोलावुन दर आणखी कमी करण्यास सांगितले असता त्यांनी आणखी ३. ७ टक्के दर कमी केले म्हणजेच प्राकलनिय रक्कमेपेक्षा ५. ४ टक्के कमी दराने काम करण्यास त्यांनी लेखी संमती दिलेली आहे.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:-याकामी लागणारे मजुर व साधनसामुग्री ही त्याचीच असेल ना?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-होय. याकामी लागणारे मजुर व सर्व सामान-साधनसामुग्री त्यांचीच असेल.

मा. पिठासिन अधिकारी(श्री. किशोर वनवारी) :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- विविध पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्तीकामी मेसर्स ओम इंडस्ट्रीअल इंजिनिआरिंग सर्व्हीसेस यांची वाटाघाटी अंतीची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असुन संविदेस मान्यता देणे बाबत.

--३--

प्रस्तावना:-

पाणी पुरवठा विभागातील विविध पंपिंग स्टेशन्स बारा महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने चालविण्यास देण्याबाबत रू.२२,३६,५६८/- मात्र अंदाजित खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यांत आला होता. सदर प्रस्तावास स्थायी समिती ठराव क्र. २१७ दि. ३१.३.२००१ नुसार प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळाली असून बाब क्र५९१ दि.३.४.२००१ नुसार तांत्रिक मान्यता मिळाली आहे.

या कामाकरिता पाणी पुरवठा विभागातर्फे दि. १४.५.२००१ रोजी १)दैनिक फि प्रेस जर्नल, मुंबई २)दैनिक लोकमत, मुंबई ३)दैनिक तरूण भारत, मुंबई ४)दैनिक, उल्हास विकास, उल्हासनगर या वृतपत्रांतुन निविदा सुचना प्रसिध्द झाली. या निविदा सुचनेनुसार दि. २३.५.२००१ रोजी दोन ठेकेदारांनी महानगरपालिकेस निविदा सादर केल्या. त्यांत खालीलप्रमाणे दर होते.

१) मे. अलाईड इलेक्ट्रो मेकॅनिकल्स -अंदाजित किंमतीपेक्षा ०.४ टक्के कमी<br>प्रा.लि. पुणे (रू. २२,३५,६७३/-)

२) मे.ओम इंडस्ट्रियल इंजिनिआरिंग - अंदाजित किंमतीपेक्षा १.७ टक्के कमी<br>सर्व्हीसेस, डोंबिवली (रू.२१,९८,५४६/-)

उपरोक्त निविदांपैकी मे. ओम इंडस्ट्रियल इंजिनिआरिंग सर्व्हिसेस, डोंबिवली यांची निविदा कमी दराची असली तरी यापेक्षा कमी दर व्हावेत म्हणुन मे.ओम इंडस्ट्रियल इंजिनिआरिंग सर्व्हिसेस यांना वाटाघाटीकरिता बोलाविण्यांत आले. वाटाघाटीनंतर सदर ठेकेदाराने आपले दर ३.७ टक्के कमी करून, अंदाजित किंमतीपेक्षा ५.४ टक्के कमी दराने (रू.२१,५१,७९३/-)काम करण्याची तयारी दर्शविली व तसे लेखी कळवले.

त्यानुसार मे. ओम . इंडस्ट्रियल इंजिनिअरींग सर्व्हिसेस, डोंबिवली यांची उपरोक्त कामाकरिता अंदाजित किंमतीपेक्षा ५.४ टक्के कमी या सुधारीत दराची (रू. २१,१५,७९३/-) निविदा स्विकारण्यास प्रस्तावित आहे,यांस मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांची शिफारस असून मा. आयुक्त यांनी मान्यता दीली आहे.

त्यानुसार सदर प्रस्तावास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळण्यांसाठी स्थायी समितीसमोर सादर करण्यांत येत आहे. त्यासं मंजुरी मिळण्याची विनंती आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ४५ दि:-१.९.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा,

अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले

--४--

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार शहरातील विविध पंपिंग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे कामी मे. ओम. इंजिनिअरिंग सर्व्हीसेस यांची वाटाघाटी अंतीची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून आयुक्तांना संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव:-</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:</u>-पाणी पटटीची रक्कम मिळकत करासोबत वसुल केली जाते. मात्र पाण्याचा पुरवठा होत नाही. अशा ठिकाणी टॅकरव्दारे केल्या जात असलेल्या पाणी पुरवठयाचे उल्हासनगर महानगरपालिकेने पैसे वसुल करणे हे योग्य नाही.

<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी:-</u>पाणी पटटीची रक्कम मिळकत कराबरोबर वसुल केली जात आहे ना? ज्यांच्याकडे पाण्याची नळजोडणी नाही तरीही त्यांच्याकडुन तुम्ही मिळकत कराबरोबर पाणी पटटीवर वसूल करता मग टॅकरने केलेल्या पाणी पुरवठयाच्या आकार वसूल करण्याचा हा प्रस्ताव कशाला?

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा:</u>-महासभेचा एक ठराव आहे ज्याचे सुचक आहेत श्रीमती. ज्योती कालानी व अनुमोदक आहेत श्री. भिमसेन मोरे, त्या ठरावात अशी नोंद आहे की, ज्याठिकाणी नळाने पाणी पुरवठा केला जाऊ शकत नाही त्याठिकाणी टॅकरव्दारे पाणी पुरवठा केला जाईल असा महासभेचा ठराव आहे. तो ठराव मी आयुक्त साहेबांना दाखवतो. व आयुक्तांना विनंती करतो की, टॅकर व्दारे केलेल्या पाणी पुरवठयाचा आकार वसुल केला जाऊ नये.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-आजुबाजुच्या महानगरपालिका / नगरपालिकामध्ये झोपडपट्टयांमध्ये टॅकरव्दारे निशुल्क पाणी पुरवठा केला जातो मात्र सहकारी गृहनिर्माण संस्थामध्ये इमारतीमध्ये टॅकरव्दारे केल्या जाणा-या पाणी पुरवठयाचे वाहतुकीच्या खर्चाची रक्कम घेतली जाते. सहकारी गृहनिर्माण संस्थाना , इमारतींना टॅकरव्दारे केलेला पाणी पुरवठा निशुल्क नाही.

मा.सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानी:-जेथे नळाव्दारे पाणी येत नाही तेथे तर टॅकरव्दारे निशुल्क पाणी पुरवठा केला पाहिजे ना?



श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-जेथे ७० टक्के पेक्षा जास्त पाणी पुरवठा होत आहे अशा ठिकाणी टॅकरव्दारे केल्या जाणा-या पाणी पुरवठयाचा वाहतुक खर्च आकारायचा आहे.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:-तर हे तर चुकीचे आहे ना?

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-झोपडपटयांमध्ये लोक राहातात, इमारतींमध्ये लोक रहात नाहीत काय?

मा.सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानी:- जेथे पाण्याची टाकी बांधली आहे तेथे पाणी येत नाही. बुस्टर बसविला तरी ही पाणी येत नाही. पुरेशा पाणी पुरवठा करणे ही आपली जबाबदारी आहे ना?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-इमारतींमध्ये पाणी पुरवठा तुटपूंजा / अपुरा नसतो. झोपडपटयांमध्ये पाणी पुरवठा अपूरा असतो.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-याबाबत मी श्री. नारायण पंजाबी यांच्या प्रभागाचे उदाहरण देतो, त्यांच्या प्रभागात पाणी येत नाही. तेथे बुस्टर बसविण्याची आवश्यकता आहे. ते आपल्या नगरसेवक निधितून या कामी पैसे देण्यास तयार असतांनाही आपण त्यांना बुस्टर बसवून देत नाहीत.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा:-श्रीमती. तुलसी वसीटा यांच्या प्रभागात सुध्दा पाणी येत नाही. श्री. नारायण पंजाबी यांच्या प्रभागतही पाणी येत नाही. तेथे जलवाहिनी टाकण्यासाठी हे नगरसेवक आपल्या नगरसेवक निधितून निधी उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत त्यांच्या प्रभागात पाणी पुरवठयाची कामे केली जावीत.

मा. आयुक्त (श्री. पोखरकर):-एम.आय.डी.सी. कडून आपल्या उल्हासनगर शहरास १०० (एम.आय.डी.सी.)दशलक्ष लिटर पाणी पुरवठा केला जातो. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार आपली पाण्याची मागणी आहे ११० ते १०७ दशलक्ष लिटर म्हणजे यामध्ये १० टक्के पाणी पुरवठा कमी आहे हा १० टक्के पाणी पुरवठा कोणत्त्याही परिस्थितीत असतोच. शासनाच्या नॉर्म नुसार प्रत्येक व्यक्तीस १०० ते १२७ लि. पाण्याची रोज आवश्यकता असते. सदयाच्या पाणी वाटपानुसार प्रत्यक्ष पाणी पुरवठा व अपेक्षित पाणी पुरवठा यामध्ये १० टक्के चा फरक आहे. उंच इमारतीमुळे पाणी पुरवठा व्यवस्थेत अडचणी येतात यासाठी माझे असे म्हणणे आहे की, पाणी पुरवठयाचे झोन तयार केले जावेत.

कित्त्येक प्रभागात २२ तास पाणी मिळते तर काही प्रभागात २ ते ४ तास पाणी पुरवठा होतो. याचाच अर्थ सर्व ठिकाणी पाण्याचे समान वाटप होत नाही, पाणी येतच नाही याच्याशी मी सहमत नाही. आता आपणास १०० दशलक्ष लिटर पाणी मिळत आहे व काही ठिकाणी टॅकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. प्रतीदिनी १५ टॅकर पाणी पुरवठा करण्याकामी २०-२० फे-या मारतात. प्रतीवर्षी त्त्यावर ६० लाख रुपये खर्च होतात. यावर्षी मात्र याकामी एक कोटी रुपये खर्च होईल. असा अंदाज आहे. आजुबाजुच्या महानगरपालिकेमध्ये टॅकरव्दारे केल्या जाणा-या पाणी पुरवठयाबाबतची मी माहिती गोळा केली आहे त्त्यानुसार

ठाणे महानगरपालिकेत - रु.२२५
कल्याण - रु.१९०
बदलापुर नगरपालिका - रु.२००



अंबरनाथ नगरपालिका - रु.२००

पाणी पुरवठयाबाबत मी सर्वेक्षण सुध्दा केले आहे. उल्हासनगर शहरामध्ये काही ठिकाणी पाणी पुरवठा जरूर कमी आहे. काही ठिकाणी ५० टक्के ते १०० आहे तर काही ठिकाणी ३० ते ५० टक्के पर्यंत पाणी पुरवठा होत आहे. याचा अर्थ असा आहे अपेक्षित पाणी पुरवठयापेक्षा पाणी पुरवठा थोडा कमी होत आहे. आपले म्हणणे आहे की जेथे पाणी येत नाही तेथे टॅकरने होणारा पाणी पुरवठा निशुल्क करावा परंतु आजुबाजुच्या महानगरपालिकेमध्ये असे धोरण नाही.

मी आपणांस आवाहन करतो की, जेथे टॅकरने पाणी पुरवठा केला जातो तेथील लोकांकडुन जर वाहतुक खर्च घेतल्यास टॅकरव्दारे होणारा खर्च
कमी होईल. महाराष्ट्र शासनाचे असे आदेश आहेत की, ज्या महानगरपालिका आपणांकडील पाणी पुरवठा योजना ना नफा ना तोटा या तत्त्वावर राबविणार नाहीत त्त्यांना शासना कडुन मिळणारी सर्व अनुदाने बंद केली जातील. तसेच आपण हा प्रस्ताव नाकारलात तर त्त्याची जबाबदारी आपणावर (स्थायी समितीवर)येईल.

पाणी पुरवठा योजनेवर आपला खर्च २८ कोटी होतो तर उत्त्पन्न मात्र फक्त सात कोटी रू. होते. म्हणजे ७५ टक्के नुकसान होत आहे. मिळकत कराची सुध्दा अपेक्षित वसुली होत नाही यास्तव मी आपणांस विनंती करतो की, टॅकरव्दारे गृहनिर्माण संस्थांना जो पाणी पुरवठा केला जातो त्त्यावर आकार बसविला नाही व शासनाच्या निर्देशानुसार ना नफा ना तोटा या तत्त्वावर आपली पाणी पुरवठा योजना राबविली नाही तर शासनाकडुन मिळणारे अनुदान बंद होईल. आजुबाजुच्या महानगरपालिकांमध्ये टॅकरव्दारे केलेल्या पाणी पुरवठयाचा आकार घेतला जातो. मी ठाणे महापालिकेमध्ये होतो तेथे सुध्दा टॅकरव्दारे केलेल्या पाण्याचा आकार वसुल केला जातो. जेव्हा पाईप लाईन तुटते. (इलेक्ट्रीक शट डाऊन) विद्युत पुरवठा बंद असतो. तेव्हा टॅकरव्दारे निशुल्क पाणी पुरवठा केला जातो.

मी आपणांस विनंती करतो की, टॅकरव्दारे केलेल्या पाणी पुरवठयाच्या वाहतुक खर्चापोटी काहीतरी रक्कम वसुल करण्यास मंजुरी दिली जावी. ते या महापालिकेच्या हिताचे राहिल.

मा. सदस्या श्रीमती. आशा राधवानी:-टॅकरव्दारे पाणी पुरवठा करणा-या खाजगी ठेकेदारांचे हेच दर आहेत. तर उल्हासनगर महानगरपालिकेकडुन याच दराने पाणी घेण्यात काय फायदा? मिळकत करासोबत आम्ही पाणी पट्टीची रक्कम देतोच ना?

मा.आयुक्त (श्री. बीआर. पोखरकर):-पाणी पुरवठ्याबाबत मी सर्वेक्षण केले आहे.

मा.सदस्य श्री. ठाकुरदास बहरानी:-आजुबाजुच्या महानगरपालिकांचे आपण जे उदाहरण देता तर तेथे प्रत्येक घरास पाण्याचे बिल दिले जाते काय? उल्हासनगरमध्ये काही घरांमध्ये पाण्याच्या नळ जोडण्या नाहीत तरीही त्यांच्याकडुन पाणी पट्टीची रक्कम घेतली जाते. जेथे पाणी येत नाही तेथे टॅकरने पाणी पुरवठा करणे हे महापालिकेचे काम आहे. टॅकरने पाणी पुरवठा करणे आपणांस महाग पडत असेल तर नविन निविदा मागवा ज्यांचे दर कमी असतील त्यांना हे काम देऊ या.

--७--

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-उल्हासनगर शहराचे बरेचसे मुददे समजुन न येण्यासारखे आहेत. कुठे किती टॅकर लागतात? लागत नाहीत यांचे सर्वेक्षण केले जावे. व त्याचा अहवाल पूढच्या सभेत दयावा त्याच्यावर आम्ही विचार करु.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी:-पाण्याचे टॅकर खरेदी करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद केली होती. त्यातुन टॅकर खरेदी केले नाहीत, महापालिकेने स्वत:चे टॅकर खरेदी केले असते तर खाजगी टॅकरवाल्यांना ऐवढे टॅकर भाडे दयावे लागले नसते. पाणी भरपुर आहे परंतु जाणीव पुर्वक कृत्रीम पाणी टंचाई निर्माण केली जात आहे की काय याचा शोध घेतला पाहिजे.

मा. पिठासिन अधिकारी (श्री. किशोर वनवारी):-श्री. दशोरे साहेबांना मी विचारू इच्छितो की, सर्व ६९ प्रभागांमध्ये पाण्याचे टॅकर जातात काय?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-नाही.

मा. पिठासिन अधिकारी (श्री. किशोर वनवारी):-किती प्रभागांमध्ये टॅकरने पाणी पुरवठा केला जातो? अंदाजे?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-कमीत कमी ३० प्रभागामध्ये...

मा. पिठासिन अधिकारी (श्री. किशोर वनवारी):-म्हणजे ३९ प्रभागांमध्ये टॅकरने पाणी पुरवठा होत नाही? त्याचे कारण काय?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-प्रभाग क्र ५५ तसेच कॅम्प १ ,२ ,३ , मध्ये काही प्रभाग आहेत तेथे टॅकरने पाणी पुरवठा केला जातो.

मा. पिठासिन अधिकारी (श्री. किशोर वनवारी):-३९ प्रभागांमध्ये टॅकरव्दारे पाणी पुरवठा केला जात नाही. जेथे नळाव्दारे पाणी येत नाही तेथेच टॅकरव्दारे पाणी पुरवठा करण्याची मागणी होते ना? महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची योजना पूर्ण झाल्यानंतर सर्व शहरात सम प्रमाणात पाण्याचे वितरण होऊ शकेल जेथे दोन तास कमी पाणी जाते तेथुन टॅकरव्दारे पाणी पुरवठा करण्याची मागणी होत नाही, प्रभाग क्र. ५५ मध्ये महिन्याचे ३० ही दिवस पाणी येत नाही तर त्या समोरच्या प्रभागात मात्र भरपुर पाणी पुरवठा होतो, श्री. नारायण पंजाबी यांच्या प्रभागात जर ६ लाख रू. खर्चाची जलवाहिनी टाकली तर त्याच्या प्रभागात रोज जे २० टॅकर पाणी पुरवविले जाते त्याची

आवश्यकता भासणार नाही त्या पैशाची बचत होईल, श्रीमती बेबी वसीटा यांच्या प्रभागात जलवाहिनी टाकण्याचे काम मंजुर झालेले आहे परंतु अदयाप ते चालु केलेले नाही. एम.आय.डी.सी कडुन ११०-१०५ दशलक्ष लिटर पाणी मिळाले तर ते पुरून उरले एवढे होईल.

टॅकरव्दारे केलेल्या पाणी पुरवठयास आकार बसविण्याचा हा प्रस्ताव आपण मे महिन्यामध्ये मंजुरीस आणला असता तर बरे झाले असते. आता महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका ३-४ महिन्यावर आल्या आहेत. आम्ही सर्व गटनेते एकत्र बसुन या प्रस्तावावर निर्णय घेऊ शकतो. टॅकरने पाणी पुरवठा होतो ते पाणी बरोबर नसते. टॅकर आतील बाजुने गंजलेले असतात. यातुन पुरविले जाणारे पाणी लाल तांबुस रंगाचे असते. परंतु मजबुरीने ते हे



पाणी घेत असतात. ज्या ठिकाणी पाणी येत नाही, त्याठिकाणी पाणी पुरवठा करण्यास महानगरपालिका बांधील आहे,जलवाहिनी टाकली तर आयुष्यभर टॅकरवर होणारा खर्च वाचु शकेल. जेथे बिल्कुलच पाणी येत नाही. तेथीलच लोक टॅकरचे पाणी घेतात. पाण्याचा टॅकर मिळविण्यासाठी श्री. नारायण पंजाबी, श्रीमती. बेबी वसीटा हे दिवसभर झगडत असतात. टॅकर मिळविण्यासाठी ते दिवसभर तेथे बसून राहातात.

<u>मा.सदस्य श्रीमती. आशा राघवानी:-</u>पाण्याची टंचाई वाजवीपेक्षा अधिक आहे.

<u>मा. पिठासिन अधिकारी (श्री. किशोर वनवारी):</u>-जलवाहिनीव्दारे आपण पाणी पुरवू शकत नाहीत. तेथे टॅकरव्दारे पाणी पुरविले जाते तर त्याचे सुध्दा आपण पैसे आकारत आहात? श्रीमती. पदमा वलेच्छा यांचा दिर पाण्याच्या टॅकरसाठी पूर्ण दिवस तेथे बसुन राहतो. पाणी वितरणाबाबत आपण काही योजना तयार केली नाहीत. टॅकरसाठी आपण एक एक तासाची वेळ निश्चित करून दिली असती तर टॅकरसाठी कुणालाही दिवसभर बसुन रहावे लागले नसते. महानगरपालिकेने असे धोरण ठरविले की पाण्याची नळजोडणी असो अगर नसो सर्वांना पाणीपटटी आकारली जात आहे. मात्र पाणी पुरवठा होत नाही.

<u>मा.आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):</u>-हा जो गोषवारा आपणासमोर ठेवला आहे त्यात दोन मुददे आहेत. एक शहरात पाणी टंचाईच्या विविध ठिकाणी टॅकरने पाणी पुरवठा करणे कामी अंदाजित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देणे.

व दुसरा मुददा आहे. नविन निविदा सुचना प्रसिध्द करून टॅकरचा पाणी वाहतुक खर्च व ठेकेदार निश्चित करणे.

मी आपणास सांगितलेच आहे की, आपली पाणी पुरवठा योजना तोटयात चालली आहे. यासाठी आपण टॅकर भाडयाचा दर कमीत कमी नाममात्र ठरवुन दिला तरी चालेल.

पाणी पुरवठा विभागाच्या अधिका-यांनी पाणी वितरणाचे सर्व्हेक्षण केले आहे. ब-याचशा ठिकाणी ५० टक्के पर्यंत पाणी पुरवठा होत असतो, काही ठिकाणी पाणी पुरवठा काही टक्के कमी होतो. मी असे सुध्दा आश्वासन देतो की, ज्या ठिकाणी अजिबातच पाणी येत नाही तेथे निशुल्क पाणी पुरवठा करू परंतु जेथे ५० टक्के पेक्षा अधिक प्रमाणात पाणी पुरवठा होतो अशा ठिकाणी सार्वजनिक गृहनिर्माण संस्थाना टॅकरव्दारे जो पाणी पुरवठा होतो त्यास आकार बसविणे आवश्यक आहे.

मा.सदस्या श्रीमती. लविना कुंदनानी:-जेथे पाणी पुरवठा होत आहे तेथील लोक टॅंकरने पाण्याची मागणी का करतील? काही ठिकाणी भरपुर पाणी येते तर काही ठिकाणी अजिबातच पाणी येत नाही. यात कुणाची चुक आहे? आपण गंभीरतेने घेत नाहीत म्हणुन असे होत आहे. श्री. ध्रुत साहेबांच्या कालावधीत माझ्या प्रभागत पाणी येत होते. श्री. दशोरे साहेबांनी पदभार स्विकारल्यापासुन माझ्या प्रभागात पाणी येत नाही याचे कारण काय? त्यावेळी पाणी येत होते. आता पाणी येत नाही असे कसे?याकामी कसुरदार अधिका-यांवर आपण कारवाई करत नाहीत म्हणुन असे होत आहे.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-असे काही नाही. आपला प्रभाग जलवाहिनीच्या अंतीम टोकावर आहे.

--९--

मा. पिठासिन अधिकारी( श्री. किशोर वनवारी) :-श्री. नारायण पंजाबी यांच्या प्रभागात एक थेंब सुध्दा पाणी येत नाही.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-त्यांच्या प्रभागात पाण्याचे २० टॅंकर जातात परंतु असे काही नाही की एक थेंब सुध्दा पाणी येत नाही.
मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-माझ्या प्रभागातील पाण्याची स्थिती सांगितली जावी.

मा. सदस्या श्रीमती. लविना कुंदनानी:-पूर्ण उल्हासनगर शहरातील पाण्याच्या समस्येपेक्षा माझ्या प्रभागातील पाण्याची समस्या अतिशयच खराब आहे. ध्रुत साहेबांच्या कालावधीत माझ्या प्रभागातील पाण्याची समस्या एवढी गंभीर नव्हती, तेव्हा माझा प्रभाग जलवाहिनीच्या शेवटी नव्हता काय?

मा. पिठासिन अधिकारी( श्री. किशोर वनवारी) :-उल्हासनगर-५ मध्ये पाण्याची गंभीर समस्या होती तेथे आता ३२ (एम.एल.डी) दशलक्ष लिटर पाणी पुरवठा केला जात असल्याने काही प्रभागातील पाण्याची समस्या सुटली असली तरी काही काही प्रभागामध्ये अदयाप पाण्याची समस्या आहे, नळाव्दारे पाणी पुरवठा होत असेल तर टॅंकरव्दारे पाणी पुरवठयाची कुणी मागणी करणारच नाही.

मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी:-जेव्हा शहरात दोन-दोन दिवस पाणी येत नाही तेव्हा आपण काय करणार? तेव्हा आपण निशुल्क पाणी पुरवठा करणार काय?

मा.आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-अशावेळी जेवढे होऊ शकते तेवढे टॅंकरव्दारे निशुल्क पाणी देऊ.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा:-आता हा प्रस्ताव पूढे ढकलू या व सर्व पक्षीय नेत्त्यांबरोबर चर्चा करून त्या गोषवा-यावरील प्रस्तावाचे दोन वेगवेगळे प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी स्थायी समितीसमोर सादर केले जावेत.

मा. पिठासिन अधिकारी( श्री. किशोर वनवारी) :-टॅंकरव्दारे पुरवविलेल्या पाण्याचे देयकाबाबतचा जो प्रस्ताव आहे तो वेगळा केला जावा व निविदा मागवुन वहातुक खर्च व ठेकेदार निश्चित करण्याचा प्रस्ताव जो आहे तो वेगळा केला जावा.
तो पर्यंत सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढे ढकलण्यांत येत आहे.

विषय :-शहरातील रहिवाशनांना टंचाई स्थितीत पाणी पुरवठा करणे

कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे व टॅंकरचा पाणी वाहतुक खर्च आकार बसविणेस मंजुर देणे बाबत.

मा. पिठासिन अधिकारी श्री. किशोर वनवारी यांनी सभेचे कामकाज संपल्याचे सायंकाळी ५. ३० वाजता जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-२०.९.२००१.

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक २०.९.२००१ रोजी दुपारी १. ०० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी ह्या पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

१. मा.सभापती :- श्रीमती. ज्योती कालानी.

२. श्रीमती. कुंदनानी लविना सदस्या
३. श्री. पारवानी रामचंद सदस्य
४. श्री. चव्हाण रमेश सदस्य
५. श्री. बहरानी ठाकुरदास सदस्य
६. श्री.टाले प्रमोद सदस्य
७. श्री.तलरेजा विनोद सदस्य
८. श्री. कैलास तेजी सदस्य
९. श्रीमती. राजानी भारती सदस्या
१० श्री.वनवारी किशोर सदस्य
११ श्रीमती. वलेचा पदमा सदस्या
१२ श्रीमती. वेलकर सुरेखा सदस्या
१३. श्रीमती. सोनावणे यमुना सदस्या
१४ श्रीमती. राघवानी आशा सदस्या
१५ श्री.केणी जयकुमार सदस्य

तर

मा. सदस्य श्री. आयलानी कुमार हे सभेस अनुपस्थित होते.

मा. सचिव :- विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. १.९.२००१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>दि. १.९.२००१ रोजीच्या सभेचे इतिवृत्त या हरकतीसह कायम करण्यास हरकत नाही की, आम्हाला मराठी येत नसताना मराठीतुनच इतिवृत्त पुरविले जात आहे.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u> मागील सभेचे दि. १.९.२००१ रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

<u>श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u>२० सुरक्षा रक्षकांची सेवा पुरविणे कामी निविदा मागविण्यांत आल्या होत्त्या. आलेल्या निविदांमध्ये मे. अनिल सिक्युरिटी व पर्सोनल सर्व्हिसेस ठाणे यांनी निविदेमध्ये भरलेले दर हे प्राकलनिय दरापेक्षा १५ टक्के कमी आहेत. त्यांच्याशी संविदा करण्यासाठी हा प्रस्ताव स्थायी समिती पुढे मंजुरीस आणला आहे.



<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u>किती सुरक्षा रक्षक पुरविले जातात? एकुण २०? २० सुरक्षा रक्षक तर कधी दिसुन येत नाहीत.

जेथे जेथे बंदुकधारी सुरक्षा रक्षक पुरविले जातात. तेथील स्थळे (लोकेशन) श्री. दशोरे प्र.का.अ. यांनी वाचुन दाखविली.

मा. महापौर कार्यालय - १
मा. उपमहापौर --''-- - १
मा. आयुक्त --''-- - १
उपआयुक्त --''-- - १

उमपा मुख्यालय मुख्यव्दार - १
(सब गेट) उपव्दार - १
--''-- - १
अतिक्रमण विभाग - १
कर --''-- - १

कोंडवाडा - अग्निशमन (जुने)
वाहन विभाग - विंधन विहिर विभाग
विद्युत विभाग - फस्ट शिफ्ट- १ सेकंड शिफ्ट - १
पाणी पुरवठा पंपीग स्टेशन पटेल नगर - १ --''-- - १
--''-- कॅम्प ५ - १ --''-- - १
--''-- कॅम्प ३ - १ --''-- - १
--''-- लालचक्की - १

पाणी पुरवठा शाखा कार्यालय - खेमानी १

उपविभागीय अधिकारी यांचे कॅम्प ३ येथील कार्यालय - १

---------

एकुण -- २०

<u>मा. सदस्य श्री. रामचंद पारवानीः-</u> कॅम्प नं. १ येथील टेकडीवर जे पंपींग स्टेशन आहे तेथे बंदुकधारी सुरक्षा रक्षक नाही.

<u>श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u>ते पंपींग स्टेशन (एम.आय.डी.सी.) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे आहे.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>हे २० बंदुकधारी सुरक्षा रक्षक रोज कामावर असतात का? बरोबर २० आहेत की कमी जास्त आहेत? की त्यातील काही रजेवर असतात? स्थायी समिती सभापतीच्या कार्यालयासाठी सुध्दा एक बंदुकधारी सुरक्षा रक्षक नेमला पाहिजे यापुर्वी येथे बंदुकधारी सुरक्षा रक्षक होता. सद्या नाही आहे,येथे कधी काहीही होवु शकते म्हणुन येथे बंदुकधारी सुरक्षा रक्षक असणे आवश्यक आहे. स्थायी समिती सभापतीच्या कार्यालयासाठी व सभागृहासाठी बंदुकधारी सुरक्षा रक्षक असणे आवश्यक आहे.



<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>यापुर्वी बंदुकधारी सुरक्षा रक्षक होता. तो का काढुन घेण्यांत आला?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>महापालिकेच्या अर्थसंकल्पाचा कालावधी एप्रिल ते मार्च असा असतो. प्रत्येक वर्षी निविदा मार्च महिन्यात निघाल्या पाहिजेत.

<u>श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u>निविदा काढण्याच्या कार्यालयीन कार्यवाहीत काही कालावधी जातो त्यामुळे उशिर होतो.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले हे दुपारी १. ३० वाजता स्थायी समिती सभागृहात उपस्थित झाले.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>हा प्रस्ताव सप्टेंबर ते मार्च असा आहे का? की सप्टेंबर ते सप्टेंबर असा आहे? महापालिकेच्या अर्थसंकल्पाचा कालावधी एप्रिल ते मार्च असा असतो. त्यानुसार ३१ मार्च पर्यंतच्या कालावधीसाठी आम्ही मंजुरी देवू शकतो, ३१ मार्चच्या पुढील कालावधीसाठी आम्ही मंजुरी कशी देणार? मार्चनंतर पुढील वर्षासाठी दुसरे सदस्य पदावर येतात.

मा.सदस्या श्रीमती. भारती राजानी हया दुपारी १ . ३५ वाजता स्थायी समिती सभागृहात उपस्थित झाल्या.

<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u>मार्च पर्यंत अर्थसंकल्पीय तरतुद असते परंतु निविदासाठी एप्रिल ते मार्च असाच कालावधी पाहिजे असे काही नाही. मार्च नंतर सुध्दा अर्थसंकल्पीय तरतुद उपलब्ध होत असते. व निविदा मागविण्यासाठी जी कार्यालयीन

कार्यवाही अवलंबवावी लागते त्यात दोन- तीन महिन्याचा कालावधी जात असल्याने निविदांचा कालावधी आणखी पुढे पुढे जात असतो त्यामुळे उशिर होत असतो.

<u>मा.आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-</u>३३ रस्ते रूंदीकरणाचे काम सुध्दा असेच होते ते सुध्दा वित्तिय वर्षाच्या बाहेरच्या कालावधीचे होते.

<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी यांचे म्हणणे बरोबर आहे. जेव्हा आपण निविदा काढतो तेव्हा निविदा काढण्याची कार्यालयीन कार्यवाहीची पुर्तता करताना काही कालावधी जातो. त्यामुळे निविदा एप्रिल ते मार्च अशा ठराविक कालावधीच्या न रहाता त्या पुढे पुढे जातात.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मागच्यावेळी जेव्हा याकामी निविदा मागविल्या होत्त्या तेव्हा सप्टेंबर महिना होता का?

<u>श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u>नाही, त्यावेळेला जुन महिना होता.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>जुन महिन्यात संपणारा प्रस्ताव आपण आता चर्चेस / मंजुरीस आणत आहात, कधी जुन मध्ये तर कधी सप्टेंबर मध्ये? मागच्या वर्षी जुन मध्ये प्रस्त्ताव आणला होता यावर्षी सप्टेंबरला.......



<u>मा. आयुक्त (बी.आर. पोखरकर):-</u>प्रशासकीय कार्यवाहीची पुर्तता करताना काही कालावधी जातो त्यामुळे उशीर होतो.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> तळमजल्यावरील कार्यालये पहिल्या मजल्यावरील आयूक्त कार्यालयाशी पत्रव्यवहार करतात. हे मुख्यालयाच्या इमारतीतच आहेत ना? उशिर का होतो?

<u>श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-</u>कार्यवाहीची पुर्तता करताना वेळ जातो.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> मागील वर्षी जुनमध्ये निविदा मागविल्या होत्त्या. आता सप्टेंबर मध्ये?

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u>असे करता करता पुढच्या वर्षी याकामीचा प्रस्ताव डिसेंबरमध्ये मंजुरीस येईल.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>व त्यानंतर पुन्हा एप्रिल ते मार्च असा प्रस्ताव मंजुरीस येईल?

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> २० बंदुकधारी सुरक्षा रक्षकांची सेवा पुरविणे कामी मे.आनिल सेक्युरीटी ॲण्ड पर्सनल सर्व्हिसेस, ठाणे यांची लघुत्त्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून संविदेस मान्यता देणे

बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

महानगरपालिकेत उपरोक्त कामासाठी दरवर्षी प्रमाणे या वर्षा करिता अंदाजित प्राकलन रू. १०,७४,३२२/- याला दि. १२.७.२००१ रोजीच्या स्थायी समिती सभेत ठराव क्रमांक ४१ अन्वये मंजुरी घेऊन हितसर निविदा सुचना प्रसिध्द करून मोहरबंद निविदा मागविल्या त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा यांचे समक्ष उघडल्या त्यांचा तपशील १)मे.शर्पा सिक्यु.सर्विस, मुंबई अंदाजित रक्कमेच्या ११ टक्के कमी रू. ९,५६,१४७/- २)मे. टायगर सिक्यु सर्विस मुंबई १५ टक्के जास्त रू. १२,३५,४७०/- ३) मे . ग्रुप सेवन गार्ड सिक्यु सर्विस, मुंबई ०६ टक्के कमी रू. १,००,९८६३/- ४) मे. अनिल सिक्यु व पर्सो सर्विस ठाणे १२ टक्के कमी रू. ९,४५,४०४/- ५) मे. पुरवा सिक्यु सर्विस, उल्हासनगर ०. ०४ टक्के कमी रू.१०,७३,८९२/- ६)मे. बॉम्बे इंजि. सिक्यु.

उपरोक्त विवेचन आणि तुलनात्तमक तक्ता पाहता मे. अनिल सिक्युरीटी व पर्सोनल सर्विस ठाणे यांनी दिलेले एकूण दर सर्वात कमी (१२ टक्के) असून रक्कम रू. ९,४५,४०४/- कार्यरत आहे व त्यांची कार्यपध्दती योग्य आहे. तसेच त्यांच्या निविदेची मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केली आहे. आणि मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. सबब सदर प्रकरण प्रशासकीय आणि वित्तिय मान्यता देऊ मे. अनिल सिक्युरीटी व पर्सो सर्विस ठाणे यांना रितसर कार्यालयीन आदेश देण्यास परवानगी साठी स्थायी समिती सभेत सादर करीत आहे.

--५--

<u>स्थायी समिती ठराव क्र. ४६</u> <u>दि:-२०. ९ . २००१.</u>

सुचकाचे नाव :- श्रीमती. पदमा वलेचा.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. लविना कुंदनानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या काही विभागांकरिता २० बंदुकधारी सुरक्षा रक्षकांची सुरक्षा सेवा पुरविणेकामी मे. अनिल सिक्युरिटी ॲण्ड पर्सोनेल सर्व्हिसेस, ठाणे यांची लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असुन आयुक्तांना संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

*मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-*या प्रस्तावाचे स्पष्टीकरण केले जावे. मागच्या वेळी हा प्रस्ताव मंजुरीस कधी आला होता?

*श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-*नविन वर्षासाठी प्राकलन तयार केले आहे व ते मंजुरीसाठी स्थायी समिती समोर ठेवले आहे.

*मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-*मागच्या वर्षी निविदा कधी मागवल्या होत्त्या?

*श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-*१९९६-९७ मध्ये निविदा मागविल्या होत्त्या त्यानंतर पुन्हा निविदा मागविल्या होत्त्या परंतु ते ठेकेदार पाण्याचे टॅकर पुरवू शकले नाहीत त्यामुळे पुर्वीच्या ठेकेदारांना मुदतवाढ देऊन हे काम चालु ठेवण्यांत आले.

*मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-* तीन वर्षापासुन निविदा न मागविता जुन्याच ठेकेदारांस मुदतवाढ देत आला आहात. तर मग आताच निविदा मागविण्याची काय जरूरत पडली? आणखी तीन महिने असेच चालवा ना?

*मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-*टॅकरने पाणी पुरवठा करण्या कामीचा हा पैसा ज्या भागात पाणी पुरवठा (अपेक्षेपेक्षा / वाजवीपेक्षा)कमी प्रमाणात होत आहे. त्याठिकाणीच वितरण व्यवस्था सुधारण्यासाठी हा पैसा खर्च केला जावा. कारण टॅकर मुक्त महाराष्ट्राची घोषणा करण्यांत आलेली आहे.

--६--

*मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-*तीन वर्षा पर्यंत आपण आपल्या मर्जीनुसार त्यांना (जुन्या ठेकेदारास) मुदतवाढ देत आलात.
*मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी:-*त्यांना माहित आहे शहरात कुठे पाणी टंचाई आहे, कोणत्त्या विभागात पाणी पुरवठा कमी होत आहे? कुठे योग्य त्या प्रमाणात पाणी पुरवठा होत आहे? नविन निविदा मागविणार? त्या कधी उघडणार? त्याचे टॅकर कसे असतील? टॅकरने ते बरोबर पाणी पुरवठा करू शकतील का नाही? नविन ठेकेदारांना याची माहिती नसेल.

*मा.आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-*निविदा न मागविण्यामध्ये कुणाचे स्वारस्थ होते.

*श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-*वेळोवेळी मुदतवाढ दिली आहे.

*मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-*कुणी दिली?

*श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-*स्थायी समितीनेच.

*मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-*असा प्रस्ताव आमच्या समोर कुणी ठेवला?

*मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-*आमच्या नगरसेवक निधीतील कामे जेव्हा मंजुरीस येतात तेव्हा कधी कधी म्हणता त्याकामी निविदा काढा, कधी म्हणता निधी उपलब्ध नाही.

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>हे लोक या प्रस्तावातील कामास मागील तीन वर्षापासुन मुदत वाढ देत आले आहेत. त्यावेळी त्यांनी असे नाही म्हंटले की निविदा मागवा म्हणुन आज जी निविदा मंजुरीस ठेवली आहे तीचा कालावधी एप्रिल पर्यंतचा ठेवावा. आपण ऐवढया चांगल्या प्रकारचे काम केले तर आम्ही सर्व नगरसेवक पुन्हा निवडुन येऊ.*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u>मुदतवाढीस आमची हरकत आहे. नविन निविदा मागवा म्हणुन आम्ही प्रत्येक वेळी लिहिले आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> आपण हरकती घेता व संमतीही देता?*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u>संमती दयायचीच नाही तर मग महापालिकेचे काम बंद करायचे का?*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>आवश्यक सेवा आहे म्हणुन ५(२)(२) अन्वये परवानगी दिली म्हणुनच ना?*

*<u>मा.सचिव :-</u>सद्याच्या ठेकेदारास मुदतवाढ देत नाहीत का?*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>या प्रस्तावामध्ये त्यांनी दोन्ही बाबी लिहिल्या आहेत. एक नविन निविदा मागविणे व नविन ठेकेदार निश्चित होईपर्यंत जुन्या ठेकेदारास मुदतवाढ देणे, निविदा कालावधी ३१ मार्च पर्यंतचा करा.*



*<u>मा.आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-</u>नविन ठेकेदार निश्चित होई पर्यंत...*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>नविन निविदा मागविणे व मुदतवाढ देणे असे दोन वेगवेगळे प्रस्ताव या गोषवा-यात आहेत.*

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>नविन ठेकेदार मार्च पर्यंतच असले पाहिजेत.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>निविदा मागवा परंतु त्याचा कालावधी मार्च ते मार्च असाच असला पाहिजे.*

*<u>मा.आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-</u>अर्थ संकल्पीय तरतुद एप्रिल ते मार्च या कालावधीसाठी असते.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मार्च महिन्यामध्ये या बाबींकडे लक्ष दयावे, निविदेचा कालावधी एप्रिल ते मार्च असा ठेवा.*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u>या गोषवा-यामध्ये दोन प्रस्ताव आहेत एक नविन निविदा मागविणे व मुदतवाढ देणे.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> निविदा मागविण्यासाठी परवानगी मागत आहेत. आम्हाला वाटते की तीन महिने याच लोकांकडुन काम करवुन घेतले जावे.*

**मा.सदस्य श्री. किशोर वनवारी :-**येथे एक वर्ष हा कालावधी निविदा काढण्यामध्येच जातो. प्रत्येक ठिकाणी प्रस्तावांवर क्युरी काढल्या जातात, हा प्रस्ताव ऐवढे दिवस का प्रलंबित ठेवला होता? हा प्रस्ताव प्रलंबित आहे हे आपणांस माहित नाही?

**मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः-**सहा महिन्याचा कालावधी अकाऊंट क्लीअर होण्यामध्येच जातो.

**मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-**या प्रस्तावाबाबत एकमताने खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात येत आहे.

**विषय :-** शहरात पाणी टंचाईच्या विविध ठिकाणी टॅकरने पाणी पुरवठा करणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

**प्रस्तावना :-**

सध्या महानगरपालिका शहरातील पाणी टंचाई असलेल्या विविध ठिकाणी खाजगी ठेकेदाराच्या पाण्याच्या टॅकरने जुना मंजुर निविदा दर प्रति. ७००० लिटर वा टॅकर प्रति फेरी रू. २०३/- प्रमाणे पाणी पुरवठा करीत आहे. या निविदेची मुदत यापुर्वीच संपलेली असून आवश्यकतेनुसार सदर काम सध्या सुरू ठेवण्यात आलेले आहे.

या कामाचे एक वर्षाच्या कालावधीसाठी जुना मंजुर दर रू. २०३/-या प्रमाणे एकुण रू. ६२ ,२३ ,९८०/- इतक्या रक्कमेचे अंदाजित प्राकलन तयार केलेले असुन या आर्थिक वर्षात रूपये ७० लाखाची तरतुद



केलेली आहे. तसेच शहरात पाणी पुरवठयाची पर्यायी उपाययोजना म्हणुन टॅकरने गरजेनुसार आवश्यक त्याठिकाणी पाणी पुरवठा करणे जरूरीचे आहे.

सदर कामास लेखा शाखा, लेखा परिक्षण यांचेकडुन शिफारस आली असुन नविन निविदा सुचना काढणे, आवश्यक आहे. सबब आता उपरोक्त प्राकलनास प्रशासकीय आणि वित्तिय मान्यता देणे व निविदा सुचना काढुन ठेकेदार निश्चित करणे व नविन ठेकेदार निश्चित होईपर्यंत पूर्वीच्याच ठेकेदारांना काम सुरू ठेवण्यास परवानगी देणे इ. बाबींच्या मंजुरीसाठी सदर प्रकरण स्थायी समिती सभेत मान्यतेसाठी सादर करीत आहोत.

**स्थायी समिती ठराव क्र. ४७** **दि:-२०.९.२००१.**

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामचंद पारवानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार शहरात पाणी टंचाईच्या विविध ठिकाणी टॅकरने पाणी पुरवठा करणेकामी एका वर्षाच्या कालावधीसाठी प्राकलनिय रक्कम रू. ६२ , २३ ,९८०/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच नविन निविदा सुचना काढुन ठेकेदार निश्चित करणेस वेळ लागेल या दरम्यानचे कालावधीमध्ये टॅकरने पाणी पुरवठा सुरळीत ठेवणे आवश्यक असल्याने दि. ३१.३.२००२ पर्यंत सद्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराशी पुर्वीच्या संविदेतील अटी व शर्तीवर ७००० लिटर क्षमतेचा पाणी टॅकर रू.२०३/- प्रती फेरा या दराने संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव:-</u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> नगरसेवक निधीतून प्रभाग क्र. १३ मधील घोषित गलिच्छ वस्ती, सम्राट अशोक नगर व आयोध्यानगर येथे दिवाबत्ती लावणे कामी केलेल्या संविदेच्या माहितीची नोंद करणे बाबत.

--९--

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र. १३मध्ये घोषित गलिच्छ वस्ती सम्राट अशोक नगर व अयोध्या नगर येथे दिवाबत्ती लावण्यासाठी नगरसेविका श्रीमती. पंचशिला नाना पवार यांनी दि. १०.४.२००१ रोजी पत्र देऊन नगरसेवक निधीतुन काम करून घेण्यासाठी मागणी केलेली होती. सदर कामाची निकड पाहाता संबंधीत कनिष्ठ/ उप अभियंता (विद्युत) यांना जागेवर पहाणी करून त्याप्रमाणे रूपये १,९५,०००/- चे प्राकलन सादर केलेले होते. नगरसेविका यांच्या मागणीनुसार सदर कामावरील खर्च उल्हासनगर महानगरपालिकेच्या अ अंदाजपत्रकाच्या भाग क्रमांक २-सी-४ (५) लेखा शीर्ष अंतर्गत येणार असुन वित्तिय वर्ष २००१-२००२ च्या बजेट कंट्रोल रजिस्टर मध्ये त्याची नोंद घेऊन व मुख्य लेखा अधिकारी आणि मुख्य लेखा परिक्षक त्यांची शिफारसीचा आढावा घेऊन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम ७३ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून सदर कार्याच्या प्राकलन रक्कम रू. १,९५,०००/- यास मंजुरी देऊन डी.डी. आर. मार्फत लेबर को. ऑ. सोसायटी ठरवुन काम करून घेण्याची दिलेली मान्यता व दिनांक ३.९.२००१ रोजी जय हिंद लेबर को.ऑ.सोसायटी झालेल्या कराराची माहीती स्थायी समितीपुढे अवलोकनासाठी सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ४८</u> <u>दि:-२०.९ .२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रमेश चव्हाण.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार नगरसेवक निधीतुन प्रभाग क्र. १३ मधील घोषित गलिच्छ वस्ती, सम्राट अशोक नगर व आयोध्या नगर येथे दिवाबत्ती व्यवस्था करणे कामी रू. १,९५,०००/- अंतर्भुत खर्चाची आयुक्तांनी मे.जयहिंद लेबर कॉ.ऑ.सोसायटी यांच्याशी केलेल्या संविदेच्या माहितीची आजच्या सभेच्या कार्यवृतांत नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव:-</u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--१०--

<u>विषय :-</u> नगरसेवक निधीतुन प्रभाग क्र. २८ मधील घोषित गलिच्छ वस्ती, विठ्ठलवाडी झोपडपट्टी येथे दिवाबत्ती लावणे कामी <u>केलेल्या संविदेच्या माहितीची नोंद करणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर-३ येथील प्रभाग क्र.२८ मध्ये घोषित गलिच्छ वस्ती विठ्ठलवाडी झोपडपट्टी येथे दिवाबत्ती लावण्यासाठी नगरसेवक श्री. राजेंद्र शां. चौधरी यांनी दि. ४.६.२००१ रोजी पत्र देऊन नगरसेवक निधीतुन काम करून घेण्यासाठी मागणी केलेली होती. सदर कामाची निकड पाहाता संबंधीत कनिष्ठ उप अभियंता (विद्युत) यांना जागेवर पहाणी करून त्याप्रमाणे रूपये १,१९,०००/- चे प्राकलन सादर केलेले होते. नगरसेवक याची मागणीनुसार सदर कामावरील खर्च उल्हासनगर महानगरपालिकेच्या अ अंदाजपत्रकाच्या भाग क्रमांक २-सी-४ (५) लेखा शीर्ष अंतर्गत येणार सिन वित्तिय वर्ष २००१-२००२ च्या बजेट कंट्रोल रजिस्टर मध्ये त्याची नोंद घेऊन व मुख्य लेखा अधिकारी आणि मुख्य लेखा परिक्षक त्यांची शिफारसीचा आढावा घेऊन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम ७३ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा

वापर करून सदर कार्याच्या प्राकलन रक्कम रू. १ ,१९ ,०००/- यास मंजुरी देऊन डी. डी. आर. मार्फत लेबर को. ऑ.सोसायटी ठरवुन काम करून घेण्याची दिलेली मान्यता व दिनांक ३.९.२००१ रोजी जनसेवा लेबर को.ऑ.सोसायटी झालेल्या कराराची माहीती स्थायी समितीपुढे अवलोकनासाठी सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ४९</u> <u>दि:-२०. ९ . २००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार नगरसेवक निधीतुन प्रभाग क्र. २८ मधील घोषित गलिच्छ वस्ती, विठ्ठलवाडी येथे दिवाबत्ती व्यवस्था करणे कामी रू. १ ,१९ ,०००/- अंर्तभुत खर्चाची आयुक्तांनी मे.जनसेवा लेबर कॉ.ऑ.सोसायटी यांच्याशी केलेल्या संविदेच्या माहितीची आजच्या सभेच्या कार्यवृतांत नोंद करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--११--

<u>मा.सचिव:-</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा. कारण की, या प्रकरणात विभागातुन अधिक माहिती उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे त्यासाठी विभागातील दस्तांऐवज पहाणेस वेळ लागेल म्हणुन सदरचा प्रस्ताव पुढे ढकलण्यांत यावा.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u> मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा यांनी सुचविलेल्या कारणांमुळे सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढे ढकलण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u>शहरातील विंधन विहिरीवरील हातपंप देखभाल दुरूस्ती कामी मे. रवि सचदेव कंपनी यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असुन संविदेस मान्यता <u>देणे बाबत</u>.

दुपारी १ . ५० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः-११.१०.२००१.

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक ११.१०. २००१ रोजी सायंकाळी ४. ३०वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी ह्या पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

१. मा.सभापती :- श्रीमती. ज्योती कालानी.

| | |
|---|---|
| २. श्री. आयलानी कुमार | सदस्य |
| ३. श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| ४. श्री. पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ५. श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ६. श्री. बहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ७. श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| ८. श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ९. श्री. कैलास तेजी | सदस्य |
| १०. श्रीमती. राजानी भारती | सदस्या |
| ११ श्री.बनवारी किशोर | सदस्य |
| १२ श्रीमती. वेलकर सुरेखा | सदस्या |
| १३. श्रीमती. सोनावणे यमुना | सदस्या |
| १४ श्रीमती. राधवानी आशा | सदस्या |
| १५ श्री.केणी जयकुमार | सदस्य |

तर

मा. सदस्या श्रीमती. वलेचा पदमा ह्या सभेस अनुपस्थित होत्त्या.

मा. सचिव :-उल्हासनगर महानगरपालिकेत नव्याने प्रतिनियुक्तीवर आलेल्या उप आयुक्तांची श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त) मुख्यालय हे सभागृहास ओळख करून देवू इच्छितात.

**श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त):-**श्री. अजिज कारचे हे प्रतिनियुक्तीवर उपायुक्त म्हणुन आपल्या महापालिकेत आलेले असुन त्यांचेकडे आरोग्य विभागाचा कार्यभार सोपविण्यांत आलेला आहे.

**श्री. अजिज कारचे (उपायुक्त आरोग्य विभाग):-**मी, अजिज कारचे, प्रतिनियुक्तीवर उपायुक्त पदाचा पदभार स्विकारला असुन सद्या माझ्याकडे आरोग्य विभागाचा कार्यभार सोपविण्यांत आलेला आहे. मी गेल्या १३ वर्षापासुन मुख्याधिकारी म्हणुन कार्यरत होतो, खोपोली, पनवेल याठिकाणी मुख्याधिकारी होतो.

मा. सभापती महोदयांच्या निर्देशानुसार श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय) हे आयुक्तांच्या अनुपस्थितीत स्थायी समितीतील आयुक्तांच्या आसनावर आसनस्थ होते.

--२--

सायंकाळी ५.०५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**मा. सचिव :-** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. २०.९.२००१ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-**स्थायी समितीच्या दि. २०.९.२००१ रोजीच्या सभेत शहरातील विंधन विहिरीवरील हातपंपाच्या देखभाल दुरूस्ती कामी मे. रवि सचदेव कंपनी या न्युनतम दराच्या ठेकेदाराशी संविदा करण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव चर्चेस आला होता. हा प्रस्ताव आम्ही सर्वानुमते (Defer) पुढे ढकलला होता तो यासाठी की तो ठेकेदार नविन होता, त्यास त्या कामाची काही माहिती नाही तसेच या प्रस्तावाबाबत संबंधित विभागाने सविस्तर माहिती उपलब्ध करून दिली नसल्याने,ती उपलब्ध करून देण्यासाठी तो प्रस्ताव पुढे ढकलला होता, आम्हास असे समजले आहे की, आयुक्तांनी श्री. दशोरे (प्र. का. अ. पा. पू. विभाग) यांना असे निर्देश दिले आहेत की, ह्या कामास मी मंजुरी देतो आहे. माझ्या अधिकार क्षेत्रात असल्याने आपण सदरचे काम चालु करावे, स्थायी समितीने पूढे ढकललेल्या प्रस्तावाबाबत आयुक्त परस्पर निर्देश देवून काम करून घेत आहेत. हा स्थायी समिती सदस्यांचा अपमान आहे. या प्रस्तावाबाबत सविस्तर माहिती उपलब्ध करून दिली जावी किंवा जुन्या ठेकेदारास सलग मुदत वाढ दिली जावी. परंतु जो पर्यंत स्थायी समितीचे सदस्य समाधानी होत नाहीत तो पर्यंत त्या प्रस्तावाचे कामास आयुक्तांनी परस्पर मंजुरी देवू नये.

**मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी:-**त्या ठेकेदारास या कामाची माहिती नाही..

**मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-**मागच्यावेळी आम्ही ज्या ठेकेदारांना ब्लॅक लिस्ट मध्ये टाकले होते त्यामध्ये यांच्या नावाचा समावेश आहे.

तसेच नगरसेवक निधीतून आमच्या प्रभागात २-२ लाखाची कामे सप्टेंबरमध्ये केली जाणार होती आता ऑक्टोबर महिना अर्ध्या संपत आला आहे. तरीही तेथे नगरसेवक निधीतील कामे होत नाहीत.

**मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-** आयुक्त स्थायी समितीस महत्त्व देत नाहीत, २ लाखाच्या कामास मंजुरी देणे त्यांच्या अधिकारात आहे. आम्हाला असे सुध्दा माहित पडले आहे की १० लाख पर्यंतच्या कामास मंजुरी देण्याचे सुध्दा त्यांना अधिकार आहेत. तर मग स्थायी समिती कशासाठी? आयुक्तांनी आपल्या अधिकारान्वये स्थायी

समिती बरखास्त करावी, तो स्थायी समिती बरखास्त का करत नाहीत? त्यांनी स्थायी समिती बरखास्त केली पाहिजे?

दि. २०.९.२००१ रोजीच्या सभेचे इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिव :-विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः-या सभेचे कामकाज सोमवार पर्यंत पुढे ढकलले जावे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-या सभेचे कामकाज पुरे करू या, व सोमवारी दुसरी सभा आयोजित करू या.

--३--

तसेच या प्रस्तावाचे काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ५(२)(२)मधील तरतुदीनुसार दिले पाहिजे.

मा.सचिवः-परंतु आयुक्तांनी त्यास संमती दिली नाही तर?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-आम्ही या कामी आयुक्तांना अधिकार देत आहोत, स्थायी समिती अधिकार घेत नाही.

मा.सदस्य श्री. पारवानी रामचंदः-हे काम ५(२)(२) अन्वये केले पाहिजे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी याचे सुध्दा हेच म्हणणे आहे की, सदरचे काम ५(२)(२) नुसार करण्यांत यावे.

मा.सचिवः-निविदा न मागविता थेट संविदा करण्यास प्रस्तावित करित आहोत. प्रभारी आयुक्त साहेब, यावर आपले काय म्हणणे आहे?

श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-याबाबत स्थायी समितीने निर्णय घ्यावा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-बरोबर आहे. आम्ही तेच म्हणत आहोत. आम्ही आयुक्तांना याकामी अधिकार देत आहोत.

श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):-स्थायी समितीला अधिकार आहेत. ते निर्णय घेवू शकतात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-हे वर्ष निवडणुकांचे आहे, यावर्षात लवकरात लवकर कामे झाली पाहिजेत. म्हणुनच आम्ही ५(२)(२) अन्वये याकामी आयुक्तांना अधिकार प्रदान करित आहोत.

मा.सचिवः-प्रभारी आयुक्त साहेब, याबाबत आपण आपले मत प्रदर्शीत केले पाहिजे.

प्रभारी आयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-मुख्य लेखा परिक्षक श्री. काळे साहेबांनी खुलासा केला आहे त्याची इतिवृतांतात नोंद घेतली जावी.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-यापूर्वी सुध्दा अशा आशयाचे अधिकार आम्ही आयुक्तांना प्रदान केलेले आहेत.

सलामतराय पुरस्वानी याचा रस्ता त्याबाबत सुध्दा अधिकार प्रदान करण्यांत आले होते त्यावेळी काही कारणे दर्शाविली नव्हती, त्यासाठी हे काम सुध्दा ५(२)(२) अन्वये केले पाहिजे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरच्या प्रस्तावाबाबत सर्वानुंमते पुढील प्रमाणे ठराव समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर येथील सम्राट अशोक नगर ते साईबाबा मंदिर पर्यंतचा रस्ता एम ३५० ने बांधणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

--४--

प्रस्तावना:-

उल्हासनगर महापालिकेच्या सन २००१-२००२ च्या मुळ अंदाजपत्रकात दुर्बल घटक वसाहतीत विकास कार्य करण्यासाठी रू. १. ५० कोटीची तरतुद दाखविण्यात आली आहे.

दिनांक १८.८.२००१ रोजी मा. आयुक्त साहेबांच्या दालनात झालेल्या सभेत सदर लेखा शिर्षाखाली सध्या तरतुदीनुसार फक्त ५० टक्के तरतुदीपुरतीच अंदाजपत्रक तयार करून मंजुरीकरता सादर करावित असे मा. आयुक्त साहेबांनी सुचविले होते. त्यानुसार एकुण ११ कामाचे प्राकलने मंजुरीकरीता मा. आयुक्त साहेबांकडे पाठविले असता एकूण ११ कामांपैकी १० कामांचे प्रत्त्येकी १० लाखापेक्षा किंमत कमी असल्यामुळे सदर यादीतील १ ते १० कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान केलेली आहे. व उल्हासनगर येथील सम्राट अशोक नगर येथे साईबाबा मंदिर पर्यंत रस्ता एम-३५० ने बांधणेचे कामाची किंमत १० लाखापेक्षा जास्त असल्यामुळे सदर कामास स्थायी समिती सभेकडुन मंजुरी मिळणेसाठी प्रस्तावित करावे असे मा. आयुक्त साहेबांच्या दिनांक २०.९.२००१ च्या शे-यानुसार सुचविले आहे. सदर कामाचे अंदाजित प्राकलनिय किंमत रू. २५,३२,०००/- इतकी होत आहे. तरी सदर कामास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेसाठी व स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यासाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ५० दि:-११.१०.२००१.

सुचकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :- श्री. रामचंद पारवानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर येथिल सम्राट अशोक नगर येथे साईबाबा मंदिर पर्यंतचा रस्ता एम ३५० ने बांधणे कामी रुपये २५,३२,०००/- चे प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे.

तसेच सदरचे काम अत्यंत तातडीचे आणि आवश्यक असल्याने आयुक्तांना योग्य आणि आवश्यक वाटेल त्या ठेकेदाराशी निविदा शिवाय थेट संविदा करण्यास प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव:-</u>विषय क्र.३ वाचुन दाखवितात.

--५--

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u> या प्रस्तावामध्ये २ मुददे सन्माननिय सदस्य समाविष्ट करू इच्छितात. या ठिकाणची सदस्यांनी प्रत्यक्ष पहाणी केली पाहिजे. हिंदु स्मशान भुमीच्या प्लॉटची जागा त्यांच्या ताब्यात जाता कामा नये त्यांचा प्लॉट त्यांना मिळाला पाहिजे त्याबाबत शहर अभियंत्यांनी प्रत्यक्ष या जागेची पहाणी करून. आपला अहवाल स्थायी समितीत सादर केला पाहिजे.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर-५ येथे सिमिट्री ग्राऊंडमध्ये कंपाऊंडवॉल पोहोच रस्ता व व्दार बनविणे कामी आयुक्तांनी केलेल्या <u>संविदेच्या माहितीची नोंद करणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर ५ येथे सिमिट्री ग्राऊंड मध्ये कंपाऊंड वाल पोहोच रस्ता व व्दार बनविणे करीता उच्च न्यायालयाने आदेश दिलेले असुन त्यानुसार सदरचे काम करणेसाठी उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २००१-२००२ च्या आर्थिक वर्षात तरतुद नसल्यामुळे सदर काम करणेसाठी लेखा शिर्ष विकास अधिभार शुल्क निधीतून प्रस्तावित केले होते. त्यानुसार मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी परवानगी प्रदान केलेली आहे. उच्च न्यायालयाने दिलेले पत्र क्र. <u>५७२७/२०००</u> इन सिव्हील पिटीशन नं. २१ ४.२००१ नुसार दिलेल्या आदेशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर कामाचे रू. ७,५८,९००/- इतक्या रक्कमेचे प्राकलन तयार केले आहे. तसेच सदर काम करणेसाठी मा. सचिव, उल्हासनगर महानगरपालिका यांनी उच्च न्यायालयाची एक प्रत नं. युएमसी/एलडी/४८१ नुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविलेली आहे. तरी उच्च न्यायालनयाने दिलेल्या आदेशानुसार सदर काम लवकरात लवकर पुर्ण करणे गरजेचे आहे. सदरचे काम लेखा शिर्ष सी-४ (xiv)पी- ii मधुन करण्याचे प्रस्तावित केले आहे. तरी त्यानुसार निविदा बोलविण्यांत आले असून मे. प्रकाश एन. रायसिंघानी यांचे नावे मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांचे शिफारशीनंतर २. ५० टक्के कमी दराने मंजुर केले आहे. सदर कामाचा करारनामा

करून काम सुरू करण्यात आले आहे. तरी कामाची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी सादर करण्यांत येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ५१ दि:-११.१० .२००१.

सुचकाचे नाव :- श्री. केणी जयकुमार.
अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. कुंदनानी लविना.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर-५ येथे सिमिट्री ग्राऊंडमध्ये कम्पाऊंडवॉल पोहोच रस्ता व व्दार बनविणे कामी आयुक्तांनी मे. प्रकाश एन. रायसिंघानी या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी केलेल्या संविदेच्या माहितीची आजच्या सभेच्या कार्यवृतांतात नोंद करित आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--६--

मा.सचिव :-विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी/ श्री. रमेश चव्हाण :-या प्रस्तावाचे स्पष्टीकरण कोण करेल? काय काय साहित्य वापरले आहे? काय काय काम केले आहे?

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-कोणत्त्या प्रवेश व्दाराचे काम चालु केले आहे? किती काम झाले आहे?

श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा.वि):-उल्हासनगर शहरात दि. ४.८.२००१ रोजी केंद्रीय गृहमंत्री मा. लालकृष्ण आडवाणी हे येणार होते त्यांच्या येण्याजाण्याच्या रस्त्यातील खड्डे भरण्याकामी मा.महापौर, पोलिस उपायुक्त व नगरसेवकांनी विनंती केली होती. हे काम तातडीने करावयाचे असल्याने या कामासाठी करारनामा करून काम चालु केले होते.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-शिवमंदीर येथील प्रवेशव्दारासाठी काय-काय काम केले? खर्च काय केलात?

श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा.वि):-प्रवेशव्दारास टाईल्स लावल्या आहेत त्याचे सविस्तर प्राकलन तयार केले आहे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-किती टाईल्स लावल्या? त्याची सविस्तर माहिती दिली जावी. जुन्या टाइल्स किती वापरल्या त्याची सविस्तर माहिती दिली जावी. हि माहिती सध्या इथे आपणाकडे उपलब्ध नसेल तर नंतर यासर्व तपशिलासह प्रस्ताव स्थायी समितीपुढे आणला जावा.

प्रभारी आयुक्त साहेब, सध्या येथे यांच्याकडे माहिती उपलब्ध नाही ती माहिती आणायला सांगा. नाहीतर पुढच्या वेळेला सविस्तर माहिती आणायला सांगा.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>चारही प्रवेशव्दारांची सदयस्थिती काय आहे? ती सभागृहासमोर आणली जावी. तोपर्यंत हा प्रस्ताव सर्वानुमते पुढे ढकलला जावा.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले हे सांयकाळी ५.२० वाजता स्थायी समिती सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा.सचिवः-</u>विषय क्र. ४ चे काय करत आहात? पुढे ढकलत आहात काय?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>सर्व संमतीने पुढे ढकलत आहोत.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव वर नमुद केलेल्या कारणामुळे सर्वानुमते पुढे ढकलण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत करावयाच्या ४ कामां संबंधित आयुक्तांनी केलेल्या <u>संविदेच्या माहितीची नोंद करणे बाबत.</u>

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. कुमार आयलानीः-</u>सदरचा प्रस्ताव समंत केला जावा.

--७--

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>मा. सदस्य श्री. राजेंद चौधरी यांच्या प्रभागात आरक्षित भुखंडास संरक्षण भिंत बांधण्याकामी यापुवीचे आयुक्त श्री. बक्षी साहेबांनी मंजुरी दिली होती तो प्रस्ताव चर्चेस आलेला नाही. मग हा प्रस्ताव कसा चर्चेस आणला?

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>अशाच प्रकारचा एक प्रस्ताव माझ्या सुध्दा प्रभागातील होता.तसेच श्रीमती. भगवंती रूपचंदानी यांच्या प्रभागातील सुध्दा होता. हे तीनही प्रस्ताव चर्चेस यावयास पाहिजे होते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आमचे सन्मानानिय सदस्य श्री. प्रमोद टाले, श्री. राजेंद्र चौधरी, श्रीमती. भगवती रूपचंदानी यांच्या प्रभागातील प्रस्ताव स्थायी समितीपुढे चर्चेस आणावयाचे राहुन गेले असतील. महापालिकेच्या राखीव भुखंडांना कुंपण घालणे / संरक्षण भिंत बांधणे कामी महापालिकेच्या अर्थ संकल्पात २५ लाख रू. तरतुद केली होती. ती यासाठी की राखीव भुखंडावर अतिक्रमणे होऊ नयेत, याबाबतचे जे काही प्रस्ताव प्रलंबित असतील ते पुढच्या स्थायी समिती सभे पुढे चर्चेस आले पाहिजेत. नाहीतर आम्ही त्या सभेचे कामकाज चालु देणार नाही. एकतर उल्हासनगर महानगरपालिकेचे भुखंडावर अतिक्रमणे होऊ नयेत म्हणुन आम्ही ते वाचवु इच्छित आहोत. प्रभारी आयुक्त साहेब हा विषय रद्द करून पुढच्या स्थायी समितीत हा विषय पुन्हा चर्चेस आला पाहिजे.व ५(२)(२) अन्वये त्यास मंजुरी दिली गेली पाहिजे.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर ३ येथील लायन गार्डनला संरक्षण भिंत बांधणे कामी आयुक्तांना निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना:-

उल्हासनगर-३ येथील लायन गार्डनला कंपाऊंड भिंत बांधणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या राखीव जागेवर संरक्षण भिंत बांधणेसाठी विनंती केलेली होती. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर कामाचे प्राकलन तयार करून मंजूरीसाठी लेखा विभागात पाठविले असता मुख्य लेखा अधिकारी यांनी सदर कामाचे प्राकलन ५ (२)(२)मध्ये मंजूरी केल्याची शिफारस केली आहे.

तरी सदर कामाच्या प्राकलनिय रू. ५,९२,२००/- यांस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अन्वये कलम ५ (२)(२) नुसार मंजुरी मिळणेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ५२ दि:-११.१० .२००१.

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

--८--

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर-३ येथील लायन गार्डनला संरक्षण भिंत बांधणे कामी आयुक्तांना आवश्यक व योग्य ठेकेदाराशी निविदाशिवाय थेट संविदा करण्यास प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव:-विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- विद्युतविभागाकरिता जुनी व निकामी झालेल्या शिडी बसविलेल्या सेवा वाहना ऐवजी नविन वाहन खरेदी करणे कामी आयुक्तांना निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना:-

महानगरपालिकेच्या विद्युत विभाग शहरात लादलेल्या दिवा बत्तीचे निगा व दुरूस्ती विभागीय कर्मचा-यांमार्फत करतात व यासाठी महानगरपालिकेने शहराची विभागनी करून दिवाबत्ती निगा व दुरूस्तीसाठी सात उपविभागांची रचना केलेली आहे. प्रत्येक उप विभागाला १-१ शिडी सेवा वाहन उपलब्ध करून दिलेले आहे. या सात वाहनांपैकी पांच वाहने १९७८ तमेज १९८७ या दरम्यान महापालिकेने खरेदी केलेली आहे. आणि हया सर्व गाडया ५ गाडया जुन्या झाल्याने वारंवार खराब होतात त्यामुळे खर्च पण होतो. तसेच कामामध्ये पण अडथळा निर्माण होतो.

सदर बाबी लक्षात घेऊन सध्या कमीत कमी १९७८ साली खरेदी केलेली जीप व शिडी खरिज करून एक नविन जीप व शिडी खरेदी रवामे अति आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या 'अ' अंदाज पत्रकाच्या भाग १ च्या ब- सार्वजनिक सुरक्षीतता व सोई अंतर्गत दिवाबत्ती निगा व दुरूस्तीसाठी १.३० कोटीचा प्रावधान केलेला आहे. त्या शिर्षातुन हे वाहन व शिडी खरेदी करणे रास्त राहील कारण ही जीप व शिडी दिवाबत्ती निगा व दुरूस्तीचे एक मुख्य हत्यार आहे. आणि त्या शिर्षात पुरेशी तरतुद पण शिल्लक आहे.

यासाठी मे. महिन्दा ॲन्ड महिंन्दा मुंबई कंपनी कडुन सरकारी दरानुसार जीप मॉडेल महिंन्दा पीक अप सिंगल कॅब एम डी. आय खरेदी करण्या करिता दरपत्रक मागविलेले आहे त्यांनी यासाठी एकूण अंदाजित रूपये ३, २०,०००/- (Firm prince at the of deliverty) अशी किंमत दिलेली

--९--

आहे. तसेच जकात, विमा व आर.टी.ओ. नोंदणी इत्त्यादीचे खर्च अंदाजित रूपये २०,०००/- पर्यंत येणार त्यामुळे एकूण अंदाजित किंमत ३,४०,०००/- पर्यंत होईल. तसेच मे. फेमस लॅडर मॅन्युफेक्चरींग कंपनी मुंबई यांचे कडुन शिडी खरेदी करून बसविण्यासाठी पण दर पत्रक मागविले आहेत त्यांनी एकूण रू. ४८,५००/- चे खर्च यासाठी दिलेला आहे. मे.महेंन्द ॲन्ड महेन्दा कंपनी कडून थेट गाडी खरेदी करण्याचे कारण असे आहे की, हे मॉडेल आपल्याला जास्त सोईस्कर आहे व त्यांनी दिलेला दर सरकारी आहे. तसेच मे. फेमस लॅडर मॅन्यूफेक्चरींग कंपनी यांचेकडुन थेट शिडी खरेदी करून बसविण्याचे कारण असे आहे की पूर्वीच्या सर्व शिडया या कंपनी कडुनच खरेदी करण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या विक्रि नंतरची सेवा अतिशय चांगली आहे आणि त्यांनी दिलेले दर पण बाजारभाव लक्षात घेता अतिशय वाजवी आहे.

सार्वजनिक सुरक्षिततेच्या व आपल्या कर्मचा-यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान अंतर्गत लोकांचे कार्यास गति देण्याच्या दृष्टीने जुने व निकामी जीप ऐवजी महेन्दा ॲन्ड महेन्दा कंपनी कडुन जीप खरेदी करण्याचे व मे. फेमस लॅडर मॅन्युफॅक्चरींग कंपनी यांच्या कडुन थेट शिडी खरेदी करून बसविण्यासाठी लागणारा अंदाजित खर्च रू. ३,९०,०००/- यास मुंबई

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम (२)(२) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळण्यासाठी प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ५३</u>                    <u>दि:-११.१० .२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार विद्युत विभागाकरिता जुनी व निकामी झालेली शिडी बसविलेल्या सेवा वाहनाऐवजी नविन वाहन आणि शिडी खरेदी करून बसविणे कामी आयुक्तांना अनुक्रमे मे. महिंन्दा ॲण्ड महिंन्दा कंपनी व मे.फ्रेमस लॅडर म्यॅन्युफ्कॅचर कंपनी यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदा करण्यास प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव:-</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>श्री. काळे साहेब या प्रस्तावाचे स्पष्टीकरण केले जावे.



<u>श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):-</u>प्रशासनिक मुददा आहे.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त मुख्यालय):-</u>श्री.ब्राम्हणी. एस. पगारे यांना महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडुन बिगर घरगुती नळजोडणी मंजुर करण्यांत आली होती. माहे फेब्रुवारी ९९ पर्यंत त्यांना बिगर घरगुती दराने पाणी बिल आकारणी करण्यांत येत होती. त्यानंतर कोणतीही पुर्व मंजुरी न घेता दस्तऐवजांमध्ये हेराफेरी करून महापालिकेचे जाणीव पुर्वक रू. ७५,०००/- आर्थिक नुकसान केले आहे. यांच्या विरूध्द खातेनिहाय चौकशीचे काम श्री. काळे साहेब यांच्याकडे सोपवण्यांत आले होते. श्री. शेख हे पाणी पटटी अधिक्षक असताना महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. हे निर्दशनास आले आहे. श्री. बक्षी साहेब आयुक्त असताना श्री. शेख यांना कामावरून काढुन का टाकण्यांत येऊ नये याबाबत त्यांच्यावर कारणे दाखवा नोटीस बजावण्यांत आली होती. त्या नोटीसी बाबत त्यांनी जो खुलासा सादर केला तो समाधानकारक वाटला नाही. त्यानंतर श्री. बक्षी साहेबांची बदली झाली. त्यानंतर दि. ३.९.२००१ रोजी समक्ष भेटुन म्हणणे ऐकुन घेण्याची त्यांना संधी देण्यात आली होती. परंतु त्यावेळी सुध्दा त्यांचा खुलासा समाधानकारक वाटला नाही. त्यानंतर विभागीय नियमांचा व शिस्तीचा भंग २)महापालिकेच्या महसुलाचे नुकसान३)कर्तव्यात हयगय व

निष्काळजीपणा हे आरोप सिध्द होत असल्याने त्यांना कामावरून कमी करण्यासाठी स्थायी समितीपुढे हा प्रस्ताव ठेवला आहे.

<u>मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानी:-ते</u> पाण्याची चोरी करत होते. त्याबाबतची त्यांच्या विरूध्द चौकशी का बसविण्यांत आली नाही. त्याबाबत सुध्दा चौकशी केली जावी व त्यांना महापालिकेच्या सेवेतुन निलंबित केले जावे.

<u>मा. सचिव :-</u>त्यांना सेवेतुन कमी करण्याचा प्रस्ताव आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले:-</u>या महापालिकेत अशी बरीच प्रकरणे झाली आहेत ती सर्व स्थायी समितीमध्ये चर्चेस येतात का? हा स्थायी समितीचा विषय आहे का?

<u>श्री. दत्ता भडकवाड (उप आयुक्त मुख्यालय):-</u>मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ५६ (२) मधील तरतुदीनुसार याबाबत स्थायी समितीने निर्णय घ्यायचा आहे. अधिनियमात स्पष्टपणे तरतुद आहे. त्यानुसार आपण निर्णय घ्यायचा आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>यावर सचिव साहेबांचे विधी अधिकारी म्हणुन काय मत आहे. यापुर्वी कुणाबाबत स्थायी समितीची परवानगी घेतली आहे काय?

<u>मा.सचिव:-</u>अशा प्रकरणांमध्ये खातेनिहाय चौकशी होते त्यामध्ये दोषारोप सिध्द झाले तर आयुक्त साहेब त्यांच्यावर शास्ती लादण्याकरिता निर्णय घेतात जर आयुक्त साहेब त्यांना बडतर्फ करण्याचा निर्णय घेत असतील तर त्यांच्यावर कारणे दाखवा नोटीस बजवायची असते. आयुक्तांनी निर्णय घेतल्यानंतर स्थायी समितीची पुर्व मंजुरी घेऊन त्यांना महापालिकेच्या सेवेतुन बडतर्फ केले जाते. अशा प्रकारची प्रकरणे यापुर्वी झालेली आहेत. श्री. अमृतलाल नरसिंघानी, यांच्या बडतर्फी बाबत प्रस्ताव स्थायी समितीत आला होता. त्यानंतर महासभेत प्रस्ताव पारीत झाल्यानंतर त्यांना महापालिकेच्या सेवेतुन बडतर्फ करण्यात आले. त्यानंतर श्री. चंदर धिरमलानी यांच्याबाबत स्थायी समितीत प्रस्ताव आला होता. त्यानंतर त्यांनाही महापालिकेच्या सेवेतुन बडतर्फ करण्यांत आले.



<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> श्री. एम. जे. शेख, पाणीपट्टी अधिक्षक, पाणी पुरवठा विभाग यांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या <u>सेवेतुन बडतर्फ करण्यास मान्यता देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडुन श्री. ब्राम्हणी एम. पगारे यांचा ग्राहक क्र. यु/४/२१६३ नुसार नळजोडणी मंजुर करण्यात आली सदर नळजोडणीस बीगर घरगुती दराने आकारणी करण्यात येत होती. सदरची आकारणी फेब्रुवारी १९९९ पर्यंत झाली. त्यानंतर कोणत्त्याही प्रकारची रितसर मंजुरी न घेता मार्च १९९९पासुन घरगुती दराने श्री. ब्राम्हणी एम. पगारे यांना बील आकारणी झाल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान झाल्याची मिटरवाचक श्री. ए. व्ही. उगले यांनी महानगरपालिकेकडे तक्रार केली होती. या प्रकरणी महानगरपालिकेने दोषारोप पत्रक. <u>उमपा/सापवि/आस्था/टे. ३/७</u> दिनांक २० जुन २००० नुसार चौकशी अधिकारी श्री. ए. एन. काळे मुख्यलेखा

परिक्षक यांच्या मार्फत चौकशी केली त्याप्रमाणे श्री. एम.ए. शेख पाणीपट्टी अधिक्षक यांच्यावरील दोषारोप पत्राच्या चौकशी अहवाल जावक पत्र क्र. उमपा. लेप्राविचौआ/२९, दि. १६.१०.२००० नुसार महानगरपालिकेला सादर केला. सदर दोषारोप पत्रातील सर्व आरोपावरून संबंधित अधिकारी यांना दोषी ठरविण्यात आले. श्री. एम.ए. शेख पाणीपट्टी अधिक्षक उल्हासनगर महानगरपालिका यांनी आपल्या कामात बेजबाबदारपणा, कर्तव्यात हयगय, निष्काळजीपणा, महसुलाचे नुकसानबाबत त्यांना महानगरपालिका सेवेतुन बडतर्फ का करण्यांत येऊ नये. याबाबत खुलासा करण्यासंबंधी त्यांना पत्र क्रमांक उमपा/साप्रवि/आस्था/टे ३/५४ दिनांक १.१.२००१ अन्वये १० दिवसांच्या आत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. त्यांचा खुलासा दहा दिवसांच्या आत श्री. एम. ए. शेख पाणीपट्टी अधिक्षक यांनी सादर केला.

तसेच त्यांना दिनांक ३.९.२००१ रोजी समक्ष म्हणजे एकुण घेण्याची संधी देण्यात आली होती, परंतु त्याचा खुलासा समाधानकारक वाटला नाही.

सदर खातेनिहाय चौकशीत चौकशी अधिकारी यांनी खातेनिहाय चौकशी करून श्री. एम.ए. शेख, पाणीपट्टी अधिक्षक, उल्हासनगर महानगरपालिका यांचे दोषारोप पत्राबाबतचे उत्तर व श्री. ए.व्ही. उगले, मिटरवाचक, उल्हासनगर महापालिका यांनी दिलेले पत्र यावरून श्री. एम.ए. शेख पाणीपट्टी अधिक्षक उल्हासनगर महानगरपालिका यांनी श्री. ब्राम्हणी एम. पगारे नळग्राहक क्र. २१६३ बीट क्र. २५ यांना दिलेल्या "देयकाबाबत" १)विभागीय नियमांचा व शिस्तीचा भंग २)महानगरपालिकेच्या महसुलाचे नुकसान ३) कर्तव्यात हयगय व निष्काळजीपणा हे आरोप सिध्द होतात.

तसेच श्री. एम. ए. शेख, पाणीपट्टी अधिक्षक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी काम करतांना आपल्या कामाशी त्यांनी एकनिष्ठ असावे असे असतांना देखील त्यांनी पाणीपट्टी देयकाबाबत आपल्या कामाशी व महानगरपालिकेशी एकनिष्ठ होते, असे वाटत नाही त्यामुळे त्याविरूध्द लावलेले आरोप १)विभागीय नियमांचा व शिस्तीचा भंग २)महानगरपालिकेच्या महसुलाचे नुकसान ३) कर्तव्यात हयगय व निष्काळजीपणा हे आरोप सिध्द होतात.



सबब चौकशी अधिकारी यांचे चौकशी अहवालानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ प्रकरण २ कलम ५(९) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२)(ह)अन्वये श्री. एम.ए. शेख, पाणीपट्टी अधिक्षक, उल्हासनगर महानगरपालिका हे यापुढे नोकरी मिळणेस सामान्यपणे अपात्र होईल अशाप्रकारे महानगरपालिकेच्या सेवेतुन बडतर्फ करणेस मा. स्थायी समिती उल्हासनगर महानगरपालिकेची मान्यता मिळणेस प्रस्तावित आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ५४** **दि:-११.१० .२००१.**

सुचकाचे नाव :- श्री. ठाकुर वेहरानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने प्रमाणे श्री. एम.ए. शेख पाणीपट्टी अधिक्षक पाणी पुरवठा विभाग यांना वरील कारणांमुळे महापालिकेच्या सेवेतुन बडतर्फ करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५. ३५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>दिनांक</u>:-८.११.२००१.

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक ८.११. २००१ रोजी सायंकाळी ४. ३०वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

<u>१. मा.सभापती :- श्रीमती. ज्योती कालानी.</u>

| | |
|---|---|
| २. श्री. आयलानी कुमार | सदस्य |
| ३. श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| ४. श्री. पारवानी रामचंद्र | सदस्य |
| ५. श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ६. श्री. बहरानी ठाकुरदास | सदस्य |

७. श्री.टाले प्रमोद सदस्य
८. श्री.तलरेजा विनोद सदस्य
९. श्री. कैलास तेजी सदस्य
१०. श्रीमती. राजानी भारती सदस्या
११ श्री.वनवारी किशोर सदस्य
१२. श्रीमती. वलेचा पदमा सदस्या
१३ श्रीमती. वेलकर सुरेखा सदस्या
१४. श्रीमती. सोनावणे यमुना सदस्या
१५ श्रीमती. राधवानी आशा सदस्या
१६ श्री.केणी जयकुमार सदस्य

सायंकाळी ५. १५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. सचिव :-विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
मागील सभेचे दि. ११.१०.२००१ रोजीचे इतिवृत कायम करणे बाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-आजच्या या सभेचे कामकाज सुरू करण्यापुर्वी सर्व सन्मानिनय सदस्यांना मी दिवाळीच्या शुभेच्छा देऊ इच्छिते. हि दिवाळी सर्वांना आनंदमय होवो.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-इतिवृतांताच्या पृष्ठ क्र. ७ वर मा. सदस्य श्री. किशोर वनवारी यांच्या नावे अशी नोंद आली आहे की, राखीव भुखंडावर अतिक्रमणे होऊ नयेत म्हणुन तेथे संरक्षित भिंत बांधण्याबाबतचे जे काही प्रस्ताव प्रलंबित असतील ते पुढच्या स्थायी समिती सभेपुढे चर्चेस आले पाहिजेत, नाही तर आम्ही त्या सभेचे कामकाज चालु देणार नाही.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-तर त्यानुसार ते प्रस्ताव आजच्या सभेपुढे मंजुरीस आणले आहेत काय?



मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-महानगरपालिकेचे जे आरक्षित भुखंड मोकळे आहेत व त्यांच्यावर अतिक्रमणे होऊ नयेत. व जी उद्याने आहेत, ज्यांच्या भिंती पडल्या आहेत. गेट तुटले आहेत त्यामुळे उद्यानांमध्ये गायी-म्हैशी अशी जनावरे जातात व उद्यानांचा विध्वंस करतात, महापालिकेचे भुखंड अतिक्रमणापासुन वाचवावेत. उद्यानांचा विध्वंस होता कामा नये म्हणुन महापालिकेचे काही सन्माननिय सदस्य याबाबींकडे पालिका प्रशासनाचे लक्ष वेधुन घेत असतात. श्रीमती. भगवंती रूपचंदानी यांच्या प्रभागातील उल्हासनगर महानगरपालिकेचा एक मोकळा भुखंड पडून होता त्यावर अतिक्रमण होऊ नये म्हणुन त्यास कुंपन घालणे आवश्यक होते, स्थायी समिती सभेत त्यावेळी या प्रस्तावावर बरीच चर्चा झाली होती.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-याच प्रकारचे आमच्या प्रभागातीलही काम आहे, काही सदस्यांच्या प्रभागातील अशी कामे स्थायी समिती सभेपुढे मंजुरीस आणली जातात, त्याच वर्षाच्या एकाच बजेट तरतुदी अन्वये त्या कामास मंजुरी दिली जाते मात्र आमच्या प्रभागातील कामाच्या प्राकलनावर लेखाविभागाकडुन क्युरीवर क्युरी काढल्या जातात. त्याचप्रकारचे काम तीच अर्थसंकल्पीय तरतुद असताना केले जात नाही असे का होते? आमच्या बाबतीत हे जाणीवपुर्वक होत आहे काय?

*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>*आमच्या प्रभागातील कामांचे प्रस्ताव कितीतरी अगोदरचे आहेत, त्यानंतरचे यांच्या प्रभागातील कामांचे प्रस्ताव आहेत, आमच्या प्रभागातील कामाच्या प्रस्तावावर क्युरी आहेत, आमच्या प्रस्तावानंतरच्या यांच्या प्रस्तावावर मात्र कोणत्त्याही प्रकारच्या क्युरी नाहीत हे कसे?

*<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>*हे जाणीव पुर्वक आहे का?

*<u>मा. आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-</u>*फाईल बघीतल्याशिवाय याबाबत मला आता येथे काही सांगता येणार नाही.

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>*तर मग फाईल मागवा.

*<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>*त्या त्या सन्माननिय सदस्यांचे चेहरे पाहुन हे त्यांच्या प्रभागातील प्रस्तावांना मंजुरी देतात काय?

मा.सदस्य श्री. कुमार आयलानी हे सायंकाळी ५.१८ वाजता स्थायी समिती सभागृहात उपस्थित झाले.

*<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>*त्यांच्या प्रस्तावावर लेखा विभागाच्या क्युरीज नाहीत.

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>* (भडकवाड साहेब) स्थायी समितीच्या त्या सभेत आम्ही सांगितले होते की, या प्रस्तावाबाबतच्या काही सन्माननिय सदस्यांच्या भावना आपण मा. आयुक्तांच्या कानी घाला.

महापालिकेचे आरक्षित भुखंड अतिक्रमणापासुन वाचविण्यासाठी त्यांना कुंपण घालणे, संरक्षण भिंत बांधणे आवश्यक होते, महापालिकेची मिळकत ते वाचवु इच्छितात, कुणाची ती वैयक्तिक मालमत्ता नाही. नाही तर भुमाफिया ते भुखंड हडप करतील.



*<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>*आमचे (प्रभागातील) प्रस्ताव ६-६ महिन्यापुर्वीचे आहेत. ते सर्व प्रस्ताव स्थायी समितीच्या पुढील सभेत मंजुरीस आणु म्हणुन सांगितले होते. ते प्रस्ताव आता या सभेपुढे मंजुरीस आणले नाहीत. त्याची कारणे काय?

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>*शहर अभियंता श्री. चिजवानी यांना विचारले जावे. आमच्या प्रस्तावाबाबत काय क्युरी आहे?

*<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>*क्युरीची पुर्तता केली आहे, आजच ते प्रस्ताव पाठवु.

*<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>*तांत्रिक विभागाची क्युरी काय आहे? फाईल मागविली जावी.

*<u>श्री. भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>*सचिव साहेब, इतिवृतांताच्या पृष्ठ क्र.३ वर मुख्यलेखा परिक्षक श्री. काळे साहेबांनी खुलासा केला आहे. त्याची इतिवृतांतात नोंद घेतली जावी अशी माझ्या नावाने नोंद आलेली आहे. परंतु ५ (२) (२) अन्वये कामे

करण्यास कारणे दाखवावी लागतात. श्री. काळे साहेबांनी केलेल्या खुलाशाची नोंद आलेली नाही.

<u>मा.सचिव :-</u>श्री. काळे साहेबांनी म्हंटले होते की, स्थायी समितीला अधिकार आहेत, ते निर्णय घेवू शकतात याची इतिवृतात नोंद आलेली आहे. सदरचे काम आवश्यक व अत्यंत तातडीचे असल्याने ते ५ (२)(२) अन्वये करण्यांत यावे अशी नोंद ठरावात आलेली आहे.

<u>श्री. भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>त्याकामात तातडी काय? त्याकामाची एवढी काय आवश्यकता आहे? असे मी विचारले होते.

<u>मा.सचिव :-</u>ते (संबंधित विभागाच्या अधिका-यांना )त्यांना विचारा.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>त्या प्रस्तावाचे काय? ते स्पष्ट करा म्हणजे इतिवृतांत कायम करता येईल.

<u>मा. आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-</u>फाईल आणली का?

<u>श्री. विठ्ठल भिवापुरकर (कार्यकारी अभियंता पी. डब्लु. डी):-</u>यांनी सदरची फाईल आयुक्तांना सादर केली.

<u>मा. आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-</u>सपना गार्डनचा प्रस्ताव मंजुर झाला आहे. तेथे कंपाऊंड भिंत बांधणे आवश्यक होते, मला असे वाटते की, सपना गार्डन हे शहरातील प्रमुख गार्डन आहे, मी स्वतः तेथे भेट देवुन पहाणी केली होती. मला ते काम जिनियन वाटले. तसेच आपले जे प्रस्ताव आहेत ते आम्ही क्लीअर करू. शहरात बरेचसे भुखंड आहेत. त्या सर्वांना एकाचवेळी कुंपन किंवा संरक्षण भिंत घालण्याचे काम आम्ही करू शकत नाही, त्यासाठी आवश्यक तितका निधी उपलब्ध नाही म्हणुन काही कामांची अग्रक्रमता लक्षात घेऊन ती कामे करावी लागतील.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>एका सदस्यांच्या प्रस्तावाबाबत अमुक एक शेरा दुस-या सदस्याच्या प्रस्तावाबाबत दुस-या प्रकारचा शेरा असे का? माझे प्रकरण ६ महिने पुर्वीचे आहे, याकामी अर्थसंकल्पीय तरतुद आहे ना? तेच उद्यान महत्त्वाचे आहे हे तुम्ही कसे ठरविले? आमचे सुध्दा महत्त्वाचे आहे.



<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u>सपना गार्डन व्यतिरिक्तचे अन्य गार्डन (उद्याने) (आयुक्त साहेब) आपण पाहिलीत का? दुसरी गार्डन आपण पाहिली नाहीत. ती पहिली असतील तर आपण त्यांना सुध्दा प्राधान्य दिले असते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>शहरात १८१आरक्षित भुखंड आहेत, भुखंडाना कुंपण / संरक्षण भिंत घालण्याचे एका सदस्याच्या प्रभागातील काम अर्थसंकल्पीय तरतुदी अन्वये केले जाते त्याच अर्थसंकल्पीय तरतुदीत दुस-या सदस्याच्या प्रभागातील याच प्रकारचे काम होत नाही, या कामांसाठी अर्थसंकल्पात जी २५ लाख रूपयांची तरतुद केली आहे,ती तरतुद केलेली रक्कम संपल्यानंतर तरतुद नाही म्हणुन आपण काम करू शकणार नाहीत. परंतु काही सदस्यांना वाटते की, महापालिकेच्या आरक्षित भुखंडाची

जमिन भुमाफियांकडुन गिळंकृत केली जावु नये म्हणुन ते अशा भुखंडाना कुंपण / संरक्षण भिंत घालण्याची मागणी करित असतात.
मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-काही वेळा काही कामांसाठी दबाव येत असतो.

मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-सांगा, याबाबत आम्ही आपणास विचारू इच्छितो की, हया सपना गार्डनचे काम कुणी मंजुर करून घेतले त्याबाबत आपणावर कुणाचा दबाव आला होता?

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-एका सदस्याच्या प्रस्तावाबाबत एक शेरा दुस-याबाबत वेगळा शेरा असे होता कामा नये याबाबत मी संबंधितांना सुचना देतो.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-लेखाविभागवाले सर्वांच्या प्रस्तावावर क्युरी काढतात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-अशा कामांचे जेवढे काही प्रस्ताव प्रलंबित आहेत ते सर्व झाले पाहिजेत.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-स्थायी समितीच्या पुढील सभेत ते मंजुरीस आले पाहिजेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-५ सदस्यांच्या प्रभागातील कामाचे प्रस्ताव आहेत.
१)श्री. राजेंद्र चौधरी.
२)श्री. प्रमोद टाले.
३)श्रीमती. भगवंती रूपचंदानी
४)श्रीमती.लविना कुंदनानी
५)श्री. ठाकुर वेहरानी.
मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-याचा अर्थ असा की, (सपना गार्डन) हे काम केले तर आणखी ४ कामे करावी लागतील. तर हे काम सुध्दा रदद करा.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-या कामाबाबतचे शेरे वेगळे आहेत. व इतर कामांबाबतचे शेरे वेगळे आहोत.
मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-शहरात विकास कामे होत आहेत नगरसेवक निधी, आमदार निधी, खासदार निधी अशा अनेक प्रकारच्या निधीतून शहरात कामे चालु आहेत. सपना गार्डन हे आमदार निधीतुन विकसित होत आहे. त्याबाबत आपण हरकत का घेता?


मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-त्या कामास मंजुरी दिलेली आहे. व या ज्याकामात मंजुरी दयायची आहे त्याबाबत (आयुक्त साहेब) आपण प्रत्यक्ष भेट देवुन पहाणी करा. ती कामे आपणांस जिनीयन वाटली तर ती केली जावीत, याची इतिवृतांत नोंद घेतली जावी.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-त्या कामाचा प्रस्ताव कुणी आणला होता?

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-नगरसेवक निधी आमदार निधी अशा अनेक प्रकारच्या निधीतुन शहरात विविध प्रकारची विकास कामे होत आहेत.

*<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>यापुर्वी मंजुरी दिलेले काम झाले पाहिजे ते काम झाले पाहिजे, त्याचबरोबर आमचे सुध्दा काम झाले पाहिजे आम्हाला एक न्याय दुस-याला दुसरा न्याय असे कसे? ६ महिन्यापासुन आम्ही आमच्या कामासाठी सारखा तगादा करत असताना आमची कामे होत नाहीत व त्यानंतरची यांची कामे होतात हे कसे?*

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>आयुक्त साहेब, मंजुर झालेल्या त्याकामात अडथळा का आणता? सदस्यांचे असे म्हणणे नाही की, ते काम बंद करा म्हणुन?*

*<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>आम्ही त्याकामात अडथळा आणत नाहीत.*

*<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>आयुक्त साहेब, जी कामे जिनीयन आहेत ती करून दिली जावीत, तुम्ही स्वतः पहाणी करा.*

*<u>मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :-</u>सर्व मिळुन ४ लाखाची कामे आहेत, एक-एक लाखाचे प्राकलन आहे हवे तर त्याबाबत सुध्दा आपण प्रत्यक्ष भेट देवून पहाणी करा.*

*<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>आमच्या प्रभागातील प्रस्तावावर लेखा विभागाचे काय शेरे आहेत?*
*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u>मी वाचुन दाखवितो.*

*<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>शेरे कोणत्त्या तारखेचे आहेत?*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u>तारीख लिहिण्याची चुक श्री. चिजवानी साहेब कधी करित नाहीत परंतु आमच्याकडे तो प्रस्ताव आला १६.२००१ रोजी त्यावर मी लिहिले आहे की, शहर अभियंता यांनी प्रस्तावित केल्यामुळे प्रकरण मान्य करण्यास हरकत नाही. त्यांनतर मुख्य लेखा परिक्षक श्री. काळे साहेबांचा शेरा आहे तो असा. प्रस्तावित काम करणे आवश्यक आहे किंवा काय याबाबत शहर अभियंता यांनी स्पष्ट अभिप्राय दिलेले नाही. अतिक्रमण होऊ नये म्हणुन प्रभाग क्र. १४ मधील सुचित केलेल्या भुखंडास संरक्षण भिंत बांधणे आवश्यक आहे. असे संबंधित प्रभागाचे नगरसेवक यांचे म्हणणे आहे. परंतु शहरात महानगरपालिकेचे एकुण किती प्लॉट आहेत? किती प्लॉटस् वर संरक्षीत भिंत बांधलेली आहे. व किती संरक्षण भिंती बांधणे बाकी आहे याबाबतची माहिती एकत्रित करून याबाबत सामाईक कार्यवाही करणे बाबत धोरणात्त्मक निर्णय घ्यावा असे वाटते. त्यावर शहर अभियंता यांनी फेर सादर केले. आमच्या मुदयांवर त्यांनी काही भाष्य न*



*करता असे लिहिले की,सर्व भुखंडावर संरक्षण भिंत बांधण्यासाठी चालु वर्षात म्हणजे २००१-२००२मध्ये रूपये २५,००,०००/-ची तरतुद ठेवलेली आहे. आणि एकुण १८१ भुखंडावर संरक्षण भिंत बांधणे आहे. १८१ भुखंडाची यादी जोडीत आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>आयुक्त साहेब, त्यादिवशी आपण म्हणत होतात ना की, महापालिकेला ऐवढे जास्त कागद का लागतात?*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u>फुटबॉल सारख्या फाईल इकडुन तिकडे तिकडुन इकडे टोलविल्या जातात.*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u>मुख्य लेखा परिक्षकांनी त्या प्रस्तावावर मारलेले शेरे मी वाचुन दाखवितो.*

*लायन गार्डन व सपना गार्डनला भिंत बांधणे हे एकच काम असुन नावे बदलून एका कामाचे दोन भाग केल्याचे दिसते.*

*उल्हासनगर महानगर पालिकेच्या राखीव भुखंडावर संरक्षण भिंत बांधण्यासाठी रू. २५ लाखाची तरतुद असून महासभेत घेतलेल्या धोरणात्त्मक निर्णयानुसार सर्व भुखंडावर संरक्षण भिंत /कुंपण घालणे अपेक्षित आहे त्यामुळे कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त भुखंडाभोवती कुंपण घालण्याचे काम हाती घेतले जाईल याची शहर अभियंता यांनी दक्षता घेणे जरूरीचे आहे. अतिक्रमण होवू नये या दृष्टीने सादर केलेला प्रस्ताव मान्य करणेस हरकत नसावी.*

*धोरणात्त्मक निर्णय घेण्याचा अधिकार स्थायी समितीला नाही, धोरणात्त्मक निर्णय घेण्यासाठी हा प्रस्ताव महासभेपुढे ठेवावा लागेल.*

*<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>समायीक प्रश्न आहे,माझ्या प्रभागातील प्रश्न आहे.*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u>मी कुठे अमान्य केला आहे?एकंदर तरतुदीच्या ४० टक्के पेक्षा अधिक तरतुद खर्ची पडली आहे तेव्हा मा. आयुक्त यांची परवानगी घेणे रास्त वाटते. असे माझे शेरे आहेत.*

*<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>तर मग हया कामाचे प्राकलन सुध्दा महासभेपुढे मंजुरीस जायला पाहिजे होते? ते स्थायी समितीने कसे मंजुर केले?*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u>शेरा लिहुन आम्ही काही गोष्टी विचारल्या आहेत. सर्व खाली प्लॉट किती आहेत? त्यापैकी संरक्षण भिंती किती प्लॉटसवर बांधणे आवश्यक आहेत? याचा तपशिल मुख्य लेखा परिक्षक यांनी विचारल्याप्रमाणे शहर अभियंता यांनी देणे आवश्यक आहे. तसेच धोरणात्त्मक निर्णय घेणे स्थायी समितीचा अधिकार नसताना धोरणात्त्मक निर्णयासाठी शहर अभियंता हे स्थायी समितीत कशासाठी प्रकरण ठेऊ इच्छितात याचाही खुलासा होणे आवश्यक वाटते. धोरणात्त्मक निर्णय घ्यायचा असल्यास प्रस्ताव महासभेसमोर ठेवावा लागेल याची नेहमीसाठी शहर अभियंत्त्यांनी नोंद घेणे योग्य राहिल.*

*<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u>ज्या कामास समंती दिली त्यांना त्या गोष्टी विचारल्या का?*



*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u>तर मग त्यापुर्वीच्या सुध्दा फाईल्स काढाव्या लागतील तुमचा प्रस्ताव आम्ही अमान्य केला नाही, मान्य करण्यास हरकत नाही असेच मी लिहिले आहे ना?*

*<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>काळे साहेब, माझ्या प्रभागातील प्राकलनाबाबत तुम्ही सांगा ना?*

*<u>श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):-</u>जेव्हा शहर अभियंत्त्याकडुन प्रस्ताव पाठविला होता तेव्हा त्याकामाची उपयुक्तता पहाणे आवश्यक आहे. शहर अभियंत्त्यांचा शेरा मी वाचुन*

दाखवितो. पालिकेची आर्थिक तरतुद लक्षात घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे. असे शहर अभियंत्यांनी लिहिले आहे.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u>पुढच्या स्थायी समिती सभेत तुमच्या प्रभागातील कामे मंजुरीस ठेवली जातील असे मागील स्थायी समितीच्या सभेत आम्हास सांगण्यांत आले होते.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>आयुक्त साहेब आपण प्रत्यक्ष भेट देवून पहाणी करा ते काम योग्य वाटेल ते करा.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>मागच्या स्थायी समितीत जे काम मंजुर झाले आहे ते काय आम्ही सुरू करू देणार नाही.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>मी म्हंटले होते, मी प्रयत्न करत आहेच / ५ लाख रूपयांपर्यंतची तर कामे आहेत. फार मोठ्या रक्कमेची कामे नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u>राजेंद चौधरीच्या प्रभागातील काम किती रक्कमेचे आहे?

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>राजेंद चौधरीच्या प्रभागातील काम झाले आहे.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u>आयुक्त साहेब, थोडया वेळे पुर्वी आपण म्हणालात की, एक काम केल्यामुळे आणखी ४ कामे करावी लागतील काय? आमच्या प्रभागातील कामाचे प्राकलनास संमती दया असे सांगण्यास आम्ही आपणाकडे कधीच आलो नाहीत.
<u>मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-</u>महापालिकेचे वेगवेगळे विभाग हे लोकांना त्याच्या कामात मदत करण्यासाठी आहेत. कुणी पॉझिटीव्ह रिमार्क लिहिले असतील तर ते मुददाम केले असा भाग नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>भुखंडाना कुंपण किंवा संरक्षण भिंत घालण्या कामीचे सर्व सदस्यांच्या प्रभागातील कामाची प्राकलने तयार आहेत. श्री. ठाकुरदास बेहरानी यांच्या प्रभागातील कामाचे प्राकलन सुध्दा तयार आहे.

थोडया वेळेपुर्वी भडकवाड साहेब जे म्हणाले त्याबाबत खुलासा करू इच्छितो.

काळे साहेब यांनी असे कधीच म्हंटले नाही, त्यांनी म्हंटले की, स्थायी समितीला अधिकार आहेत ते आपल्या अधिकारानुसार करू शकतात.



<u>मा. सचिव :-</u>त्यावेळी मी म्हटले होते की, कारणे देणे आवश्यक आहे.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>आयुक्त साहेब, त्या प्रस्तावाबाबत काय म्हणतात?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>आम्हाला असे वाटते की, महापालिकेचे आरक्षित भुखंड अतिक्रमणापासुन वाचले पाहिजेत, श्री. चौधरी यांच्या भुखंडास संरक्षण भिंत बांधण्याचे काम झाले आहे. आता फक्त ३ कामांची प्राकलने शिल्लक आहेत.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः-</u>५ लाखा पर्यंतचे तर काम आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आयुक्त साहेब जेव्हा हसत हसत बोलतात तेव्हा असे समजा की, काम झाले म्हणुन..?

३ सदस्यांच्या प्रभागातील कामे बाकी आहेत.

१)श्रीमती. लविना कुंदनानी, २)श्री. ठाकुरदास बेहरानी ३) श्री. प्रमोद टाले.

मा. सदस्य श्री. कुमार आयलानीः-आयुक्त साहेब माझ्या प्रभागातीलही गोल मैदानचे काम बाकी आहे.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-आमच्या प्रभागातील कामे आता नाही तर मग केव्हा होणार?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-श्री. प्रमोद टाले यांच्या प्रभागातील काम - १, ७२,६००/- रूपयांचे श्रीमती. लविना कुंदनानी यांच्या प्रभागातील काम - १, ९९,८०५/- तर श्री. राजेंद्र चौधरी -३, ६५,५२४/-रूपयांचे आहे.

ही सर्व कामे सव्वा सात लाख रूपयांची होतात.

मा. सदस्य श्री. ठाकुरदास बहरानी :-हवे तर माझ्या प्रभागातील काम वगळुन टाका.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-जे काम यापुर्वी मंजुर झाले आहे त्याचे काम आपण कसे थांबवू इच्छिता?

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण/ श्री. प्रमोद टाले :-त्यांचे काम होवू नये असे आम्ही म्हणत नाही, आमचे म्हणणे आहे की, त्यांच्या बरोबर आमचेही काम झाले पाहिजे.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर) :-मी पहाणी करून नंतर सांगेन. जितके शक्य होईल तितके काम मंजूर करण्याचा प्रयत्न करेन तिन्ही कामाबाबत जर पैसे उपलब्ध होत असतील खर्च जास्त नसेल तर तिन्ही कामे करण्याचा प्रयत्न करेन.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-जे काम मंजुर झाले आहे,काम चालु झाले आहे.ते थांबवावे असे कोण म्हणेल? आता तीनच कामे बाकी आहेत.
श्री. ठाकुरदास बेहरानी यांच्या प्रभागातील काम वगळुन श्री. प्रमोद टाले, श्री. राजेंद्र चौधरी, श्रीमती. लविना कुंदनानी यांच्या प्रभागातील कामे केली जावीत.



मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :- श्री. दत्ता भडकवाड (उप-आयुक्त मुख्यालय)यांनी दिनांक ११.१०.२००१ रोजीच्या इतिवृत्तांताबाबत जी हरकत घेतली आहे ती खरी नाही श्री. भडकवाड म्हणतात तसे श्री. काळे साहेब यांनी सांगितले नाही.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः- मागील सभेचे दिनांक ११.१०.२००१ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिव :-विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-स्पष्टीकरण केले जावे.

*__श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):-__पृष्ठ क्र. २ वर पहावे. मागील वर्षी अर्थसंकल्पीय एकुण अपेक्षित उत्त्पन्नाचे लक्ष आपण गाठु शकलो नाही. त्यानंतर सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यांत आला. परंतु त्याचेही लक्ष गाठता आले नाही.*

*पृष्ठ क्र. ५ व ६ वर उत्त्पन्न व खर्चाची स्थिती दर्शाविली आहे. पृष्ठ क्र. ८ वर जून (२००१) पर्यंतच्या जमाखर्चाची स्थिती दर्शाविली आहे. सन २००१-२००२ या वित्तिय वर्षात १,७३ कोटीचे उत्त्पन्न अपेक्षित धरले होते, अर्थसंकल्पात ५१ कोटीचे जकातकर उत्त्पन्न अपेक्षित धरले होते. परंतु जकात कराची सर्वोच्च निविदा ४३.६७ कोटीची प्राप्त झाल्यामुळे अंदाजे ७ कोटीची तुट शिल्लक राहिली. माहे एप्रिल २००१ ते जुन २००१ या त्रैमासिक कालावधीत सरासरी रू. ३१. ४६ कोटी महसुल उत्त्पन्न अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात १३.४७ कोटी उत्त्पन्न प्राप्त झाले आहे.*

*पृष्ठ क्र. ९- मालमत्ता कर विभागाच्या लेखा परिक्षणामध्ये असे आढळुन आले आहे की, सन १९९८-९९ या आर्थिक वर्षातील मागणी नोंद वहीमध्ये ११५ खातेदारांची अखेरची एकुण थकबाकी रू. २९,८५,९८३/- दर्शाविली आहे परंतु सन १९९९-२००० या आर्थिक वर्षातील मागणी नोंदवहीत सदरच्या खातेदारांच्या थकबाकीच्या नोंदी वगळल्या आहेत. हया खातेदारांकडुन सदरच्या थकबाकीच्या रक्कमा वसुल झाल्या किंवा नाही हे समजु शकले नाही.*

*या ११५ खातेदाराच्या थकबाकीच्या नोंदी का वगळल्या याबाबत मालमत्ताकर विभागाकडून दि. १६.६.२००१, ६.७.७.२००१ व २४.७.२००१ च्या पत्रान्वये खुलासा मागविण्यांत आलेला आहे परंतु अदयाप पर्यंत त्यांच्याकडून खुलासा प्राप्त झालेला नाही,*

*तसेच पाणी पुरवठा विभागातील वसुली लिपिकांनी पावतीव्दारे वसुल केलेल्या रक्कमेपेक्षा रू. ८,६९९/- चा कमी भरणा केल्याचे आढळुन आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातील लिपिक श्री. नागदेव यांनी ५००० रूपयाचा कमी भरणा केला होता. त्यांनी सदर रक्कमेचा महापालिका कोषागारात भरणा केलेला आहे. एकुण उत्त्पनाची माहिती पृष्ठ क्र. १२ वर देण्यांत आलेली आहे. त्यानुसार अर्थसंकल्पीय अंदाज आता पर्यंत तुटीत आहे. आजपर्यंत ४० टक्के भांडवली खर्च व देणी वाढत आहेत.*

*__मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-__देणी वाढतच जाणार आहेत. कारण उत्त्पन्नामध्ये वाढ करण्याबाबत जसे की, पाणी पट्टीकर, पाणी टॅकर सेवा शुल्क कराधान इत्त्यादी प्रस्तावाना आपण मंजूरी देत नसल्याने उत्त्पन्न न वाढता दायीत्त्व वाढत जाणार आहे.*

*--१०--*

*__श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):-__मा. महापौरांच्या समवेत झालेल्या चर्चेत.मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० अन्वये अनुपुरक कराधान लादणे मान्य केले नव्हते.*

*__मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-__अर्थसंकल्प तुटीत आहे याबददल दुमत नाही, आम्ही जो अर्थसंकल्प तयार केला होता तोच मुळात तुटीचा होता, करांच्या रक्कमांची बरोबर वसुली होत नाही, त्यामध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव महासभेपुढे आणला जावा, तसेच काही वसुली लिपिकांच्या आकडेमोडीच्या चुकांमुळे कमी रक्कमेचा भरणा झालेला आहे. त्या रक्कमा लहान लहान असल्याने त्या रक्कमेचा भरणा करून घेवुन हे आक्षेप लेखा परिक्षण विभागामार्फत तिकडेच परस्पर थेट निकाली काढले पाहिजेत बाकी जसे काही लोकांनी मालमत्ता कराच्या थकबाकीच्या रक्कमा वगळल्या आहेत. अशा प्रकरणी*

संबंधिताची खात निहाय चौकशी करावी किंवा त्यांच्यावर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करू शकता.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u>कोणत्त्या विभागातील खातेदारांच्या थकबाकीच्या रक्कमा वगळल्या आहेत?

<u>श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):-</u>मालमत्ता कर विभागातील ११५ खातेदारांच्या मिळकत कर मागणी नोंद वहीतील थकबाकीच्या रक्कमा वगळल्या आहेत.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>या प्रकरणामध्ये जे लोक दोषी आहेत त्यांच्याविरूध्द खाते निहाय चौकशी करण्यास किंवा फौजदारी गुन्हा दाखल करण्यास स्थायी समिती आपणास अधिकार देईल.

<u>मा. आयुक्त (श्री. बी.आर. पोखरकर):-</u>आपण श्री. शेख (पाणीपुरवठा विभाग) यांच्याबाबत तर बोलत नाहीत ना?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>नजरचुकीने किंवा आकडेमोडीतील चुकांमुळे ज्यांनी छोटया छोटया रक्कमाचा कमी भरणा केला होता व आता त्यांनी त्या रक्कमा भरल्या आहेत अशी प्रकरणे लेखापरिक्षण विभागाने त्यांच्या स्तरावर थेट निकाली काढावीत. परंतु ज्यांनी अफरातफर करण्याचा प्रयत्न केला आहे त्यांच्यावर खाते निहाय चौकशी किंवा फौजदारी खटला भरला पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-</u>हे किती महिन्यापुर्वी झाले? कधी झाले?

<u>श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):-</u>१ एप्रिल पासुन थकबाकीच्या रक्कमा वगळयाचे दिसुन आले आहे,त्यापुर्वी त्याच्या नोंदी होत्त्या.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u>१ एप्रिल पासुनची प्रकरणे अदयाप आपण स्थायी समिती समोर आणली नाहीत?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>त्यांनी संबंधित विभागाकडुन खुलासा मागविला आहे. परंतु विभागाने अदयाप खुलासा सादर केलेला नाही. कर विभागातील लोकांचे म्हणणे आहे की, मिळकतीच्या दुबार नोंदी आहेत परंतु त्या बाबतचा खुलासा त्यांनी सादर केलेला नाही.



<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u>आता आपण म्हणता की त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करा परंतु ज्यांना आपल्या हातुन चुक झाल्याचे माहित नव्हते. आता ज्यांना माहित झाले असेल तर त्याचे बाबतीत काय?
<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>ज्यांची नजरचुकीने चुक झाली होती त्यांनी कमी भरणा केलेल्या रक्कमा भरल्या आहेत. परंतु २९ लाख ८५ हजाराच्या थकबाकीची नोंद जी गायब करण्यांत आली आहे. त्याबाबत संबंधिताविरूध्द खातेनिहाय चौकशी किंवा फौजदारी गुन्हा यापैकी जे आपणास योग्य वाटेल ते केले जावे आम्ही हे प्रकरण महासभेपुढे सादर करू.
<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरच्या प्रस्तावाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम

१०५ व १०६ (अ) अन्वये मुख्यलेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे बाबत.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ५५</u> <u>दि:-८.११.२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :- श्री. बहरानी ठाकुरदास

हि स्थायी समिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ व १०६ प्रमाणे माहे मार्च २००१ पर्यंत व एप्रिल २००१ ते जून २००१ पर्यंतचा जमाखर्चाचा आणि महापालिकेच्या लेख्यांच्या अयोग्य किंवा नियमबाहय प्रकारासंबंधी मुख्य लेखा परिक्षकांच्या सोबत जोडलेल्या पान क्र. १ ते ३६ चे प्रपत्रातील अहवाल विचारात घेऊन महासभेच्या अधिन राहुन या ठरावाव्दारे पुढीलप्रमाणे ठरवित आहे.

१) सरकारी वर्षे २००१-२००२ च्या उत्पनाचा खर्चाशी मेळ बसविण्यासाठी प्रशासनाने महासभेपुढे आवश्यक असेल अशी कोणतीही उपाययोजना करण्यासाठी मंजुरीसाठी सादर करावी.

२) कर विभागातील संबंधित कर्मचा-यांवर ११५ मालमत्ता करदात्त्यांच्या खातेदारांच्या मागणी नोंद वहितुन एकुण रूपये २९,८५,९८३/- ची थकबाकी रक्कम वगळल्याबाबत खातेनिहाय चौकशी बसविणे किंवा आवश्यक वाटेल तर फौजदारी गुन्हा दाखल करण्या करिता प्रशासनाला प्राधिकृत करित आहे.

३) पाणी पुरवठा विभागातील पाणीपटटी वसुली लिपिकांनी एकुण रू. ८,६९९/-चा कमी भरणा केल्याबाबत संबंधित कर्मचा-यांना ताकीद देणे आणि अपहाराची रक्कम वसुल करण्याकरिता प्रशासनाला निर्देश देत आहे.

४) सार्वजनिक बांधकाम विभागातील लिपिक श्री. नागदेव यांनी महानगरपालिकेच्या कोषागारात रू. <u>५०००/-</u> च्या केलेल्या कमी भरणा रक्कमेची भरपाई केल्याने ते प्रकरण दप्तरी दाखल करण्यांत यावे.

मुख्य लेखा परिक्षकांचा सोबत जोडलेला पान क्र. १ ते ३६ चा अहवाल या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--४८--

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-</u>आयुक्त साहेब, आपण जे पत्र दिले आहे त्यामध्ये लिहिले आहे की, आपण ज्यांना वहया वाटप करणार आहात. त्या गरजु विद्यार्थ्यांची नावे पत्ते शाळांची नावे इत्त्यादी तपशिल लिहून आणा. नगरसेवक काय प्रत्येकाच्या दारोदारी जाणार आहे ? कोण गरीब आहे कोण सावकार आहे ते पहाण्यासाठी? आम्हाला कसे माहित पडणार कोण गरीब आहे? कोण सावकार आहे ते?

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>प्रत्येक वर्षी प्रत्येक सदस्यास त्याचे प्रभागातील गरीब गरजु होतकरू विद्यार्थ्यांना देण्यासाठी महापालिकेच्या वतिने वहया दिल्या जातात. मागील ३-४ वर्षापासुन आम्ही त्या प्रभागात वाटप करत आलो आहोत. त्यावेळी त्या कुणा कुणाला दिल्या याची यादी मागविली नव्हती. यावेळी मात्र आपण ती यादी मागविली आहे. खरे म्हणजे या यादीची काही जरूरत दिसत नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. कुमार आयलानी:-</u>आपण हा जो फार्म दिला आहे,जो भरून देण्याबाबत सांगितले आहे.*

*<u>मा.आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-</u>सभापतींनी पत्र दिले आहे त्यानुसार आपणास फार्म भरून दयायचा असेल तर दया परंतु महापालिकेचा निधी हा सार्वजनिक निधी असतो. आपणास दिलेल्या वहया हया महापालिकेच्या वतीने दिलेल्या आहेत, त्या योग्य त्या गरीब गरजु विद्यार्थ्यांसच दिल्या गेल्या पाहिजेत परंतु तसे ते होत नसल्या बाबतच्या काही तक्रारी माझ्याकडे आल्या आहेत म्हणुन वहया वाटप केलेल्या विद्यार्थ्यांची यादी देणे आवश्यक आहे. जर आपण यादी दिली नाही तर मात्र गंभीर बाब होईल यादी दयायची की नाही हे आपणावर अवलंबुन आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी :-</u>हे विद्यार्थी गरीब आहेत की नाही याची आम्ही आपणास कशी माहिती देवू शकणार? आम्हास हे कसे माहित पडणार?*

*<u>मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-</u>आपल्या चांगल्यासाठी मी तो फॉर्म दिला आहे. त्याप्रमाणे आपण यादी देवू इच्छित असाल तर दया.*

*<u>मा. सदस्या श्रीमती. लविना कुंदनानी :-</u>५०० तर वहया आपण दिल्या आहेत, त्या ज्यांना वाटप केल्या जातील अशा विद्यार्थ्यांची माहिती देणे आम्हास शक्य नाही. मी त्या वहया परत करू इच्छिते.*

*<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-</u>तर त्या वहया परत केल्या जातील काय?*

*<u>मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-</u>सचिव साहेब आपण कायदेशिर मत दया.*

*<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मागील ४ वर्षापासुन आम्ही आमच्या प्रभागांमध्ये वहया वाटप करत आलो आहोत त्यावेळी कधी वहया वाटप केलेल्या विद्यार्थ्यांची यादी दिली नाही, वहया वाटप करण्यासाठी आपण कर्मचारी वाटप केले तर आम्ही आपणास यादी देण्यास तयार आहोत, आपण आमच्या विनंतीनुसार याकामी एका अधिका-याची किंवा कर्मचा-याची*



*नियुक्ती करा की जे आमच्या बरोबर वहया वाटप करण्यासाठी घरोघरी येवू शकतील, हे कर्मचारी प्रत्येक नगरसेवकाबरोबर वहया वाटप करण्यासाठी एक-एक दिवस बरोबर जातील, प्रशासनास माहिती हवी असेल तर प्रशासनाने त्यासाठी एका लिपिकाची किवा कर्मचा-याची नियुक्ती करावी.*

*<u>मा. सचिव :-</u>मी आपणास सुचित करू इच्छितो की, वहया वाटप करण्यासाठी नगरसेवकांकडे दिल्या पाहिजेत अशी काही प्रथा नाही. वहया वाटप करणे हे प्रशासनाचे काम आहे,वहयासाठी खर्च केलेले पैसे हे महापालिकेचे म्हणजेच जनतेचे पैसे आहेत. त्या पैशाचा हिसाब ठेवणे आवश्यक आहे. आपण म्हणाल आम्ही त्या वहया प्रभागात वाटप*

केल्या त्याचा हिसाब ठेवला नाही तर आपणावर चौकशी बसु शकते यासाठी या वहया एका मध्यवर्ती ठिकाणी ठेवून प्रशासनामार्फत तेथुन वितरित केल्या पाहिजेत, वहया कुणाला दिल्या त्यांची ओळख व खात्री झाली पाहिजे.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> गरजु विद्यार्थ्यांना वहया पुरविणे कामी मा. आयुक्तांनी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

सन २००१-२००२ या आर्थीक वर्षासाठी महिला व बालकल्याण समितीतर्फे गरजु विद्यार्थ्यांना वहयांचे वाटप करण्याचे ठरविल्यामुळे सदर वहयांचे खरेदीकरिता फ्रिप्रेस जनरल व नवशक्ती या दैनिक वर्तमान पत्रामध्ये जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आल्या त्यानुसार खालील निविदा प्राप्त झाल्या.

१. मेसर्स जॉली प्रिन्टर्स, उल्हासनगर - १५ . २५/ रूपये प्रत्येक वहीसाठी
४. मेसर्स मनमोहन इंटरप्रायजेस, उल्हासनगर - १३. ००/- रूपये --''---
५. मेसर्स स्विटी इंटरप्रायजेस,उल्हासनगर - १४. २५/- रूपये --''--
६. मेसर्स उमपा इंटरप्रायजेस, उल्हासनगर -१४. १० /- रूपय

उपरोक्त निविदा धारकांमध्ये मेसस मनमोहन इंटरप्रायजेस उल्हासनगर-४ यांचे दर कमी सिन एकूण ३४ ,५००/- वहया खरेदी करणे करिता एकुण ४ , ४८ ,५००/- रूपये इतका खरेदी खर्च येणार आहे. वित्तिय वर्ष - २००१-२००२ चे अंदाजपत्रकात महिला व बालकल्याण समितीसाठी तरतुद रूपये २५ ,०० ,०००/- आहे. लेखाशिर्ष सी-५ (३) मधील तरतुदीमधून सदर खर्च करावयाचा आहे व सदरहु कामासाठी मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता संविदेस दिलेली असुन त्यानुसार मेसर्स मनमोहन इंटरप्रायजेस उल्हासनगर यांचेकडुन कामाचा करारनामा करून काम सुरू करण्यात आले आहे.

तरी सदर कामाची माहिती स्थायी समिती सभेपुढे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

--५०--

<u>स्थायी समिती ठराव क्र. ५६ दि:-८. ११ . २००१.</u>

सुचकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :- श्री. केणी जयकुमार

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार गरजु विद्यार्थ्यांना वहया पुरविणेकामी आयुक्तांनी मेसर्स मनमोहन इंटरप्रायझेस, उल्हासनगर यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृतांतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>याबाबत कोण स्पष्टीकरण करेल.

<u>मा. सचिव :-</u>श्रीमती विमला मुरजानी हया मागील कित्येक वर्षापासुन कामावर येत नाहीत.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> श्रीमती. विमला पी. मुरजानी, नाका शिपाई यांना
महापालिकेच्या सेवेतुन बडतर्फ करण्यास मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

श्रीमती. विमला मुरजानी, नाका अटेंडट यांना दोषारोप पत्र क्रमांक युएमसी/जीइएन/इएसटी/टे. ५/४३ दिनांक ७ जुलै, १९९८ बजावणेत आले असता संबंधित कर्मचारी यांना चौकशी अधिकारी यांचेकडे चौकशी कामी हजर होण्यास दिरंगाई केले मुळे दिनांक २७.७.२००० रोजी जाहिर नोटीस देवून १५ दिवसाच्या आत चौकशी अधिकारी पुढे हजर राहण्या बाबत श्रीमती. मुरजानी यांना आदेश दिले होते. अन्यथा त्यांना महापालिकेच्या नोकरीमध्ये स्वास्थ्य नाही असे गृहीत धरून त्यांच्या सेवा समाप्त करणेत येतील अशी समज देण्यात आली होती. तरी श्रीमती. मुरजानी या चौकशी अधिकारी यांचे पुढे चौकशीसाठी हजर झाल्या नाहीत. परंतु चौकशी अधिकारी यांनी दिनांक ३०.६.२००१ रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर नोटीस देवुन श्रीमती. मुरजानी यांना दिनांक १६.७.२००१ रोजी चौकशीसाठी हजर होणे बाबत आदेश दिले होते. जर त्या चौकशीला हजर राहिल्या नाहीत तर चौकशी एकतर्फी करणेत येईल असेही स्पष्ट केले होते. असे असुनही श्रीमती. मुरजानी या दिनांक १६.७.२००१ रोजी चौकशीस उपस्थित राहिले



नाहीत. त्यामुळे चौकशी अधिकारी यांनी एकतर्फी चौकशी करून श्रीमती. मुरजानी या दिनांक २४.२.९७ ते १४.६.९८ व दिनांक २२.८.९८ ते आजपर्यंत अनाधिकृतपणे रजेवर होत्त्या/ आहेत यावरून अनाधिकृत अनुपस्थिती बाबतचा आरोप सिध्द केला आहे.

कार्यालयीन पत्रास उत्तर न देणे, रजेचा अर्ज योग्य त-हेने सादर न करणे, चौकशीसाठी चौकशी अधिका-यांसमोर हजर न राहणे इत्त्यादी उदाहरणावरून त्यांचा निष्काळजीपणा आरोप क्र. २ सिध्द केला आहे. तसेच प्रशासनाने आदेश देवूनही

कार्यालयात हजर न रहाणे, खाते चौकशीसाठी हजर न रहाणे, इत्त्यादी उदाहरणा वरून प्रशासनाच्या आदेशांचे उल्लंघन केले बाबत त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या कार्यालयीन आदेशांचे पालन न करणे इत्त्यादी बाबतचा आरोप सिध्द केला आहे.

तसेच त्यांना बजावण्यात आलेल्या दिनांक २४.२.२००० रोजीच्या नोटीसीत नमुद केल्याप्रमाणे प्रशासनाची परवानगी न घेता मुख्यालयात तसेच देश सोडल्याचे अतिरिक्त आरोपही सिध्द झाले आहेत.

प्रशासनाने ठेवलेले सर्व आरोप सिध्द होत असल्याने अपचारी श्रीमती. विमला मुरजानी या दोषी आहेत हे स्पष्ट केले आहे.

सबब चौकशी अधिकारी यांचे चौकशी अहवाला नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) अन्वये श्रीमती. विमला पी. मुरजानी, नका अटेंडंट, उल्हासनगर महानगरपालिका या यापुढे नोकरी मिळणेस सामान्यपणे अपात्र होईल. अशया प्रकारे महानगरपालिका सेवेतुन बडतर्फ करणेसाठी स्थायी समिती उल्हासनगर महानगरपालिकेची मान्यता मिळणेस प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ५७</u> <u>दि:-८.११.२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. पारवानी रामचंद

अनुमोदकाचे नाव :- श्री. केणी जयकुमार

हि स्थायी समिती वरील प्रस्तावने प्रमाणे श्रीमती. विमला पी. मुरजानी, नाका शिपाई यांना वरील कारणांमुळे महापालिकेच्या सेवेतुन बडतर्फ करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.



<u>मा. सदस्य श्री. रामंचद्र पारवानी :-</u>हे काम कोणत्त्या निधीतुन करणार? प्रभाग समित्त्यांना किती निधी दिला आहे? खर्चाचा निधी कुठून येणार?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>आयुक्त साहेब, प्रभाग समित्त्यांच्या सभापतींचा कालावधी किती राहिला पहे?

__मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-__प्रभाग समित्त्यांना किती आर्थिक अधिकार आहेत? खर्च किती होईल? प्रभाग समित्त्या किती कालावधीसाठी आहेत? प्रभाग समित्त्यांचे सभापतींना किती अधिकार आहेत? ते काय करू शकतात? आयुक्त साहेब म्हणतात १० लाख पर्यंतचे वित्तिय अधिकार आयुक्तांना आहेत म्हणुन.

__मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-__मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ नुसार महापालिकेस अर्थसंकल्पीय अंदाज तयार करावा लागतो त्यात विविध शिर्षाखाली अलग अलगपणे तरतुद केली जाते व त्यातुन कामे केली जातात. प्रभाग समित्त्यांना ५ लाख पर्यंतचे वित्तिय अधिकार आहेत, ५ लाखापर्यंतच्या कामांना त्यांनी प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिल्यानंतर ते प्रस्ताव मान्यतेसाठी आयुक्तांकडे येतात आयुक्तांना १० लाख पर्यंतच्या खर्चांना मान्यता देण्याचे अधिकार आहेत. जेव्हा अर्थसंकल्प तयार करतो तेव्हा प्रभाग समित्त्यासाठी तरतुद करावयास पाहिजे परंतु दुर्भाग्याने ती केली नाही, काळे साहेब तुम्ही जरा याबाबत स्पष्टीकरण करा.

__श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):-__ आयुक्तांना पूर्वी ३ लाखापर्यंतचे अधिकार होते आता १० लाख पर्यंतचे अधिकार आहेत.

__मा. सचिव :-__अधिनियमात सुधारणा करण्यासाठी. राजीव गांधी प्रशासकिय गतिमानता या योजनेमध्ये शिफारस केली आहे.

__मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी :-__हया कामासाठी एक लाख रूपये कुठून येणार, तरतुदच नाही तर?

__मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानी :-__सर्वसाधारण निधीतुन?

__मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी/ श्री. रमेश चव्हाण :-__प्रभाग समित्त्यांचा कालावधी दोन महिन्याचा उरलेला असताना हा खर्च करू नये. असे आमचे म्हणणे आहे.

__मा. सदस्य श्री. कुमार आयलानी :-__हा प्रस्ताव समंत केला जावा.

__मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-__हे प्राकलन नाही आहे,माहितीसाठीचा प्रस्ताव आहे.

__मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-__सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

__विषय :-__ प्रभाग क्षेत्र क्र. १ भगवंती नावानी स्टेज येथे बनविलेल्या कार्यालयात नविन वायरिंग व इतर साहित्त्य बसविणे कपाम आयुक्तांनी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.



__प्रस्तावना:-__

महानगरपालिकेने प्रभाग क्षेत्र क्रमांक १ चे कार्यालय भगवंती नावानी स्टेज गोल मैदान उल्हासनगर -१ येथे बनविलेले आहे तिथली विद्युत वायरिंग व विद्युत साहित्त्य पाणी

रिसावा व वयामुळे संपूर्ण रित्याने खराब झालेली आहे या कारणे ती संपुर्ण नवीन करण्याकरिता रूपये १, ०४,०००/- च्या प्राकलन बनवून डी. डी. आर. मार्फत ने जनसेवा लेबर को. ऑ. सोसायटीला देण्यात आलेले असुन त्यांच्याशी दिनांक १२.१०.२००१ रोजी करारनामा करण्यात आलेले आहे झालेल्या करारनाम्याची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये स्थायी समितीच्या माहिती व अवलोकनासाठी प्रस्तावित आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ५८</u> <u>दि:-८.११.२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. कुमार आयलानी
अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार प्रभाग क्षेत्र क्र. १ भगवंती नावानी स्टेज येथे बनविलेल्या कार्यालयात नविन वायरिंग व इतर साहित्य बसविणेकामी आयुक्तांनी मेसर्स. जनसेवा लेबर कॉ.ऑ. सोसायटी यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृतांतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत करावयाच्या ११ कामांसंबंधी आयुक्तांनी केलेल्या संविदांची माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिका अंदाजपत्रकीय तरतुद ठेवलेल्या सन २००१-२००२ च्या निधीतुन काम करणेसाठी मा. महापौर / नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | प्र. क्र. ६७ मध्ये शिवमंदिर बॅ.क्र. ५५४ जवळ आणि विविध ठिकाणी सी.सी. पायवाटा नाली बांधून वेकर्ड टाईल्स लावणे (नगरसेवक निधीतुन) | १२४३५०/- | २६.९.२०० | रवि किरण म.का.सो. |
| २. | प्र. क्र. ३८ मध्ये मिलन पॅलेस अपार्टमेंटच्या बाजुला आणि बॅ.क्र. ७४१ येथे चेकर्ड टाईल्स लावणे आणि विविध ठिकाणी सी.सी. बांधणे (नगरसेवक निधीतुन) | ६३१२५/- | २६.९.२००१ | रवि किरण म.का.सो. |
| ३. | प्र. क्र. ८ मध्ये वडार कॉलनी जवळ उम-२५० रोड व सी.सी.व नाली बनविणे (नगरसेवक निधीतुन) | १९९९५०/- | २६.९.२००१ | राजलक्ष्मी म.का.सो. |
| ४. | प्र. क्र४८ वीर तानाजी नगर येथे विविध ठिकाणी सी. सी.एम-२५० ने रस्ता बनविणे. (नगरसेवक निधीतुन) | १९९९००/- | २६.९.२००१ | शिवाजी म.का.सो. |
| ५. | प्र.क्र. ६७ विविध ठिकाणी सी.सी पायवाटा व नाली बनविणे. (नगरसेवक निधीतुन) | ८००००/- | २८.८.२००१ | शिवाजी म.का.सो. |
| ६. | प्र.क्र. ४ मध्ये बाल शिवाजी उद्यान रेल्वे शिवसेना ऑफीस पर्यंतचा रस्ता सी.सी.एम-२५० ने नाली बांधणे. (नगरसेवक निधीतुन) | १९९८४०/- | २६.९.२००१ | श्री.जयशंकर म.का.सो. |
| ७. | प्र.क्र. ६५ मध्ये बॅ.क्र३२६,२७,३१४ जवळ विविध ठिकाणी सी.सी एम-२५० आणि नाली बांधणे | १९९६००/- | २६.९.२००१ | सिध्दनाथ म.का.सो. |
| ८. | प्र. क्र. ८ मध्ये आझाद नगर येथील रामभाऊ महाकाली चौक समोर व परिसर येथे एम-२ ने सिमेंट कॉंक्रिटरोड बनविणे (नगरसेवक निधी) | ९९९५०/- | २६.९.२००१ | राजलक्ष्मी म.का.सो. |
| ९. | प्र. क्र३० मध्ये गॅस गोडाऊन जवळ व रिगल कॉम्पलेक्स येथे रस्त्याचे विकास काम करणे (नगरसेवक निधीतुन) | १९९९९०/- | २८.९.२००१ | गीता म.का.सो. |
| १०. | प्र.क्र४० मध्ये मात्रभुमि सॉ मिल ते गौतमवाडीमध्ये नाला बनविणे. | १९९३००/- | २८.९.२००१ | राजलक्ष्मी म.का.सो. |

११. प्र.क्र.६९ वॅ. क्र.१००२ जवळ
समाज मंदिर बांधणे
(महापौर निधीतुन) १९९९२०/- २८.९.२००१ श्री.साईश्रध्दा म.का.सो.

--५५--

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक, ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ५९ दि:-८.११.२००१.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गतचे उपरोक्त ११ कामांसंबंधी आयुक्तांनी केलेल्या संविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृतांतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :-विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर शहरात सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत करावयाच्या ४ कामांसंबंधी आयुक्तांनी केलेल्या संविदांची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना:-

उल्हासनगर शहरात दिनांक ४.८.२००१ मा. लालकृष्ण आडवाणी येणार होते. त्यावेळेस उल्हासनगर शहरातील मुख्यत्त्वेकरून खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या पोलिस उप-आयुक्त व नगरसेवक यांनी विनंती केलेली होती.



| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | उल्हासनगर-३ मध्ये शांतीनगर येथे प्रवेशव्दाराचे नुतनीकरण करणे. | रू.२,९५,४००/- |
| २. | उल्हासनगर-५ मध्ये शिवमंदीर जवळ प्रवेशव्दाराचे नुतनीकरण करणे. | रू.३,९९,०००/- |
| ३. | उल्हासनगर मध्ये श्रीराम सिनेमा ते वाको जंक्शन व शांतीनगर ते राधास्वामी सत्संग व शांतीप्रकाश आश्रम जवळ रस्त्याचे खड्डे डब्लु बी.एम. व्दारा भरणे. | रू.१,४९,९२०/- |
| ४. | उल्हासनगर-३ येथे अय्यप्पा मंदीर, तुलसी ट्रेडींग ते पंजाबी कॉलनी चौक शांतीनगर चौक, कल्याण -अंबरनाथ रोडवर पडलेले खड्डे डब्लु. बी.एम.व्दारा भरणे. | रू.६५,०००/- |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३ (ड) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे. यानुसार काम तातडीने करावयाचे असल्यामुळे उपरोक्त कामांचे करारनामा करून काम सुरू करण्यात आले आहे.

तरी त्यानुसार सदर कामांची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६०</u> <u>दि:-८.११.२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्रीमती. वलेचा पदमा

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. लविना कुंदनानी

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गतचे उपरोक्त चार कामासंबधी आयुक्तांनी केलेल्या संविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृतांतात नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--५७--

सायंकाळी ६. ३०वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>दिनांक</u>:-६.१२.२००१.

<u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक ६.१२.२००१ रोजी सायंकाळी ४. ३०वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठसीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

<u>१. मा.सभापती :- श्रीमती. ज्योती कालानी.</u>

| | |
|---|---|
| २. श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| ३. श्री.टाले प्रमोद | सदस्य |
| ४. श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ५. श्री. कैलास तेजी | सदस्य |
| ६. श्रीमती. राजानी भारती | सदस्या |
| ७ श्री.वनवारी किशोर | सदस्य |
| ८. श्रीमती. वलेचा पदमा | सदस्या |
| ९ श्रीमती. वेलकर सुरेखा | सदस्या |
| १० श्रीमती. सोनावणे यमुना | सदस्या |
| ११ श्रीमती. राधवानी आशा | सदस्या |

१२ श्री.केणी जयकुमार सदस्य

तर

मा. श्री. आयलानी कुमार ,श्री. पारवानी रामचंद,श्री. चव्हाण रमेश, श्री. बहरानी ठाकुरदास हे सदस्य सभेस अनुपस्थितीत होते.

श्री. दत्ता भडकवाड उपायुक्त मुख्यालय हे आयुक्तांच्या अनुपस्थितीत स्थायी समिती सभागृहातील त्यांच्या आसनावर आसनस्थ होते.

सायंकाळी ४. ५५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. ८.११.२००१ रोजीचे इतिवृत कायम करणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u> काही राखीव भुखंडाना कुंपण घालण्याचे राहुन गेले आहे त्याबाबत मागील स्थायी समिती सभेत इतिवृत्त कायम



करताना आम्ही हरकत घेतली होती. तो मुददा अदयाप निर्णयीत निघालेला नाही.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-</u>तीन सदस्यांच्या प्रभागातील राखीव भुखंडांना कुंपण घालणे /संरक्षण भिंत बांधणे चे काम बाकी आहे. श्री. राजेंद्र चौधरी, श्री. प्रमोद टाले व श्रीमती. लविना कुंदनानी यांच्या प्रभागातील राखीव भुखंडांना कुंपण घालण्याबाबतच्या कामाचे प्राकलन पुढील स्थायी समितीत मंजुरीस आले पाहिजे.

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u> याबाबतचा प्रस्ताव आमच्याकडुन माननीय आयुक्तांना सादर करण्यांत आलेला आहे.

<u>मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-</u>प्रभारी आयुक्त साहेब, आपण या मुदयाचे स्पष्टीकरण करावे.

<u>श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-</u>याबाबत आता मी आश्वासन देऊ शकत नाही.

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>त्याकामांचे प्रस्ताव कार्यवाहीत आहेत. ती कामे होतील.

<u>मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मा. सदस्या श्रीमती. लविना कुंदनानी यांच्या प्रभागातील आरक्षित भुखंडास कुंपण घालण्याच्या त्या प्रस्तावाचे काय झाले?

<u>श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा.वि):-</u>त्या कामाचे प्राकलन तयार केलेले आहे. त्या कामाच्या जागेबाबतच्या कागदपत्राची पडताळणी करणे बाबत नगररचनाकार यांचेकडुन अहवाल मागविण्यांत आलेला आहे त्यावर नगररचनाकार यांनी असे शेरे लिहिले आहेत की, सदरची जागा महानगरपालिकेच्या मालकीची नाही.त्यामुळे या जागेबाबत उपविभागीय अधिकारी (एस.डी.ओ) यांच्याकडुन शेरे घेऊन त्यानंतरच त्या जागेस / उद्यानास कुंपण घालता येईल.

<u>श्री. शिंदे (नगररचनाकार):-</u>त्या जागेचा मालकी हक्क आपल्याकडे नाही. मालकी हक्काबाबत निर्णय झाल्यानंतरच कुंपण घालता येईल.

मा.सदस्या श्रीमती. लविना कुंदनानीः-त्या जागेस अगोदरच महानगरपालिकेच्या खर्चाने कुंपण (फेन्सींग)घातलेले आहे. आता संरक्षण भिंत बांधण्यास काय हरकत आहे?
मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः-सन्माननिय सदस्य महापालिकेचा एखादा भुखंड अतिक्रमणांपासुन वाचवु इच्छित असल्यास अशा भुखंडावर महापालिकेच्या वतीने संरक्षण भिंत / कुंपण घातले जावे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी / श्री. विनोद तलरेजा :-पुढील स्थायी समिती सभेत मा. सदस्य श्री. प्रमोद टाले यांच्या प्रभागातील आरक्षित भुखंडावर कुंपण घालण्याचा प्रस्ताव येईल त्याबरोबर श्रीमती. लविना कुंदनानी यांच्या प्रभागातील प्रस्ताव सुध्दा मंजुरीस आणला जावा. तेथे यापुर्वीच कुंपण घालण्यासाठी महापालिकेने खर्च केलेला आहे. आता तेथे संरक्षण भिंत बांधण्यास काय हरकत आहे?

--३--

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-मागील सभेचे दि. ८.११.२००१ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिव :-विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर ३ येथील प्रभाग क्र. ४० येथील गलिच्छ वस्ती फंडातुन रस्त्त्यावरील दिवाबत्ती बसविणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावनाः-

मा. स्थायी समिती सभापती यांनी पत्र क्रमांक - २४ दिनांक २९.९.२००१ अन्वये प्रभाग क्रमांक ४० मध्ये विविध ठिकाणी दिवाबत्ती करणेसाठी लाख पर्यंत निधी मंजुर करून दिली होती त्यानुसार प्रभाग क्रमांक ४० मध्ये विविध ठिकाणची पहाणी करून एक लाखाचे अंदाजपत्रक बनवून मंजुर करण्यात आला व डी. डी. आर. ठाणे यांनी स्वराज्य लेबर को. ऑ. सोसायटी प्रस्तावित करण्याचे पत्र देण्यात आले डी. डी. आर. ठाणे यांनी स्वराज्य लेबर को. ऑ. सोसायटी यांना सदर कार्य देण्याचे शिफारीश केली असुन सदर सोसायटीला कार्याचे स्विकृती पत्र देवून त्यांच्याशी दिनांक ८. ११. २००१ रोजी करार करण्यात आलेला आहे. झालेल्या कराराची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) खाली स्थायी समिती पुढे अवलोकनार्थ सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ६१ दिः-६. १२. २००१.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर ३ येथील प्रभाग क्र. ४० मध्ये गलिच्छ वस्ती करिता स्थायी समिती सभापती निधीतून रस्त्त्यावरील दिवाबत्ती बसविणे कामी प्रशासनाने स्वराज्य लेबर को. ऑ. सोसायटी यांच्याशी केलेल्या रू.

१ ,०० ,०००/- खर्चाचे संविदेच्या माहितीची आजच्या या सभेच्या कार्यवृतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--४--

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकामांतर्गत १३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतुद ठेवलेल्या सन २००१-२००२ च्या निधीतुन कामे करणेसाठी मा. महापौर / नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ.क्र कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|
| १. उल्हासनगर येथील प्र. क्र. १० बुध्द मंदिरजवळ शास्त्रीनगर येथे एम. १५० रस्ता बांधणे. | १ ,९९ ,९५०/- | २५.१०.२००१ | वणी देवी म.का. |
| २. उल्हासनगर येथील प्र. क्र. ६० मध्ये चोप्रा कोर्ट मागे आणि विविध ठिकाणी सी.सी. पायवाटा आणि नाली बांधणे | ९९ ,६००/- | २५.१.२००१ | राजलक्ष्मी म.का. |
| ३. उल्हासनगर येथील प्र.क्र. ६० मध्ये कोर्ट जवळील संगिता प्लास्टिक समोर सी.सी.एम २५० रस्ता बांधणे | १ ,०५ ,१००/- | २५.१०.२००१ | श्रीजयशंकर म.का. |
| ४. उल्हासनगर येथील प्र. क्र.२० मध्ये महात्त्मा फुले नगर मध्ये सी.सी.एम.२५० रस्ता आणि सी .सी. पायवाटा बांधणे | १ ,९९ ,९५०/- | ३०.१०.२००१ | शिवकृपा म.का. |

५ उल्हासनगर ४ येथील प्र.क्र. २५ मध्ये

रस्ता एम.२५० सी.सी बांधणे,
पायवाटा आणि नाली बांधणे.१,९९,९२०/- ३०.१०.२००१ शिव म.का.

६ उल्हासनगर -४ येथील प्र.क्र. २५ मध्ये
न्यु सिंध विविंग फॅक्टरी जवळ रस्ता
एम-२५० ने बांधणे. १९९९८०/- ३०.१०.२००१ श्री.जयशंकर म.का.

७ उल्हासनगर २ येथील प्र.क्र. ६७ मध्ये
४० कोटी मागे संरक्षण भिंत बांधणे.९९,९२५/-३०.१०.२००१ राजलक्ष्मी म.का.

--५--

८. उल्हासनगर ४ येथील प्र. क्र. ४५ मध्ये
पाच पांडव कॉलनी येथे हनुमान मंदिर जवळ
समाज मंदिर बांधणे. १,९९,९००/- ३०.१०.२००१ गीता म.का.

९. उल्हासनगर ४ येथील प्र. क्र. ५४ मध्ये
पाटकर यांचे घरामागे हरीराम अपार्टमेंटजवळ
खड्डे बी.एम. व्दारे बांधणे. ७०,०००/- ३०.१०.२००१ शिवाणी म.का.

१०. उल्हासनगर ४ येथिल प्र.क्र.४४ मध्ये
सानेगुरूजी नगर येथे बुध्द विहार ऑफिस
ते आंबेडकर हाऊसकर पर्यंत सी.सी.
एम.३५० ने रस्ता बांधणे. ४,९९,९००/-३०.१०.२००१ शिवाणी म.का.

११. उल्हासनगर ३ येथील प्र.क्र.५९ मध्ये
सिल्व्हर अपार्टमेंट जवळ बी.एम व ए.सी.
व्दारे रस्त्त्यातील खड्डे भरणे.७०,०००/-३०.१०.२००१ शिवाणी म.का.सो.
१२. उल्हासनगर ३ येथिल प्र.क्र.४६ मध्ये
टीप्सी टॉप्सी समोर ब्लॉक ए.१८४,१९७
समोर नाली बांधणे. १,९९,९५०/- ३०.१०.२००१ गीता म.का.सो.

१३. उल्हासनगर ४ येथील प्र.क्र. १५ मध्ये
डिफेन्स कॉलनी महात्त्मा फुले नगर
रामजी आंबेडकर नगरमध्ये सी.सी.
एम.२५० ने रस्ता आणि
नाली बांधणे. १,९९,९००/- ३०.१०.२००१ सी विनायक म.का.सो.

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक, ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६२ दि:-६.१२.२००१.

सुचकाचे नाव :-श्रीमती. पद्‌मा वलेचा.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. लविना कुंदनानी.

--६--

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गतचे १३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेच्या माहितीची आजच्या या सभेच्या कार्यवृतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव :-विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकामांतर्गत २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना:-

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतुद ठेवलेल्या सन २००१-२००२ च्या निधीतुन कामे करणेसाठी मा. महापौर / नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | प्र. क्र. १०मध्ये डॉ. समीर दवाखाना जवळ शास्त्रीनगर मध्ये एम. २५० रस्ता बांधणे. | १,९९,९५०/- | २३.१०.२००१ | वनीदेवी मजुर कामगार |

२. प्र. क्र. ४० मध्ये राजु यांच्या घरापासुन
श्री. अण्णा यांचे घरापर्यंत सिमेंट पायवाटा
व नाल्या बनविणे. १,९९,९५०/- २३.१०.२००१ वनीदेवी मजुर कामगार

---

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार



संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक, ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६३</u> <u>दि:-६.१२.२००१.</u>

सुचकाचे नाव :- श्रीमती. आशा राधवानी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. भारती राजानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गतचे २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेच्या माहितीची आजच्या या सभेच्या कार्यवृतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. ५ हा दोन वेळा आलेला आहे. अनु क्र. ५ व अनु.क्र.७ वर हा एकच विषय दोन वेळा आलेला आहे त्यामुळे कुठला तरी एक विषय कमी करावा लागेल.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>विषय क्र. ५ सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> मा. आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत ५ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या जा. क्र. नियो/आस्थविका/संस-२/२००१-००२/४११/४५३, दिनांक १७.७.२००१ पत्रानुसार मा. आमदार श्री. सुरेश (पप्पु) कालानी यांनी सुचविलेल्या कामांची यादी या महानगरपालिकेने प्राकलने व आराखडे तयार करून पत्र क्रमांक उ म पा/सा.बा.वि. /शआ/२९/०१ दिनांक १८/८/२००१ अन्वये पाठविले होते.

--८--

मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या जा.क्र. नियो/आस्थविका/टे-१/५२२, दिनांक ४/१०/०१ च्या पत्रानुसार काही काम मंजुर करून पाठविले होते.

मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या प्रशासकीय मंजुरी अनुसार हे काम लहान रक्कमेचे असून तसेच दिवाळी सण असून आणि रोषणाईचे कार्य त्या अगोदर करणे रास्त असून डी.डी.आर मार्फत लेबर को. ऑ.सो. कडून घेण्यासाठी मंजुरी दिली होती.

डी.डी. आर. ठाणे यानी पोच कामाचे वाटप करून पाठवले होते त्यांच्याशी करार झाले आहे त्याची माहीती पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रस्ताव संकेतांक | कामाचे नाव | सोसायटीचे नाव | झालेल्या कराराचे दिनांक |
|---|---|---|---|---|
| १) | विस /२००१/ ०५५/००९९८ | वार्ड क्र. ३८ मध्ये दिवाबत्तीची सोय करणे. (रुपये ०.७५ लाख) | आशा | ९/११/२००१ |
| २) | विस /२००१/ ०५५/०१००१ | वार्ड क्र. ४९ मध्ये विदयुतीकरण करणे.(रुपये एक लाख) | शुभ लक्ष्मी | ९/११/२००१ |
| ३) | विस /२००१/ ०५५/०१००८ | वार्ड क्र. ६७ मध्ये विदयुतीकरण करणे.(रुपये एक लाख) | आशा | ८/११/२००१ |
| ४) | विस /२००१/ ०५५/०१००९ | वार्ड क्र. ४२ मध्ये विदयुतीकरण करणे.(रुपये एक लाख) | रेणुका माता | १३/११/२००१ |
| ५) | विस /२००१ ०५५/०१०२१ | वार्ड क्र. ४९ ,बॅरेक क्र.१८२२ मध्ये गर्डन विदयुतीकरण करणे.(रुपये ० ५० लाख) | रेणुका माता | १३/११/२००१ |

सदर माहीती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३ (ड) अन्वये स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६४</u> <u>दि:-६.१२ .२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्रीमती. सुरेखा वेलकर.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. यमुना सोनावणे.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार मा. आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत दिवाबत्ती व विद्युतीकरणाच्या उपरोक्त ५ कामांकरिता प्रशासनाने केलेल्या संविदेच्या माहितीची आजच्या या सभेच्या कार्यवृतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव :-</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकामांतर्गत ३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतुद ठेवलेल्या सन २००१-२००२ च्या निधीतुन कामे करणेसाठी मा. महापौर / नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.



-------------------------------------------------------------

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | . प्र. क्र. १४साईबाबानगर मध्ये डब्लु बी.एम. ने रस्ता विकसित करणे (नगरसेवक निधीतुन) | ११ ,३१ ,००/- | १५.१०.२००१ | गिता म.का.सो. |
| २ | . प्र. क्र. १९ मध्ये बॅ.क्र. २१०१ , २१०८ ,२०७५ ,२०८४ ,८५ ,२०८९ जवळ सी.सी. एम.२५० ने बांधणे.(नगरसेवक निधी) | १ ,९९ ,९००/- | १५.१०.२००१ | शिव म. का.सो. |
| ३ | . प्र.क्र. ४९ मध्ये कॅनरा बॅंक जवळ बॅ.क्र.२०२० ,२०३० ,३१ ,१८४१ , २०२० च्या बाजुला मुतारी व सी.सी. एम.२५० ने बांधणे. (नगरसेवक निधी) | १ ,९९ ,९००/- | १५.१०.२००१ | श्री. जयशंकर म.का.सो. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक, ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६५</u> <u>दि:-६.१२ .२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. जयकुमार केणी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गतचे ३ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेच्या माहितीची आजच्या या सभेच्या कार्यवृतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका



<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-सांगा, स्पष्टीकरण करा.

श्री. लांजेवार (सहाय्यक आरोग्य अधिकारी):-नागरिकांना महापालिकेच्या दवाखान्यातुन पुरविल्या जाणा-या वैद्यकीय सेवेचा आकार म्हणुन सन १९७८ मध्ये प्रत्येक रूग्णामागे ५० पैसे ऐवढा आकार वसुल केला जात होता.स्थायी समिती ठराव क्र. ४२६ दि. २९. ९.८२ अन्वये या फीचे दर वाढवुन तो १ रू. करण्यांत आला. त्यानंतर औषधे / उपकरणे यांच्या दरामध्ये झालेल्या वाढीमुळे व रूग्णांच्या संख्येतील वाढीमुळे महापालिकेच्या खर्चाचा बोजा वाढत असल्यामुळे स्थायी समिती ठराव क्र. १३५३ दि. १६.५.९१ अन्वये फी चे दर वाढवुन २ रू. करण्यांत आली.

मागील तीन वर्षामध्ये महापालिकेस रूग्ण फी आकारणी पोटी एकुण रू. ७५,०२४/- प्राप्त झाले मात्र आस्थापनेवर २६,१९,०००/- व औषधांपोटी २,७०,०९६/- असे एकुण २८,८९,०९६/- रू. खर्च होतात. महापालिकेची बिकट आर्थिक स्थिती लक्षात घेता रूग्ण फी रू. २ ऐवजी ५ रू. ऐवढी वाढविणे आवश्यक आहे. मागील वर्षी एकुण १३,५९०/- रूग्णांकडुन २७,१८० रू. फी व्दारे प्राप्त झाले. फी वाढीमुळे महापालिकेस अंदाजे एकुण ६७,९५०/-रू. एवढे उत्त्पन्न होईल. शासकीय रूग्णालयात प्रत्येक रूग्णाकडुन ५ रू. फी आकारण्यांत येते. ही ५ रू. फी फार जास्त काही नाही.

मा.सदस्य श्री. विनोद तलरेजा :-महापालिकेच्या दवाखान्यात दररोज किती रूग्ण येतात?

श्री. लांजेवार (सहाय्यक आरोग्य अधिकारी):-७० ते ८० रूग्ण येतात, महापालिका कर्मचा-यांकडुन केस पेपर फी घेतली जात नाही.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-केस पेपरची फी २ रू. वरून ५ रू. करू इच्छितात. कर्मचा-यांकडुन केस पेपरची फी का घेतली जात नाही?

श्री. लांजेवार (सहाय्यक आरोग्य अधिकारी):-कर्मचा-यांची केस पेपर फी प्रतिवर्तीत (रिअंबर्स) होते.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :-महापालिकेच्या दवाखान्यातुन रूग्णांना कोण कोणत्त्या सोयी सुविधा पुरविल्या जातात?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-प्रथम रूग्णास थर्मामीटरने तपासले जाते. त्यानंतर आजारानुसार त्यास गोळया व औषधे दिली जातात.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-नाही नाही. कल्याण महापालिकेच्या रूग्णालयातील सोयी सुविधा पहा आणि आपल्याकडील रूग्णालयातील सोयी सुविधा पहा.



मा. सदस्य श्री. किशोर वनवारी :-आपले रूग्णालय नाही आहे. दवाखाना आहे.

मा. सदस्य श्री. प्रमोद टाले :-लोक जे आजारी पडतात. ते महापालिकेच्या दुषित पाणी पुरवठयामुळे व सार्वजनिक साफ सफाईच्या अभावामुळे,नागरिकांना आजारी पाडण्यामध्ये

महानगरपालिकेचा हात आहे. असे असताना रूग्ण फी दोन रू. वरून पाच रू. अशी कशी वाढवत आहात?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>ही फी किती वाढत आहे? दोन रू. वरून पाच रू. ही काही फार मोठी वाढ नाही. सर्व ठिकाणी पाच रू. फी घेतली जात आहे. सर्वानंद हॉस्पीटल येथे सुध्दा पाच रू. रूग्ण फी घेतली जात आहे. खाजगी डॉक्टर रूग्णांकडुन ५०-५० रू. फी घेत आहेत.छोटे मोठे जे आजार आहेत त्याबाबतचे रूग्ण महापालिका दवाखान्यात येत असतात.मोठे आजार असलेले रूग्ण मध्यवर्ती रूग्णालयात दाखल होत असतात. त्यामुळे महापालिकेने प्रस्तावित केलेली ५ रू. हि रूग्ण फी जास्त नाही.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर महानगरपालिकेच्या दवाखान्यातील रूग्ण फी वाढविणेबाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ कलम ६३ (६) अन्वये आवश्यक सेवा अंर्तगत महापालिकेच्या मुख्यालयातील दवाखान्यातून उल्हासनगर शहरातील नागरिकांना /कार्यालयीन कर्मचारी यांना उपचारात्मक सेवा दिल्या जातात. महानगरपालिका रूग्णालयात उपचार घेणा-या महापालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांकडुन फी आकारली जात नाही, परंतु मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५८ (४२)अन्वये इतर रूग्णाकडुन फी आकारली जाते. औषधांच्या किंमतीत होत असलेल्या वाढीमुळे महानगरपालिकेवर खर्चाचा बोजा पडत आहे. महापालिकेव्दारे प्रत्येक रूग्णास नोंदणी फी व औषधांची किंमत म्हणुन दर दिवशी फक्त दोन रूपये आकारली जाते.

सन १९७८ पासुन प्रत्येक रूग्णामागे ५० पैसे आकारले जात होते. स्थायी समिती ठराव क्रमांक ४२६ दिनांक २९.०९.८२ अन्वये फी चे दर वाढवून एक रूपया करण्यात आले, त्यानंतर औषधे /उपकरणे यांच्या दरामध्ये झालेल्या वाढीमुळे व रूग्णांच्या संख्येतील वाढीमुळे महानगरपालिकेच्या खर्चाचा बोजा वाढत असल्यामुळे स्थायी समिती ठराव क्रमांक १३५३ दिनांक १६.०५.९१ अन्वये फी चे दर वाढवून दोन रूपये करण्यात आली.



शासन निर्णय क्रमांक जी. आर.फी. <u>१०००/प्र.</u> क्र. ९०/२०००/आरोग्य-३ , मंत्रालय, मुंबई ३२, दिनांक १० जुलै २००१ नुसार शासकीय रूग्णालयात प्रत्येक रूग्णामागे <u>५/-</u> रूपये (अक्षरी पाच रूपये फक्त) फी आकारण्यात येते तसेच <u>५/-</u> रूपये (अक्षरी पाच रूपये फक्त) इतर महानगरपालिका, नगरपालिका दवाखान्यामध्ये आकारली जात आहे.

मागील ३ वर्षामध्ये महानगरपालिकेस रूग्ण फी आकारणी पोटी एकूण रूपये ७५,०२४/- प्राप्त झाले आस्थापनेवर २६,१९,०००/- व औषधापोटी २,७०,०९६/- एकूण २८,८९,०९६/- खर्च आलेला आहे. महापालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता रूग्णाची फी रूपये दोन ऐवजी पांच रूपये एवढी वाढविणे आवश्यक आहे. मागील वर्षी

एकूण १३,५९० रूग्णांकडुन २७,१८०/- रूपये फी व्दारे प्राप्त झाले फी वाढविल्यामुळे महापालिकेस अंदाजे एकूण ६७,९५०/- रूपये उत्पन्न होईल. याकरिता सदरची दर वाढ रवामे आवश्यक आहे असे वाटते.

तरी रूग्ण फी प्रति रूग्ण प्रति दिन ५/- रूपये प्रमाणे फी वाढ करण्यासाठी प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर मंजुरीस सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ६६ दि:-६.१२.२००१.

सुचकाचे नाव :- श्रीमती. आशा राधवानी.
अनुमोदकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या दवाखान्यातील रूग्ण फि २ रूपयावरून ५ रू. वाढविणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५.०५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-३१.१२.२००१.

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक ३१.१२.२००१ रोजी सायंकाळी ४.३०वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शाविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

१. मा.सभापती :- श्रीमती. ज्योती कालानी.

२. श्रीमती. कुंदनानी लविना सदस्या

३. श्री. पारवानी रामचंद सदस्य
४. श्री. चव्हाण रमेश सदस्य
५. श्री. बहरानी ठाकुरदास सदस्य
६. श्री.टाले प्रमोद सदस्य
७. श्री.तलरेजा विनोद सदस्य
८. श्री. कैलास तेजी सदस्य
९. श्रीमती. रजानी भारती सदस्या
१० श्री.वनवारी किशोर सदस्य
११ श्रीमती. वेलकर सुरेखा सदस्या
१२ श्रीमती.सोनावणे यमुना सदस्या
१३ श्रीमती. राधवानी आशा सदस्या
१४ श्री.केणी जयकुमार सदस्य

तर

मा. श्री. आयलानी कुमार ,श्रीमती. पदमा वलेचा हे सदस्य/ सदस्या सभेस अनुपस्थितीत होते/ होत्त्या.

मा. सदस्या श्रीमती. लविना कुंदनानी या सायंकाळी ४. ५५ वाजता स्थायी समिती सभागृहातून बाहेर पडल्या.

सायंकाळी ५. १० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. ६.१२.२००१ रोजीचे इतिवृत कायम करणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण:-</u>गार्डनला संरक्षण भिंत बांधण्याच्या त्या प्रस्तावाचे काय झाले? आयुक्तांनी आश्वासन दिले होते.

<u>मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-</u>मी कधी आश्वासन दिले होते?



<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण-</u>मागील स्थायी समिती सभेत, दि. ८.११.२००१ रोजीच्या सभेत.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>मागच्या स्थायी समिती सभेत ३ सदस्यांच्या प्रभागातील राखीव भुखंडाना कुंपण घालणे/ संरक्षण भिंत बांधणेचे काम बाकी आहे. श्री. राजेंद चौधरी, श्री. प्रमोद टाले व श्रीमती. लविना कुंदनानी या त्या तीन सदस्यांच्या प्रभागातील राखीव भुखंडाना संरक्षण भिंत बांधणे कामीचा प्रस्ताव पुढील सभेत मंजुरीस आणला जावा असे ठरले होते.

<u>श्री.भिवापुरकर(कार्यकारी अभियंता):-</u> श्रीमती. लविना कुंदनानी यांच्या प्रभागातील भुखंडास/ संरक्षण भिंत/ कुंपण घालण्या कामीच्या प्रस्तावाचे प्राकलन तयार आहे परंतु सदर जागेच्या मालकी हक्काचे कागदपत्राची पडताळणी करण्यासाठी उपविभागीय अधिकारी (एस.डी. ओ) यांना पत्र लिहिले आहे.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-२ लाखाचे प्राकलन आहे म्हणुन आपण म्हणाला होतात परंतु ती तर ३-३ लाखाची प्राकलन आहेत.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-३ सदस्यांचे प्रभागातील तर कामे आहेत व ती सुध्दा कुंपण घालण्याच्या कामाची.

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण-श्रीमती. कुंदनानी यांच्या प्रभागातील काम किती रक्कमेचे आहे?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-२ लाख रूपये खर्चाचे तर काम आहे.

श्री.भिवापुरकर(कार्यकारी अभियंता):-श्री. प्रमोद टाले यांच्या प्रभागातील भुखंडास कुंपन घालण्याच्या प्रस्तावाचे काम अडीच लाखाचे आहे.
_ श्रीमती लाविना कुंदनानी यांच्या प्रभागातील ती जागा महापालिकेस अदयाप हस्तांतरीत झालेली नाही, त्याबाबत उपविभागीय अधिकारी (एस.डी.ओ.) यांना आपण पत्र दिलेले आहे. श्री. प्रमोद टाले यांच्या प्रभागातील त्या जागेची पहाणी करावयाची आहे.

मा.सदस्य श्री. प्रमोद टाले :- अजुन जागेची पहाणी करायची आहे श्री. राजेंद्र चौधरी यांच्या प्रभागातील काम माझ्या प्रभागातील कामाच्या प्राकलनापेक्षा जास्त रक्कमेचे आहे. माझ्या प्रभागातील कामाबाबत त्यावेळी आपण संमती सुध्दा दिलेली होती व आता आपण म्हणता जागेची पहाणी करायची आहे म्हणुन? जागेची पहाणी करायची आहे या बहाण्याने आपण वेळ काढत आहात?

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-मी संमती दर्शविल्या बाबतची इतिवृतांतात नोंद आहे काय?

--३--

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-इतिवृत्ताच्या पृष्ठ क्र.२ वर नोंद आलेली आहे.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-मी आश्वासन दिले अशी येथे कुठे नोंद आहे?
मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-मागील सभेस (दि. ६.१२.२००१)च्या सभेत आपण नव्हता, त्यावेळी उपआयुक्त मुख्यालय श्री. दत्ता भडकवाड हे आपल्या आसनावर आसनस्थ होते त्यापुर्वीच्या म्हणजे दि. ८.११.२००१ रोजीच्या सभेत आपण आश्वासन दिले होते.

मा. सचिव :-दि. ८.११.२००१ रोजीच्या स्थायी समिती सभेत या प्रस्तावाबाबत बोलताना आपण म्हंटले होते की, मी प्रयत्न करेन...

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-त्यावेळी आपण म्हणाला होतात की,चार प्राकलनास संमती देता येणार नाही, त्यामुळे श्री. ठाकुर बेहरानी यांनी आपल्या प्रभागातील काम मागे घेतल्याने ३ सदस्यांच्या प्रभागातील कामे करण्यास संमती दर्शाविली होती.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-दि. ८.११.२००१ रोजीच्या स्थायी समितीच्या इतिवृतांतात माझ्या नावाने काय नोंद आलेली आहे.पाहु दया ''मी पहाणी करून नंतर सांगेन, जितके शक्य होईल तितके काम मंजुर करण्याचा प्रयत्न करेन तिन्ही कामा

बाबत जर पैसे उपलब्ध होत असतील व खर्च जास्त नसेल तर तिन्ही कामे करण्याचा प्रयत्न करेन म्हणजे मी प्रयत्न करेन असेच म्हंटलेले आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-प्रयत्न करेन एवढे आपण म्हंटलात तरी ते फार मोठे आहे. स्थायी समितीच्या आमच्या एकच सदस्याच्या प्रभागातील काम आहे.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-कुणाच्या प्रभागातील आहे?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-प्रमोद टाले यांच्या प्रभागातील कामाचा प्रस्ताव आहे.
मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-ठिक आहे. श्री. भिवापुरकर श्री. प्रमोद टाले यांच्या प्रभागातील त्याकामाचे प्राकलन संध्याकाळी माझ्याकडे घेऊन या.
मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-मागील सभेचे दि. ६.१२.२००१ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा. सचिव :-विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-स्पष्टीकरण केले जावे.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-विठ्ठलवाडी पोलिस स्टेशन जवळील जलकुंभ १५ वर्षापुर्वीचे आहे,१९८७ साली ते तयार करण्यांत



आलेले असुन वापर न झाल्याने ते वापरणे योग्य नाही त्यामुळे त्यांचे महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडुन मजबुतीकरण करणे आवश्यक आहे.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानी :-जलकुंभ तोडुन नव्याने बांधणार काय?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-त्याचवेळी कव नाही मजबुतीकरण केले.

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-त्यावेळी त्याचा विचार केला नव्हता.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडुन जी १८ कोटीची कामे केली जात आहेत त्यामध्ये याकामाचा समावेश नाही काय? महापालिकेस हे अतिरिक्त काम करायचे आहे काय?

श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-स्वतः महापालिकेने हे काम त्यांच्याकडुन करून घेण्यासाठी प्रस्तावित केले आहे. अर्थसंकल्पात तरतुद केलेली आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-१९८७ पासून त्या जलकुंभामध्ये कधी पाणी भरल्याचे मी तरी अदयाप पाहिले नाही.

*मा. सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-*त्या जलकुंभात साठविलेल्या पाण्याचा पुरवठा कुठे केला जाईल?

*श्री. दशोरे (प्रभारी कार्यकारी अभियंता):-*उल्हासनगर शहरासाठीच केला जाईल.

*मा.सदस्य श्री. ठाकुर बेहरानीः-*त्यातुन पाणी पुरवठा कल्याणसाठी केला जाईल. जलकुंभ सुध्दा कल्याणच्या विभागात आहे?

*मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः-*हा प्रस्ताव पारीत केला पाहिजे.

*मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-*सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--५--

*विषय :-* सुधारित पाणी पुरवठा टप्पा क्र. १ अंर्तगत विठ्ठलवाडी
पोलीस स्टेशन जवळील उल्हासनगर-४ येथील
जलकुंभाची मजबुती करणे बाबत महाराष्ट्र जिवन
प्राधिकरण यांचेतर्फे नकाशा आणि प्राकलने तयार
करण्यास आणि अंर्तभूत खर्चास प्रशासकीय व वित्तिय
मान्यता देणे बाबत..

*प्रस्तावना :-*

उल्हासनगर पाणीपुरवठा टप्पा क्र. १ मध्ये समाविष्ट असलेल्या जलकुंभामध्ये, विठ्ठलवाडी पोलिस स्टेशन जवळील १. ५ द.ल. लिटर क्षमतेच्या जलकुंभाचा समावेश आहे.

या जलकुंभाचे बांधकाम १५ वर्षापुर्वी झाले असुन जलकुंभाचा वापर न झाल्याने तो वापरणे योग्य नाही. त्यादृष्टीने जलकुंभाची दुरूस्ती व मजबुतीकरण करणे आवश्यक आहे असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कळविले आहे.

या कामास अंदाजे रू. १५,७८,३५०/- निव्वळ व रूपये १८,५४,६००/- ढोबळ खर्च अपेक्षित आहे. तसेच सदर कामाचा अनुभव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला असल्याने पुर्ण ठेव योजनेवर त्यांचेकडुन काम करून घेणे प्रस्तावित आहे. त्याकारणाने कामाचे आराखडे व अंदाजपत्रके तयार करण्यास फी रू. ३७,१००/- प्राधिकरणास अदा करणे जरूरीचे आहे.

कामाचा खर्च सीबीी८ हया शिर्षकातुन करण्यात येणार आहे. चालु आर्थिक वर्षात (२००१-२००२) सदर लेखाशिर्षकात रक्कम रू. ११,५०,०२४/- शिल्लक असल्याने तेवढा खर्च यावर्षात व उर्वरित रू. ७,०४,५७६/-ची तरतुद पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पात करून खर्च करण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळण्याकरिता तसेच

काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेतर्फे करण्यास मान्यतेकरिता प्रस्ताव स्थायी समिती कडे सादर.

स्थायी समिती ठराव क्र.६७ दिनांकः-३१ . १२ . २००१

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. पारवानी रामचंद

हि स्थायीसमिती वरील प्रस्तावनेनुसार सुधारीत पाणीपुरवठा टप्पा क्र. १ अंतर्गत विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन जवळील जलकुंभाचे मजबुतीकरण करणे कामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडुन नकाशा आणि प्राकलन तयार

--६--

करण्यास रू.३७,१००/- आणि अंतर्भुत खर्च रू.१८,५४,६००/- यांस आवश्यक सरकारी वर्षाच्या अवधित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पुर्न समायोजनाच्या आधिन राहून प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :-विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः-यासाठी पैसा कुठून येणार?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-कुठून येणार? कुठे जाणार?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-महापालिका निधीतुन.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानीः-महानगरपालिका अगोदर आर्थिक टंचाईत आहे व आपण म्हणता की हे काम महापालिका निधीतून करायचे आहे, आमचे नगरसेवक श्री. राजु जग्याशी यांच्याच प्रभागातील कामाचा ही प्रस्ताव आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-शाळेचा रस्ता आहे व तो करणे अत्यंत आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः-जर याकामी निधी उपलब्ध असेल तर आमची काही हरकत नाही.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाण/श्री. रामचंद्र पारवानीः-हे काम करण्यास आमचा विरोध नाही याबरोबर आमचे सुध्दा काम केले जावे.

मा. सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानीः-सभे समोर जो प्रस्ताव आला आहे तो पारीत केला जावा.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-पास.पास.

मा. सदस्य श्री. कैलास तेजी हे सायंकाळी ५.२० वाजता स्थायी समिती सभागृहातुन बाहेर पडले.

--७--

मा. सदस्य श्री. रमेश चव्हाणः-आयुक्त साहेब, आपणाकडे निधी उपलब्ध आहे कब?

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-मी त्या जागेची प्रत्यक्ष पहाणी केली आहे तेथे पाणी जमा होते, तसेच जकात ठेकेदारास तेथे मध्यवर्ती जकात नाक्यासाठी जागा दिलेली आहे.तेथे पाणी जमा होत असल्याने खुपच त्रासाचे होत आहे. निधी उपलब्ध नाही परंतु कामाची आवश्यकता लक्षात घेवून मी हा प्रस्ताव आपल्यासमोर ठेवला आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-तेथे पूराचे पाणी साठत असल्याने आयुक्तांनी स्वतः तेथील जागेची पहाणी करून त्या रस्त्याच्या कामाचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजूरीस आणला आहे.

मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः-महापालिकेचे अर्थसंकल्पीय उत्पन्न १०० कोटी मागे जात आहे, ४ तारखेनंतर आचारसंहिता लागु झाल्यानंतर आपणास सर्व अधिकार प्राप्त होणार आहेत त्यावेळी आपण आपल्या अधिकारात हे काम करा.

मा. सदस्य श्री. प्रमोद टालेः-हया प्रस्तावास मंजुरी दया. बाकीचे प्रस्ताव नंतर आणले जावेत.

मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः-महापालिकेचा अर्थसंकल्प १०० कोटी रूपये तुटीत असतानाही?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-या प्रस्तावावर मतदान घेतले जावे.

मा. सचिवः-या प्रस्तावाच्या बाजुने जे सदस्य असतील कृपया त्यांनी आपले हात वर करावेत.

१. श्रीमती. ज्योती कालानी.
२. श्री. वनवारी किशोर
३. श्री. तलरेजा विनोद
४. श्री. ठाकुर बेहरानी

५. श्री. केणी जयकुमार
६. श्री. टाले प्रमोद

प्रस्तावाच्या विरोधात जे सदस्य आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

१. श्री. पारवानी रामचंद्र
२. श्रीमती. राधवानी आशा
३. श्रीमती. राजानी भारती
४. श्रीमती. वेलकर सुरेखा
५. श्रीमती. सोनावणे यमुना
६. श्री. रमेश चव्हाण



ठरावाच्या बाजुने ६ व विरोधात ६ मते असल्याने या प्रस्तावाबाबत सभापतींचे निर्णायक मत घ्यावे लागेल.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>मी माझे निर्णयक मत प्रस्तावाच्या बाजुने देत आहे. त्यामुळे प्रस्तावाच्या बाजुने ७ व विरोधात ६ मते होत असल्याने सदरचा ठराव बहुमताने पारीत झाल्याचे मी जाहिर करते.

<u>विषय :-</u> उल्हासनगर ३ येथील लायन बगीच्यामधुन जाणा-या रस्त्याचे व प्रेमचंद स्टील ते हरीव्दार अपार्टमेंन्ट या रस्त्यांचे सिमेंट क्रॉकीटीकरणाचे अतिरिक्त कामास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उपरोक्त विषयानुसार महानगरपालिकेच्या स्थायी समितीने वर्ष २००१-२००२ चे सुधारीत अंदाजपत्रक मंजुर करतेवेळी लायन (सपना) उद्यान दरम्यानच्या रू. १२,०० लक्ष व लिंक रोड प्रेमचंद स्टील ते हरव्दार अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्यासाठी रू. ८.०० लक्ष इतकी तरतुद केली आहे. स्थायी समितीने मंजुर केलेली अर्थसंकल्पीय तरतुद लक्षात घेऊन तांत्रिक दृष्टया अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. परंतु सदरचे काम सुरू केल्यानंतर सदर जागेवर अतिरिक्त कामे खामे अत्यंत महत्त्वाचे होते. अर्थसंकल्पीय तरतुद कमी असल्यामुळे जादा बाबी मुळ अंदाजपत्रकात नमुद करण्यांत आले नाही.जुन २००१ मध्ये पावसाळा सुरू झालेनंतर अनेक बाबी करण्याचे लक्षात आले व संबंधित नगरसेवक व मा. महापौर महोदयांनी अतिरिक्त कामे करण्याबाबत कंत्राटदारास व संबंधित उप-अभियंत्यांस सुचना दिल्या त्यानुसार सदर जागेवर अतिरिक्त कामे करण्यांत आले आहे. या रस्त्यावरील नालीची पातळी कमी असल्यामुळे पावसाळयात पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नाही. दरवर्षी डागडूजी साठी होणारा खर्च सिमेंट कॉक्रिटीकरण केल्यामुळे कमी होईल. सदर कामास स्थायी समितीने ठराव क्र. १५ दिनांक १७.५.२००१ नुसार मंजुरी दिलेली आहे. सदर कामे करण्याअगोदर पावसाळा सुरू झाल्यामुळे तेथे असलेल्या नाल्याचे काम करणे भाग पडले. त्यामुळे सदर कामवरील मुळ अंदाजित किंमतीला रक्कमेतुन सदर नाल्याचे काम करण्यात आले. त्यामुळे सदर कामावरील मुळ अंदाजित किंमतीतील रक्कमेतुन सदर नाल्याचे काम करण्यात आले.त्यामुळे राहीलेल्या उर्वरीत रक्कमेतुन सदर रस्त्याचे काम पुर्ण होणे

शक्य नाही. त्यामुळे सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करावे लागणार आहे. मुळ अंदाजित किंमतीतुन वरील कामे होत नसल्यामुळे मा. महापौर यांनी पत्र क्र. उमपा/महापौर कार्यालय/२०५ दिनांक ४.१०.२००१ रोजी पत्र दिले असुन वरील कामात होणा-या अतिरिक्त कामांचे सुधारीत प्राकलन तयार करण्यासाठी मागणी केलेली आहे. तरी सदर उल्हासनगर-३ येथील लायन बगीच्या मधुन जाणारा रस्ता (सिमेंट कॉक्रिटीकरण) या कामाची मुळ प्राकलनीय किंमत १२.०० लक्ष व अतिरिक्त होणा-या कमाची सुधारित



अंदाजित किंमत रुपये २४,९४,६००/- इतकी होत आहे. प्रेमचंद स्टील तमेज हरिद्वार अपार्टमेंट पर्यंतचा रस्ता (सिमेंट कॉक्रिटीकरण)या कामामुळे मुळ अंदाजित किंमत रु. ८.०० लक्ष इतकी आहे. व अतिरिक्त होणा-या कामांची सुधारित किंमत रु. १८,३२,७६०/- एवढी होत आहे.

तरी उत्त्पन्नामध्ये वाढ होण्याची तसेच इतर खर्चात बचत होण्याची शक्यता नसल्याने बांधकाम विभागाच्या खालील अतिरिक्त कामाचे सुधारित अंदाजित प्राकलनास अर्थसंकिल्पिय तरतुदीमधून लेखा शिर्ष C- 4 (II) P-II अंतर्गत पुर्नविंयोजनेन्वये [BY way of reappropriation] मान्यता मिळणेसाठी आदेशार्थ सविनय सादर.

| कामाचे नाव | मुळ अंदाजित किंमत | सूधारित अंदाजित किंमत |
|---|---|---|
| ३ उल्हासनगर-३ येथिल लायन (सपना)गार्डनमध्ये एम ३५० ने रस्ता बांधणे. | १२,००,०००/- | २४,९४,६००/- |
| ४. उल्हासनगर-३ येथिल प्रेमचंद स्टील ते हरिद्वार अर्पाटमेंट पर्यंतचा रस्ता एम ३५०ने बांधणे. | ८,००,०००/- | १८,३२,७६०/- |

तसेच मा. मुख्य लेखा अधिकारी व मा. मुख्य लेखा परिक्षक यांनी सदर कामास शिफारस दिली आहे. तरी सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळविण्यासाठी व खर्चाच्या बाबतीत आर्थिक धोरणात्त्मक निर्णय घेण्यासाठी स्थायी समितीपुढे मंजूरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६८</u>　　　<u>दिनांक:-३१ . १२. २००१</u>

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :- श्री. केणी जयकुमार

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-३ येथिल लायन बगिच्यामधुन जाणा-या रस्त्त्याचे व प्रेमचंद स्टील ते हरिव्दार अपार्टमेंट या रस्त्त्याचे सिमेंट कॉक्रिटीकरण अतिरिक्त कामाच्या उपरोक्त रक्कमेचे सुधारित प्राकलनास आवश्यक त्या सरकारी वर्षाच्या अवधीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पुर्नसमायोजनाच्या अधिन राहुन प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>बहुमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u>हया रस्त्याचे काम कसे होते? प्राकलन कोण तयार करतात?

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):- </u>या कामाचे प्राकलन मे.उत्तम इंजिनिअरींग यांनी तयार केले आहे,काही बाबीमध्ये वाढ झाल्यामुळे प्राकलनिय रक्कमेमध्ये फरक पडला आहे.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u>आता किती लाख रूपयांचा फरक आहे? ४३ लाखाचा?

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):- </u>सुधारित प्राकलनाप्रामणे रू.३८ लाख इतक्या रक्कमेची वाढ होत आहे.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u>३८ लाख? व एकुण कामाची रक्कम किती होते?

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>१ कोटी ६१ लाख.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u>प्राकनांमध्ये किती फरक असतो? किती टक्के कमी जास्त होते? २टक्के, ३ टक्के किती टक्के?मुळ प्राकलनामध्ये किती रक्कमेची वाढ होते? सुधारित प्राकलनात १० टक्यापेक्षा जास्त फरक ठेवला जातो का?

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>फरक ठेवला जात नाही, ५-१० टक्के होत असतो खोदाई काम वगैरे वाढत असते.

<u>मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-</u>काम वाढते ते सांगा ना?

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):- </u>जंक्शनवर थोडे काम वाढविण्याचा विचार आहे. डांबरीकरणा ऐवजी सिमेंट कॉक्रिटीकरणाचा विचार आहे.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u>कुठे काम वाढले आहे ते मला दाखवा? आवस चौक आहे का त्यामध्ये?

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-</u>तो रस्ता आपल्या व श्री. प्रकाश माखीजा यांच्या प्रभागाशी संबंधित आहे,आपण का हरकत घेता?

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u>एम.एम. आर.डी.ए. कडुन कर्जापोटी किती पेमेंट आले आहे?

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>४ कोटी आले आहेत.

<u>मा.सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-</u>किती कोटीचे काम होते?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-२० कोटीचे कर्ज उभारण्याचा प्रस्ताव होता.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-जसे जसे काम होईल तसतसे प्रतीपुर्तीचे प्रस्ताव पाठविले जातील व त्यानुसार प्रतीपूर्तीच्या रक्कमा येत जातील.

मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-या प्रस्तावास आमचा विरोध आहे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-मी हा प्रस्ताव मतदानास टाकते.

मा. सचिव:-या प्रस्तावाच्या बाजुने जे सदस्य असतील कृपया त्यांनी आपले हात वर करावेत.

१. श्रीमती. ज्योती कालानी.
२. श्री. वनवारी किशोर
३. श्री. तलरेजा विनोद
४. श्री. ठाकुर वेहरानी
५. श्री. केणी जयकुमार
६. श्री. टाले प्रमोद

प्रस्तावाच्या विरोधात जे सदस्य आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.
१. श्री. पारवानी रामचंद्र
२. श्रीमती. राधवानी आशा
३ श्रीमती. राजानी भारती
४. श्रीमती. वेलकर सुरेखा
५. श्रीमती. सोनावणे यमुना
६. श्री. रमेश चव्हाण

ठरावाच्या बाजुने ६ व विरोधात ६ मते असल्याने या प्रस्तावाबाबत सभापतींचे निर्णयक मत घ्यावे लागेल.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-मी माझे निर्णयक मत प्रस्तावाच्या बाजुने देत आहे. त्यामुळे प्रस्तावाच्या बाजुने ७ व विरोधात ६ मते होत असल्याने सदरचा ठराव बहुमताने पारीत झाल्याचे मी जाहिर करते.

विषय :- एकात्त्मीक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र. १
अंतर्गत झुलेलाल मंदिर ते रेड क्रॉस या रस्त्याचे
सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय
मान्यता देणे बाबत.



--

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा.१ अंतर्गत व एम एम आर डी ए कर्ज उभारणी टप्पा १ मधून झुलेलाल मंदिर ते रेडक्रॉस

हा बालकनजी बारी मार्गेचा रस्ता सिमेंट कॉक्रिट ने बांधण्याकरीता रु. १,४३,०७,७२५/- कामासाठी निविदा मागविल्या होत्त्या. या कामासाठी सिव्हिल काम व इतर कामे अशा एकत्रित कामाच्या रु १,६१,८८,८९०/- रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळालेली आहे. व या रक्कमेची तरतूद एम एम आर डी ए कर्ज उभारणी प्रस्ताव टप्पा १ मध्ये अंतर्भुत आहे. सिव्हील कामासाठी मागविलेल्या रु. १,४३,०७,७२५/- निविदेचे काम मे. शंकर महादेव हे त्यांच्या ११.०७ टक्के कमी दराने करीत आहेत. कामाची कार्यवाही करतांना काही बाबींमध्ये वाढ झालेली आहे. त्याचे विवरण सोबतच्या सुधारित प्राकलनात कारणांसह दिलेले आहे. सुधारीत प्राकलनानुसार या कामाची एकंदर किंमत रु. १,९९,८८,४८८/- इतकी होत आहे. ती मुळ प्रशासकिय मान्यता मिळालेल्या रु. १,६१,८८,८९०/- रक्कमेपेक्षा २३.४७टक्के ने जास्त आहे. त्यामुळे या रक्कमेस सुधारित प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणे आवश्यक आहे.

सुधारित प्राकलनाप्रमाणे रु. ३७,९९,५९८/- इतकी कामाच्या किंमतीत वाढ होत आहे. सदर वाढीव खर्च महानगरपालिकेच्या चालू अर्थ संकल्पात असलेल्या लेखा शिर्ष सी४ पपद्व एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गत ठेवलेल्या तरतुदीतून भागविण्याचा आहे. मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी या प्राकलनासाठी शिफारस केली आहे.

तरी उपरोक्त सुधारित प्राकलनास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेकरीता स्थायी समिती सभेपूढे ठेवण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६९</u> <u>दिनांकः-३१ . १२. २००१</u>

सुचकाचे नाव :- श्री. तलरेजा विनोद.
अनुमोदकाचे नाव :- श्री. प्रमोद टाले.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम व एम. एम. आरडी. ओ. कर्ज उभारणी टप्पा क्र. १ मधील झुलेलाल मंदिर ते रेड क्रॉस या रस्त्याचे उपरोक्त रक्कमेचे सुधारित पाकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>बहुमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--१३--

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषयः-</u>मा. आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत
प्रभाग क्र. १९ मध्ये दिवाबत्तीची सोय करणे
कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद

करणे बाबत.

प्रस्तावना :-

मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या जा.क्र. नियो/आस्थविका/संस-२/२००१-२००२/४११/४५३, दिनांक १७.०७.२००१ पत्रानुसार मा. आमदार श्री. सुरेश (पप्पु) कालानी यांनी सुचविलेल्या कामांची यादी या महानगरपालिकेने प्राकलने व आराखडे तयार करून पत्र क्रमांक उ म पा/ सा.बां.वि/ श.अ/ २९/०१, दिनांक १८.८.२००१ अन्वये पाठविले होते.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या जा.क्र. नियो/आस्थविका/टे-१/५२२, दिनांक ४.१०.०१ च्या पत्रानुसार काही काम मंजूर करुन पाठविले होते.

मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या प्रशासकिय मंजूरी अनुसार हे काम डी.डी. आर. मार्फत लेबर को. ऑ.सो. कडुन घेण्यासाठी मंजूरी दिली होती.

डी.डी आर. ठाणे यांनी कामाचे वाटप करुन पाठविले होते. त्यांच्याशी करार झाले आहे त्याची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रस्ताव संकेतांक | कामाचे नाव | सोसायटी चे नाव | झालेल्या कराराचे दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | विस/२००१/०५५/१००२ | वार्ड क्र.१९ मध्ये दिवाबत्तीची सोय करणे . (रु. १ लाख) | रवि किरण | १०/१२/२००१ |

सदर माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड)अन्वये स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. ७०** **दिनांक:-३१ . १२. २००१**

सुचकाचे नाव :- श्री. बहरानी ठाकुरदास.

अनुमोदकाचे नाव :- श्री. तलरेजा विनोद.

--१४--

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मा. आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रम २००१-२००२ अंतर्गत प्रभाग क्र. १९ मध्ये दिवाबत्तीची सोय करणे कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृत्तांतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

**एकमताने मंजुर**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :-विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-हे काम कोणत्त्या निधीतील आहे?

मा. सचिव :-नगरसेवक निधीतील.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

विषय :- उल्हासनगर शहरात पाणीपुरवठा विभागाअंर्तगत ७ विविध जलवाहिन्या टाकणे आणि १ वाल्वसाठी चेंबर बांधणे कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना:-

उल्हासनगर शहराच्या विविध भागात खाली नमुद केलेली कामे वित्तिय अंदाजपत्रक सन २००१-२००२मधुन नमुद करण्यासाठी नगरसेवक यांनी विनंती केली आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर ४ प्र. क्र. २६मध्ये मयुर टेलर ते पंम्पु वसीटा यांचे घर व पी.डब्लु.डी.वसाहत ते १४नं शाळा ते संडासा पर्यंत ५० मी. मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत (नगरसेवक निधीतुन) | ४९,९००/- | १८.७.२००१ | विजय म.का.सो. |
| २ | उल्हासनगर ४ व ५ मध्ये, गुरूनानक शाळा, तसेच मच्छीमार्केट जवळ वॉल्व लावणे बाबत. (नगरसेवक निधीतुन) | १,३३,९००/- | २८.२००१ | शारदा म. का.सो. |



| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| ३ | दुषित पाण्याबाबत भरत नगर, सुभाष टेकडी, लुंबनी ग्राउंड ते श्री. खैरे यांचे घरापर्यंत १५० मी.मी व्यासाची व ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत. उल्हासनगर-४ वार्ड क्र. १४ (नगरसेवक निधीतुन) | २,७७,३००/- | १०८.२००१ | प्रभात म.का.सो |
| ४ | ओटी विभाग कॅम्प ४ येथील चौकामध्ये १५० मी.मी. व्यासाची पोलादी जलवाहिनी टाकणे | | | |

( प्रभाग क्र.२५ ,२६ व ९५) २ ,०० ,६५०/- १३.९.२००१ शारदा म.का.सो.
५. उल्हासनगर ५ प्र. क्र. १७करिता
मेन रोड (देशीबार) ते वीर तानाजी
नगर पर्यंत ८० मी. मी. व्यासाची जी.आर.
पाईप लाईन टाकणे बाबत. १ ,५२ ,७००/- १७.१०.२००१प्रभात म.का.सो.
(नगरसेवक निधीतुन)
६. उल्हासनगर ४ प्र. क्र. २६ मध्ये
रेल्वे ब्रीज ते विठ्ठलवाडी पोलिस वसाहत
पर्यंत १५० मी. मी. व्यासाची एम.एस.
जलवाहिनी टाकणे बाबत. ४ ,९५ ,५००/- ७.११.२००१ शारदा म. का.सो.

७. उल्हासनगर ४ प्र. क्र. १५मध्ये
जुने बुस्टर ते सिध्दार्थ हाऊसिंग कॉलनी
पर्यंत ८० मी. मी. व ६५ मी. मी. व्यासाची
जी. आय. जलवाहिनी टाकणे बाबत.२ ,८३ ,९००/२८.११.२००१ वंदना म.का.

८. उल्हासनगर ४ नेताजी चौक ते शेडच्या
बाजुला असलेल्या व्हॉल्वसाठी चेंबर बांधणे
बाबत. ८५ ,१४०/- १२.१२.२००१ प्रभात म. का.सो.

---------------------------------------------------------------

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक ठाणे यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती त्यानुसार उप-निबंधक, ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदर माहिती स्थायी समितीकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.



<u>स्थायी समिती ठराव क्र. ७१</u> <u>दि:-३१.१२.२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. चव्हाण रमेश

अनुमोदकाचे नाव :- श्री. केणी जयकुमार.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरात पाणी पुरवठा विभागा अंतर्गत सात विविध जलवाहिन्या टाकणे व एक वॉल्व्हसाठी चेंबर बांधणे कामी प्रशासनाने केलेल्या उपरोक्त रक्कमांच्या संविदांची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृत्तांतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

<u>मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-</u>या प्रस्तावाबाबत मी बोलु इच्छितो की, ज्या सदस्याच्या प्रभागातील रस्त्त्याच्या कामाचे प्रस्ताव प्रलंबित असतील ते सर्व प्रस्ताव पुढील स्थायी समितीपुढे मंजूरीस ठेवले जावेत.

<u>मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानीः-</u>या प्रस्तावास सुध्दा आमचा विरोध आहे. २५ सेक्शनच्या रस्त्त्याचे काम राहुन गेले आहे. ते काम सुध्दा मंजुरीस आणले जावे.

<u>मा.सदस्य श्री.किशोर वनवारीः-</u>रस्त्त्यांच्या वाढीव कामाचे प्रस्ताव मंजुरीस आणले जावेत.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>मी हा प्रस्ताव मतदानास टाकते.



<u>मा. सचिवः-</u>या प्रस्तावाच्या बाजुने जे सदस्य असतील कृपया त्यांनी आपले हात वर करावेत.

१. श्रीमती. ज्योती कालानी.
२. श्री. वनवारी किशोर
३. श्री. तलरेजा विनोद
४. श्री. ठाकुर बेहरानी
५. श्री. केणी जयकुमार
६. श्री. टाले प्रमोद

प्रस्तावाच्या विरोधात जे सदस्य आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.
१. श्री. पारवानी रामचंद्र
२. श्रीमती. राधवानी आशा
३ श्रीमती. राजानी भारती
४. श्रीमती. वेलकर सुरेखा

५. श्रीमती. सोनावणे यमुना
६. श्री. रमेश चव्हाण

ठरावाच्या बाजुने ६ व विरोधात ६ मते असल्याने या प्रस्तावाबाबत सभापतींचे निर्णयक मत घ्यावे लागेल.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>मी माझे निर्णयक मत प्रस्तावाच्या बाजुने देत आहे. त्यामुळे प्रस्तावाच्या बाजुने ७ व विरोधात ६ मते होत असल्याने सदरचा ठराव बहुमताने पारीत झाल्याचे मी जाहिर करते.

<u>विषय :-</u> उल्हासनगर -४ येथील प्रभात चौक (श्यामसुंदर जनरल स्टोअर्स) ते दिपक दरबार मार्गे मानेरा जंक्शन पर्यंतचा रस्ता रूंदीकरण व डांबरीकरण करणे कामीचे सुधारीत प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उपरोक्त विषयांकित काम मे.गौरव इंटर प्राईजेस ठाणे यांना दिनांक १८.१.२०००च्या आदेशाच्या आदेशाव्दारे देण्यात आले होते. सदर कामाची अंदाजित प्राकलनीय रक्कम रूपये ४५.०३ लक्ष होती. परंतु सदर काम चालु असतांना मा. आयुक्त साहेबांनी प्रत्यक्ष कामाच्या जागेवर भेट दिली होती. सदर रस्तयाच्या उपलब्ध रूंदी असल्याप्रमाणे काम करण्याचे आदेश दिले होते. सदर काम चालु केल्यानंतर खालील कामात वाढ करण्यात आली. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१. सदर रस्तयाची रूंदी काही ठिकाणी ४० फुटापेक्षा जास्त आहे.
२. सदर रस्त्यात सहा जागी नाल्यावर साकव बांधणे आवश्यक होते.
३. सदर रस्त्याच्या काही ठिकाणी कडेने संरक्षक भिंत बांधणे आवश्यक होते.



४. रस्त्याच्या बाजुने फुटपाथ व त्यावरील चेकर्ड टाईल्स तसेच कर्ब स्टोनची प्राकलनात तरतुद केलेली नव्हती.
५. रस्त्यात असलेल्या दोन चौकांचा विकास करणे आवश्यक होते.

वरील काम करणेसाठी लेखा शिर्ष c-4 (ii) p-ii मध्ये १४.०० कोटी तरतुद आहे. आतापर्यंत या लेखा शिर्षामधून शिल्लक तरतूद ३,८३,२६,७००/- इतकी आहे. या कामावरील अंदाजित रू. १२,००,०००/- इतक्या खर्चाचे प्राकलन तयार केले असून वरील नमुद केलेल्या वाढीव कामाची किंमत विचारात घेता मे.उत्तम इंजिनिअरिंग कंन्सल्टन्सी यांनी सुधारित तयार केलेल्या प्राकलनाची किंमत रू. ५७.०३ लक्ष इतकी होत आहे. मूळ प्राकलनीय किंमत ४५.०३ लक्ष इतकी होती. अर्थात १२.०० लक्ष इतकी वाढ होत आहे. तरी रस्त्याचे काम करण्याचे अत्यंत आवश्यक असुन व सर्व उर्वरित काम पुर्ण होणे आवश्यक आहे. मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांचे मार्फत सदर सुधारित अंदाजपत्रकाची तपासणी केली असुन सुधारित अंदाजपत्रक स्थायी समिती पुढे मंजुरीसाठी ठेवण्यासाठी शिफारस केली आहे. वरील कामाची निकड लक्षात घेता सदर काम लवकरात लवकर पुर्ण करून घेणेसाठी स्थायी समिती कडुन वाढलेल्या सुधारीत प्राकलनीय किंमतीस प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ७२ दिनांकः-३१ . १२ . २००१

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. पमोद टाले.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-४ येथील प्रभात चौक (श्यामसुंदर जनरल स्टोअर्स) ते दिपक दरबार मार्गे मानेरा जंक्शन पर्यंतचा रस्ता रूंदीकरण व डांबरीकरण करणे कामी उपरोक्त रक्कमेच्या सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

बहुमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--१९--

मा. सचिव :-विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):-वित्तिय वर्ष सन २००१-२००२ च्या अर्थसंकल्पात १२६ कोटी रूपयाचे महसूली उत्त्पन्न अपेक्षित धरले होते. माहे नोव्हेंबर २००१ पर्यंत ८४ कोटी रूपये उत्त्पन्न अपेक्षित होते मात्र प्रत्यक्षात ३८.७४ कोटी उत्त्पन्न प्राप्त झाले म्हणजे ४६ टक्के उत्त्पन्न प्राप्त झाले आहे, उत्त्पन्नात ५५ टक्के तुट आहे.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-त्यास जबाबदार कोण?

श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):-प्रत्येक लेखा शिर्षानुसार किती वसुली झाली त्याची टककेवारी दिली आहे.

मा.सदस्य श्री. रामचंद पारवानीः-वसुली कमी का त्याची कारणे सांगितली जावीत.

श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):-त्यास जबाबदार ते ते विभाग.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-आयुक्त साहेब, आजपर्यंत आपण काय केले? आपले मुख्य लेखापरिक्षक म्हणतात की कमी वसुलीस विभाग जबाबदार आहेत.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-ज्यांची वसुली कमी आहे अशा कर्मचा-यांची वेतन वाढ थांबविली आहे.

*मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-*स्थायी समिती आपणास असे निर्देश देत आहे की, वसुली वाढविण्यासाठी आपणास जे जे बदल करावे असे वाटते त्या बदला बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीस सादर केले जावेत जसे सुधारीत अर्थ संकल्पात बदल केले जातात. ते केले आहेत काय?

*श्री. शेंडे(मुख्य लेखा अधिकारी):-*सुधारित अर्थसंकल्प तयार करण्याचे काम चालु आहे.

*मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-*डिसेंबर महिन्यामध्ये अर्थसंकल्प सुधारित केला जातो. आज ३१ डिसेंबर आहे अदयाप सुधारित अर्थसंकल्प तयार केला नाही? कोणकोणत्त्या लेखा शिर्षामध्ये किती किती रक्कमेची तरतुद केली होती? प्रत्यक्षात त्या शिर्षामध्ये किती किती रक्कमा उपलब्ध झाल्या? किती रक्कमा खर्ची झाल्या कोणत्त्या शिर्षामधील रक्कमा खर्ची पडल्या नाहीत, कोणकोणत्त्या शिर्षातील रक्कमा दुस-या शिर्षामध्ये प्रत्त्यावर्तीत करता येतील तसेच किती उत्त्पन्न अपेक्षित होते? प्रत्यक्षात किती उत्त्पन्न प्राप्त झाले याचा अहवाल लवकरात लवकर स्थायी समिती समोर आणला जावा.

*श्री. शेंडे(मुख्य लेखा अधिकारी):-*मार्च महिन्या अखेर सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक प्रस्तुत करता येईल.

--२०--

*मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-*प्रत्येक वर्षी २० फेब्रुवारी पर्यंत सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज स्थायी समिती समोर मांडला जातो हे बरोबर आहे ना? आम्ही शासनास पत्र पाठविले आहे, ज्या सरकारी वर्षात महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका असतात त्या वर्षाचा अर्थसंकल्पीय अंदाजपत्र चार महिन्यासाठी तयार केले जाईल. आणि उर्वरित महिन्यासाठी सार्वत्रिक निवडणुकीनंतर येणा-या नविन पालिका सदस्यांनी पदभार स्विकारल्यानंतर अर्थसंकल्प तयार केला जाईल.

*मा. सदस्य श्री किशोर वनवारी:-*तर तो लवकरात लवकर स्थायी समितीपुढे मांडला जावा.

*मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी:-*अर्थसंकल्पीय तरतुद उपलब्ध नसताना ही आपण रस्त्त्याचे कामाचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजुरीस ठेवत आहात?

*श्री. शेंडे(मुख्य लेखा अधिकारी):-*उत्त्पन्नाच्या ज्या रक्कमा अपेक्षित होत्त्या त्या आम्ही आपणांसमोर दिलेल्या आहेत. बाकी निर्णय स्थायी समितीने घ्यायचा आहे.

*मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-*शहरामध्ये ज्या ज्या रस्त्त्यांची कामे चालु आहेत ती सर्व कामे पूर्ण झाली पाहिजेत अतिरिक्त कामाचे जे जे रस्ते आहेत ते पुर्ण झाले पाहिजेत, शहराच्या विकासाची ही कामे झाली पाहिजेत त्यासाठी आयुक्तांना आम्ही पाठींबा देत आहोतए तसेच जेथे पुराचे पाणी येते त्या ठिकाणचे रस्त्त्याचे ही काम झाले पाहिजे.

*मा. सदस्य श्री. रामचंद पारवानी:-*त्या बरोबर नविन रस्त्त्याचीही कामे मंजुरीस आणली जात आहेत, निवडणुका आल्या नंतर आता आपणांस जाग आली आहे काय?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-याबरोबर रस्त्यांची कामे जेव्हा जेव्हा मंजुरीस आणली जातील तेव्हा तेव्हा ती पारीत केली जातील.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय:- मुख्य लेखा परिक्षकांचे माहे एप्रिल २००१ ते
नोव्हेंबर २००१ पर्यंतच्या जमाखर्च लेख्यांची छाननी
अहवाल नोंद करणे बाबत.

--२१--

प्रस्तावना :-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसारन माहे एप्रिल २००१ ते नोव्हेंबर २००१ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल सोबत सादर कलेला आहे.

कृपया वरील अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

स्थायी समिती ठराव क्र.७३          दिनांक:-३१ . १२. २००१

सुचकाचे नाव :- श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :- श्री. वहरानी ठाकुरदास

हि स्थायी समिती सोबत जोडलेल्या पान क्र. १ ते ८ पर्यंतच्या, मुख्य लेखा परिक्षकांच्या माहे एप्रिल २००१ ते नोव्हेंबर २००१ पर्यंतच्या जमाखर्चाच्या लेख्यांचा छाननी अहवाल आजच्या सभेच्या कार्यवृत्तांतात नोंद
करित आहे. व आयुक्तांना या सरकारी वर्षाच्या अवधीत जमाखर्चाचे पुर्नसमायोजन करणेस निर्देशीत करीत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव:-विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकामांतर्गत तीन

विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतुद ठेवलेल्या वित्तिय अंदाजपत्रक सन २००१-२००२मधुन नमुद करण्यासाठी नगरसेवक यांनी विनंती केली आहे.

--२२--

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | उल्हासनगर ३ येथील प्र. क्र. ४२मध्ये शिवाजी नगर मध्ये सी.सी. पायवाटा बनविणे आणि मुख्य रस्त्यापासुन ते नाल्यापर्यंत आणि गणेशनगर मध्ये नाली बांधणे. (जुने शौचालय ते चांदीबाई कॉलेज भिंत पर्यंत) | ४९,९९९००/- | १७.११.२००१ | ओमकार म.का. |
| २. | उल्हासनगर ३ येथील प्र. क्र. ६९ मध्ये बॅरक क्र. ११३५,३६,१०५०, १०१३,१०१४,९९७,१०२५ आणि विविध ठिकाणी सी.सी. पायवाटा आणि नाल्या बांधणे. | १९९८२५/- | १२.११.२००१ | ओमकार म. का. |
| ३. | उल्हासनगर-३ येथील प्र. क्र. ४२ मध्ये बॅ. नं.१०३५,१०३६ आणि ९७५ जवळ आणि विविध ठिकाणी सी. सी. पायवाटा आणि नाल्या बांधणे. | १५००००/- | १७.११.२००१ | ओमकार म.का.सो |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक ठाणे यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती त्यानुसार उप-निबंधक, ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदर माहिती स्थायी समितीकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ७४</u> <u>दि:-३१.१२.२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. प्रमोद टाले.

अनुमोदकाचे नाव :- श्री. तलरेजा विनोद.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गतचे उपरोक्त तीन विविध कामासमोर दर्शाविलेल्या

--२३--

रक्कमेच्या प्रशासनाने केलेल्या संविदांची आजच्या सभेच्या कार्यवृत्तांतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u> सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u>उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकामांतर्गत
पाच विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची
माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावनाः-</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतुद ठेवलेल्या वित्तिय अंदाजपत्रक सन २००१-२००२मधुन नमुद करण्यासाठी नगरसेवक यांनी विनंती केली आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | प्र. क्र. १६मध्ये समता नगर येथे सहा बैठकीचे शौचालय बांधणे | १९९९५०/- | ६.११.२००१ | तुषार म.का.सो. |
| २. | प्र क्र. २४मध्ये बॅरेक नं. १५७०, १५७१, १५७२, १५७३, १६०२, १६०४ आणि १६३८ जवळ पायवाटा आणि नाली बांधणे. | १,९९,८००/- | १७.११.२००१ | सिध्दनाथ म. का.सो. |
| ३. | उल्हासनगर-५ येथील गायकवाड पाडयामध्ये श्री. तुकाराम पाटील यांचे घरापासुन शरद जाधव यांचे घरापर्यंत सी. सी.एम.२५० ने रस्ता बांधणे. | ४९९९००/- | १७.११.२००१ | धनलक्ष्मी म.का.सो |
| ४. | उल्हासनगर-२ येथील प्र. क्र. ३९ मध्ये बुध्द नगर व साईबाबा कॉलनी येथील नाल्या बनविणे व दुरूस्त करणे. | ६९०००/- | १७.११.२००१ | वणीदेवी म.का.सो. |
| ५. | उल्हासनगर-४ येथील प्र.क्र. २३ | | | |

मध्ये बॅरेक नं. १६५१ ,१६५२ ,
आणि १६५३ जवळ सी.सी.
पायवाटा आणि नाली
बांधणे. १९९८००/- १७.११.२००१ रविकिरण म.का.सो



उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक ठाणे यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती त्यानुसार उप-निबंधक, ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदर माहिती स्थायी समितीकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ७५ दि:-३१.१२ .२००१.

सुचकाचे नाव :-श्री. केणी जयकुमार

अनुमोदकाचे नाव :- श्री. तलरेजा विनोद

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गतचे उपरोक्त पाच विविध कामासमोर दर्शविलेल्या रक्कमेच्या प्रशासनाने केलेल्या संविदांची आजच्या सभेच्या कार्यवृत्तांतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :-विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकामांतर्गत सात विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतुद ठेवलेल्या वित्तिय अंदाजपत्रक सन २००१-२००२मधुन नमुद करण्यासाठी नगरसेवक यांनी विनंती केली आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | प्र. क्र. ४३मध्ये गजानन नगर मध्ये राशन दुकान ते एम.एस.ई.बी. ट्रान्सफर पर्यंत रस्ता एम.२५० ने बांधणे. (नगरसेवक निधीतुन) | १३००००/- | ७.१२.२००१ | मे. राजलक्ष्मी मकासो. |
| २. | प्र.क्र. ४७ मध्ये चांद राशन दुकान आणि विविध ठिकाणी सी.सी. पायवाट बांधणे. (नगरसेवक निधीतुन) | ९९,९४०/- | ७.१२.२००१ | मेगीता म. का.सो. |
| ३ | प्र. क्र. ४७ मध्ये आशियाना महल समोर ब्लॉक बी.२० जवळ सी.सी.एम २५० ने रस्ता बांधणे. (नगरसेवक निधीतुन) | ९९४००/- | ७.१२.२००१ | मेगीता म.का.सो |
| ४. | प्र. क्र. १३ मध्ये सम्राट अशोक नगरमध्ये सहा बैठकीचे शौचालय बांधणे. ( गलिच्छ वस्ती) | १९९९५०/- | ७.१२.२००१ | मे.राजलक्ष्मी म.का.सो. |
| ५. | प्र. क्र. ४३ मध्ये सिताराम नगर आणि शिवाजी किराणा स्टोअर्स ते जावडे यांच्या घरापर्यंत सी.सी. पायवाट आणि नाली बांधणे. (गलिच्छ वस्ती ) | १,९९,८००/- | ७.१२.२००१ | मे.राजलक्ष्मी म.का.सो. |
| ६. | प्र. क्र. ४५मध्ये राहुल नगरमध्ये दहा चाळ येथिल रस्ता बी.एम. व ए.सी ने विकसित करणे. (गलिच्छ वस्ती ) | १९९९००/- | ७.१२.२००१ | मेगीता म. का.सो. |
| ७. | उल्हासनगर ४ येथील नागसेन नगर येथे डॉ. आंबेडकर उद्यान जवळ रस्ता सी.सी. एम. २५० ने बांधणे. श्री. तोरणे यांच्या घराजवळ (गलिच्छ वस्ती) | ४९९४००/- | ७.१२.२००१ | मे. विजय म.का.सो. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक ठाणे यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती त्यानुसार उप-निबंधक, ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदर माहिती स्थायी समितीकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ७६</u> <u>दि:-३१.१२.२००१.</u>

सुचकाचे नाव :-श्री. तलरेजा विनोद

अनुमोदकाचे नाव :- श्री. केणी जयकुमार

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गतचे उपरोक्त सात विविध कामासमोर दर्शाविलेल्या रक्कमेच्या प्रशासनाने केलेल्या संविदांची आजच्या सभेच्या कार्यवृत्तांतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:-</u>विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

गोषवा-यामध्ये १५ कामे दर्शाविली आहेत परंतु अ क्र. ७ नंतर ८ ऐवजी थेट ९ क्र. लिहिला गेल्याने १४ कामाच्या ठिकाणी १५ कामे दर्शाविलि आहेत. तेथे सुधारणा करावयाची आहे.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकामांतर्गत पंधरा विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना:-</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतुद ठेवलेल्या वित्तिय अंदाजपत्रक सन २००१-२००२मधुन नमुद करण्यासाठी नगरसेवक यांनी विनंती केली आहे.

| अ.क्र कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|
| १. उल्हासनगर येथील प्र. क्र. ३ मध्ये अभिमन्यु भालेराव यांचे घर ते रविंद्र विठ्ठल जाधव यांचे घरापर्यंत सी.सी. एम. २५० ने आणि नाली बांधणे. (नगरसेवक निधीतुन) | १९९९२०/- | २६.११.२००१ | शेरावाली म.का. |
| २. उल्हासनगर ३ येथील प्र. क्र. २७ मध्ये बॅरेक नं. ११४७ जवळ रस्ता सी.सी. एम.२५० ने बांधणे. (नगरसेवक निधीतुन) | १,९९,८२५/- | २६.११.२०० | शिवकृपा म. का. |
| ३. उल्हासनगर येथील प्र. क्र. ३४ मध्ये बॅरेक नं. १ आणि २ अरमन महोता कंपनीच्या बाजुने सी. सी. पायवाटा आणि नाली बांधणे. (नगरसेवक निधीतुन) | १३८०००/- | २६.११.२००१ | शिवकृपा म.का.सो |
| ४. उल्हासनगर येथील प्र. क्र. ३५ मध्ये शिवमंदीर जवळ विठ्ठल अपार्टमेंट ते एम.आय.डी.सी. रोड आणि विविध ठिकाणी सी.सी. एम.२५० ने नाली बांधणे.( नगरसेवक निधी) | १२२०००/- | २६.११.२००१ | शिवकृपा म.का.सो. |
| ५. उल्हासनगर येथिल प्र.क्र. ३६ मध्ये पुरुषोत्तम दादजानी यांचे घर ते प्रितमदास पुरस्वानी यांचे मार्फत बॅ.नं.१३७ पर्यंत आणि विविध ठिकाणी सी.सी.एम २५० ने रस्ता बांधणे. (नगरसेवक निधीतुन) | ६०००००/- | २६.११.२००१ | शिवकृपा म.का.सो. |
| ६. उल्हासनगर-५ येथिल प्र.क्र.५० मध्ये गणेश मंदिर जवळ घुमटराव यांचे घराजवळ बॅ.क्र. १७८२ ते १७८५ पर्यंत सी.सी.एम २५०ने रस्ता बांधणे. (नगरसेवक निधी) | १९९९००/- | २६.११.२००१ | शेरावाली म. का. |



अ.क्र कामाचे नाव प्राकलनिय करारनामा एजेन्सीचे

रक्कम दिनांक नांव

-----------------------------------------------------------

७. उल्हासनगर ४ येथिल प्र. क्र. ५४मध्ये
शिवमंदिर बॅ.क्र.१४६४/१२ जवळ मधुकुंज
सोसायटी मागे से. ३० आणि बॅ.क्र.
१४४९ बॅ.क्र.१५३५ आणि विविध ठिकाणी
सी.सी. पायवाटा आणि नाल्या
बांधणे. ८८,०००/- २६.११.२००१ शिवकृपा म.का.
(नगरसेवक निधी)

८. उल्हासनगर येथिल प्र.क्र.१६२ मध्ये
मनोहर महल जवळील बगीचा सुशोभिकरण
करणे आणि रामचंद्र अपार्टमेंट मागे सी.सी.
पायवाटा बांधणे.
(नगरसेवक निधितून) १,९९,८००/- २६.११.२००१ शेरावाली म. का.

९. उल्हासनगर येथिल प्र. क्र. १६२मध्ये
बॅ.क्र. १६२ ते १६८ जवळ सी.सी. पायवाटा
व बॅ.नं. १८१,२२२ जवळ नाल्याची
भिंत दुरूस्त करणे. १,९९,८५०/- २६.११.२००१ शिवकृपा म.का.
(नगरसेवक निधितून)

१०. उल्हासनगर ३येथिल प्र.क्र. ५१ मध्ये
शोभा जाधवचे घर ते दत्ता तावडे घरापर्यंत
सी.सी. रोड व नाली बंधणे. १,९९,९५०/- २६.११.२००१ शिवकृपा म. का.
(नगरसेवक निधितून)

११. उल्हासनगर ४ येथिल प्र. क्र. ५१मध्ये
राधेश्याम नगरमध्ये सी.सी. एम २५० ने रस्ता
सी.सी. पायवाटा आणि नाली
बांधणे. १,९९,९५०/- २६.११.२००१ सिध्दनाथ म. का.
(नागरी सुविधा)

१२. उल्हासनगर ३ येथिल प्र. क्र.९ झा पाडयामध्ये
सी.सी. व नाली बांधणे. १,९९,९५०/- २८.११.२००१ मुंबादेवी म. का.
(नागरी सुविधा)

१३. उल्हासनगर ४ प्र.क्र. ४५ मध्ये संभाजी
चौक ते दहा चाळ जयभिम चौक१,९९,९५०/- २८.११.२००१मुंबादेवी म.का.
रस्ता बी.एम. आणि एसीने विकसित करणे.
(उप.महापौर निधितून)

१४. उल्हासनगर ५ येथिल प्र. क्र.२१मध्ये
बॅ.नं. ७१३ ते ७१७ पर्यंतचा रस्ता एसीने
विकसित करणे. (नगरसेवक निधितून९९,९५०/-२८.११.२००१ दत्त म. का

-----------------------------------------------------------

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक ठाणे यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती त्यानुसार उप-निबंधक, ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदर माहिती स्थायी समितीकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ७७ दि:-३१. १२ . २००१.

सुचकाचे नाव :-श्री.केणी जयकुमार

अनुमोदकाचे नाव :- श्री. तलरेजा विनोद

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गतचे उपरोक्त पंधरा विविध कामासमोर दर्शाविलेल्या रक्कमेच्या प्रशासनाने केलेल्या संविदांची आजच्या सभेच्या कार्यवृत्तांतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने मंजुर

सभापती/ पिठासिन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :-विषय क्र. १३ वाचुन दाखवितात.

मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-सुधारित प्राकलनास आमचा विरोध आहे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-उपमहापौर साहेबांच्या प्रभागातील काम आहे. उपमहापौर साहेबांच्या प्रभागातील कामास आपला विरोध आहे? आम्ही उपमहापौर साहेबांच्या बरोबर आहेत, त्यांच्या प्रभागातील रस्त्याचे हे काम झालेच पाहिजे.

मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-आम्ही सुध्दा त्यांच्या बरोबर आहोतच.



मा. सचिव:-या प्रस्तावाच्या बाजुने जे सदस्य असतील कृपया त्यांनी आपले हात वर करावेत.

१. श्रीमती. ज्योती कालानी.
२. श्री. वनवारी किशोर

३ . श्री. तलरेजा विनोद
४ . श्री. ठाकुर वेहरानी
५ . श्री. केणी जयकुमार
६ . श्री. टाले प्रमोद

प्रस्तावाच्या विरोधात जे सदस्य आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

१ . श्री. पारवानी रामचंद्र
२ . श्रीमती. राधवानी आशा
३ श्रीमती. राजानी भारती
४ . श्रीमती. वेलकर सुरेखा
५ . श्रीमती. सोनावणे यमुना
६ श्री. रमेश चव्हाण

ठरावाच्या बाजुने ६ व विरोधात ६ मते असल्याने या प्रस्तावाबाबत सभापतींचे निर्णयक मत घ्यावे लागेल.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>मी माझे निर्णयक मत प्रस्तावाच्या बाजुने देत आहे. त्यामुळे प्रस्तावाच्या बाजुने ७ व विरोधात ६ मते होत असल्याने सदरचा ठराव बहुमताने पारीत झाल्याचे मी जाहिर करते.

<u>विषय :-</u> एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र.१ अंतर्गत रस्ता क्र. ४ अ ,ब ,क ,ड या मानेरा जंक्शन पर्यंत रस्त्यांचे रूंदीकरण व सुधारणा करणे कामी सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-१ अंतर्गत उल्हासनगर-४ येथील वाको जंक्शन ते बॅरेक क्र. १६१० ते मानेरा जंक्शन पर्यंतचे काम महानगरपालिकेने हाती घेतलेले आहे या कामाची कार्यवाही करताना वाकोजंक्शन ते व्ही.टी.सी या 4ab या रस्त्याच्या कामामध्ये २००मी. लांबीचा न्यु सिंध विव्हींग मील ते मुख्य रस्ता हा तुकडा हाती घेतला होता. या कामास प्राथमिक मान्यता घेतलेली आहे. त्यापुढील व्ही.टी.सी. ते बॅरेक क्र. १६१० या ४ क या भागातील कामांमध्ये काही फक्त ३ . २६ टक्केने वाढ झालेली आहे.त्यापुढील बॅरेक क्र. १६१० ते मानेरा जंक्शन पर्यंतच्या



भरणी कामात वाढ झालेली असुन खडीकरणाच्या कामापुर्वी G.S.B. Layer टाकणे करिता सल्ला या कामाचे तांत्रिक सल्लागाराने दिलेला होता त्यानुसार सदर जास्तीचा थर टाकण्यांत आलेला आहे. सदरचा रस्ता पावसाळयापुर्वी B.B.M. थरापर्यंत मानेरा जंक्शन पर्यंतचा झालेला होता. परंतु नव्याने केलेल्या भरणीमुळे सदर रस्त्यात पावसाळयानंतर खड्डे पडले होते. ज्यांची दुरूस्ती खडीकरणाने बुजवून त्यावर L.B.M. चा थर देण्यात आलेला आहे. ज्याची तरतुद मुळ प्राकलनात नाही. या कारणामुळे या भागातील वाढ झालेली आहे. अशा प्रकारे मुळ रस्त्याच्या कामात वाढ झालेली आहे.

एकात्मिक रस्ता सदर 4ab , 4 c, 4d या रस्त्याच्या जेथुन सुरूवात होते त्यापुर्वीचा म्हणजे श्रीराम थेटर ते वाकोजंक्शन पर्यंतचा दोन चौकांना जोडणार व वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत गजबजलेला, दुतर्फा दुकाने असलेला रस्ता हाती घेण्याचा प्रस्ताव लोकप्रतिनिधीच्या व मा. महापौर, व उपमहापौर स्थानिक नगरसेवक यांच्या मागणी नुसार सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्याकरिता तयार करण्यात आलेला आहे. सदर रस्ता उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे गजबजलेला असल्याने वेळोवेळी डांबरीकरण करूनसुध्दा वारंवार खराब होत असतो. तसेच या रस्त्याचे जोड रस्ते जसे की, श्रीराम कडुन कल्याण महानगरपालिका हद्दीतुन येणारा रस्ता, पवई पुलाचे जोड रस्ते ज्यांचे काम प्रगती पथावर आहे. वाकोजंक्शन ते व्ही.टी.सी कडे जाणारा रस्ता हे सर्व वाकोजंक्शन हा तुकडा सिमेंट कॉंक्रिटीकरणाने बांधल्यास वारंवार कार्यवाही होणेकरिता सदर काम 4ab या कामाचे कंत्राटदार मेसर्स डी.एस. कंन्स्ट्रक्शन यांचेकडुन करून घेणेकरिता प्रस्तावास मा. मुख्य लेखाअधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केलेली असुन मा. आयुक्त यांनी सदर प्रस्तावास दिनांक. २०.१२.२००१ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर श्रीराम थेटर ते वाकोजंक्शन हे काम रूपये २५,३८,७०७/- प्राकलनिय किंमतीचे आहे. सदर कामामुळे व उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे मुळ कामात होणारी वाढ त्यामुळे मुळ रस्ता क्र. 4ab, 4c,4d या कामाची किंमत सुधारित प्राकलनानुसार रूपये ४,६०,६९,३११/- इतके होत आहे. सदर वाढीव खर्चाचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| Section of road No.4 | Sanctioned Cost | Working Estimate cost | Addition work cost | Total revised cost |
|---|---|---|---|---|
| 4ab | Rs.17246932/- | Rs.18531094/- | Rs.2538707/- | Rs.21069804/- |
| 4c | Rs.5630941/- | Rs.5815000/- | | Rs.5815000/- |
| 4d | Rs.15534100/- | Rs.17736121/- | Rs.1448385/- | Rs.19184507/- |
| TOTAL | Rs.38411973/- | Rs.42082217/- | Rs.3987092/- | Rs.46069311/- |

सदर कामास मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केली आहे. तरी सदर कामाचे सुधारित प्राकलनास रू.४,६०,६९,३११/- एवढया किंमतीस सुधारित प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेसाठी स्थायी समिती पुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

--३२--

<u>स्थायी समिती ठराव क्र.७८</u> <u>दिनांकः-३१ . १२ . २००१</u>

सुचकाचे नाव :-श्री. बहरानी ठाकुरदास

अनुमोदकाचे नाव :- श्री. केणी जयकुमार

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र. १ अंतर्गत रस्ता क्र. ४ अब, ४क व ४ड या मानेरा जंक्शन पर्यंतच्या रस्त्यांचे रूंदीकरण व सुधारणा करण्याकामी उपरोक्त रक्कमांच्या सुधारीत प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही-

**बहुमताने मंजुर**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-आपणा सर्वांची समंती असेल तर आयत्त्यावेळच्या विषयान्वये मी एक प्रस्ताव चर्चेस आणु इच्छितो.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-आयुक्तांनी आयत्त्यावेळच्या विषयान्वये चर्चेस आणलेला प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत आहे.

मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-हा प्रस्ताव आयत्त्यावेळच्या विषयान्वये न आणता सेभेच्या नियमित सभा सुचनेवर आणला जावा.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-साहेब या प्रस्तावाचे स्पष्टीकरण केले जावे.

श्री.कारचे (उपअयुक्त आरोग्य):-सन २००१-२००२या वर्षासाठी जंतुनाशके /किटकनाशके व साफसफाईचे साहित्त्य मागविण्याकामी निविदा मागविण्यात आल्या होत्त्या.

निविदा क्रमांक १ मधील १९ बाबीपैकी १८ बाबीमध्ये न्युनतम दाराची निविदा प्राप्त झाली आहे. निविदा क. २ मध्ये ३२बाबी पैकी ७ बाबीमध्ये न्युनतम दराची निविदा प्राप्त झाली असुन ती स्विकृत करण्यासाठी शिफारस करण्यांत आली आहे. चालु वर्षात हे साहित्त्य मागविण्यांत आले नव्हते. मागील वर्षाचेच साहित्त्य आजपर्यंत वारण्यात आले या पुढील कालावधीसाठी हे साहित्त्य मागविणे आवश्यक आहे.



मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-हे साहित्त्य कधी पर्यंत येईल?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-निवडणुकीपर्यंत येईल.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येपत आहे.

आयत्त्यावेळचा विषय:-

विषय:- २००१-२००२ सालाकरिता जंतु नाशके /किटक नाशके व सफाई कामाचे साहित्त्य खरेदी करणे बाबत.

प्रस्तावना :-

सार्वजनिक आरोग्य विभाग, उल्हासनगर महानगरपालिकेसाठी स्वच्छता व साफ सफाईच्या कामासाठी सन २००१-२००२ वर्षाकरिता महापालिकेने जंतुनाशके / किटकनाशक व इतर सफाईचे साहित्त्य पुरवठ्याकरिता उत्त्पादक कंपनीकडुन किंवा उत्त्पादक कंपनीच्या अधिकृत विक्रेत्त्याकडुन निविदा दिनांक १२.११.२००१रोजी मागविण्यात आल्या होत्त्या. सदर निविदा त्याच दिवशी निविदादारकांच्या प्रतिनिधि समोर उघडण्यात आल्या. प्राप्त झालेल्या

निविदेतील दरांचे तुलनात्त्मक दरपत्रक तर तयार करून न्युनत्तम दराच्या निविदाचे दर स्विकारण्यात आले. जंतुनाशके / किटकनाशके पुरवठ्याकरिता व सफाई साहित्त्य पुरवठ्याकरिता अशा दोन निविदातील न्युनत्तम दर स्विकारण्यात आले आहेत. निविदा क्रमांक १ मधील १९ पैकी १८ बाबी व निविदा क्र. २ मधील ३२ पैकी ७ बाबी स्विकृत करण्यात आल्या आहेत. तरी जंतुनाशके /किटकनाशके खरेदी करण्याकरिता एकुण ४३ ,६५ ,५००/- रू. तसेच सफाई कामाकरिता लागणारे साहित्त्य खरेदीच्या रू. ८ ,६५ ,०००/- खर्चाच्या वित्तिय मान्यतेकरिता मा. स्थायी समितीसमोर मंजुरीस सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.७९</u> <u>दिनांकः-३१ . १२ . २००१</u>

सुचकाचे नाव :-श्री. चव्हाण रमेश
अनुमोदकाचे नाव :- श्री. तलरेजा विनोद

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार सन २००१-२००२ सालाकरिता जंतुनाशके, किटकनाशके व सफाई कामाचे साहित्त्य पुरविणेकामी सोबत जोडलेल्या पान क्र. १ ते ५ मधील तुलनात्त्मक तक्त्याचे अनुषंगाने निविदा क्र. १ मधील १९ पैकी १८ बाबी व निविदा क्र. २ मधील ७ बाबींबाबत उपरोक्त न्युनत्तम दराच्या निविदादारांशी आयुक्तांना रू. ५२ ,३० ,५००/- अंतर्भुत खर्चाच्या संविदा करण्यास मान्यता आणि प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--३४--

नुतन वर्ष आपणा सर्वांना आनंदमय व सुख समृध्दीचे जावो. असे म्हणुन सायंकाळी ६. ०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका